**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती.)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**तापी डायव्हर्शन कॅनाल प्रकल्प**

**(1) * 9283 श्री. सुधाकर गणगणे , श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. नानासाहेब बोरस्ते** : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती, अकोला व बुलढाणा या जिल्ह्यामध्ये मोठी सिंचनक्षमता निर्माण करु शकणाऱ्या तापी डायव्हर्शन कॅनॉल प्रकल्पाचे सर्व्हेक्षण तातडीने हाती घेण्यात यावे अशी शासनाला विनंती करणारा एक प्रस्ताव अमरावती जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक 25 जून,2005 रोजी झालेल्या बैठकीमध्ये मंजूर करण्यात आला ही गोष्ट खरी आहे काय,

(2) अकोला शहरामध्ये सन 2005 च्या उन्हाळयामध्ये निर्माण झालेली पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेता तापी डायव्हर्शन कॅनॉल प्रकल्पाबाबत मानचित्रावर (टोपोशिटवर) आधारित अभ्यास ऑगस्ट,2005 पर्यंत सादर करण्यात यावा अशा सूचना मा.राज्यमंत्री पाटबंधारे यांनी त्यांच्या दालनांत दिनांक 20 जुलै,2005 रोजी झालेल्या बैठकीमध्ये विभागाला दिल्या हे खरे आहे काय,

(3) खरे असल्यास सादर करण्यात आलेल्या मानचित्रावरील अभ्यासातून प्रथमदर्शनी काय निष्कर्ष हाती आलेले आहेत,

(4) या प्रकल्पाच्या तपशीलवार सर्वेक्षण व अन्वेषणाची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (1) होय.

(2) होय.

(3) प्रस्तावित उर्ध्व तापी टप्पा-2 (खारीया धुटो घाट) मुळे मेळघाट व्याघ्र प्रकल्प बाधित होत असल्यामुळे पर्याय म्हणून तापी पणन योजना (चिंचघाट धरण) या प्रकल्पाचा मानचित्रावरुन अभ्यास करुन तापी गर्भासंगमाचे खाली चिंचघाट येथे धरण घेण्याची शक्यता आढळून आलेली आहे. धरणाच्या डाव्या तिरावरुन कालवा काढल्यास अमरावती व अकोला जिल्ह्यातील क्षेत्रात सिंचनाचा लाभ होईल, असे दिसते. सदर योजना आंतरराज्य योजना असून याबाबत मध्यप्रदेश शासनाची चर्चा होणे आवश्यक आहे. त्याकरीता एक अभ्यास गट स्थापन करण्यात आला असून योजनेबाबत प्राथमिक अभ्यास सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. **9283**.......

(4) सदर योजनेबाबत मध्यप्रदेश शासनाची चर्चा झाल्यानंतर योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो :--

" प्रश्न क्र. 3 च्या उत्तरातील दुसऱ्या ओळीत "तापी पणन योजना" या शब्दाऐवजी "तापी वळण योजना" आणि तिसऱ्या ओळीमध्ये "तापी गर्भासंगमाचे" याऐवजी "तापी गर्गासंगमाचे" असा शब्दप्रयोग करावा, बाकी छापल्याप्रमाणे.

श्री सुधाकर गणगणे : सभापती महोदय, तापी खोऱ्यासंबंधीचा हा प्रश्न पश्चिम विदर्भाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असा प्रश्न आहे तसेच सिंचनाचा अनुशेष भरण्यासंबंधी देखील अत्यंत आवश्यक असा प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात म्हटले आहे की, याबाबत अभ्यास गट स्थापन करण्यात आला असून योजनेबाबत प्राथमिक अभ्यास सुरु आहे. माझा प्रश्न असा आहे की, या अभ्यास गटाचे काम केंव्हा पूर्ण होणार आहे आणि किती कालावधी या प्रकल्पाबाबतचे सर्वेक्षण पूर्ण होणार आहे ?

डॉ. सुनील देशमुख : महोदय, हा आंतरराज्यीय प्रकल्प असून महाराष्ट्र व मध्यप्रदेशचे सचिव, मंत्री तसेच मुख्यमंत्री स्तरावर या प्रकल्पाबाबतच्या बैठका होतात म्हणून याबाबतचा अभ्यास करण्यासाठी 19 ऑक्टोबर, 2000 ला एका अभ्यास गटाची निर्मिती केलेली आहे. या अभ्यास गटाची पहिली बैठक 8.12.2005 रोजी झालेली असून पुढील तीन महिन्याच्या आत यासंबंधीचा निर्णय घेऊन मंत्रिमंडळासमोर द्यावयाचा असे ठरले आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : महोदय, विदर्भातील अमरावती आणि अकोला या दोन जिल्हयांना या प्रकल्पामुळे होणाऱ्या सिंचनाचा फायदा होणार आहे. खरे तर हे दोन्ही जिल्हे दुर्देवी आहेत. अमरावती जिल्हयाबाबत सांगावयाचे झाले तर सन 1982 च्या स्तरावर 134 हजार हेक्टर, सन 1990 च्या स्तरावर 169 हजार हेक्टर, 1992 च्या स्तरावर 174 हजार हेक्टर आणि 1994 च्या स्तरावर 219 हेक्टर, अकोला जिल्हयाबाबत सांगावयाचे तर 1990 च्या स्तरावर 92 हजार हेक्टर, 1992 मध्ये 144 हजार हेक्टर, 1994 च्या स्तरावर 181 हजार हेक्टर आणि 2004 च्या स्तरावर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A-3

PFK/ SBT/ MHM/ पूर्वी कु. थोरात.... 11:00

प्रा. बी.टी.देशमुख ....... ता. प्र. क्र. 9283........

217 हजार हेक्टरचा अनुशेष असून सतत पहिल्या व दुसऱ्या क्रमांकावर या जिल्हयांचा अनुशेष राहिला आहे. पाटबंधारे विभागाने माननीय राज्यपालांना असे कळविले होते की, या जिल्हयातील अनुशेष दूर होऊ शकतो. हा आंतरराज्यीय प्रकल्प असल्यामुळे मध्यप्रदेश शासनाबरोबर चर्चा करणे आवश्यक आहे, ती शासनाने जरुर करावी परंतु केवळ तेवढयासाठी या प्रकल्पाचे सर्वेक्षण आणि अन्वेषण अडून राहता कामा नये. अपवाद म्हणून शासनाचे या कामासाठी 5-10 लाख रुपये वाया जातील, त्याचा विचार करु नये परंतु सर्वेक्षणाचे काम आणि मध्यप्रदेश शासनाबरोबर चर्चा हया दोन्ही गोष्टी सायमलटेनियसली कराव्यात. नॉर्मली आपण चर्चा झाल्यानंतर हे करीत असतो म्हणून माझी मागणी आहे की, एका बाजूला मध्यप्रदेश सरकारबरोबर चर्चा सुरु असतांना या प्रकल्पाचे सर्वेक्षण आणि अन्वेषण करण्यासाठी सक्तीचे आदेश शासनाकडून दिले जातील काय ?

श्री. अजित पवार : महोदय, हे फक्त आपल्या राज्याशीच संबंधित असते तर सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी म्हटल्याप्रमाणे करण्यामध्ये अडचण आली नसती. हा आपल्या राज्यातील विदर्भ आणि खानदेश या दोन भागांशी निगडीत असा महत्वाचा प्रश्न आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 9283.....

श्री. अजित पवार ......

विदर्भातील सर्व लोकप्रतिनधींना हा प्रकल्प व्हावा असे वाटते तसेच ज्या ठिकाणी पाणी असते ते पाणी त्याच भागाला मिळावे अशी सर्वांची भावना असते, तीच भावना विदर्भातील लोकप्रतिनिधींची आणि तशीच भावना जलसंपदा विभागाची आणि राज्यशासनाची देखील आहे. हा प्रकल्प आंतरराज्यीय प्रकल्प असून या प्रकल्पाच्या संदर्भात आपल्याला मध्यप्रदेश सरकारशी चर्चा करावी लागणार आहे. ज्या भागात पाणी फार कमी आहे अशा ठिकाणी हा प्रकल्प होणार आहे. हे सर्व करीत असतांना मुख्य अभियंत्यांच्या उपस्थितीत या अभ्यास गटाची पहिली बैठक 8.12.2005 रोजी झालेली आहे. तसेच दुसरी बैठक या महिन्याच्या तिस-या-चवथ्या आठवडयात घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपल्या राज्याचे माननीय मुख्यमंत्री तसेच मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री हे या प्रकल्पाच्या संदर्भात मार्ग काढण्यासाठी लवकरच बैठक घेणार आहेत. खरे म्हणजे या बैठकीला तसा विलंबही झालेला आहे. तसेच हा प्रकल्प व्हावा म्हणून महाराष्ट्र राज्याचे चिफ इंजिनिअर आणि मध्यप्रदेश राज्याचे चिफ इंजिनिअर आणि अधिकारी वर्ग यांच्या अभ्यास गटाची निर्मिती करण्यात आलेली आहे. यामध्ये शासनाच्या प्रधान सचिव स्तरावर तसेच मध्यप्रदेश सरकारच्या प्रधान सचिवांच्या पातळीवर आणि दोन्ही राज्याच्या मुख्य अभियंताच्या स्तरावर ही बैठक बोलावली जाणार आहे. ही बैठक झाली तर माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख साहेब म्हणता त्या प्रमाणे पुढील कार्यवाही जलसंपदा विभाग करेल.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मी जो प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. माझ्या मते या प्रकल्पाचे सर्वेक्षण करण्यास काहीही हरकत नाही. जर या प्रकल्पाच्या कामाचे सर्वेक्षण सुरु केले तर प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ लवकर करणे सहज शक्य होईल.

श्री. अजित पवार : सर्वेक्षण सुरु करण्यास हरकत नाही परंतु हा प्रकल्प आंतरराज्यीय स्वरुपाचा प्रकल्प आहे. मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, येत्या 3-4 आठवडयात यासंदर्भात दुसरी बैठक घेण्यात येईल. या बैठकीमध्ये मध्यप्रदेश सरकारचे पॉझीटीव्ह मत झाले तर ताबडतोब सर्व कामे करता येईल. मध्यप्रदेश सरकारची संमती न घेता सर्वेक्षण सुरु केले आणि त्यातून नवीन काही प्रश्न निर्माण झाला तर सगळेच काम थांबण्याची शक्यता देखील आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 9283..... श्री. अजित पवार ......

त्यामुळे मी म्हणालो आहे की, हा प्रकल्प व्हावा ही जशी विदर्भातील लोकप्रतिनिधींची भावना आहे तशीच भावना राज्यशासनाची आणि जलसंपदा विभागाची देखील आहे. हा प्रकल्प व्हावा म्हणून आम्ही कामाला सुरुवात देखील केलेली आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अमरावती आणि अकोला या जिल्हयांमध्ये जलसिंचनाचा अनुशेष मोठा आहे. जळगाव जिल्हा या बाबतीत 82 मध्ये सरप्लस होता तसेच 1990,1992 व 1994 च्या राज्य सरासरीवर सुध्दा सरप्लस होता. त्यामुळे माझी माननीय मंत्रीमहोदयांना एकच विनंती आहे की, हा आंतरराज्यीय प्रकल्प असल्यामुळे आपण मध्यप्रदेश सरकारची जरुर सहमती घ्या परंतु एका बाजूला या प्रकल्पाच्या संदर्भातील मध्य प्रदेशाच्या सहमतीची प्रोसेस चालू असतांना दुसरीकडे सर्वेक्षण आणि अन्वेषण चालू करण्याच्या संदर्भात आदेश देण्यामध्ये काय अडचण आहे जर तशा प्रकारची अडचण नसेल तर सर्वेक्षण आणि अन्वेषण सुरु करण्याचे आदेश देण्यास काय हरकत आहे?

श्री. अजित पवार : यासंदर्भात विधि व न्याय विभागाशी सल्ला-मसलत करुन या प्रकल्पाच्या सर्वेक्षणाच्या कामाला सुरुवात केली तर दुसरे काही प्रश्न निर्माण होणार नाहीत ना यासंदर्भात शहानिशा करुन घेतली जाईल. त्यांनी जर सांगितले की, असे करण्यामध्ये अडचण येणार नाही तर सर्वेक्षणाच्या कामाला सुरुवात करता येईल.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) C1

BGO/ SBT/ MHM/ 11:10

ता.प्र.क्र.9283...

श्री.अजित पवार...

तर तशा पध्दतीने जल संपदा विभाग त्याबाबतीत कारवाई करील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सल्ला घेतल्यानंतर शासन 8 दिवसांमध्ये, एक महिन्यामध्ये आपली कारवाई पूर्ण करणार आहे का ?.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, प्रत्येक बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.देशमुख हे मुदत घालण्याचा प्रयत्न करीत असतात. जल संपदा विभागालासुध्दा हा प्रकल्प व्हावा असे वाटते. या प्रकल्पाचा दोन राज्यांशी संबंध आहे. त्यामुळे भविष्यात नवीन प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून आपल्या विधि व न्याय विभागाने पुढच्या प्रोसेससंबंधी मत व्यक्त केले तर दिनांक 31 जानेवारी 2006 पर्यंत त्यासंबंधी आदेश दिले जातील.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, पश्चिम विदर्भातील हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे, याची जाणीव शासनाला आहे. हा आंतरराज्य प्रकल्प आहे, हे खरे आहे. त्यासाठी अभ्यास गट तयार करण्यात आला आहे. जशी आपल्याला या प्रकल्पाची गरज आहे, तशी मध्य प्रदेशला देखील गरज आहे की नाही ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तेव्हा मध्य प्रदेश शासनाच्या जल संपदा विभागाशी लवकरात लवकर संपर्क साधून या प्रकल्पाला गतिमान कसे करता येईल या दृष्टिकोनातून आमचा जलसंपदा विभाग विशेष प्रयत्न करणार आहे का ? तसेच, प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारल्या प्रमाणे सर्वेक्षणाच्या कामासंबंधीची प्रोसेस सुरू करण्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, या दोन्ही प्रश्नांची उत्तरे राज्यमंत्री महोदयांनी दिलेली आहेत. अभ्यास गट स्थापन केल्यानंतर मुख्य अभियंता यांच्या स्तरावर दिनांक 8 डिसेंबर .2005 रोजी झाली. हे जे धरण आहे ते मध्य प्रदेशच्या जागेवर आहे. त्यासाठी मध्य प्रदेश शासनाची परवानगी घ्यावी लागेल. हा प्रकल्प झाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे. त्यामुळे सर्व स्तरावर पाठपुरावा आम्ही सुरू केला आहे. सदर अधिवेशन संपल्यानंतर मुख्यमंत्री स्तरावर बैठक घेण्याचा देखील प्रयत्न केला जाईल.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) C2

BGO/ SBT/ MHM/ 11:10

**उर्ध्व मोर्णा प्रकल्पाचे कामाची सद्य:स्थिती**

**(२) * १०११२ श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्ही. यू. डायगव्हाणे , श्री. नानासाहेब बोरस्ते : तारांकित प्रश्न क्रमांक ५९९२ ला दिनांक १४ जुलै, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्णा नदीच्या पुरापासून अकोला शहर व परिसराचा बचाव व्हावा म्हणून अकोला पूर संरक्षणाच्या कामी उपयुक्त ठरलेल्या उर्ध्व मोर्णा प्रकल्पाच्या विविध उप कामाच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) दिनांक ३१ मार्च, २००५ पावेतो या प्रकल्पावर वर्षवार किती खर्च करण्यात आलेला आहे,

(३) या आर्थिक वर्षात आतापावेतो प्रत्यक्ष किती खर्च करण्यात आला आहे ?

**डॉ.सुनील देशमुख,श्री. अजित पवार यांच्याकरिता :** (१) उर्ध्व मोर्णा प्रकल्पाच्या (संग्राहक तलाव) बांधकामाची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

१) माती धरण - धरणाचे मातीकाम घळभरणीसह पूर्ण झाले आहे.
२) सांडवा - बांधकाम पूर्ण
३) आगमन व पुच्छ कालवा - पूर्ण
४) सिंचन विमोचक - पूर्ण
५) पुनर्वसन - बुडीत क्षेत्रामुळे बाधीत गोकसावंगी पुनर्वसीत गावठाणातील नागरी सुविधाची कामे प्रगतीत.

(२) प्रकल्पावर ३१.३.२००५ पावेतो वर्षवार झालेला खर्च पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | खर्च (रुपये लक्ष मध्ये) |
|---|---|
| १) सन १९९६-९७ | ४२.०३ |
| २) सन १९९७-९८ | १८१.३१ |
| ३) सन १९९८-९९ | २७१.२९ |
| ४) सन १९९९-२००० | २५.५६ |
| ५) सन २०००-२००१ | ४६.४७ |
| ६) सन २००१-२००२ | ३७.९८ |
| ७) सन २००२-२००३ | २९.६२ |
| ८) सन २००३-२००४ | ११९.६८ |
| ९) सन २००४-२००५ | २६९.३५ |
| एकूण | ११२३.२९ लक्ष रुपये |

(३) सन २००५-०६ या आर्थिक वर्षात १०/२००५ अखेर रु. २७३.५७ लक्ष खर्च झालेला आहे.

----------

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, अकोला शहर आणि शहराच्या आजूबाजूचा परिसर याचा मोर्णा नदीच्या पुरापासून बचाव व्हावा म्हणून उर्ध्व मोर्णा प्रकल्प आहे. येथे मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे, ते समाधानकारक आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, हे काम पूर्ण होण्यासाठी अजून किती निधीची आवश्यकता आहे आणि सदर काम किती दिवसात पूर्ण होणार आहे ?

डॉ.सुनील देशमुख : सदर प्रकल्पाचे काम जून 2006 पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी आपण 5 कोटी 95 लाखाचे नियोजन चालू वर्षामध्ये केलेले आहे. यापैकी आतापर्यंत 2 कोटी 73 लाख इतका खर्च झालेला आहे. उर्वरित निधी सन जून 2006 पर्यंत खर्च करून काम पूर्णत्वास नेले जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, पूर नियंत्रित व्हावा म्हणून सदर प्रकल्प सुरू केलेला आहे. उर्ध्व मोर्णा प्रकल्प हा अकोल्याच्या वर असलेला प्रकल्प आहे. गेल्या उन्हाळयामध्ये येथे अत्यंत वाईट अवस्था होती. आता मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले आहे की, जून 2006 मध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण होणार आहे. गेल्या वर्षी येथील गावांवर संकट आले होते. तेव्हा या प्रकल्पावर निश्चितपणे किती निधी खर्च होणार आहे आणि जून 2006 पर्यंत काम पूर्ण करण्यासंबंधीचे सक्त आदेश शासन देणार आहे का ?

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र..10112........

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आताच सांगितल्याप्रमाणे हे धरण जून 2006 पर्यंत पूर्ण होईल. या धरणासाठी 5 कोटी 95 लाख खर्च अपेक्षित असून आतापर्यंत 2 कोटी 73 लाख इतका खर्च झालेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ऊर्ध्व मोर्णा हा मोर्णा नदीवरील प्रकल्प आहे. तीन-चार वर्षापूर्वी मोर्णा नदीला महापूर आला होता. त्यामुळे अशा पुराचे नियंत्रण व्हावे यासाठी उर्ध्व मोर्णा प्रकल्प घेण्यात आला. दगडपारवा नदी सुध्दा मोर्णा नदीला येऊन मिळते. दगडपारवा प्रकल्पास सुरुवात झालेली आहे, पण त्या प्रकल्पाचे काम निधी अभावी रखडलेले आहे. या कामासाठी आपण निधी उपलब्ध करुन देणार आहात काय ? कोकसावंगी गाव बाधित झालेले आहे. या गावाच्या पुनर्वसनाचे काम संथ गतीने सुरु आहे. तेव्हा हे काम गतीने सुरु होण्यासाठी आपण निधी उपलब्ध करुन देणार आहात काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो दगडपारवा प्रकल्पासंबंधी प्रश्न विचारला तो या प्रश्नाशी संबंधित नाही....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अकोला पूर संरक्षणाच्या कामामध्ये दगडपारवा प्रकल्पाचे काम आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, या प्रकल्पाचे काम जून 2006 पर्यंत पूर्ण करणार आहोत. या प्रकल्पासाठी 6 कोटी रुपये खर्च असून निधी अभावी आम्ही विदर्भ सिंचन महामंडळाकडून चार कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. हे काम जून 2006 पर्यंत पूर्ण होईल. आतापर्यंत 2 कोटी 73 लाख रुपये खर्च झालेला आहे. 1 कोटी 25 लाख रुपये पुनर्वसनाच्या कामसाठी ठेवलेले आहेत. त्या गावाचे पुनर्वसन करण्यात येईल.

-----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.ओटवणेकर........ 11:15

**निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकाम**

**(3) * 9296 श्री. रमेश निकोसे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते : तारांकित प्रश्न क्रमांक 5698 ला दिनांक 14 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 12 ऑगस्ट, 2004 च्या शासन निर्णयान्वये रुपये 161.17 कोटी किमतीला प्रशासकिय मान्यता प्राप्त निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असल्याने प्रकल्पाच्या निविदा निश्‍चितीमध्ये निश्‍चित कोणत्या अडचणी आहेत,

(2) असल्यास, जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्याच्या दृष्टीने या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(3) उपाययोजना केलेली नसल्यास त्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुनील देशमुख,श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (1) निम्न पेढी प्रकल्पाची निविदा काढण्यात आलेली आहे.

(2) प्रत्यक्ष बांधकाम सुरुवात करण्याचे दृष्टीने पुनर्वसन कायद्या अंतर्गत कलम-11 (1) ची सुचना दिनांक 22.9.2005 रोजी प्रसिद्ध झालेली असून भूसंपादन प्रस्तावाबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, निम्नपेढी प्रकल्पास दिनांक 12 ऑगस्ट 2004 रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली. हा मिडीयम प्रोजेक्ट आहे. या संदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. या प्रकल्पाची वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे काय ? नसल्यास ती केव्हा देणार आहात ? मोठे प्रोजेक्ट तीन-चार वर्षात पूर्ण होतात. तेव्हा आपण हा प्रकल्प किती वर्षात पूर्ण करणार आहात ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, या प्रकल्पाच्या निविदा काढलेल्या आहेत. दिनांक 6 जानेवारी 2006 रोजी या निविदा उघडण्यात येणार आहेत. हे सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर मार्च अखेरपर्यंत प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येईल. हा प्रकल्प साधारणत: सहा वर्षात पूर्ण करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्रिमहोदयांनी मार्च अखेरपर्यंत कामास सुरुवात करण्यात येईल असे सांगितले. तेव्हा 31 मार्च पर्यंत प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल अशा प्रकारचे ठाम आदेश विभागाला देण्यात येतील काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, विभागाला तसे ठाम आदेश देण्यात येतील.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9296 .

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, या भागातील शेतकरी शेतीसाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात, त्यामुळे शेतीमध्ये क्षार जमा होतात. तेव्हा याबाबतची चाचणी शासनाने केली आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, ही चाचणी पूर्ण झाल्यानंतरच प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य जे म्हणता त्याप्रमाणे काही घडणार नाही.

----------

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्हयातील आदिवासी मजुराला रोजगार ओळखपत्र वितरित करण्याबाबत**

**(४) * १२४०९ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , डॉ. अशोक मोडक , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: ठाणे जिल्हयातील आदिवासींच्या सर्वकर्ष विकासाच्या दृष्टीने रायगड जिल्हयातील चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वंचित ऐच्छिक आदिवासी मजुराला त्यांच्या गावातच रोजगार मिळवून देण्याबाबत सुमारे १० हजार पात्र आदिवासी मजुरांच्या याद्या संबंधित तहसिलदारांकडे सादर करुन रोजगार ओळखपत्र वितरित करण्याची मागणी ठाणे जिल्हयातील श्रमजीवी संघटनेने दिनांक ३० सप्टेंबर, २००५ वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १० हजार आदिवासीपैकी किती पात्र आदिवासींना रोजगाराचे ओळखपत्र वितरण करण्यात आले व किती जणांचे ओळखपत्र प्रस्ताव विचाराधीन आहे,

(३) सदर प्रकरणी रोजगाराचे ओळखपत्र वितरण करण्याबाबत प्रक्रियेची साप्रत सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील,श्री.हर्षवर्धन पाटील याच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) ठाणे जिल्ह्यात प्राप्त झालेल्या एकूण १७,१३१ ओळखपत्र प्रस्तावांपैकी १५.५३४ ओळखपत्रे रोहयो नियमाखाली वितरित केली आहेत. उर्वरित १,५९७ जणांचे ओळखपत्र प्रस्ताव विचाराधीन आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील ज्या आदिवासी बांधवांना ओळखपत्रे देण्यात आलेली आहेत. त्यांना रोजगार उपलब्ध करुन दिला आहे काय ? दिला असल्यास कधी दिला आहे ? आणि दिला नसल्यास केव्हा उपलब्ध करुन दिला जाणार आहे ? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, 1597 आदिवासी बांधवांना अजूनही ओळखपत्रे वितरित करण्यात आलेली नाहीत ती त्यांना केव्हा वितरित करण्यात येणार आहेत ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : ज्या मजुरांना ओळखपत्रे द्यावयाची होती अशा मजुरांची एकूण संख्या 17 हजार 131 इतकी होती त्यापैकी 15 हजार 607 मजुरांना ओळखपत्रे देण्यात आलेली आहेत. 1 हजार 524 मजुरांना ओळखपत्रे देण्याच्या बाबतीत काही माहिती तहसीलदासरांकडून अपेक्षित आहे. येत्या महिन्याभरामध्ये त्या मजुरांनासुध्दा ओळखपत्रे देण्यात येतील . तसेच आजपर्यन्त 13 हजार 518 मजुरांना कामे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

श्री.वसंतराव चव्हाण : या प्रश्नाच्या अनुषंगाने मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, रोजगार हमी योजनेखाली काम करणा-या मजुरांना ओळखपत्रे

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12409 श्री.चव्हाण ...

इतर जिल्हयातसुध्दा देण्यात आलेली आहेत परंतु नांदेड जिल्हयात काही ठिकाणी ही ओळखपत्रे द्यावयाची राहिलेली आहेत तेव्हा नांदेड जिल्हयात ही ओळखपत्रे केव्हा देण्यात येणार आहेत ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : रोजगार हमी योजनेच्या कायद्यातील तरतुदीनुसार फॉर्म नंबर एक नुसार संबंधित व्यक्तीला अर्ज करावा लागतो. त्यानंतर रोजगारासाठी त्या मजुरांना ओळखपत्र देण्यात येते. हे ओळखपत्र देत असतांना संबंधित व्यक्ती कोणत्या ठिकाणी राहते तसेच त्याचे वय काय आहे या बाबी तपासून पहाव्या लागतात त्यासाठी थोडा विलंब लागत असतो. संबंधित व्यक्तीने अर्ज केल्यानंतर पंधरा दिवसात ओळखपत्र देण्यासबंधी खबरदारी घेण्यात येईल.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय,माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना सांगितले की,"15 हजार 534 आदिवासी मजुरांना ओळखपत्रे देण्यात आली आहेत तसेच या मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे." गेल्या वर्षी रोजगार हमी योजना समितीने ठाणे जिल्हयाला भेट दिली होती. या समितीचा एक सदस्य या नात्याने मी सुध्दा ठाणे जिल्हयातील वाडा भागात रोजगार हमी योजनेच्या कामांना भेट दिली होती.त्यावेळी मला अशी माहिती देण्यात आली होती की,"आदिवासी भागातील काही मजुरांना ओळखपत्रे देण्यात आलेली नाहीत " आता माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना असे सांगितले की, त्या मजुरांना ओळखपत्रे देण्यात आलेली आहेत तेव्हा या दोन्ही उत्तरातील माहिती पैकी कोणती माहिती खरी आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील :आता जी माहिती मी दिलेली आहे ती माहिती खरी आहे.सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यात ओळखपत्रांची मागणी करण्यात आली होती.25 सप्टेंबर 2005 ला मागणी करण्यात आल्यानंतर 15 हजार 534 मजुरांना ओळखपत्रे दिली होती त्या व्यतिरिक्त जवळजवळ एक एप्रिल 2004 पासून दर महिन्याला किती मजुरांना ओळखपत्रे देण्यात आली होती त्याची आकडेवारी माझ्याकडे आहे. ती आकडेवारी मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.ठाणे जिल्हयात 23 हजार 684 मजुरांना दर दिवशी काम देण्यात आले होते.

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, तिस-या प्रश्नाच्या उत्तरात असे सांगण्यात आलेले आहे की, "उर्वरित 1 हजार 597 जणांचे ओळखपत्र प्रस्ताव विचाराधीन आहे." याबाबतीत मला माननीय मत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या 1 हजार 597 मजुरांना ओळखपत्रे किती दिवसात देण्यात येणार आहेत ?त्याचबरोबर त्यांचे ओळखपत्र देण्याचे प्रस्ताव विचाराधीन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असण्याची कारणे काय आहेत ? त्यांनी कागदपत्राची पूर्तता केलेली नव्हती काय ? हे प्रस्ताव किती दिवसापासून विचाराधीन होते ?

श्री.हर्षवर्धन पाटील :1 हजार 524 ओळखपत्रे वितरीत करण्याचे काम बाकी आहे.महिना भरामध्ये सर्व मजुरांना ओळखपत्रे देण्याचे काम पूर्ण केले जाईल. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसंबंधीचा जो कायदा आहे त्यानुसार राज्यात ज्या ज्या ठिकाणी ही योजना राबविण्यात येते त्या त्या ठिकाणच्या मजुरांना ओळखपत्रे देण्याचे बंधन घालण्यात आलेले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : ठाणे जिल्हयातील आदिवासींच्या सर्वकष विकासाच्या दृष्टीने रायगड जिल्हयातील चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वंचित ऐच्छिक आदिवासी मजुरांना त्यांच्या गावातच रोजगार मिळवून देण्याबाबत मागणी करण्यात आली होती. ठाणे जिल्हयातील आदिवासी भागात जे मजूर आहेत ते मोठया संख्येने वीट भट्टयांमध्ये काम करण्यासाठी रायगड जिल्हयामध्ये येत असतात.तेव्हा या मजुरांना त्याच भागात काम उपलब्ध करुन दिले तर ते इतर जिल्हयात काम करण्यासाठी जाणार नाहीत.तेव्हा जे आदिवासी मजूर आपल्या भागातच काम करु इच्छितात त्यांना त्या भागातच काम उपलब्ध करुन दिले जाणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील :ठाणे जिल्हयाचा 2005 सालचा जो आराखडा तयार करण्यात आला होता त्यानुसार 80 कोटी रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आलेली आहे आणि आदिवासी भागातील मजुरांना 2 ते 5 मिलोमीटर्स अंतरापर्यन्त काम देण्याची व्यवस्था केली जाईल.

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 11:25

ता.प्र.क्र.12409 ...

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, ही ओळखपत्रे देण्यामध्ये तहसिल कार्यालयाकडून पूर्तता व्हायला पाहिजे ती अद्याप झालेली नाही असे आता मंत्री महोदयही म्हणतात. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.तरे यांनी ज्या रोजगार हमी योजना समितीच्या ठाणे येथील बैठकीचा उल्लेख करून सांगितले त्या समितीचा मी देखील एक सदस्य आहे. तर त्या बैठकीमध्ये आम्हाला तेव्हाही सांगितले गेले होते की, एक महिन्यात ही सगळी ओळखपत्रे दिली जातील. पण अद्यापही ते काम पूर्ण झालेले नाही. दुसरा मुद्दा असे दिसून आला की, एका कुटुंबामध्ये 5 मजूर असतील तर त्यापैकी केवळ 2-3 जणांनाच काम दिले जाते, बाकीच्यांना काम दिले जात नाही अशा तक्रारी तेथील लोकांकडून आलेल्या आहेत. तेथील स्थानिक ठेकेदार आणि अधिकारी त्यांना सांगतात की, आम्ही कुटुंबातील 2 किंवा 3 माणसांनाच काम देणार. खरे तर हा त्यांचेवर अन्याय आहे. त्यामध्ये सुधारणा व्हायला पाहिजे. आपण जी ओळखपत्रे या मजुरांना देतो त्यावर त्याचा फोटो असला पाहिजे. त्यासाठी त्यावर चौकट दिलेली असते पण फोटो मात्र असत नाही. तेव्हा मुख्य मुद्दा हा की, कुटुंबात जर 5 मजूर असतील तर त्या सगळ्यांना काम मिळाले पाहिजे आणि एक महिन्यात तेथील सर्व लोकांना, मजुरांना ओळखपत्रे दिली पाहिजेत, एक महिन्यात हे काम पूर्ण केले जाणार होते तर ते अद्याप का पूर्ण झाले नाही आणि त्या भागामध्ये जेवढे मजूर असतील त्या सगळ्यांना काम देण्याबद्दलचे आदेश आपण काढणार का ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, राष्ट्रीय रोजगार हमी कायदा आहे त्याप्रमाणे प्रत्येक कुटुंबाला जॉब कार्ड दिले जाणार आहे तसेच वैयक्तिक ओळखपत्र सुद्धा दिले जाणार आहे आणि त्यावर त्या मजुराचा फोटो असणार आहे. तसेच त्यावरील सगळी माहिती आपण कॉम्प्युटराईज करीत आहोत आणि इंटरनेटवरून देखील देणार आहेत. म्हणजे हे सारे ऑनलाईन ठेवल्यामुळे यामध्ये निश्चितपणे पारदर्शकता राहणार आहे. तेव्हा महिनाभरामध्ये हे ओळखपत्र देण्याचे काम आपण पूर्ण करू.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील एकंदर आदिवासींची लोकसंख्या पाहता 17131 हा जो आकडा येथे दिलेला आहे त्यापेक्षाही अधिक आदिवासींची संख्या ठाणे जिल्ह्यात आहेत. तेव्हा ठाणे जिल्ह्यामध्ये खरोखरी आपल्याला प्रभावीपणे ही योजना राबविण्याचा आपला मानस असेल तर या संदर्भात आपले जे काही सर्वेक्षण झाले आहे त्यामध्ये कोठे तरी त्रुटी

..... एफ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. ठाणे जिल्ह्यातील एकंदर असलेली आदिवासींची लोकसंख्या आणि आपण ओळखपत्र दिलेल्या देणार असलेल्या आदिवासींची संख्या यामध्ये मोठी तफावत आहे, आपण फार कमी आदिवासींना ही ओळखपत्रे देत आहात. त्यात त्या जिल्ह्यातील सर्व आदिवासी आलेले नाहीत. तेव्हा सर्वेक्षणात त्रुटी आहे हे आपण मान्य करता का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी हा जो प्रश्न विचारला गेला आहे तो श्रमजीवी संघटनेने जे निवेदन दिले होते त्या संदर्भात विचारला गेला आहे. त्या संघटनेने 18 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर या काळामध्ये 17131 आदिवासी मजुरांना ओळखपत्रे द्यावीत असे निवेदन आपल्याकडे दिले होते आणि त्या अनुषंगानेच हा प्रश्न विचारला गेला आहे. त्यावर आपण उत्तर दिले आहे की, 1500 च्या आसपास मजुरांना ओळखपत्रे दिलेली आहेत. तेव्हा ठाणे जिल्ह्यात बऱ्याचशा तालुक्यांमध्ये आदिवासी एरिया जो आहे त्या भागामध्ये अजूनही आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. परंतु श्रमजीवी संघटनेने दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रश्न आल्याने तेवढ्या पुरते उत्तर आपण येथे दिलेले आहे. तेव्हा बाकी ज्यांची ज्यांची ओळखपत्रासाठी मागणी आहे त्यांचेबाबतीत उपाय योजना करून कार्यवाही करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ज्यांना ओळखपत्र दिलेले आहे त्यांना काम देण्यात आलेले आहे असे येथे आता सांगण्यात आले. परंतु काम झाल्यानंतर त्याचे पेमेंट त्याच दिवशी किंवा लौकरात लौकर होईल याची काळजी शासन घेईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : होय.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा प्रश्न ओळखपत्रांच्या संदर्भात आहे आणि मुळात श्रमजीवी संघटनेने रोजगार हमी योजनेच्या संदर्भात सातत्याने ही मागणी केलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, रोजगार हमी योजनासाठी पुनर्वसन समितीचा अहवाल आपल्याकडे प्राप्त झालेला आहे त्यानुसार यंत्रांद्वारा देखील रो.ह.यो.ची कामे पूर्ण करण्याबाबत मागणी केलेली आहे. यासाठी समर्थन आणि प्रयास या नावाच्या दोन संस्था आहेत त्या दोन्ही संस्थांनी रोजगार हमी योजनेची पाहणी केली आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. तरे आणि श्री.निकोसे यांनी रो.ह.योख संबंधात अनेक तक्रारी मांडल्या आहेत. ....

( यानंतर श्री. सरफरे ....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) G 1

DGS/ SBT/ MHM/ 11:30

ता.प्र.क्र. 12409...

डॉ. नीलम गोऱ्हे...

प्रश्न असा आहे की, प्रयास या संस्थेने केलेल्या वेगवेगळया शिफारशी आणि समर्थन या संस्थेचा अहवाल मी आपणामार्फत शासनाला सादर करीत आहे. त्यावर शासनाने विचार करुन ही रोजगार हमी योजना अधिक कार्यक्षम बनविण्यासाठी ही ओळखपत्र देण्याची योजना प्रत्येक जिल्हावार राबविणार काय? दुसरा प्रश्न असा की, सोलापूरला रोजगार हमी योजनेमध्ये प्रचंड भ्रष्टाचार उघडकीस आला त्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने बोगस सहया केलेल्या दिसल्या. म्हणून या योजनेच्या बाबतीत आपण दक्षता घेणार काय? आणि या दोन्ही अहवालातील शिफारशी शासन स्वीकारील काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न जरी वेगळा असला तरी सांगू इच्छितो की, पुनर्विलोकन समितीचा अहवाल शासनाकडे सादर झाला आहे. तो दोन्ही सभागृहामध्ये ठेवण्यात आला आहे. त्या अहवालामध्ये 42 शिफारशी आहेत. त्या शिफारशींवर सभागृहामध्ये चर्चा केल्यानंतर त्या शिफारशी आपण स्वीकृत करणार आहोत. आपणाकडे ज्या दोन संस्थांचे अहवाल आहेत ते आम्ही निश्चितपणे तपासून पाहून त्या संदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : हा आदिवासी विभागाशी संबंधित प्रश्न आहे. माझ्यासमोर प्रश्नचिन्ह आहे की, आदिवासी विभागातील तरुणांना आपण ओळखपत्र देणार आहात. यामध्ये काम करु शकणारे आणि काम करण्याची क्षमता असणाऱ्या लोकांना आपण ओळखपत्र देणार काय? ओळखपत्र देण्याच्या बाबतीत कोणते निकष लावणार? आपण या ठिकाणी बहुतांशी लोकांना ओळखपत्र मिळेल असे निवेदन केले आहे.जिल्हाधिकारी व मामलेदार यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर आपण सभागृहामध्ये माहिती देत असतांना ओळखपत्रांच्या बाबतीत निकष कोणते ठरविले आहेत?

श्री. हर्षवर्धन पाटील : माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्यांनी अर्ज करावा लागतो तो केल्यानंतर तहसिल यंत्रणा त्याची खातरजमा करुन घेते. त्यांचा रहाण्याचा पत्ता व त्याच्या घरामध्ये मुळात किती लोक मजूरी करण्यासाठी तयार आहेत इत्यादी बाबींची माहिती देण्यासाठी प्रिस्क्राईब फॉर्म तयार केला आहे. तो सादर केल्यानंतर त्यांना ओळखपत्र देतो. मध्यंतरी उच्च न्यायालयामध्ये एक याचिका दाखल करण्यात आली. त्यावर निर्णय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) G 2

DGS/ SBT/ MHM/ 11:30

ता.प्र.क्र. 12409...

श्री. हर्षवर्धन पाटील...

झाला की, आदिवासी विभागामध्ये रोजगार हमी योजनेचे नियम शिथिल करुन त्या भागामध्ये केवळ ओळखपत्रांसाठी न थांबता मागेल त्याला काम ताबडतोब उपलब्ध करुन द्यावे. व त्या भागामध्ये एकेरी पध्दतीने काम सुरु करावे असे आदेश निर्गमित केले आहेत.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात जुलै, २००५ मध्ये झालेल्या पूरामुळे मृत्यूमुखी पडलेल्यांच्या**
**कुटूंबियांना केंद्र व राज्य सरकारची आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(५) * ९३५१ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. श्रीकांत जोशी , श्री. विलास अवचट :** सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुलै, २००५ मध्ये राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या मृत व्यक्तींचा अंतिम आकडा किती होता,

(२) यापैकी किती मृत व्यक्तींच्या कुटूंबियांना राज्य व केंद्र शासनाची मदत मिळालेली आहे,

(३) किती मृत व्यक्तींच्या कुटूंबियांना केंद्र शासनाची मदत मिळालेली नाही व त्याची कारणे काय आहेत,

(४) ज्या मृत व्यक्तींचे मृतदेह सापडलेले नाहीत अशा व्यक्ती किती आहेत व त्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात येत आहे वा आली आहे ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ. पतंगराव कदम यांच्याकरिता :** (१) जुलै, २००५ मध्ये राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे एकूण १०८३ व्यक्ति मृत झाल्या.

(२) एकूण ८७२ मृत व्यक्तिच्या कुटुंबियांना राज्य शासनाची मदत देण्यात आली आहे. ६८० मृत व्यक्तिच्या कुटूंबियांना पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधीतून मदत देण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यापैकी ४६६ प्रकरणात मदत देण्यात आली आहे व २१४ प्रकरणांत मंजूरी अपेक्षित आहे.

(३) वारसांत वाद असणे, मृतांची ओळख न पटणे, इतर राज्यातील व इतर जिल्ह्यातील रहिवासी असणे, बँकेत खाते न काढणे इत्यादी कारणांमुळे ६१७ (२१४+४०३) मृत व्यक्तिच्या कुटुंबियांना केंद्र शासनाची मदत मिळालेली नाही.

(४) सदर आपत्तीमध्ये एकूण ८० व्यक्ति बेपत्ता असल्याचे आढळून आले. सदर बेपत्ता व्यक्तिच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत चौकशी करुन पात्र वारसांना मदत देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** ९३५१ .....**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक ९३५१...

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, छापल्याप्रमाणे. तथापि, मला आपल्या अनुमतीने छापील उत्तरामध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे.

१) दुसऱ्या उत्तरामध्ये "८७२" ऐवजी "८९८" असे वाचावे. "६८०" ऐवजी "६८५" असे वाचावे. "४६६" ऐवजी "६४८" वाचावे. "२१४" ऐवजी "३७" असे वाचावे.

२) तिसऱ्या उत्तरामध्ये "६१७" ऐवजी "४३५" असे वाचावे. तसेच, कंसामध्ये "(२१४+४०३)" ऐवजी "(३७+३९८)" असे वाचावे.

३) चौथ्या उत्तराच्या शेवटी "६२ प्रकरणांमध्ये मदत दिली गेली आहे" असे अतिरिक्त वाक्य समाविष्ट करण्यात यावे. वरील दुरुस्तीसह उत्तर छापल्याप्रमाणे...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जुलै महिन्यात महाराष्ट्रामध्ये प्रचंड अतिवृष्टी झाली आहे. या अतिवृष्टीमुळे १ हजार ८३ व्यक्ती मृत पावल्या आहेत. मृत पावलेल्या व्यक्तींपैकी ६९८ मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना राज्य सरकारने मदत केली आहे. ती मदत केल्यानंतर जवळपास ६८५ प्रकरणे केंद्र सरकारकडे पाठविली आहेत. आणि केंद्र सरकारने त्यामधील ६४८ प्रकरणांमध्ये मदत केली आहे. उर्वरीत प्रकरणांमध्ये वारसामध्ये वाद असणे, मृत व्यक्ती बाहेरच्या जिल्हयातील असणे, मृत व्यक्तीची ओळख न पटणे अशी कारणे पुढे आली आहेत. तेव्हा वारसामध्ये वाद असलेली प्रकरणे किती आहेत?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9351. . . .

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

मृतांची ओळख न पटलेली प्रकरणे किती आहेत ? याठिकाणी असे म्हटलेले आहे की, "इतर राज्यातील व इतर जिल्हयातील रहिवासी असणे." पण येथे इतर जिल्हयाचा प्रश्नच नाही कारण महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली होती आणि त्यामध्ये व्यक्ती मृत झाल्या आहेत. इतर राज्यातील व इतर जिल्हयातील रहिवासी असल्यामुळे त्यांना मदत मिळाली नाही म्हणजे ते लोक काही मध्य प्रदेशातील नव्हते, तर ते महाराष्ट्रातीलच होते. त्यामुळे इतर राज्यातील व इतर जिल्हयातील रहिवासी असल्याने मदत मिळाली नाही अशी किती प्रकरणे आहेत ? तसेच बँकेत खाते न काढणे यामुळे मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना मदत मिळाली नाही. बँकेमध्ये खाते काढले नाही म्हणून आपण मदत देत नाही, तरी माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत ब्रेकप द्यावा की, इतर जिल्हयातील व इतर राज्यातील रहिवासी असल्याने मदत न मिळाल्याची किती प्रकरणे आहेत ? बँकेत खाते न उघडल्यामुळे लोक केंद्र शासनाच्या मदतीपासून वंचित होणार असतील तर ते कितपत योग्य आहे? म्हणून बँकेत खाते नाही म्हणून मदत नाकारली असेल तर अशी एकंदर किती प्रकरणे आहेत ? तसेच इतर जिल्हयातील रहिवासी असतील तर त्याबाबतीत आपण कलेक्टरनां सूचना देऊ शकता. इतर जिल्हयातील आहेत म्हणून मदत नाकारली असेल तर अशा लोकांना ताबडतोब मदत देण्यासंबंधी शासन काय कारवाई करणार आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विचारल्या प्रमाणे माझ्याकडे दोन्ही आकडेवारी आहे. महाराष्ट्रात जिल्हयाबाहेरील आहेत म्हणून ज्यांना मदत मिळाली नाही अशी 35 प्रकरणे आहेत आणि इतर राज्यातील आहेत म्हणून ज्यांना मदत मिळाली नाही अशी प्रकरणे 30 आहेत. वारसात वाद असल्यामुळे ज्यांना मदत मिळाली नाही अशी 72 प्रकरणे आहेत. मृतांची ओळख पटलेली नाही अशी एकंदर 48 प्रकरणे आहेत. बँकेमध्ये खाते न उघडल्यामुळे ज्यांच्या कुटुंबियांना केंद्र शासनाची मदत मिळाली नाही अशी 213 प्रकरणे आहेत. बँकेमध्ये खाते न उघडल्यामुळे मदत न मिळण्याचे मुख्य कारण असे आहे की, केंद्र शासनाकडून मदत मिळत असताना, ती रक्कम मृत व्यक्तीच्या वारसांच्या अकाऊंटमध्ये जमा केली जाते, ती रक्कम राज्य शासनाकडे जमा केली जात नाही. पण दुर्दैवाने 213 लोकांनी अजून बँकेमध्ये खाते न उघडल्यामुळे त्यांना केंद्र शासनाची मदत मिळू शकलेली नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9351. . . .

श्री.अरविद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. . . . .

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या प्रश्नाचा रोख असा होता की, ज्या व्यक्ती मृत झाल्या आहेत, त्यांच्या कुटुंबियांसाठी केंद्र शासनाकडून मदत मंजूर झाली आहे. फक्त त्यांच्या वारसांनी बँकेमध्ये खाते उघडले नाही या कारणासाठी अद्यापही त्यांच्या खात्यात ते पैसे जमा झ ाले नसतील तर याबाबतीत जिल्हा प्रशासनाचे काम आहे जेणेकरुन लवकरात लवकर ही खाती उघडली जातील. यादृष्टीने आपण संबंधितांना सूचना द्याव्यात.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, बँकेमध्ये खाते उघडले नाही म्हणून त्या-त्या जिल्हयातील मृत व्यक्तींच्या वारसांकडे जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून तगादा लावण्यात येत आहे की, त्यांनी ताबडतोब खाते उघडावे. परंतु दुर्दैवाने काही प्रकरणामध्ये वारसांमध्ये वाद असल्यामुळे बँकेमध्ये कोणी खाते उघडावयाचे ? असा प्रश्न निर्माण झालेला आहे,त्यामुळे खाते उघडलेले नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आमच्या भागामध्ये जवळजवळ 50 लोकांनी बँकेत खाते उघडलेले आहे. त्यांच्याबाबतीत काय करणार ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ज्यांनी बँकेत खाते उघडलेले आहे पण अजून केंद्र शासनाची मदत मिळालेली नाही अशाही प्रकरणांचा पाठपुरावा केला जाईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देईन. पण सर्वांना एकदम प्रश्न विचारता येणार नाहीत.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, याठिकाणी शासनाची भावनाशुन्य भूमिका दिसून येते. बँकेमध्ये खाते उघडले नाही म्हणून मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना केंद्र शासनाची मदत मिळालेली नाही. पण बँकेत खाते उघडण्यासाठी दिव्य काम करावे लागते का ? हे साधे कामही कलेक्टरनां करता येत नाही का ? बँकेत खाते न उघडल्यामुळे 213 जणांना मदत मिळू शकलेली नाही. तेव्हा वारसांमध्ये वाद असणे असे जे म्हटलेले आहे, तेही खरे नाही. बँकेमध्ये खाते उघडले नाही म्हणून मदत न मिळाण्याची प्रकरणे 213 आहेत आणि वारसांमध्ये वाद असलेली प्रकरणे 72 आहेत आणि ही प्रकरणे यातून वजा केली तरी 60 प्रकरणे शिल्लक रहातात. मृत व्यक्तींची संख्या 1083 असून राज्य शासनाने 898 व्यक्तींना मदत केली आहे. ही प्रकरणे केंद्र शासनाकडे पाठवत

. . . .एच-3



APR/MHM/SBT 11:35

असताना कट लावला जातो आणि केंद्राकडून मदत आल्यानंतर देखील त्याला कट लावला जातो म्हणजे माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटीलसाहेबांचा कट याठिकाणीही आहे का ? मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना सहानुभूतीपूर्वक वागणूक दिलेली नाही. बँकेमध्ये खाते उघडण्याबाबतीत जी युध्द पातळीवरुन कारवाई करण्यासाठी आपण एक यंत्रणा उभी करावयास हवी होती. पण तसे झाले नाही. याबाबतीत ज्या कलेक्टरनीं काम केलेले नाही, त्यांच्यावर आपण कारवाई करणार आहात का ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9351 (पुढे सुरु...

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मृत व्यक्तींच्या वारसांना मदत न करण्याबद्दचे शासनाचे कोणतेही धोरण नाही. राज्य सरकारच्यावतीने आणि केंद्र सरकारच्यावतीने मृत व्यक्तींच्या वारसांचा पूर्णपणे शोध लावावा असे ठरलेले आहे. राज्य शासनाचे पूर्णपणे मदत देण्याचे धोरण आहे. प्रामुख्याने केंद्र सरकारची मदत मिळत असतांना बँकेमध्ये खाते उघडलेले नाही, त्या संदर्भातील प्रश्न महत्वाचा आहे. सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे अशा वारसांना ताबडतोबीने आठ दिवसामध्ये प्रशासनाच्या वतीने खाते उघडून घेण्याबाबतची कार्यवाही होईल आणि केंद्र सरकारची मदत दिली जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जे अधिकाऱ्यांनी बेजबाबदारपणे वागले असतील त्यांचीसुध्दा चौकशी करुन त्यांच्यावर देखील योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री.नितीन गडकरी : प्रश्न अतिशय सोपा आहे. या गंभीर परिस्थितीमध्ये आपले राज्य सरकार किती संवेदनशील आहे हे दिसते. राज्य सरकारच्या भावना बोथट झालेल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे वारस ठरविणे, बँकेत खाते उघडण्यासाठी त्यांच्याकडून कागदपत्रे पूर्ण करुन घेणे हे लोकाभिमुख शासन म्हणून पुढील कार्यवाही पटापट करणे हे अपेक्षित आहे. आज एखादा वारस आयडेंटीफाय होत नसेल तर त्याच्याकडून खोटे वारस म्हणून सिध्द झाल्यानंतर पैसे परत करु, अशाप्रकारचे त्यांच्याकडून ॲफिडेव्हीट करण्याचा मार्ग उपलब्ध असतांना, जिल्हाधिकाऱ्यांनी आजपर्यन्त अशाप्रकारची मदत केलेली नाही. या संदर्भात स्वतंत्र कॅम्प लावून 15 दिवसामध्ये केसेस निकाली काढल्या जातील काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, केंद्र सरकारकडून अतिवृष्टीकरिता आणि पूरग्रस्तांसाठी किती रक्कम मागितलेली होती आणि केंद्र सरकारने आतापर्यन्त किती निधी दिलेला आहे, त्यापैकी आतापर्यन्त किती खर्च केलेला आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे येत्या 15 दिवसामध्ये ज्या जिल्ह्यातील मृत लोकांच्या वारसांना मदत दिली गेलेली नाही, अशा सर्व लोकांचा कॅम्प घेऊन, तसेच प्रत्येक गावामध्ये जाऊन त्या मृत व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना मदत करण्याच्या दृष्टीने कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन, बँकेमध्ये खाते उघडावे, वारस आयडेंटीफाय झाले नाहीत तर जे काही वारस पुढे येतील त्यांच्याकडून ॲफिडीव्हीट करुन घेणे, या सगळ्या गोष्टींची पूर्तता केली जाईल. यापूर्वी अशाप्रकारची मदत देण्याच्या संबंधतील शासनाचे जे काही निर्णय, जी.आर, असतील ते बदललेले आहेत. या पुरामध्ये ज्यांचे नुकसान झाले, त्या सर्वांना मदत करत असतांना अतिशय लवचिक धोरण ठेवलेले आहे. या सर्व व्यक्तींच्याबाबतीमध्ये मदत करत असतांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9351 (पुढे सुरु...

डॉ.राजेंद्र शिंगणे (पुढे सुरु...

अगोदर 65 वर्षाच्या व्यक्ती यामध्ये मृत पावल्या तर त्यांना मदत करत नव्हतो,आता ती अट, शिथिल केलेली आहे. दोन व्यक्ती मृत पावल्या तर पूर्वी एकाच व्यक्तीला मदत दिली जात होती, पुरामध्ये मृत पावल्या असतील, वाहून गेल्या असतील, त्या सगळयांना मदत करण्याचे धोरण ठेवलेले आहे. ही मदत करत असतांना ज्यांचे पूर परिस्थितीमध्ये नुकसान झालेले आहे, त्या सर्वांच्या पाठीमागे शासन भक्कम उभे आहे.

श्री.नितीन गडकरी : माझ्या प्रश्नाला उत्तर दिलेले नाही. केंद्र सरकारकडून यासाठी किती मदत मागितली, केंद्राने किती मदत दिली आणि त्यापैकी किती रक्कम खर्च केली ? याचे उत्तर द्यावे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : केंद्र सरकारकडे 8,740 कोटी रु. मागितले. मुंबईसाठी वेगळे 3900 कोटी रुपये मागितले. आतापर्यन्त जवळपास 1250 कोटी रुपये खर्च केलेले आहेत.

श्री.नितीन गडकरी : तुम्हाला पैसे किती मिळाले आणि किती खर्च केले ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी हरकतीचा मुद्याद्वारे प्रश्न उपस्थित करु नये.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9351....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही म्हणून मी या ठिकाणी परत प्रश्न विचारलेला आहे. माझा हरकतीचा मुद्दा नाही. आपण मला संरक्षण द्यावे. मी तीन प्रश्न विचारले आहेत. त्यापेकी पहिला प्रश्न असा आहे की, केंद्र सरकारकडे किती मदत मागितली ? केंद्र सरकारने किती मदत दिली ? आणि तिसरा प्रश्न असा की, त्यातील किती रुपये खर्च केले. मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी सांगितले की, 8000 आणि 3000 असे एकंदर 11000, 12000 कोटी रुपये खर्च केले. त्यातील केंद्र सरकारचे किती आणि राज्य सरकारचे किती ते सांगावे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आगोदरच या ठिकाणी सांगितलेले आहे की, हा मूळ प्रश्न मृत व्यक्तिच्या कुटुंबियांना किती मदत दिली या संदर्भात होता. तरी सुध्दा मी उत्तर देतांना आगोदरच सांगितलेले आहे की, 8740 कोटी रुपये मुंबई सोडून महाराष्ट्रासाठी मागितले आणि मुंबईसाठी 3,900 कोटी रुपये केंद्र सरकारकडे मागितलेले आहेत. त्यापैकी 1000 कोटी रुपये मिळालेले आहेत.अधिक धान्य मिळालेले आहे. अशा पध्दतीने 1019 कोटी रुपये जवळपास खर्च केलेले आहेत. त्यामध्ये राज्य शासनाचे धरुन जवळपास 12,500 कोटी रुपये खर्च केलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यामध्ये कुठे तरी हिशेब चुकलेला आहे. 12500 अधिक 1500 मिळून 2300 कोटी रुपये होतात. 1200 रुपये कोटी खर्च केले असे मंत्रिमहोदय सांगत आहेत.

डॉ. राजेंद्र शिंगणे :1242.38 कोटी रुपये खर्च कलेले आहेत. मी अंदाजे 12500 कोटी रुपये सांगितले होते. 1242.38 कोटी रुपये खर्च केलले आहेत.

( गोंधळ )

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाच्या अडचणीचा प्रश्न आहे. त्यामुळे शासनाला माहीत आहे की, या प्रश्नाचे उत्तर दिल्यामुळे आगोदरचे सगळे उघडे होणार आहे. पण ...

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी राज्य शासनाचे किती पैसे आहेत तेवढेच सांगावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9351....

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आपत्ती निवारण निधीसाठी 222.90 कोटी रुपये उपलब्ध झाले होते. त्यामध्ये राज्य शासनाचा 25 टक्के वाटा होता आणि केंद्र शासनाचा 75 टक्के वाटा होता. अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीवर मात करण्यासाठी केंद्र शासनाकडून सुरुवातीला तातडीची मदत म्हणून 916.41 कोटी रुपये मिळाले होते. व टंचाईवरील उपाययोजनेसाठी 103.7 कोटी इतके अनुदान राज्याला प्राप्त झाले होते. मी मघाशीच सांगितल्याप्रमाणे 1242.38 काटी रुपये खर्च केलेले आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : राज्य सरकारने किती पैसे खर्च केले हे सांगितलेले नाही..

**सभापती** :कृपया आपण खाली बसावे. मी तुम्हाला नंतर संधी देतो.

श्री. विलास अवचट :सभापती महोदय, अतिवृष्टीमुळे या राज्यामध्ये किती वित्त हानी ---- झाली? किती जण बेघर झाले आणि आतापर्यंत किती बेघरांना घरे दिली आहेत? तसेच याबाबतीत शासनाचे धोरण काय आहे ? याचा खुलासा होणे आवश्यक आहे. मुंबईच्या संदर्भात मंत्रिमहोदयांनी सांगितले की, केंद्र शासनाकडून जो निधी उपलब्ध झाला त्यापैकी प्रत्यक्ष किती पैशांची मागणी केली होती आणि त्याचा किती विनियोग झाला ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे. यासंदर्भात त्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

( विरोधी पक्षातील सन्मानीय सदस्य घोषणा देत असतात )

श्री. विलासराव शिंदे :अध्यक्ष महोदय, राज्यातील मृत व्यक्तिंची संख्या दिलेली आहे. यामध्ये जे निकष लावलेले आहेत त्या निकषांमध्ये पंचनामा आणि पोस्टमॉर्टेम या दोन गोष्टींचा निकष लावण्यात आलेला आहे. काही गावांना 8 ते 10 दिवस पुराचा वेढा पडलेला होता. अशा वेळेला पंचनामा ..........................................................................................

यानंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 9351..........

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवरुन घोषणा देत असतात. )

**सभापती** : माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, सभागृहात कृपया शांतता राखावी. मी पुढील प्रश्न पुकारलेला आहे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**वैभववाडी तालुक्यातील (जि. सिंधुदुर्ग) वेंगसर आजिवली रस्त्याचे काम सुरु करणेबाबत**

**(6) * 10174 श्री. विनोद तावडे , डॉ. अशोक मोडक , श्रीमती कांता नलावडे , श्री. रामनाथ मोते , श्रीमती संजीवनी रायकर : ताराकिंत प्रश्न क्रमांक 7895 ला दिनांक 14 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वैभववाडी तालुक्यातील जि. सिंधुदुर्ग वेंगसर-आजिवली या रस्त्याच्या रुपये 18,39,346/- च्या सुधारित अंदाजपत्रकास दिनांक 28 एप्रिल 2005 शेवटी प्रशासकीय मंजुरी व कार्यारंभ आदेश देण्यात आले असून दिनांक 9 एप्रिल, 2005 रोजी रस्त्याच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे या रस्त्याचे 80% मातीकाम पूर्ण झाले असून पावसामुळे दिनांक 15 जून, 2005 पासून काम तात्पुरते बंद आहे या रस्त्यावर आतापार्यंत रु. 4.37 लक्ष खर्च झाले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, रस्त्याचे उर्वरित काम त्वरीत पूर्ण करण्यासाठी काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे व हे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येत आहे ?

**श्री. हर्षवर्धन पाटील** : (1) व (2) वैभववाडी तालुक्यातील जिल्हा सिंधुदुर्ग वेगसर-आजिवली या रस्त्याच्या रुपये 18,39,346/- च्या अंदाजपत्रकास दिनांक 2.3.2005 रोजी प्रशासकीय मंजूरी व कार्यारंभ आदेश दिले असून या कामावर आत्तापर्यंत 6.66 लक्ष खर्च करण्यात आले आहेत. मजुरांच्या उपलब्धतेनुसार उर्वरित काम पूर्ण करण्यात येईल.

(उपप्रश्न नाहीत.)

-----------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापण्याबाबत**

**(7) * 9409 डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनंत तरे , श्री. विलास अवचट , श्री. अनिल परब , श्री. अरविंद सावंत , श्री. चंद्रकांत रघुवंशी , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्रीमती कांता नलावडे** : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात भविष्यात होणारी अतिवृष्टी, वारंवार होणारे भुकंप यासारख्या घटनांचे वाढते प्रमाण व तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेवून राज्य शासनाने दिनांक 23 सप्टेंबर,2005 रोजी वा त्यासुमारास नैसर्गिक आपत्ती निवारण प्राधिकरण स्थापण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास,प्राधिकरणांत कोणाकोणाचा समावेश करण्यांत येणार आहे व प्राधिकरणाची सर्वसाधारण रुपरेषा काय आहे,

(3) त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यांत येणार आहे ?

**डॉ. पतंगराव कदम** : (1) विविध आपत्ती संदर्भातील अनेकविध बाबी सुव्यवस्थितपणे हाताळण्यासाठी "महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण" स्थापण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने दि. 10 ऑगस्ट, 2005 रोजी घेतला आहे.

(2) मा. मुख्यमंत्री हे प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष राहतील. त्यांना 9 सदस्य नामनिर्देशित करण्याचा अधिकारी आहे. त्यानुसार मंत्रिमंडळातील उपमुख्यमंत्री व संबंधित मंत्री, मंत्रिमंडळातील काही सदस्य तसेच सेनादल, विज्ञानशाखा, समाजसेवा, पत्राकरिता, स्वयंसेवी संस्थामधील अग्रणी मान्यवरांना प्राधिकरणावर घेण्यात येणार आहे. राज्य प्राधिकरणास मदत करण्यासाठी तसेच निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली "कार्यकारी समिती" राहील.

(3) याबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

(उपप्रश्न नाहीत.)

--------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( तारांकित प्रश्न क्र. 12014 )

**ता. खेड (जि. रत्नागिरी) नातूनगर धरणातील 80 टक्के पाणी वाया जात असल्याबाबत**

**(8) * 12014 श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान : तारांकित प्रश्न क्रमांक 8508 ला दिनांक 21 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नातूनगर (ता. खेड, जि. रत्नागिरी) या धरणाच्या कालव्याच्या दुरुस्तीसाठी अजून किती निधीची आवश्यकता आहे व सदरचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय,

(2) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार** : (1) नातूनगर धरणाच्या कालव्याच्या दुरुस्तीसाठी सुमारे रु. 666.10 लक्ष निधीची आवश्यकता आहे. निधी अद्याप उपलब्ध झालेला नाही.

(2) व (3) निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारले नाहीत.

-------------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( तारांकित प्रश्न क्रमांक 9473 )

**भूविकास बँक मंचर शाखा (ता.आंबेगाव जि.पुणे) यांचेकडून शेअर्सची रक्कम परत मिळणेबाबत**

**(9) * 9473 श्री. नानासाहेब बोरस्ते , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे** : सन्माननीय सहकार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) भूविकास बँक मंचर शाखा (ता.आंबेगाव जि.पुणे) यांचेकडे अनेकदा मागणी करुनही शिवकृपा उपसा जलसिंचन सह.संस्था मंचर या संस्थेच्या सभासदांना त्यांची शेअर्सची 22 हजार रुपये रक्क्म बँकेचे संपूर्ण कर्ज फेड होऊनही परत मिळत नाही हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सभासदांना देय असलेली रुपये 22 हजार शेअर्स रक्कम बँकेने नियमबाहयपणे आपल्याकडेच रोखुन ठेवली याबाबत बँकेच्या व्यवस्थापनावर शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली आहे अथवा करण्यात येणार आहे,

(3) असल्यास, सदरची रक्कम सभासदांना परत मिळणेसाठी किती कालावधी अपेक्षित आहे ?

**डॉ. पतंगराव कदम** : (1) होय.

(2) महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक म., मुंबई या बँकेच्या नाबार्डबरोबर झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने तसेच बँक तोट्यात असल्याने व भाग (शेअर्स) चे नक्त मूल्य उणे झाल्यामुळे भागभांडवलाची रक्कम भागधारकांना परत न करण्याबाबतचे आदेश महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहूउद्देशिय विकास बँक म., मुंबई या बँकेने दिनांक 9/11/2000 च्या परिपत्रकान्वये दिलेले आहेत. शिखर भूविकास बँकेने दिलेले सदर आदेश विचारात घेता यासंदर्भात संबंधित भूविकास बँकेच्या व्यवस्थापनावर दडांत्मक कारवाई करण्याबाबतचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारले नाहीत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना वारंवार सांगून देखील ते ऐकत नाहीत, अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असल्याने मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 11 वाजून 52 मिनिटांपासून दुपारी 12 वाजून 07 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

-------------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी मा. उपसभापती**

**पृ.शी./मु.शी . :औचित्याच्या मुद्यासंबंधी**

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ): सभापती महोदय, नाशिक जिल्हयात मोठ्या प्रमाणात खतांचा तुटवडा निर्माण झालेला आहे. नाशिक जिल्हयात आरसीएफ आणि इफ्को या खत तयार करणा-या कंपन्याकडून खंताचा पुरवठा केला जातो. आरसीएफला खतांचा पुरवठा करण्यासाठी ॲडव्हान्स पेमेंट सुद्धा करण्यात आलेले आहे असे असतांनाही त्यांनी नाशिक जिल्हयामध्ये खतांचा पुरवठा केलेला नाही. इफ्को कंपनी ही गुजरात मध्ये आहे त्यामुळे ते सुद्धा खतांचा पुरवठा करीत नाहीत. नाशिक जिल्हयातील सहकारी मार्केटींग कमिट्या आणि सोसायट्यांना खतांचा पुरवठा तातडीने सुरू करण्याच्या संदर्भात शासनास सूचना द्याव्यात अशी औचित्याच्या माध्यमातून माझी विनंती आहे.

-----------------

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, आपण येथे येण्याच्या अगोदर माननीय सभापती महोदयांनी 15 मिनिटांसाठी सभागृहाचे कामकाज स्थगित केले होते. अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतक-यांचे नुकसान झाले तसेच या अतिवृष्टीमुळे हजारो लोक मृत्युमुखी पडलेले आहेत असे असतांना शासनाने त्यांना आर्थिक मदत दिलेली नाही त्यामुळे या विषयाच्या संदर्भातील आमच्या भावना अतिशय तीव्र आहेत. अतिवृष्टीमध्ये नुकसान झालेल्या लोकांना मदत मिळावी यासाठी केंद्रसरकारकडे राज्यशासनाने 11 हजार कोटी रुपयांची मागणी केली होती परंतु प्रत्यक्षात केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनाला 1000 कोटी रुपयेच दिलेले आहेत. असे असतांनाही अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या लोकांच्या पुनर्ररचनेच्या कामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे यासंदर्भात आम्ही या ठिकाणी आमच्या तीव्र भावना व्यक्त केलेल्या आहेत तसेच शासनाचा निषेध देखील व्यक्त केलेला आहे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, हा विषय अतिशय गंभीर आहे. तसेच यासंदर्भातील आमच्या तीव्र भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. अतिवृष्टीमध्ये नुकसान झालेल्या जनतेला न्याय मिळण्याच्या दृष्टीने या विषयावर विस्तृतपणे चर्चा होण्याची आवश्यकता आहे. या विषयावर त्वरित चर्चा सुरू झाली तर अतिवृष्टीतील लोकांना न्याय मिळू शकेल.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या विषयाच्या संदर्भातील चर्चा 15 डिसेंबर, 2005 रोजी ठेवण्यात आलेली आहे चर्चेच्या दिवशी सर्व सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे विस्तृतपणे मांडता येईल.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हे सरकार आपले काहीच ऐकत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, आपण शासनाला आपला मान-सन्मान राखावयास सांगावे.

**उपसभापती** : माझे म्हणणे मानायला मी सरकारला भाग पाडेन. आता सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्याद्वारे एक गोष्ट शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. महाराष्ट्र हयुमन राईट कमिशन यांच्याकडे 60 कामगार गेल्या तीन वर्षापासून कंत्राटी पध्दतीने काम करीत आहेत. आपल्याकडे कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲबॉलिशन ॲक्ट अस्तित्त्वात आहे. असे असताना मानवी हक्क आयोगाकडे कंत्राटी पध्दतीने काम करणे हा विरोधाभास आहे. तेव्हा या प्रश्नात शासनाने त्वरित लक्ष घालावे अशी मी विनंती करीत आहे. तसेच मानवी हक्क आयोगाने कायद्याची पायमल्ली करू नये असे मला वाटते.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्यावर गंभीर व तातडीचे प्रश्न मांडले जातात. जे सन्माननीय सदस्य नियमानुसार कामकाज करू पहात आहेत त्यांच्यावर अन्याय होत आहे. औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी देखील काही प्रथा परंपरा आहेत. कोणाही सदस्याला आपण कुठल्याही विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास अनुमती देणार असाल तर आपण झीरो अवर सुरू करावा.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी हात वर केल्यामुळे मी त्यांना औचित्याचा मुद्दा मांडायला अनुमती दिली आहे. सन्माननीय सदस्य जो पर्यंत औचित्याचा मुद्दा मांडत नाही, तो पर्यंत त्यांचा मुद्दा औचित्याचा आहे किंवा नाही हे मला समजत नाही. म्हणून मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, ज्यांचा विषय खरोखरच औचित्याच्या मुद्यासंबंधीचा असेल तर त्यांनी तो मांडावा म्हणजे सन्मानननीय श्री.अरविंद सावंत यांच्या सारख्या अभ्यासू सदस्याला पुन्हा प्रश्न विचारावा लागणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय औचित्याचा मुद्दा मांडण्यापूर्वी सन्माननीय सदस्यांनी माननीय सभापती महोदयांची दालनात भेटून परवानगी घेतली पाहिजे.

**उपसभापती** : मी सभापतीस्थानी बसून गेल्यानंतर माझ्या दालनात भेटायला कोणीही येत नाही.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी रोज आपल्या दालनात भेटायला येत असतो.

**उपसभापती** : आपण रोज चहा पिण्यासाठी माझ्या दालनात येत असता. आता सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, 25 नोव्हेंबर रोजीचा शिक्षकेतर आकृतिबंध संबंधीचा जी.आर.शासनाने रद्द केला आहे. अशाच प्रकारचा जी.आर.2 वर्षापूर्वी रद्द करण्यात आला होता. त्यामुळे एकाही शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती झाली नाही. आता पुन्हा जी.आर. रद्द केल्यामुळे ती स्थगिती कायम राहणार आहे का ? यासंबंधीचा खुलासा मंत्रिमहोदयांनी करावा अशी मी मागणी करीत आहे.

**उपसभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, उल्हासनगर संबंधीची कालची लक्षवेधी सूचना आज घेण्यात येईल असे ठरले होते. पण अद्याप पर्यंत ती आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर घेतल्याचे दिसून येत नाही. आज उल्हासनगरमधील जवळ जवळ 4 लाख लोक रस्त्यावर आले आहेत. त्यांच्याकडे शासन लक्ष देणार आहे की नाही ? त्यामुळे उल्हासनगरच्या विषयासंबंधीची लक्षवेधी उद्या घ्यावी व त्यावर चर्चा घडवून आणावी अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

**उपसभापती** : आपल्या लक्षवेधी सूचनेवर गुरूवारी चर्चा होणार आहे. गुरूवारी आपली लक्षवेधी अनुक्रमांक 1 वर असेल.

......

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "गडचिरोली जिल्हयाप्रमाणे विदर्भातील यवतमाळ व बुलढाणा या दोन जिल्हयात येणाऱ्या उद्योगांना करातून वगळण्याबाबत" या विषयावरील डॉ.एन.पी.हिराणी व इतर वि.प.स.यांच्या दिनांक 21 जुलै 2005 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 5605 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती जोडावी)

.....

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.सुनील देशमुख ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीच्या सन 2001-2002 या वर्षाच्या आठव्या अहवालातील परिच्छेद क्रमांक 1.28 मध्ये समितीने केलेल्या शिफारशीनुसार सर्व मंत्रालयीन विभागांनी सन 2003-2004 या वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

----------

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( कृषि राज्यमंत्री ) सभापती, महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.पंजाबराव देशमुख, कृषि विद्यापीठाचा सन 2002-2003 चा 34 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचा 34 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती सुधा जोशी ( समिती सदस्य ) : मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा दुसरा अहवाल सभागृहास सादर करते.

सभापती महोदय, हा अहवाल सादर करीत असताना त्यातील काही महत्वाच्या बाबींचा मी याठिकाणी उल्लेख करु इच्छिते. सभापती महोदय, राज्य शासनाच्या औरंगाबाद येथे असलेल्या जलसंपदा विभागांतर्गत जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) स्थापन करण्यामागे शासनाचा उद्देश कितपत सफल झाला आहे याची छाननी करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. संबंधित अधिकारी तसेच लाभधारक शेतकरी या सर्वांना प्रशिक्षण देण्याकरिता ही संस्था जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने स्थापन करण्यात आली आहे. एखाद्या अधिकारी त्याच्या सेवेच्या शेवटच्या वर्षात प्रशिक्षण घेतो त्यामुळे त्याने घेतलेल्या प्रशिक्षणाचा उपयोग इतर अधिकारी व शेतकऱ्यांना होत नाही. म्हणून समितीने अशी शिफारस केली आहे की, प्रत्येक अभियंत्याने किंवा अधिकाऱ्याने दर तीन वर्षाने किंवा पाच वर्षांनी अशा विहित काळात प्रशिक्षण घेतले पाहिजे अशाप्रकारचा निर्णय शासनाने घ्यावा आणि त्याची त्वरित काटेकोरपणे अंमलबजावणी होते किंवा नाही याबाबतचा आढावा वरिष्ठ अधिकाऱ्याकडून घेण्यात यावा.

वाल्मी संस्थेची निर्मिती, प्रशिक्षण व संशोधन यासाठी असली तरी एकूण आस्थापनेवर सुमारे 78 ते 80 टक्के आणि संशोधन व प्रशिक्षणावर केवळ 4 टक्के रक्कम खर्च होते. या बाबींवर समितीने तीव्र चिंता व्यक्त केलेली आहे. वाल्मी संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात समिती अशी शिफारस करते की, उक्त संस्थेतील कर्मचाऱ्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने त्यांना निवृत्तीवेतन लागू करण्याच्या वित्त विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करुन त्याची अंमलबजावणी त्वरित होण्याच्या दृष्टीने संस्थेने कार्यवाही करावी. म्हणून समिती अशी शिफारस करते की, वाल्मी संस्थेच्या कामाचे मूल्यमापन शासनाच्या त्रयस्थ संस्थेकडून करुन घेण्याचा निर्णय शासनाने घ्यावा व त्यांच्या सूचनेप्रमाणे संस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.........

कोकण विभागामध्ये वाहणाऱ्या नद्यांच्या पाण्याचा उपयोग करुन फळबागा वाढविण्याच्या दृष्टीने त्या विभागातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन सदर संस्थेने करण्याची आवश्यकता आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना सदर संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपली आभारी आहे.

**उपसभापती** : अंदाज समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-------------

यानंतर श्री.बोर्डे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अनुपालन अहवाल सादर करणे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीने नागपूर जिल्हा परिषदेच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना या विषयावरील दिनांक 29 मार्च, 2001 रोजी सभागृहात सादर केलेल्या तिसऱ्या अहवालात समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

महोदय, या समितीने एकंदरीत 10 शिफारशी केलेल्या आहेत. परंतु मी सर्व शिफारशींच्या खोलात जाणार नाही. केवळ महत्वाच्या दोन शिफारशीसंदर्भात उल्लेख करु इच्छिते. या समितीने नागपूर जिल्हा परिषदेची पाहणी करुन काही शिफारशी केल्या होत्या. त्या शिफारशींची अंमलबजावणी झाली की नाही यासंदर्भात माहिती घेण्यासाठी समितीने संबंधित विभागाची साक्ष घेऊन माहिती घेतली. "कामधेनू" योजनेंतर्गत हजारो महिलांनी ठिकठिकाणी महिला बचत गट स्थापन केलेले आहेत. या बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळावी अशी महिला बचत गटांची अपेक्षा आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेने स्वत:ला लागणाऱ्या वस्तू या कामधेनू योजनेंतर्गत असलेल्या महिला बचत गटांकडून खरेदी करण्यास प्राधान्य द्यावे अशी मुख्य शिफारस समितीने केली आहे. प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये महिला व बालकल्याण या विभागामार्फत योजना राबविल्या जातात. त्यामुळे नागपूर जिल्हा परिषदेमध्ये महिला बालकल्याण समितीसाठी 10 टक्के निधीची तरतूद वाढवून देण्यासंदर्भात महिला लोकप्रतिनिधींची मागणी आहे. त्यामुळे यासंदर्भात नागपूर जिल्हा परिषदेने विचार करुन, पाठपुरावा करावा अशी शिफारस या अहवालामध्ये करण्यात आली आहे.

**उपसभापती** : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अनुपालन अहवाल सादर झाला आहे.

--------

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते व इतर वि.प.स. "यांनी वस्तीशाळा शिक्षकांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिनांक 12 डिसेंबर, 2005 पासून आंदोलन सुरु करुन, सामुहिक आत्महत्या करण्याचा दिलेला इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री गोपिकिशन बाजोरिया यांनी "अकोला महानगरपालिकेतील मानधनावर काम करणाऱ्या कामगारांनी सुरु केलेल्या उपोषणात 15 कामगारांची तब्येत बिघडल्याने त्यांना इस्पितळात दाखल करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "गोवा मुक्ती स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना मंजूर झालेल्या भूखंडाचा रक्कम भरुनही ताबा न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील व इतर वि.प.स. यांनी "उरण, जिल्हा रायगड येथील ओ.एन.जी.सी. प्रकल्पाची जुनी पाईप लाईन काढून टाकण्याची निर्माण झालेली आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे व इतर वि.प.स. यांनी "राज्यातील अनेक भागात शेळया-मेंढया रोगाचा प्रादुर्भाव होऊन मृत्यूमुखी पडल्यामुळे धनगरांना नुकसान भरपाई देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3..



SJB/ RJW/ D/ पूर्वी श्री.अजित.... 12:20

**उपसभापती**....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री जगदिश गुप्ता व इतर वि.प.स. यांनी "राजूरवाडी, जि.अमरावती येथील शेतकरी श्री.गोपाळ मानकर यांनी कर्जफेड करणे शक्य न झाल्यामुळे दिनांक 10 डिसेंबर, 2005 रोजी केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी "सांगली शहरातील ईम्यॅन्यूअल एज्युकेशन सोसायटी ही ख्रिश्चन समाजाची संस्था हडप करण्याच्या कटात सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचा असलेला सहभाग" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री विलास अवचट व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 10 डिसेंबर, 2005 रोजी कल्याण महानगरपालिकेच्या बारच्या जल शुध्दीकरण केंद्रात दुरुस्ती काम करताना वीज स्पार्कींगमुळे भूषण पाटील हा कामगार गंभीर जखमी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 12 डिसेंबर, 2005 रोजी आर्वी, जिल्हा वर्धा येथे सौ.मुक्ता सातपुते या महिलेचा विनयभंग केल्यानंतर कुख्यात गुंड शंकर शेंडे यास महिलांनी केलेली बेदम मारहाण, या प्रकरणी महिलांनी तक्रार करुनही पोलिसांनी तक्रार नोंदवून न घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दगडाने ठेचून महिलांनी केलेली मारहाण असा उल्लेख आपल्या वाचण्यामध्ये आलेला नाही.

------

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी : सौ. अर्चना सुर्यभान डोंगरे (ता.नांदुरा,जि. बुलढाणा) या विवाहितेचा संशयास्पद झालेला मृत्यू

मु.शी : सौ. अर्चना सुर्यभान डोंगरे (ता.नांदुरा,जि.बुलढाणा) या विवाहितेचा संशयास्पद झालेला मृत्यू

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) :अध्यक्ष महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी " सौ. अर्चना सुर्यभान डोंगरे ( ता.नांदुरा,जि. बुलढाणा )या विवाहितेचा संशयास्पद झालेला मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे.निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

p 1(ए)..

- निवेदना नंतर -

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : मुंबईतील हाफकिन बायो फार्मासिटीकल कॉर्पोरेशनचे
निर्गुंतवणुकीकरण करण्याचा घेतलेला निर्णय

मु.शी : मुंबईतील हाफकिन बायो फार्मासिटीकल कॉर्पोरेशनचे
निर्गुंतवणुकीकरण करण्याच्या घेतलेल्या निर्णयासबंधी सर्वश्री
मधुकर चव्हाण, विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे,वि.प.स.
यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व औषधी प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" मध्य मुंबईतील अतिशय मोलाची सुमारे २८ एकर जागा खाजगी औषध कंपन्या आणि बिल्डरांच्या ताब्यात देण्यासाठीच राज्य सरकारने हाफकीन बायो फार्मासिटीकल कॉपोरेशनचे निर्गुतवणुकीकरण करण्याचा घेतलेला निर्णय, गेली १०/१२ वर्षे नफ्यात असलेले हे महामंडळ मोडीत काढण्याचा निष्कर्ष काढून दिशाभूल करणे, देशाला माफक दरात अतिशय दर्जेदार, विश्वासार्ह औषधे व लसी पुरविणा-या आशिया खंडातील पहिल्या व ऐतिहासिक व्हॅक्सिन इन्स्टिटयूटच्या जागेची गिरण्यांच्या जमिनीप्रमाणे धनदांडग्यांच्या फायद्यासाठी सरकारच्या निष्क्रियतेमुळे एकेकाळी ८५ कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल असणारी संस्था ३५ कोटीवर येणे, सर्पदंश, पोलियो व रेबिज वरील लसीचे उत्पादन इतर खाजगी कंपन्यांच्या तुलनेत माफक दरात उपलब्ध करुन देणा-या हाफकिन बायो फार्मासिटीकल कॉर्पोरेशन उर्जितावस्थेत आणण्याबाबत सातत्याने शासन स्तरावर उदासिनता दाखवून जाणुनबुजून दुर्लक्ष करणे, मान्यवर संशोधन आणि व्यासंगी अधिका-यांच्या चांगल्या प्रस्तावांनाही धुडकावून लावणे, महाराष्ट्र व देशातील गरीबांच्या आरोग्याच्या सोयीसाठी शासनाने १९७५ साली या संस्थेचे महामंडळात विलिनीकरण करताना संस्थेची मालमत्ता विकली जाणार नाही व त्याचे खाजगीकरणही करणार नाही असे वचन देऊनही आता हेतुपरस्पर त्याच्याकडे दुर्लक्ष करुन या संस्थेचे निर्गुंतवणुकीकरण करण्याचा घेतलेला संशयास्पद निर्णय, यामुळे राज्यातील गोरगरीब जनतेच्या मनात निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, परिणामी शासन निर्णयाबाबत निर्माण झालेला जनप्रक्षोभ, यावर शासनाची प्रतिक्रिया व शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

३..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाबा सिध्दिकी ( अन्न व औषधी प्रशासन राज्य मंत्री ) अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

४...



-" निवेदनानंतर -

श्री.मधुकर चव्हाण :सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या अशा हाफकिन बायो फार्मासिटीकल कॉर्पोरेशनचे खाजगीकरण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. हाफकिन ही संस्था आपल्या देशात आणि देशाबाहेरही प्रसिध्द आहे. त्या ठिकाणी निरनिराळया प्रकारची व्हॅक्सीन्स तयार केली जातात. त्याचबरोबर अनेक प्रकारची जीव रक्षक औषधे तयार केली जातात. Calcium with Vit 'D', Chloroqin Phosphate, Metronidazole, Phenobarbitone Paracetamol, Vit B-Complex (T), Vit B-Complex with C & Folic Acid या टॅबलेटस् तसेच Viral Vaccine, Bacterial Vaccine, Anti Toxin, Oral Liquid Products अशी अनेक प्रकारची औषधे तेथे तयार होत असतात.१९७५ साली जेव्हा हाफकिन इन्स्टिटयूटचे कॉर्पोरेशनमध्ये विलीनीकरण केले होते त्यावेळी कोणत्याही परिस्थितीत या महामंडळाची विक्री केली जाणार नाही तसेच त्याचे खाजगीकरण केले जाणार नाही. असे शासनाच्या वतीने आश्वासन दिले होते व अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला होता हे खरे आहे काय ? असे असतांना या महामंडळाच्या जमिनीसह तो उद्योग रिलायन्स कपनी विकत घेणार आहे असा प्रस्ताव त्यांनी शासनाकडे पाठविला होता हे खरे आहे काय आणि तो प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय ? त्याचबरोबर भविष्यकाळात त्या उद्योगात निर्गुतवणूक केली जाणार नाही अशा प्रकारचे आश्वासन माननीय मंत्रीमहोदय देतील काय ?

श्री बाबा सिद्दीकी : माननीय सभापति महोदय, माननीय सदस्य ने जो बताया वह सही है कि रिलायंस लाइफ साइंस प्राइवेट लिमिटेड ने इच्छा जतायी थी और उन्होंने एक लेटर भी हाफकीन कंपनी के सेक्रेटरी को लिखा था. लेकिन शासन बोर्ड ने उनको नकार दिया.

श्री मधुकर चव्हाण : महोदय, मेरा प्रश्न यह है कि उन्होंने कितनी प्राइस कोट की थी ?

श्री बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, रिलायसं लाइफ साइंस प्राइवेट लिमिटेड ने कहा था कि यदि सरकार डिसइन्वेस्टमेंट करना चाहे तो हम पार्टिसिपेट करेंगे.

श्री.मधुकर चव्हाण :माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले नाही. हाफकिन इन्स्टिटयूटचे १९७५ साली रिसर्च आणि प्रॉडक्शन अशा महामंडळात विलीनीकरण करण्यात आले होते.ही दोन महामंडळे तयार करीत असतांना असा निर्णय घेण्यात आला होता की

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री मधुकर चव्हाण...

या महामंडळाला शासन मदत करील. त्याचबरोबर यामध्ये निर्गुंतवणूक केली जाणार नाही आणि त्याचे खाजगीकरणही केले जाणार नाही. तेथील जमीन विकली जाणार नाही. तेव्हा ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, माननीय सदस्य यहां पर २८ एकड़ जमीन की बात कर रहे हैं. मुझे कहना है कि शासन ने डिसइन्वेस्टमेंट के लिए जो ओपन एडवरटाइजमेंट निकाला था वह पिंपरी में हाफकीन जो कंपनी है उसके लिए निकाला है.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, हाफकिन इन्स्टिटयूट ही १०० वर्षाहून अधिक काळा पासून कार्यरत असलेली संस्था असून तेथे जीव रक्षक औषधे तयार केली जातात.जागतिक कीर्तीची ही संस्था आहे.अशा वेळी जर शासन ही जमीन विकण्याचा निर्णय घेणार असेल तर तो निर्दयी निर्णय आहे असे म्हणावे लागेल.या निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "उपरोक्त महामंडळाची कोणतीही मालमत्ता विकायचा अथवा अन्य कंपनीत/ संस्थात विलीनीकरण करण्याचा कोणताही निर्णय शासनाने घेतलेला नाही. तथापि महाराष्ट्र बोर्ड ऑफ रिस्ट्रक्चरिंग ऑफ स्टेट एंटरप्रायजेसने केलेल्या सूचनेनुसार हाफकिन महामंडळ उर्जितावस्थेत आणण्यासाठी अन्य संस्था कंपन्याचे सहकार्य घेण्यासाठी विकल्प मागविण्यात आले आहे "

नतर श्री.सुंबरे`

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ...

म्हणजे शासन कोठल्या दिशेने चालले आहे हे यातून लक्षात येत नाही काय ? निर्गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतलेला नाही म्हणून सांगितले जाते, त्याला माननीय मुख्यमंत्र्यांनी समर्थन दिलेले आहे.तेव्हा हे उत्तर बरोबर आहे काय ? यातून नेमके आपल्याला काय म्हणावयाचे आहे ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, यह उत्तर बराबर है. मैं स्पष्ट रुप से बताना चाहता हूं कि मुंबई में हाफकीन की जो 28 एकड़ जमीन है वह वैसे ही रहेगी. उसका कारभार वैसे ही चलेगा. ज्वाइंट वेंचर के लिए ओपन एडवरटाइजमेंट के द्वारा हमने टेंडर इन्वाइट किया है. इस संबंध में चीफ सेक्रेटरी श्री शरद उपासनी कमेटी भी थी. मैं बताना चाहूंगा कि मुंबई के परेल में जो जगह है उसका डिसइन्वेस्टमेंट करने का या उस जमीन को बेचने का कोई इरादा नहीं है.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांच्या बोलण्यामध्ये, उत्तरामध्ये विसंगती आहे. पहिली गोष्ट अशी आहे की, मुंबईची जागा आम्ही कोणालाही देणार नाही असे म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला जॉईंट व्हेचर क रण्याच्या दृष्टीने विकल्प मागवावयाचे आणि असे कोणतेही प्रपोजल नाही असेही मंत्री महोदय सांगत आहेत. या निवेदनात शेवटच्या परिच्छेदामध्ये आपण म्हणता आहात की, महाराष्ट्र बोर्ड ऑफ रिस्ट्रक्चरींग ऑफ स्टेट एंटरप्रायजेस यांनी या संदर्भात आपल्याला जॉईंट व्हेचर करण्याची सूचना केली आहे असेही आपण सांगत आहात. आता आपण या ठिकाणी उपासनी समितीचा उल्लेख केला. पण ही जी उपासनी समिती होती ती महाराष्ट्रातील जी महामंडळे आहेत त्यातील कोणती महामंडळे आर्थिकदृष्ट्या योग्य आहेत वा अयोग्य आहेत, त्यातील कोणती बंद करावयाची वगैरे ठरविण्यासाठी, अभ्यास करण्यासाठी म्हणून कॅबिनेटने नियुक्त केलेली होती. मला बीआयएफआर माहीत आहे की जे केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. आता आपण महाराष्ट्र बोर्ड ऑफ रिस्ट्रक्चरींग ऑफ स्टेट एंटरप्रायजेस कडून सूचना वा सल्ला मागितला आहे म्हणून म्हणता आहात तर त्यांचा सल्ला सरकारवर बंधनकारक आहे की नाही ? का केवळ ही सूचना म्हणूनच आपण त्याकडे पाहणार आहात ? सभापती महोदय, एका बाजूला आपण म्हणता आहात की, आम्ही हाफकीनची कोणतीही मालमत्ता विकणार नाही वा हे महामंडळ कोणत्याही कंपनीत वा संस्थेत विलिनीकरण करणार नाही. दुसऱ्या बाजूला

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

जॉईंट व्हेचर करण्याच्यादृष्टीने जाहीर विकल्प मागविता आहात. अर्थात तसे झाले तर तुमचे जेवढे शे`अर्स आहेत ते तुमच्याकडे राहतील हा भाग वेगळा. तेव्हा या संदर्भात आपल्याला नेमके काय सांगावयाचे आहे ? आपला निर्णय काय राहणार आहे ? पुण्याला या महामंडळाची जी जागा आहे त्याबद्दल व्यंकटेश हॅचरिजचा प्रस्ताव होता असे आपण म्हणता आहात पण ओव्हरऑल हाफकीन महामंडळाबाबत नेमके आपले धोरण काय आहे ? महामंडळाच्या मुंबई आणि पुणे येथील दोन्ही जागांबद्दल आपले धोरण काय आहे ते आपण सांगावे. कारण आतापर्यंतच्या आपल्या उत्तरातून वा या निवेदनातून आपले या संबंधीचे नेमके धोरण काय आहे ते स्पष्ट होत नाही.

श्री बाबा सिद्दिकी : माननीय सभापति महोदय, माननीय गडकरी साहब ने जो विषय यहां बताया है, मैं बताना चाहूंगा कि ये दो विषय हैं. एक विषय मुंबई में परेल में जो कंपनी है उसका विषय है वहां पर दवाईयां बनती हैं. हमारा कहना है कि वह कंपनी उसी तरह से चलती रहेगी. ज्वाइंट वेंचर के संबंध में तीन लोगों ने भाग लिया. एक रिलायंस कंपनी थी. दूसरी वेंकटेश्वर हॅचरिज और तीसरी कंपनी हैदराबाद की थी. जब पता चला कि यहां पर डिसइन्वेस्टमेंट की बात नहीं है तो रिलायंस कंपनी ने विदड्रा कर लिया.उन्होंने कहा कि यदि शासन सोचेगा कि डिसइन्वेस्टमेंट करना है तो वे टेंडर में पार्टिसिपेट करेंगे. एडिशनल चीफ सेक्रेटरी ने इस संबंध में फाइनेंस सेक्रेटरी से रिव्यु करने के लिए कहा है और यह केस आज इसी स्टेज में है. मैं यहां पर स्पष्ट रुप से बता देना चाहता हूं कि मुंबई में परेल में जो कंपनी है वह वैसे ही चलेगी. माननीय सदस्य ने भी बताया कि वह प्रॉफिटेबल है. इसलिए हमारा कहना है कि वह कंपनी वैसे ही चलेगी. मैं समझता हूं कि जो ज्वाइंट वेंचर होगा वह पिंपरी की कंपनी के बारे में ही होगा. इसमें 51 और 49 का रेशो होगा. मुंबई की कंपनी के बारे में यह ज्वाइंट वेंचर नहीं होगा.

(इसके बाद श्री सरफरे-आर 1)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, वेंकटेश्वरी हॅचरीजचा प्रस्ताव अद्यापि प्राप्त झाला की नाही? प्राप्त झाला असल्यास त्यावर आपण कोणता निर्णय घेणार आहात?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी स्पष्टपणे समजावून सांगितले आहे.तरीसुध्दा माननीय सदस्यांनी पुन्हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. सरकार को डिसइन्वेस्टमेंट करना होगा तो वे पार्टिसिपेट करेंगे.

श्री. मधुकर सरपोतदार : ज्या संस्थांचे नूतनीकरण करावयाचे आहे त्यासाठी त्यांना बीआयएफआरकडे जावे लागते. याठिकाणी रिस्ट्रक्चरींग ऑफ इंडस्ट्रीसंबंधी उल्लेख आहे. या महामंडळाचे प्रमुख कोण आहेत? त्यांनी दिलेल्या अहवालामध्ये हाफकीनबाबत कोणते शेरे मारले आहेत? महामंडळाचा अहवाल शासनावर बंधनकारक आहे काय? यासंबंधी निर्णय घेतांना केवळ महामंडळाने केलेल्या शिफारशीच्या आधाराने निर्णय घेऊ अशाप्रकारची महाराष्ट्र शासनाची धारणा आहे काय?

श्री बाबा सिद्दिकी : सभापति महोदय, बोर्ड के अहवाल के बाद एडिशनल चीफ सेक्रेटरी ने फायनेंस सेक्रेटरी से रिव्यु करने के लिए कहा है और यह केस इसी स्टेज पर आज है.

श्री. मधुकर सरपोतदार : मी प्रश्न विचारला होता की, महामंडळाने घेतलेला निर्णय शासनावर बंधनकारक आहे काय? याबाबत शासन स्वत:ची बुध्दिमत्ता वापरुन, परिस्थिती पाहून निर्णय घेणार आहे काय की, महामंडळाने केलेल्या शिफारशीनुसार निर्णय घेणार आहे?

श्री बाबा सिद्दिकी : सभापति महोदय, राज्य के हित में ही शासन निर्णय लेगा.

श्री. मधुकर सरपोतदार : राज्याच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेतला जाईल त्यावेळी महामंडळाने घेतलेला निर्णय शासनावर बंधनकारक आहे काय?

**उपसभापती** : राज्याच्या हिताचे कोणतेही निर्णय शासनावर बंधनकारक आहेत.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/RJW/D पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:40

पृ.शी.: राज्यात इंटरनेट कॅफेमध्ये अश्लिल छायाचित्रे दाखविण्याचा व्यवसाय सुरु असणे.

मु.शी.: राज्यात इंटरनेट कॅफेमध्ये अश्लिल छायाचित्रे दाखविण्याचा व्यवसाय सुरु असणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे(विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते व त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करते.

"राज्यात इंटरनेट कॅफेमध्ये अश्लिल छायाचित्रे दाखविण्याचा व्यवसाय मोठया प्रमाणात सुरु असणे, नुकतेच नागपूरमधील हनुमाननगर भागातील टारगेट इंटरनेट कॅफेमध्ये अश्लिल छायाचित्रे दाखविण्याचा करण्यात येत असलेला व्यवसाय दिनांक 7 डिसेंबर 2005 रोजी उघडकीस येणे, अशा प्रकारे इंटरनेट कॅफेच्या माध्यतातून चांगले शिक्षण न देता अश्लिल चित्रे दाखवून युवकांना वाम मार्गास लावण्यात येत असणे, पोलिसांकडे याबाबत तक्रारी येऊनही त्याकडे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, इंटरनेट कॅफेमध्ये दाखविण्यात येणारी अश्लिल चित्रे दाखविण्याचे थांबविण्यासाठी पोलिसांकडून तसेच शासनाकडून होत असलेली चालढकल, परिणामी या परिसरातील महिलांमध्ये व विशेषत: पालक वर्गात पसरलेले असंतोषाचे वातावरण, याकडे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सायबर क्राईमचा विषय गेली काही वर्षे महाराष्ट्रात आणि भारतात गाजत आहे. याबद्दल शासनाला वारंवार सूचना केल्या आहेत, लेखी निवेदन देखील दिलेले आहे. संभाजीनगर मध्ये "याहू" वेबसाईटवर 300 मुलींची छायाचित्रे सेक्स वर्कर्स अँड फ्रेंडस् म्हणून यामध्ये घालण्यात आली होती. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, संबंधित लोकांना पकडल्यानंतर ते लगेच जामिनावर सुटतात आणि बाहेर येऊन साक्षीदारांवर दबाव आणतात. अशा प्रकारची घटना घडणे आणि त्याबाबतीत गुन्हा नोंदविला जाणे यामध्ये बराच काळ निघून जातो. सायबर क्राईम करणारे वेगवेगळया प्रकारे इंटरनेटचा वापर करतात. अशा प्रकारचे गुन्हे करणारे जे लोक आहेत, त्यांना पकडण्याच्या दृष्टीकोनातून आणि नागपूर शहरातही अशी घटना घडू नये म्हणून कोणती दक्षता घेण्यात आली होती ? महाराष्ट्रात इतरत्रही अशा प्रकारचे अनेक गुन्हे झाले आहेत. अशा गुन्हेगारांना पकडल्यानंतर त्यांना जामीन मिळून नये यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सायबर कॅफेमध्ये इंटरनेटवर जाऊन अश्लील छायाचित्रे पाहिली जातात. त्यामुळे सायबर कॅफेमधील केबिनची रचना अशा प्रकारची असली पाहिजे की, जेणेकरुन त्या सायबर कॅफेचा जो मालक असेल, चालक असेल किंवा मॅनेजर असेल त्यालाही कॉम्प्युटरवर बसलेली मुले काय पहात आहेत हे दिसले पाहिजे यादृष्टीकोनातून यापुढे रजिस्ट्रेशन करावे लागणार आहे. तसेच ही मुले जेवढा वेळा कॉम्प्युटरवर बसली होती, त्या काळात त्यांनी कोणकोणत्या साईटवर जाऊन काय-काय पाहिले आहे याचीही नोंद लॉग-बुकात करावी लागणार आहे. तसेच कॅफेमध्ये येणाऱ्या व्यक्तीला आपले आयडेन्टीटी कार्ड घेऊन यावे लागणार आहे आणि त्याबाबतीत रजिस्टरमध्ये नोंद करावी लागणार आहे. तसेच जर एखाद्याकडे आयडेन्टीटी कार्ड नसेल तर त्या व्यक्तीचा कॉम्प्युटरवर फोटो काढून ठेवण्यात येणार आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, संभाजीनगर येथे सी.ई.डी.टी. म्हणजेच सेंटर फॉर इलेक्ट्रॉनिक डिझाईन अँड टेक्नॉलॉजी ही केंद्र शासनाची संस्था आहे. केंद्र शासनाची मान्यता असलेली, त्यांच्या अखत्यारित असलेली ही संस्था असून ती विद्यापीठाच्या परिसरात आहे. या संस्थेतील काही कर्मचाऱ्यांनी त्या शहरातील काही मुलींचे फोटो मिळविले. पण हे फोटो कसे मिळविले तर ? त्यांनी नोकरीसाठी एक जाहिरात काढली आणि संबंधितांना फोटोसह बायोडेटा मागविला. फोटोसह बायोडेटा मिळाल्यावर त्यांनी सी.ई.डी.टी..या केंद्र शासनाच्या अखत्यारितील

...3



APR/RJW/D 12:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी . . . .

संस्थेचे कॉम्प्युटर वापरुन "याहू" आणि राज्य सरकारच्या D.A.V.P. चा वापर करुन सर्व वेबसाईटसवर अपलोड केले. त्यामुळे या मुलींची बदनामी झाली. त्याबद्दल त्यांच्या वडिलांनी तक्रार केली आणि त्यांना कारवाई करण्यासाठी सहा महिने पोलिसांच्या मागे लागावे लागले. मग शेवटी श्री. निखिल गुप्ता या चांगल्या अधिकाऱ्याने "याहू" या वेबसाईटवर जाऊन करस्पॉन्डन्स्चा पत्ता मिळविला आणि मग ते पोलीस या संस्थेपर्यंत पोहोचले व त्यांनी संबंधितांना अटक केली. परंतु आपला कायदा इतका तकलादू आहे की, त्यांना जामीन मिळाला. उद्या कदाचित ती संस्था त्यांना कामावरही घेईल. तेव्हा यावर कुठेतरी कायम स्वरुपी तोडगा काढण्यासाठी "याहू" आणि इतर ज्या दहा-बारा सर्च-इंजिन्स आहेत, त्याअनुषंगाने ताबडतोब कायदा करणे आवश्यक आहे तसेच जर "महाराष्ट्र" किंवा "इंडियन" असे नाव आल्यानंतर कोणतीही साईट दाखविण्यापूर्वी त्यासंबंधीची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे अशा प्रकारची आपण कायद्यामध्ये सुधारणा करु शकतो का ? सध्या आपल्याला माहिती घ्यावयाची झाली तर केवळ टेलिफोन नंबर मिळतो, बाकी काहीही माहिती मिळत नाही. तसेच टेलिफोन नंबर कोणाचाही वापरला जाऊ शकतो. तसेच एखाद्याच्या घरात जाऊन कॉम्प्युटरचा वापर करुन किंवा टेलिफोन नंबर टॅब करुन यासाठी उपयोग केला जाऊ शकतो. जर हे उघडकीस आले तर जो सज्जन माणूस आहे, ज्याला यातील काही माहिती नाही तोच यामध्ये सापडेल आणि जो असे प्रकार करणारा माणूस आहे तो बाहेर राहील.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (पुढे चालू...

वर्तमान पत्रामध्ये बातमी येते की, त्या व्यक्तीच्या घरातून हा प्रकार झालेला आहे. परंतु त्या व्यक्तीला त्याची काही कल्पना नसते. कारण बाहेरुन टेलिफोनवरुन टॅप केलेला असतो. सर्च इंजिनच्या ज्या कंपन्या आहेत, त्यांनी या संबंधाने विशिष्ट कोड ठेवावा, तो कोड रजिस्टर केल्याशिवाय सर्च इंजिनद्वारा आऊटलोड होणार नाही, अशापध्दतीचा कायदा शासन करणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : केंद्र सरकारचा यासंबंधीचा जो कायदा आहे, त्यामध्ये अमेंडमेंट करण्याचा केंद्र सरकार विचार करत आहे. सायबर गुन्ह्यांच्या संबंधाने कारवाई करण्याच्या दृष्टीने तज्ज्ञ समिती नेमून त्यांनी शिफारस केल्याप्रमाणे कायदा केला जाईल.

श्री.श्रीकांत जोशी : सहा मेजर सर्च इंजिन कंपन्या या विदेशातील आहेत. औरंगाबादच्या डी.एस.पी.नी अशाप्रकारच्या एका गुन्ह्यामध्ये संबंधित विदेशातील कंपनीला भारतीय कायद्याचा आधार घेऊन नोटीस पाठविलेली आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटलेले आहे की, तुम्ही आम्हाला याबाबतची माहिती दिली नाही तर तुमच्या विरुध्द एफ.आय.आर. दाखल करुन आम्हाला इंटरपोलकडे जावे लागेल. तेव्हा ही सगळी माहिती तुम्ही द्या. डी.एस.पीं.नाही अशाप्रकारची आपल्याला कारवाई करता येते, हे माहीत नव्हते. त्यांच्या लक्षात ही बाब दोन वकिलांनी आणून देऊन याबाबतचा कायदा वाचून दाखविला. आपल्या महाराष्ट्रातील टेलिफोनवरुन सर्च इंजिनद्वारा आऊटलोड केले जाते. आपल्या कायद्याच्या आधारे त्यांच्यावर अशाप्रकारचा बॅन आपण टाकू शकतो. परंतु सरकार तसे काही करत नाही ही अडचण आहे.तेव्हा शासन यादृष्टीने विचार करणार आहे का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सजेशन फॉर ॲक्शन.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, टारगेट इंटरनेट कॅफेचे मालक श्री.नितीन ज्ञानेश्वर सावरकर यांना जामिनावर सोडलेले आहे, हे खरे आहे काय ? आताच मंत्री महोदयांनी सांगितले की, अशाप्रकारचे गुन्हे करणाऱ्यांना आम्ही सोडणार नाही. मागच्या नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडयामध्ये नांदेड येथील श्री.जाजू नावाच्या मुलाला अशाप्रकारच्या मुलींची सीडी बनवितांना पकडले होते. अशाप्रकारच्या त्यांच्याकडें व्हीडीओ कॅसेट मिळाल्यानंतर शहरामधील दुकानांवर धाडी घालायला हव्या होत्या. परंतु असे न करता अशा अशाप्रकारची कॅसेट मिळालेली आहे,

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (पुढे सुरु...

त्यामध्ये दोन-तीन मुलींचा समावेश झालेला आहे, असे सांगण्यात आल्यानंतर संबंधित लोकांनी ती व्हीडीओ कॅसेट डिस्ट्रॉय करुन टाकली. नंतर श्री.जाजू हा आरोपी तिसऱ्या दिवशी जामिनावर सुटला. अशाप्रकारच्या गुन्ह्यांमध्ये जामिनावर सोडले जाणार नाही, अशाप्रकारचे विसंगत उत्तर का दिले जाते ? मालक श्री.नितीन ज्ञानदेव सावरकर याला जामिनावर सोडले आहे हे खरे आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री.सावरकर यांना जामीन मिळाला हे खरे आहे. म्हणूनच मी सुरुवातीला सांगितले की, अशाप्रकारच्या केसेसवरुन देशाबाहेरची संस्कृती येऊ लागलेली आहे.

श्रीमती कांता नलावडे : आपण त्याबाबत काही कृती करत नाही. त्यांना जामिनावर का सोडले ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : तेच मी सांगत आहे. आपला जो काही यासंबंधीचा कायदा आहे, त्यामध्ये काही तृटी असतील तर यासाठी एक तज्ज्ञ समिती नेमली जाईल. अशाप्रकारचे गुन्हे करणारे आरोपी हे सुटणार नाहीत, या दृष्टीने कायदा केला जाईल.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, सायबर क्राईमच्या संबंधात गृह खात्याला डोकेदुखी झालेली आहे. दोन महिन्यापूर्वी ठाणे शहरामध्ये ठाणे पोलीस आयुक्तांनी सायबर क्राईम इन्व्हेस्टीगेशन, सायबर लॅबचे उद्घाटन केलेले आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ RJW/ 12:50

श्री. अनंत तरे....

अशा प्रकारच्या प्रॉजेक्टचे उदघाटन माननीय मुख्यमंत्र्यांनी केले त्या ठिकाणी मीही उपस्थित होतो. सायबर लॅब आणि सायबर क्राईम इन्व्हेस्टिगेशन सेंटर्स निर्माण केले जातील असे त्यांनी म्हटले होते. ठाण्याच्या माननीय पोलीस आयुक्तांनी सुध्दा परीश्रम करुन अशा त-हेची लॅब उघडण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारचे सायबर लॅब आणि सायबर क्राईम इनव्हेस्टिगेशन सेंटर्स संपूर्ण राज्यभर सुरु करणार काय?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. मुझफ्फर हुसेन :सभापती महोदय, सायबर लॅबमध्ये अश्लील चित्रे दाखविण्याचे प्रकार घडतात. तसेच संपूर्ण राज्यामध्ये छोटया-मोठया शहरात व्हिडियो पार्लर आहेत. या व्हिडियो पार्लरमध्येसुध्दा अश्लील चित्रे दाखविण्याचे प्रकार घडतात. सदर व्हिडियो पार्लर्सना शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे काय असेल तर ज्यांनी मंजुरी घेतली नसेल त्या व्हिडियो पार्लरवर शासन काय कारवाई करणार आहे?

श्री. सिध्दराम म्हेत्रे :सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर आधीच दिलेले आहे. परत सांगतो की, जे व्हिडियो पार्लर अशा पध्दतीने बेकायदेशीरपणे चालविले जात असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री. दिलीप देशमुख :सभापती महोदय, आघाडी सरकारने डान्सबार बंद करण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला. तसेच सायबर कॅफेची आता आवश्यकता नाही. कारण अनेकांच्या घरामध्ये पर्सनल संगणक आलेले आहेत. सायबर लॅबमध्ये दाखविण्या येणा-या अश्लील चित्रपटांच्या बाबतीत कायद्याने काही करता येत नसेल आणि ते लोक जामिनावर सुटत असतील तर हे सायबर कॅफे बंद करण्याचा निर्णय शासन करणार आहे काय?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी विनंती अशी आहे की, सायबर लॅबचा उपयोग अनेक गोरगरीब मुलांना तेथे जाऊन माहिती मिळविण्यासाठी होतो. मी परवा शंकरनगर येथे एका सायबर लॅबमध्ये गेलो होतो. त्या ठिकाणी कै. डॉ. श्रीकांत जिचकार यांचा मुलगा इंटरनेटवरुन महत्वाची माहिती खेचून घेत होता. यामध्ये एखादी गोष्ट चुकीची झाली असेल त्यामुळे ते सरसकट बंद करणे योग्य नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप देशमुख :सभापती महोदय, सगळया महाविद्यालयांना आणि शाळांना संगणक उपलब्ध झालेले आहेत. आमदार फंडातूनही शाळांना संगणक देता येतो. म्हणून सायबर लॅबमधून असे प्रकार वाढणार असतील तर त्याबद्दल शासनाची काय भुमिका राहणार आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्य श्री. दिलीप देशमाुख आणि श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे एखादी चुकीची गोष्ट झाली तर जशी हाताला जखम झाली म्हणून हात तोडून टाकत नाही, जखम झाली तर ती बरी होण्यासाठी औषधोपचार घेतो. जग माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात जात असतांना सायबर लॅब मुळासकट नष्ट करणे म्हणजे आपण मागे जात आहोत असे चित्र दिसेल. म्हणून सरकार याबाबतीत आपल्यापरीने प्रयत्न करील. कायदा करील. तसेच आपल्या मुलांचे चांगले प्रबोधन करणे त्यांच्यावर चांगले संस्कार करणे हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे. अशा त-हने मुलांवर चांगल्या त-हेचे संस्कार झाले तर हया सगळया गोष्टी थांबतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आघाडी सरकारचे काय उत्तर आहे ! सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी त्यांचे उत्तर सांगितलेले आहे. माला फक्त एकच प्रश्न विचारावयाचा आहे. मंत्रिमहोदयांनी जे सांगितले त्याचे मी स्वागत करतो. सायबर लॅब हे आधुनिक तंत्रज्ञान आहे ते लोकापर्यंत गेले पाहिजे. श्री. दिलीपराव देशमुख यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या या सायबर लॅबमध्ये जे धंदे चालतात त्यामुळे व्यक्त केल्या आहेत. आणि अशा प्रकारच्या गुन्हयात जे कलप्रिट सापडतात त्यांना लगेच जामिनावर सोडून दिले जाते. म्हणून अशा प्रकारच्या गुन्हयांसाठी नॉन बेलेबल ऑफेन्स झाला पाहिजे जेणेकरुन त्याला शिक्षा झाली पाहिजे आणि ती कठोर शिक्षा झाली पाहिजे. दोन-चार दिवस पोलीस कस्टडी झाली की, ते ताळयावर येतील. या संबंधीच्या गुन्हयाकरिता कठोर शिक्षा करण्याकरिता कलम 120 (ब) किंवा त्याहून चांगले कलम लावावे. जेणेकरुन तो नॉनबेलेबल ऑफेन्स होईल.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .......

जेणेकरुन नंतर कोणाची अशा प्रकारे हिंमत होणार नाही त्यादृष्टीने शासन अशी काळजी घेणार काय ?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

प्रा. फौजिया खान : महोदय, निवेदनामध्ये एमपीइजी नांवाच्या फाईलमधील प्रिंट आऊट काढून तसेच सॅमट्रॉन कंपनीचे तिन्ही मॉनिटर व त्यांचे की-बोर्ड आणि माऊस असे एकूण 60 हजाराचा माल जप्त करण्यात आला, असे म्हटले आहे. महोदय, मेरा प्रश्न यह है कि आपने उसका जो सामान जब्त किया है क्या इतनी ही टोटल सम्पति उस सायबर कॅफे की थी तथा मेरा दूसरा प्रश्न यह है कि वह सायबर कॅफे अभी चालू है या बंद है? यानी उसका इन्टरनेट कनेक्शन तथा लाइसेंस रद्द किया है या नहीं ?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, जो गुन्हा दाखल झालेला आहे त्यामधून जी माहिती समोर आली आहे त्यानुसार हे साहित्य जप्त करण्यात आले. त्याची संपूर्ण संपत्ती नाही परंतु धाड टाकल्यानंतर जे जे साहित्य समोर आले ते सर्व जप्त करण्यात आले आणि कॅफे सध्या चालू आहे.

डॉ. दीपक सावंत : कायदयामध्ये यासंबंधीची तरतूद नसल्यामुळे शासनाने असमर्थता व्यक्त केली. परंतु आमची मागणी अशी आहे की, पुढील अधिवेशनात याबाबत कायदयात दुरुस्ती करुन हा गुन्हा नॉन बेलेबल ऑफेन्स करण्याबाबत प्रयत्न करण्यात येतील काय ?

डॉ. एन.पी.हिराणी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी अत्यंत स्पेसिफिक असा प्रश्न विचारला आहे. ज्या ठिकाणी एवढा मोठा गुन्हा होतो, तरुण पिढीला चुकीच्या मार्गाने लावण्यासाठी या मॉडर्न टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतात. तरी देखील अशा कॅफेचे रजिस्ट्रेशन रद्द न करता फक्त त्याची 75 हजाराची मालमत्ता जप्त करण्यात येते, तसेच बेलेबल ऑफेन्स रजिस्टर करुन त्याला सोडून दिले जाते. म्हणून समाजात अशा प्रकारचे कृत्य करणारे जे असतील त्यांच्यावर दहशत बसावी म्हणून नॉन बेलेबल ऑफेन्स रजिस्टर व्हावा म्हणून शासन मूळ कायदयात तशी दुरुस्ती करणे हे अपेक्षित आहे. माझा प्रश्न

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी.हिराणी...

असा आहे की, या कॅफेचे लायसन्स ताबडतोब रद्द करणार काय ? आणि इतरांना असे कृत्य करण्यासाठी दहशत बसावी म्हणून अशा प्रकारचे गुन्हे नॉन बेलेबल ऑफेन्स रजिस्टर्ड करण्यासाठी मूळ कायदयात शासन पुढील अधिवेशनात दुरुस्ती करणार काय ?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, संबंधित सायबर कॅफेचे लायसेन्स रद्द केले जाईल आणि त्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमली जाईल व त्या समितीचा विचार घेऊन सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

--------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: हिंगोली जिल्हयात दरोडेखोरांनी नगराध्यक्षांवर केलेला हल्ला.

**मु.शी.**: हिंगोली जिल्हयात दरोडेखोरांनी नगराध्यक्षांवर केलेला हल्ला यासंबंधी सर्वश्री सुरेशदादा देशमुख, सुरेश जेथलिया, अनंत तरे, अरविंद सावंत, अनिल परब, डॉ. नीलम गो-हे, डॉ. दीपक सावंत वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुरेश देशमुख (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

( येथे "हिंगोली जिल्हयातील टाले हॉलनजीक अज्ञात सात-आठ दरोडेखोरांच्या टोळक्याने हिंगोलीचे नगराध्यक्ष सुधीरअप्पा सराफ यांच्यावर दिनांक 23 नोव्हेंबर 2005 रोजी वा त्या सुमारास प्राणघातक हल्ला करुन त्यांच्याकडील पैशांची बॅग लुटणे, या हल्ल्यात श्री. सराफ हे गंभीर जखमी झाले असून त्याच्याबरोबर अन्य चार जण गंभीर जखमी होणे, या घटनेच्या निषेधार्थ स्थानिक लोकप्रतिनिधींनी व संतप्त नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेला मोर्चा, गेल्या पंधरवडयात चो-या, वाटमारी, महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्रांची चोरी आदि प्रकारात झालेली वाढ, दरोडेखोरांना अद्याप अटक करण्यास पोलिसांना आलेले अपयश, परिणामी त्या परिसरात पसरलेले असंतोषांचे व घबराटीचे वातावरण, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, पोलिसांच्या निष्क्रिय कारभारामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

**( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)**

-------------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश देशमुख : सभापती महोदय, नाशिक जिल्हयातील टाले हॉलनजीक 23 तारखेला संध्याकाळी आठ ते साडेआठ वाजता हिंगोलीचे नगराध्यक्ष श्री. सुधीरअप्पा सराफ यांच्यावर प्राणघातक हल्ला करुन त्यांच्याजवळचे सोने,चांदी तसेच रोकड रक्कम दरोडेखोरांनी लंपास केली. परंतु या ठिकाणी जे निवेदन करण्यात आलेले आहे ते वस्तुस्थिती सोडून करण्यात आलेले आहे. तसेच दुस-या घटनेशी या प्रकरणाचा संबंध जोडून सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे या घटनेत श्री. सुधीरअप्पा यांच्या कमरेवर गोळी झाडण्यात आली असून त्यांच्यावर हत्याराने वार सुध्दा करण्यात आलेला आहे तसेच त्यांच्या बरोबर त्यांचे 4 मित्र होते त्यांना सुध्दा मारहाण करण्यात आलेली आहे. आता श्री. सुधीरअप्पा हे बॉंबे हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत. यासंदर्भात पोलिसांनी सांगितले आहे की, लंपास झालेल्या मालाच्या संदर्भात श्री. सुधीरअप्पा यांच्याशी विचारणा करुन देखील त्यांनी यासंदर्भातील काहीही माहिती दिली नाही. चोरी गेलेल्या मालाच्या संदर्भात श्री. सुधीरअप्पा यांच्या भावाने सांगितले आहे की, या लुटीमध्ये 3 ते 3.5 किलो सोने, 25 ते 30 किलो चांदी आणि 2 लाख रुपये रोख गेलेले आहेत. अशी वस्तुस्थिती असतांनाही या ठिकाणी लक्षवेधी सूचनेत जी माहिती दिलेली आहे ती चूकीची असून सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. या प्रकरणाची चौकशी करीत असलेल्या पोलीस निरीक्षकांचीच यामध्ये बांधिलकी दिसून येते तसेच या गुन्हयामध्ये ते सामिल असण्याची शक्यता दिसून येते. आतापर्यंत या गुन्हयाच्या संदर्भात कसल्याही प्रकारची माहिती उघड झालेली नाही. तसेच तपास देखील ज्या पध्दतीने व्हावयास पाहिजे त्या पध्दतीने होत नाही. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याचे काम ज्या पोलीस निरीक्षकाला देण्यात आलेले आहे त्यांना निलंबित करुन दुस-या अधिका-यामार्फत या प्रकरणाची पुन्हा नव्याने चौकशी सुरु करण्याचे आदेश माननीय मंत्रीमहोदय देतील का?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हिंगोलीचे नगराध्यक्ष श्री.सुधीरअप्पा सराफ यांच्यावर हल्ला झाल्यानंतर त्यांना बॉंबे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आलेले आहे ही गोष्ट खरी आहे. श्री. सुधीरअप्पा यांचा जबाब घेण्यासाठी बॉंबे हास्पिटलमध्ये पी.आय. श्री. तावडे गेले असता त्यांनी सांगितले की, तब्येत ठीक झाल्यानंतर हिंगोली येथे आल्यानंतर सर्व माहिती दिली जाईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्रीमहोदय, चुकीची माहिती देत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. देशमुख साहेबांनी चोरीला कोणकोणत्या गोष्टी गेलेल्या आहेत यासंदर्भातील संपूर्ण माहिती स्पष्टपणे पोलीसांना दिलेली आहे. असे असतांनाही मंत्रीमहोदय या ठिकाणी चुकीची माहिती देत आहेत आणि अशा प्रकारे चुकीची माहिती आणि चुकीचे उत्तर सभागृहाच्या रेकॉर्डवर येऊ नये यासाठी मंत्रीमहोदयांनी यासंदर्भातील खरी वस्तुस्थिती काय आहे त्याची माहिती सभागृहाला द्यावी. पोलीस डिपार्टमेंट चांगले काम करीत नसेल तर त्यांच्यावर आपण पांघरुण कशासाठी घालता?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, चोरी गेलेल्या मालाच्या संदर्भात पोलीसांनी सुधीरअप्पा आणि त्यांच्या कुटुंबियांना वारंवार विचारले परंतु तरी सुध्दा त्यांनी माहिती दिलेली नाही. अशी माहिती माझ्याकडे असतांना सन्माननीय सदस्य श्री. देशमुख आणि मेटे साहेब सभागृहात जी माहिती देत आहेत ती सत्य आहे असे समजून संबंधितांचे जबाब घेतले जातील. तसेच वरिष्ठ पातळीवरुन या प्रकरणाची चौकशी केली जाईल.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सुधीरअप्पा यांच्यावर हल्ला झाल्यामुळे येथील लोक प्रतिनिधींनी आणि जनतेने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. या प्रकरणाची जे चौकशी करीत आहेत त्यांचा या प्रकरणाशी संबंध असल्याची शंका आहे त्यामुळे त्यांच्याकडून हा तपास काढून दुस-या जिल्हयाच्या वरिष्ठ अधिका-याकडून या प्रकरणाची चौकशी नव्याने केली जाईल का? तसेच या प्रकरणाच्या संदर्भात सीआयडी चौकशी केली जाईल काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्य श्री. मेटे साहेबांनी सांगितल्या प्रमाणे दुस-या जिल्हयाच्या वरिष्ठ अधिका-यांमार्फत या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय,ही घटना गंभीर आहे. असे असताना या लक्षवेधीवर गोलमाल उत्तर दिलेले आहे. सदर घटना ही 23 नोव्हेंबर रोजी घडली आहे. हिंगोलीचे नगराध्यक्ष हे सत्ताधारी काँग्रेस पक्षाचे आहेत. त्यांचे घर आणि दुकान यात पाच मिनिटाचे अंतर आहे. त्यांचे घर आणि दुकान या दरम्यान ग्रामीण पोलीस चौकी आहे. असे असताना देखील रात्रौ 8.00 ते 8.30 च्या दरम्यान सदर घटना घडली आहे. सगळे व्यापारी दुकान बंद करून घरी जात असताना ही घटना घडली आहे. असे असले तरी येथे जे उत्तर दिले आहे, ते पूर्ण माहितीच्या आधारे दिलेले नाही. सदर घटना कशी घडली हे मी थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. घटनेच्या दिवशी लोडशेडिंग असल्यामुळे अंधाराचा फायदा घेऊन नगराध्यक्षांवर हल्ला करण्यात आला आहे. गंभीर अवस्थेमध्ये असताना नगराध्यक्षांना नांदेड येथील रूग्णालयात ॲडमिट केल्यानंतर तेथील डॉक्टरांनी त्यांना मुंबईला ॲडमिट करण्यास सांगितले. आजही त्या नगराध्यक्षांवर मुंबईत उपचार चालू आहेत. ते बेशुध्दावस्थेत आहेत. असे असताना मुद्देमाल किती गेला यासंबंधीची विचारणा पोलिसांकडून होत आहे. असे प्रकार मराठवाडयात जालना, नांदेड येथे घडत आहेत. आता पर्यंत या प्रकरणाचा तपास का लागलेला नाही ? असा माझा सवाल आहे. दरोडेखोर हे वाहनाने पळून न जाता चालत गेले आहेत. असे असताना या प्रकरणाचा तपास का लागला नाही ? यासंबंधी शासनाने निवेदन करावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणाचा तपास करीत असताना दोन संशयित आरोपींना पकडण्यात आले आहे. परंतु, त्यांचा या गुन्हयाशी काही संबंध नाही. मात्र, त्यांच्याकडून पोलिसांनी 14.8 किलो चांदी व रोख रु.1,80,000/- असा ऐवज जप्त केला आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मेटे यांनी धीर धरावा. ज्या सन्माननीय सदस्यांची नावे लक्षवेधी सूचनेवर आहेत, त्यांना मी प्रथम प्रश्न विचारण्याची संधी देणार आहे. मी सगळया सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देण्याचा प्रयत्न करणार आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, सदर गुन्हा रात्री 8.30 वाजण्याच्या दरम्यान घडला आहे. त्यावेळी भारनियमन होते की, विद्युत पुरवठा खंडित झाला होता ? सदर हल्ल्यामध्ये गोळीबार आणि बॉम्बस्फोट झाला आहे. गोळीबार झाला असेल तर पोलिसांनी कोणते कलम लावले आहे व बॉम्बस्फोट झाला असेल तर कोणते कलम पोलिसांनी लावले आहे ? ...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या हल्ल्यामध्ये गोळीबार झालेला आहे म्हणून आर्म ॲक्ट 25 (3) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या हल्ल्यात बॉम्बस्फोट झालेला नाही. हल्लेखोरांनी आपटीबार फोडलेला आहे. आपटीबार हा एक्सप्लोझिव्हच्या अंडर येत नाही. घटनेच्या वेळी लोडशेडिंग होते किंवा नाही यासंबंधीची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान :सभापति महोदय, मैंने भी अपना नाम इस लक्षवेधी सूचना के लिए दिया है, लेकिन मेरा नाम काट दिया गया है. इसलिए इसकी जाँच होनी चाहिए.

उप सभापति : इसकी जाँच होगी.

श्रीमती फौजीया खान : इसकी जाँच जरुर करनी चाहिए क्योंकि प्रश्न देने का हमारा अधिकार है.

सभापति महोदय, मैं इस लक्षवेधी के संबंध में यह प्रश्न पूछना चाहती हूं, अभी माननीय सदस्य श्री जेथलिया जी ने जैसा बताया कि परभणी, जालना, नांदेड, हिंगोली एवं मराठवाड़ा के अन्य क्षेत्रों में इस प्रकार की घटनाएं हुई हैं. कहीं बम विस्फोट की घटना हुई है, एक क्षेत्र में विद्या देशमुख का मर्डर हुआ है और इस घटना में हिंगोली के नगराध्यक्ष को गोली मार कर जख्मी कर दिया गया है. फिर भी निवेदन में यह कहा गया है कि शहर में भय का वातावरण नहीं है. इतनी सारी घटनाएं हो रही है और यह कहा जाता है कि भय का वातावरण नहीं है, यह कैसे हो सकता है ? मैं माननीय मंत्री जी से पूछना चाहती हूं कि इन क्षेत्रों में हुई इन घटनाओं में अब तक एक भी मेजर क्राईम ट्रेस क्यों नहीं हुआ है ? इसलिए अपराधियों का पता लगाने के लिए विशेष जांच करने की जरुरत है और इसके लिए वरिष्ठ अधिकारियों को जिम्मेदार ठहराना चाहिए. क्योंकि दो साल में एक भी मेजर क्राईम डिटेक्ट नहीं हुआ है. मैं यह भी पूछना चाहती हूं कि कृपया, मंत्री महोदय यह बताए कि कितने मेजर क्राईम डिटेक्ट हुए हैं ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या परिसरामध्ये गुन्ह्याचा किती तपास झाला याची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. ही माहिती मी पटलावर ठेवतो. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणी वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्यात येईल.

**उपसभापती** : आतापर्यंत या विषयावर जी चर्चा झाली त्यातून एकच दिसून येते की, या गुन्ह्याचा तपास करण्यात स्थानिक पोलिसांची उदासीनता दिसून येते. हिंगोलीचे नगराध्यक्ष यांचेवर हल्ला झालेला आहे. तपासात स्थानिक पोलिसांची उदासीनता दिसून येते. तेव्हा आपण हे प्रकरण सी.आय.डी.कडे सोपवावे. सन्माननीय सदस्यांचीसुध्दा तशी मागणी आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आपण दिलेल्या सूचनेनुसार या प्रकरणी सी.आय.डी. चौकशी करण्यात येईल.

...2

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Y-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण जे निदेश दिले ते योग्य आहे. आपण जर निवेदन वाचले तर त्यावरुन पोलीस आणि गुन्हेगारांची मिलीभगत आहे असे दिसून येते. नगराध्यक्षांवर गोळीबार होतो, ते जखमी होतात. ही घटना दिनांक 23 नोव्हेंबर 2005 रोजी घडली आणि ही लक्षवेधी सूचना दिल्यानंतर दिनांक 2 डिसेंबर रोजी दोन संशयित आरोपिंना अटक करण्यात आली. सभापती महोदय, निवेदनात असे म्हटलेले आहे की,"त्यांच्याकडून 14 किलो चांदी जप्त करण्यात आली. सदर जप्त केलेला माल हा नांदेड येथील घरफोडीच्या गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले आहे." याचा अर्थ काय ? याचा अर्थ ही लक्षवेधी सूचना आल्यानंतर पोलिसांनी कोणालातरी पकडून समोर उभे केले आहे. आपण दुसऱ्या जिल्ह्यातील अधिकाऱ्यांकडे तपास देणार काय ? असे विचारले असता "होय"असे सांगितले. याचा अर्थ तुम्हाला त्यांच्या इंटीग्रीटीबद्दल भरवसा नाही. आमचे पोलीस अधिकारी अत्यंत सक्षम आणि सचोटीचे आहेत असे आपण सांगावयास पाहिजे होते. पण आपण तसे उत्तर दिले नाही. आपण हा तपास सी.आय.डी.कडे सोपविणार आहात. माझा प्रश्न आहे की, आपणास संबंधित अधिकाऱ्याला सस्पेंड करणार आहात काय ?

श्री.सुरेश देशमुख : सभापती महोदय, माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, आपण संबंधित अधिकाऱ्याला सस्पेंड करुन चौकशी करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आपण निदेश दिल्याप्रमाणे या प्रकरणी सी.आय.डी. चौकशी करण्यात येईल. या गुन्ह्याचा तपास सी.आय.डी.करणार आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यामध्ये काय अडचण आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आपल्या निदेशानुसार या प्रकरणाची सी.आय.डी. चौकशी जाहीर करण्यात आलेली आहे. त्या चौकशीमध्ये गुन्हयाचाच नव्हेतर ज्या अधिकाऱ्यांनी तपासामध्ये हलगर्जीपणा केला आहे त्याची सुध्दा चौकशी केली जाईल. चौकशीमध्ये जर कोणी दोषी आढळले तर त्यांना निलंबित सुध्दा करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण या गुन्हयाचा तपास करण्यासाठी सी.आय.डी. चौकशी करण्याचे निदेश दिलेले आहेत. आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, या गुन्हयाचीच नव्हेतर त्या पोलीस अधिकाऱ्याची सुध्दा चौकशी करण्यात येईल. महोदय, जर हा अधिकारी सेवेत असताना चौकशी झाली तर कागदपत्रे लंबे करण्याचे काम होऊ शकेल. इंटेग्रीटीविषयी माननीय मंत्रिमहोदयांनी ठामपणे बोलावयास पाहिजे. महोदय, या ठिकाणी चौकशीसंदर्भात घेतलेला निर्णय अभिनंदनीय आहे. त्यातल्यात्यात माननीय मंत्रिमहोदय गुन्हयाच्या बरोबरच पोलीस अधिकाऱ्यांची सुध्दा चौकशी करणार आहेत. परंतु सिंहासनावर बसून त्याची चौकशी होऊ शकणार नाही. म्हणून आताच्या आता त्या अधिकाऱ्याला निलंबित करण्यात यावे. जर त्याला निलंबित करण्यात अडचण येत असेल तर त्या अडचणीसंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सी.आय.डी.चौकशीमध्ये जर अडचण येत असेल तर त्या पोलीस अधिकाऱ्याची इतरत्र बदली करुन, चौकशी करण्यात येईल.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, त्या अधिकाऱ्याची दुसऱ्या ठिकाणी बदली करण्यात येईल. म्हणजे अगोदरच्या ठिकाणी मिलीभगत झाली म्हणून त्याला आता दुसरीकडे मिलीभगत करण्यासाठी पाठवावयाचे आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, या घटनेमध्ये कोणचाही इंटरेस्ट नाही. परंतु या केसमध्ये जो फिर्यादी आहे तो स्वत:हून काहीही सांगत नाही. परंतु तरी सुध्दा सी.आय.डी.चौकशीमध्ये अडथळा होण्याची शक्यता असेल तर त्याची इतरत्र बदली करुन चौकशी केली जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या लक्षवेधी सूचनेवर भरपूर चर्चा झालेली आहे. सरकारी अधिकाऱ्याला निलंबित करण्याची सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मागणी केली आहे. आपल्या विनंतीनुसार या गुन्हयाचा तपास सी.आय.डी. कडे वर्ग करण्याचे माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केले आहे. निलंबनाबाबत या ठिकाणी मागणी झाली, परंतु मी सांगू इच्छितो की, आपण सर्वांना समान संधी देत असतो. त्यामुळे अधिकाऱ्यांना निलंबित करुन न्याय मिळेल हे मानण्यास मी तयार नाही. आपल्या सर्वांनाच माहीत आहे की, दादासाहेब जाधवराव यांच्यावर ज्यावेळी हल्ला झाला होता त्यावेळी सुध्दा सभागृहात अशीच मागणी झाली होती. त्यावेळी आपण प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन माहिती घेऊन नंतर निर्णय घेतला होता. त्यामुळे सभागृहामध्ये अशाप्रकारच्या भावना निर्माण होणे, शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये अंतर पडण्याची घटना घडू नये असे मला वाटते.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ..

त्या ठिकाणी जो गुन्हा घडलेला आहे त्या गुन्हयातील गुन्हेगारांना शासन झाले पाहिजे अशी सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी भावना व्यक्त केलेली आहे . या गुन्हयाचा तपास योग्य पध्दतीने व्हावा म्हणून ती चौकशी सी.आय.डी.कडे देण्याचे माननीय गृह राज्यमंत्र्यांनी मान्य केलेले आहे.दुसरी बाब अशी आहे की, या प्रकरणातील संबंधित अधिकारी त्याच ठिकाणी राहिले तर तपास कामामध्ये अडथळा येईल किंवा कारवाई करण्याच्या बाबतीत अडथळा निर्माण होईल असे सन्माननीय सदस्यांना वाटते. त्यामुळे या अधिका-याची दुसरीकडे बदली करण्यास सुध्दा माननीय गृह राज्यमंत्री तयार आहेत. कोणत्याही अधिका-यांची बदली करण्याचे अधिकार हे शासनाचे आहेत त्यामुळे या अधिका-याची बदली कोणत्या ठिकाणी करावी याबाबतीत मी काहीही बोलणार नाही.त्या संदर्भात सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी अशा भावना व्यक्त केलेल्या आहेत की या अधिका-याना त्या ठिकाणी ठेवण्यामध्ये तसेच त्यांना निलंबित न करण्यामध्ये माननीय मंत्रिमहोदयांना काय इंटरेस्ट आहे?. परंतु तशा प्रकारचा आग्रह धरण्यामध्ये माननीय सदस्यांचा काय इंटरेस्ट आहे ?.....

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

माझे म्हणणे पूर्ण झाल्यानतर माननीय सदस्यांनी बोलावे. मला एवढेच म्हणावयाचे होते की....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या सभागृहात हा मुद्दा उपस्थित करण्यात आल्यानंतर सुध्दा आपण मोकळे सुटलो अशा प्रकारची भावना त्या अधिका-याच्या मनात येता कामा नये.हा आमचा त्या मागचा उद्देश आहे.

**उपसभापती** : एखाद्या अधिका-याला निलंबित करण्यात यावे अशा प्रकारच्या भावना ज्यावेळी सन्माननीय सदस्यांनी सभागृहात व्यक्त केल्या होत्या त्या वेळी मी योग्य तो निर्णय दिलेला आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण जो निर्णय दिला आहे त्याबद्दल मला पूर्ण आदर आहे. आपण जो काही आदेश दिलेला आहे तो आदेश मान्य करणे हे आमचे कामच आहे.या संदर्भात मला आपल्याला एक विनंती करावयाची आहे. सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य ज्यावेळी एखाद्याला निलंबित करण्याची मागणी करतात त्यावेळी त्या मागे कोणाचा काहीही इंटरेस्ट नसतो.आपण या ठिकाणी जे सांगितले आहे त्याचा वेगळा अर्थ निघू शकतो.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगतो की, मी जे काही बोललो आहे त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांना जर वाटत असेल तर ते शब्द मी मागे घेतो. त्या अधिका-याची बदली करण्यात येईल असे माननीय गृह राज्यमंत्र्यांनी मान्य केलेले आहे.सभागृहातील लोकप्रतिनिधीबद्दल किंवा या सभागृहाबद्दल प्रशासनामध्ये चुकीचा मेसेज जाता कामा नये असे मला वाटते. अधिका-याची बदली करण्याच्या बाबतीत माननीय गृह राज्यमंत्र्यानी मान्य केलेले आहे.त्याचबरोबर सबंधित अधिका-याची चौकशी करण्यात येईल आणि या चौकशमध्ये जर अधिकारी दोषी आढळून आलो तर त्यांच्या विरुध्द योग्य ती कारवाई करण्याचे सुध्दा माननीय गृह राज्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे. जो काही गुन्हा घडलेला आहे त्या गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेता योग्य ती कारवाई करण्याचे तसेच या प्रकरणातील संबधित अधिका-याची बदली करुन चौकशी करण्याचे माननीय गृह राज्यमंत्र्यांनी मान्य केलेले आहे तेव्हा या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जास्त आग्रह धरु नये. अशी माझी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.या बाबत सन्माननीय सदस्यांना जे काही सांगावयाचे असेल ते त्यांनी सागावे.

श्री.चन्द्रकांत रघुवंशी : या अधिका-याची बदली गडचिरोली जिल्हयात करण्यात यावी हे कर्तव्य दक्ष अधिकारी आहेत आणि गडचिरोली भागात नक्षलवाद्यांचा प्रश्न निर्माण झालेले आहेत तेव्हा त्यांची तेथे बदली करण्यात यावी.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.कडे देण्यात यावी त्याचबरोबर या प्रकरणात गुंतलेल्या अधिका-याची जिल्हयाबाहेर बदली करण्यात येईल आणि त्याची चौकशी करण्यात येईल या चौकशीमध्ये जर ते दोषी आढळून आले तर त्यांच्याविरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात येईल असे आश्वासन माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय ,सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन त्या अधिका-याची जिल्हया बाहेर बदली करण्यात येईल.त्याचबरोबर या धटनेची सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यात येईल तसेच या अधिका-याचीसुध्दा चौकशी केली जाईल आणि या चौकशी मध्ये जर हे अधिकारी दोषी आढळून आले तर त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

---



पृ.शी :ठाणे औद्योगिक क्षेत्रातील बंद पडलेले हजारो कारखाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु.शी: ठाणे औद्योगिक क्षेत्रातील बंद पडलेले हजारो कारखान्यासबंधी
श्रीमती मंदा म्हात्रे,श्री.जितेन्द्र आव्हाड,प्रा.फौजिया खान, सर्वश्री
सदाशिवराव पोळ,वसंतराव चव्हाण, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जगन्नाथ
शेवाळे ,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती मंदा म्हात्रे (विधान सभेने निवडलेल्या): अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करते.

" ठाणे येथील औद्योगिक क्षेत्रातील कारखानदारांना सद्यस्थितीत येत असलेल्या विविध अडचणींमुळे परिसरातील औद्योगिक क्षेत्राची होत असलेली प्रचंड पिछेहाट, औद्योगिक क्षेत्रातील हजारो कारखाने बंद पडल्यामुळे परिसरामध्ये वाढत असलेले बेरोजगाराचे धक्कादायक प्रमाण या संदर्भात शासनाच्या उदासीन भूमिकेमुळे कृत्रिमरीत्या आलेली औद्योगिक मंदी, परिसरातील औद्योगिक वसाहतीतील जमिनींच्या किंमती व ठाणे येथील वागळे इस्टेट व परिसरातील औद्योगिक जमिनींच्या किंमतीमध्ये असलेली प्रचंड तफावत, त्यामुळे या परिसरामध्ये नवीन उद्योग उभारणीसाठी येत असलेल्या प्रचंड अडचणी,ठाणे औद्योगिक वसाहतीतील जागेच्या किंमती कमी करुन नवीन उद्योगांची उभारणी होण्याच्या संदर्भात त्वरित कार्यवाही करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी उद्योग मंत्री यांच्याकडे नोव्हेंबर 2005 तसेच अलीकडील काळात वेळोवेळी केलेली मागणी, कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी परिसरातील जनता तसेच बेरोजगारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, परिसरामध्ये कामधंद्यासाठी उपाययोजना नसल्याने बेरोजगारांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस होत असलेली वाढ व ठाणे येथील औद्योगिक परिसरातील उद्योजकांना येत असलेल्या अडचणी दूर करण्याच्या संदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया"

श्री.अशोक चव्हाण ( उद्योग मंत्री ) :अध्यक्ष महाराज. लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे ) नंतर श्री.सुंबरे ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 13:25

( लक्षवेधी सुचनेवरील मा. उद्योगमंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये आज अनेक कारखान्यांना येणाऱ्या विविध अडचणींमुळे तेथील औद्योगिक क्षेत्राची आज पिछेहाट होत आहे. त्याचप्रमाणे अनेक तरूण बेरोजगार हात आहेत आणि प्रचंड प्रमाणात या बेरोजगारांची संख्या वाढलेली आहे. तेव्हा यासंदर्भात माझा नेमका प्रश्न असा आहे की, ठाणे शहरातील या एमआयडीसी परिसरामध्ये जे काही उद्योग आहेत त्यापैकी आज किती सुरू आहेत आणि किती बंद आहेत याची माहिती आपण देऊ शकाल काय ? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ठाणे येथील काही अंतरावर रबाले येथील औद्योगिक भूखंड वाटपाचे भाव 2500 चौ.फूट असे आहेत तर ठाणे एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचे भाव 7800 चौ.फूट असे आहेत. त्याचा परिणाम असा होतो आहे की, अनेक उद्योग आज त्या ठिकाणी येण्यास उत्सुक असताना ही जी दरामध्ये मोठी तफावत आहे त्यामुळे ते तेथे येऊ शकत नाहीत. तेव्हा हे दर आपण कमी करणार आहात का ? याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे असे आपण निवेदनामध्ये म्हटले आहे तर तो केव्हा घेण्यात येणार आहे ? त्यानंतर तिसरा प्रश्न असा आहे की, नवी मुंबईमध्ये एमआयडीसी परिसरामध्ये आयटी पार्क आपण निर्माण केलेले आहे, सुरू केलेले आहे. तर ठाणे औद्योगिक परिसरामध्ये देखील अशी परवानगी आपण देणार आहात का ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, ठाणे एमआयडीसी परिसरातील किती उद्योग सध्या सुरू आहेत व किती बंद आहेत असा जो प्रश्न विचारला आहे त्याला उत्तर देताना मी आपल्याला सांगू इच्छितो की, तेथे आज 8817 लघुउद्योग सुरू आहेत आणि 3181 लघुउद्योग बंद आहेत. तसेच मध्यम स्वरूपाचे जे उद्योग आहेत त्यात 450 उद्योग सुरू आहेत आणि 30 उद्योग बंद आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मघाशी उल्लेख केला की, टीटीसी परिसरामध्ये आणि वागळे इस्टेट परिसरामध्ये असलेला जमिनीचा दर यामध्ये मोठी तफावत आहे. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, एमआयडीसी जेव्हा जमीन संपादित करते आणि उद्योगाचे दृष्टीने विकास करते म्हणजे त्या इकाणी रस्ते, पाणी, वीज, वगैरे ज्या पायाभूत सुविधा आहेत त्या उपलब्ध करून देते त्या सगळ्यांचा खर्च लक्षात घेऊन तेथील भूखंची किंमत ठरविण्यात येते आणि महामंडळाच्या संचालक मंडळासमोर या सर्व बाबी ठेवून भूखंडाचा दर ठरविला जातो. त्याचबरोबर त्या भागातील जी खरेदी विक्री यांचे रेडी रेकनर असते तेही हा दर ठरविताना विचारात घेतले

..... बीबी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण ....

जात असते. सभापती महोदय, खाडीच्या पलिकडे असलेला जो टीटीसी एरिया आहे तेथील औद्योगिक क्षेत्रातील जमिनीचा भाव 2500 रूपये आहे आणि वागळे इस्टेट येथील भूखंडाचा भाव 7800 रूपये चौ.फूट आहे. या दोन्ही ठिकाणच्या दरामध्ये मोठी तफावत आहे हे मान्य आहे आणि या संदर्भात शासनाकडे, महामंडळाकडे काही निवेदने देखील प्राप्त झालेली आहेत की, वागळे इस्टेट येथील जो 7800 रूपये चौ.फूट दर आहे तो खूप जास्त होत आहे. तरी तो कमी करण्यात यावा. तेव्हा याबाबतीत तपासून घेऊन मग निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण आज तरी वागळे इस्टेट औद्योगिक वसाहतीतील सगळे भूखंड विकले गेलेले आहेत, केवळ तेथील 3-4 भूखंडच शिल्लक असतील. त्यामुळे तेथे नव्याने भूखंड विक्रीचा प्रश्न येणार नाही. परंतु तेथे विक्री संबंधात काही अडच्ण असेल, काही प्रश्न असतील तर तोच या प्रश्नाचा रोख असावा असा माझा अंदाज आहे. तेव्हा हे दर नेमके किती असले पाहिजेत हे महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये प्रस्ताव आणून त्यावर निर्णय घेतला जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, अतिशय गंभीर प्रश्नाला या ठिकाणी या लक्षवेधी सुचनेच्या द्वारा वाचा फोडण्यात आली आहे. ठाण्यातील वागळे इस्टेट हा जो परिसर आहे त्याचा एकूणच महाराष्ट्राच्या औद्योगिक विषयातील मोठा सहभाग असलेला परिसर आहे. किंबहुना मुंबई आणि ठाणे येथील एमआयडीसीच्या औद्योगिक पर्वाला येथूनच सुरूवात झालेली आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. प्रचंड अशी औद्योगिक नगरी त्या ठिकाणी वसलेली आहे. परंतु सध्या ऑक्ट्रॉय आणि जागतिकीकरण यामुळे या औद्योगिक नगरीवर मोठा परिणाम झालेला आहे. येथील जागेचा भाव देखील चौरस फूटाला 7800 रूपये इतक्या प्रचंड स्वरूपाचा आहे आणि येथून 8 कि.मी. अंतरावर असलेल्या रबाळे येथील टीटीसी चा जो परिसर आहे तेथे मात्र आपल्याच रेडी रेकनर नुसार देखील अडीचशे रूपये चौरस फूट या दराने जमीन मिळणार असेल तर मग वागळे इस्टेट येथील बंद पडलेले उद्योग, तेथील मालकाला विकून जायचे म्हटले तरी शक्य होत नाही. वागळे इस्टेट ही स्टेशन पासून जवळच आहे. ....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ..... सीसी 1 ..

श्री. जितेंद्र आव्हाड....

सर्व दृष्टीने उपयुक्त असलेला हा औद्योगिक पट्टा शासनाच्या उदासिनतेमुळे बंद पडलेला आहे, ही सत्य परिस्थिती आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, 8 कि.मी. च्या अंतरावर अडीच हजार रुपये भाव आहे. ज्या औद्योगिक नगरीने महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला गती दिली आहे त्याठिकाणी मात्र भयानक अवस्था आहे. ही डिस्पॅरिटी दूर करण्यासाठी अडीच हजार नाही तर कमीत कमी साडे तीन हजार रुपये भाव दिला तर जे कारखाने आज बंद पडले आहेत व जे विकण्यायोग्य आहेत ते त्या भावाने विकता येतील. परंतु आज अडीच हजार रुपये भाव मिळत असल्यामुळे लोक टी.टी.सी.मध्ये जात आहेत. ते तिकडे न जाता वागळे इस्टेटमधील उद्योग घेण्यासाठी येतील. त्यामुळे तेथील तरुणांना नोकऱ्या मिळतील. ज्या ठिकाणी आज 4 लाख लोक काम करीत होते त्याठिकाणी आज 50 हजार सुध्दा कामगार काम करीत नाहीत अशी अतिशय भयानक अवस्था आहे. तेव्हा माझे असे म्हणणे आहे की, टी.टी.सी.चा अडीच हजार रेट असतांना आमच्याकडे आठ हजार रुपये हा रेट कशासाठी लावता? ही औद्योगिक नगरी गेली 35 वर्षे जुनी आहे. त्यामुळे आमच्याकडील बंद असलेले कारखाने कमी रेट लावला तर ते घेण्यासाठी लोक येतील व येथील उद्योगधंदे वाढतील. तेव्हा या औद्योगिक नगरीला ऊर्जितावस्था आणण्यासाठी, तिला जीवंत करण्यासाठी येत्या दोन महिन्यात हा रेट आपण कमी करणार काय? दुसरे असे की, आज 9 हजार, 18 हजार वाराचे मोठे प्लॉट शिल्लक आहेत. त्याकडे एम.आय.डी.सी. चे दुर्लक्ष झाले आहे. येथील 30 टक्के एरीया झोपडपट्टीने व्यापलेला आहे. आपले अधिकारी पैसे खाण्याचे काम करतात व झोपडपट्टया वाढविण्याचे काम करतात. त्यामुळे मोकळया भूखंडावर आय.टी. पार्क, बाय-टेक्नॉलॉजी पार्क विकसित करुन ठाणे शहर व ठाणे औद्योगिक नगरीला आपण न्याय देणार काय?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, अनेक कारणांमुळे उद्योग बंद होतात. त्यामध्ये वित्तीय संस्थांचे कारण आहे. काही ठिकाणी कच्च्या मालाची समस्या आहे, काही ठिकाणी स्पर्धेमुळे उद्योग बंद झाले आहेत, काही ठिकाणी व्यवस्थापनाच्या अडचणीमुळे उद्योग बंद झाले आहे. परंतु लोडशेडींगमुळे कोणताही कारखाना बंद झालेला नाही. लोडशेडींगमुळे कारखाना बंद झालेला नसला तरी त्यामध्ये अडचणी आल्या आहेत. माननीय सदस्यांनी 7 हजार 800 रुपये या दराचा उल्लेख केला हा प्लॉट विक्रीचा दर आहे. एखादा नवीन प्लॉट घ्यावयाचा झाला तर 7 हजार 800 रुपये हा दर चौरस मीटरला लावला जातो. जर एखादा प्लॉट ट्रान्सफर करावयाचा असेल तर

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

त्यासाठी हा दर लावला जात नाही. त्यासाठी 10 ते 20 टक्के चार्ज करुन स्पेसिफिक अमाऊंटप्रमाणे चार्ज केला जातो.

श्री. जितेंद्र आव्हाड : आपण 7 हजार 800 वर 20 टक्केप्रमाणे चार्ज करता?

श्री. अशोक चव्हाण : जर तो प्लॉट ट्रान्सफर करावयाचा असेल तर 10 ते 20 टक्के प्रमाणे चार्ज करुन तो प्लॉट ट्रान्सफर करुन देतो.

श्री. जितेंद्र आव्हाड : आपण 7 हजार 800 रुपये हा दर घेता आणि त्यावर 20 टक्के चार्ज करता. म्हणजेच ते 1500 रुपये होतात. त्यापेक्षा त्यांना अडीच हजारामध्ये नवीन प्लॉट मिळतो...

श्री. अशोक चव्हाण : आपण म्हणता ती वस्तुस्थिती नाही, ट्रान्सफर करण्यासाठी कमीत कमी चार्ज लावला जातो. आपण म्हणाल्याप्रमाणे टी.टी.सी. अंबरनाथ, बदलापूर, कल्याण, मुरबाड, तारापूर या ठाणे जिल्हयातील वेगवेगळया एम.आय.डी.सी. चे असलेले दर लक्षात घेऊन सर्वंकष विचार करु. वागळे इस्टेटमधील बंद पडलेले उद्योग कांही नवीन उद्योजक घेऊ इच्छित असतील व त्या माध्यमातून नवीन उद्योग तयार होणार असतील तर त्या दृष्टीने मंडळाची भूमिका सकारात्मक असेल. त्या संदर्भात रेट निश्चित करण्या संदर्भात सर्व बाजूंनी माहिती घेऊन दोन महिन्याच्या आत निश्चितपणे निर्णय घेतला जाईल. त्याठिकाणी आय.टी. पार्क व्हावे अशी आपली मागणी असेल तर त्यादृष्टीने निश्चितपणे मदत केली जाईल.

श्री. अनंत तरे : एकेकाळी औद्योगिक नगरी असलेले ठाणे शहर व ठाणे जिल्हयामध्ये आज 60 ते 70 टक्के लघु उद्योग व मोठे कारखाने बंद पडले आहेत. वागळे इस्टेटमध्ये जवळपास 70 टक्के उद्योग बंद आहेत. निवेदनात असे म्हटले आहे की, "महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या ठाणे परिसरातील औद्योगिक क्षेत्रामध्ये बंद पडलेल्या उद्योग घटकांच्या जमिनीवर गृह संकुलाला परवानगी देण्यात आलेली नाही." प्रश्न असा आहे की, या संदर्भात आपण आज परवानगी दिली नाही.परंतु पुढे आपण परवानगी नेणार आहात काय? त्या ठिकाणी औद्योगिक क्षेत्रामध्ये कारखाने व उद्योग बंद पडले आहेत त्यामधील कर्मचाऱ्यांचे पैसे आजही देण्यात आलेले नाहीत. ते पैसे न देता गृह व व्यापारी संकुलांचे बांधकाम सुरु आहे. तेव्हा या कामगारांचे पैसे देण्यासाठी आपण कोणती उपाययोजना केली आहे?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे . . . .

त्यासाठी आपण काय प्रोव्हीजन केलेली आहे ? तिसरा प्रश्न असा आहे की, हे औद्योगिक क्षेत्र वाढविण्यासाठी तेथे जे उद्योगधंदे सुरु आहेत, ते चालू ठेवण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या स्थानिक संस्था आहेत, महानगरपालिका आहेत, त्यांच्या अटी जाचक स्वरुपाच्या आहेत. महाराष्ट्रात एक्साईज टॅक्स 22 टक्के आहे परंतु इतर राज्यात तो कमी आहे. तेव्हा महानगरपालिकेच्या जाचक अटी आणि जकात इ.बाबत शासन काय करणार आहे ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी गृहनिर्माणसाठी किंवा रेसीडेन्शिअल साठी परवानगी दिलेली नाही हे निवेदनातच नमूद केले आहे. पण उद्योगाच्या ठिकाणी घराशिवाय आयसोलेशनमध्ये कामगार राहू शकत नाहीत. अशा वेळी रेसीडेन्शिअल ॲकोमोडेशनसाठी मागणी आली तर मर्यादित प्रमाणात परवानगी देण्याचे आमचे धोरण आहे. यामागचा उद्देश एवढाच आहे की, त्या एम.आय.डी.सी.परिसरामध्ये जर कामगारांच्या घरकुलांसाठी, फक्त तेथील कामगारांच्या घरकुलासाठीच, उद्या तेथे बिल्डर येऊन त्यांनी रेसीडेन्शिअल इमारती बांधून त्या विकाव्यात असे यामध्ये अपेक्षित नाही. तर त्या एम.आय.डी.सी.औद्योगिक परिसरामध्ये काम करणाऱ्या कामगारांना घरे उपलब्ध व्हावीत या हेतूने तेथील औद्योगिक संघटनांनी मागणी केली तर त्याबाबतीत मर्यादित स्वरुपात विचार करण्याचे आमचे धोरण आहे, त्यासाठी परवानगी देण्यात येईल. सुरुवातीला ठाणे शहराची जी व्याप्ती होती, त्या भागामध्ये इंडस्ट्रीअल इस्टेटचा परिसर येत नसल्याने तेथे कदाचित ऑक्ट्रॉय बसत नसावा. पण आता ठाणे परिसराचा भाग वाढल्यामुळे वागळे इस्टेटचा भाग हा आता ठाणे शहरात आला आहे. त्यामुळे कर बसणे स्वाभाविक आहे. हा प्रश्न केवळ वागळे इस्टेटपुरता मर्यादित नाही. तर राज्यातील सर्वच ठिकाणी जेथे अशा इंडस्ट्रीज् आहेत, तेथे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. महानगरपालिका, नगरपालिका या स्वायत्त संस्था आहे आणि त्यांचे उत्पन्नाचे प्रश्न याच्याशी निगडित आहेत. हा नगरविकास विभागाचा प्रश्न असल्याने माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर याबाबतीत मध्यस्थी करण्याच्यादृष्टीने प्रयत्न करावे लागतील. राज्याचे औद्योगिक धोरण लक्षात घेता आणि महाराष्ट्रात अधिक गुंतवणूक व्हावी यासाठी ऑक्ट्रॉयच्या बाबतीत नगरपालिका, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावून माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.जगन्नाथ शेवाळे : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ ठाणे परिसरातील वागळे

. . . .2 डी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगन्नाथ शेवाळे . . . .

इस्टेटपुरता मर्यादित नाही. तर राज्यात अनेक ठिकाणी या प्रश्नाची व्याप्ती पसरलेली आहे. ठाणे परिसरामध्ये हा प्रश्न आहे, तसा पिंपरी-चिंचवड परिसरातही हा प्रश्न भेडसावत आहे. त्या ठिकाणी 30-35 वर्षापूर्वी इंडस्ट्री उभी राहिलेली आहे आणि ती जुन्या टेक्नॉलॉजीनुसार उभी राहिलेली इंडस्ट्री आहे. आता काळाच्या ओघात नवीन टेक्नॉलॉजीमुळे जुन्या इंडस्ट्रीच्या उद्योजकांना आपला उद्योग सावरणे अशक्य झाले आहे आणि त्यामुळे ते उद्योग हळूहळू बंद झाले आहेत. जुन्या इंडस्ट्रीकडे शासनाचा पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक वाटतो. परंतु नव्या टेक्नॉलॉजीप्रमाणे उभे राहणारे उद्योग फार कमी मजुरांना सामावून घेतात, पण जुन्या टेक्नॉलॉजीप्रमाणे या देशात, या राज्यात जे उद्योग उभे राहीले त्यामुळे अनेक हातांना काम मिळाले होते, रोजगार मिळाला होता. म्हणून हा प्रश्न उपस्थित करीत असताना आमचे असे म्हणणे आहे की, जसा शेती धंदा अनेक मजुरांना काम मिळवून देतो, तो धंदा अडचणीमध्ये येत आहे असे म्हटल्यावर आपण अनेक प्रकारची पॅकेज जाहीर करतो. तशा या जुन्या इंडस्ट्रींनी अनेक मजुरांना रोजगार मिळवून दिलेला आहे. तेव्हा हे उद्योग पुनर्स्थापित होण्यासाठी शासनाकडे काही योजना आहे का ? खरे म्हणजे हा या विषयाचा गाभा आहे. केवळ नवीन एम.आय.डी.सी.निर्माण करणे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ पूर्वी सौ.रणदिवे.... 13:40

श्री.जगन्नाथ शेवाळे (पुढे चालू...

नवीन उद्योगधंद्याची वाढ जरुर होणार आहे. परंतु जुन्या उद्योगामध्ये असलेल्या कामगारांच्या दृष्टीने शासनाकडे कोणती योजना आहे? त्यादृष्टीने मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना ठाणे औद्योगिक क्षेत्रामधील अडचणीच्या संबंधातील आहे. सन्माननीय सदस्यांनी आपल्या प्रश्नामध्ये जो उल्लेख केलेला आहे तो व्यापक अशाप्रकारचा आहे. तरीसुध्दा त्याबाबतीत शासनाचे धोरण सांगण्यास मी तयार आहे. एक गोष्ट खरी आहे की, नवीन टेक्नॉलॉजीची सुरुवात झाल्यामुळे नवीन उद्योग येत आहेत. काही ठिकाणचे जुने उद्योग बंद करुन त्या ठिकाणी नवीन उद्योंग सुरु झालेले आहेत. आय.टी.चे क्षेत्र नवीन असल्यामुळे नवीन उद्योग येत आहेत. महेंद्र जेलीकॉम या नव्याने येणाऱ्या उद्योगाच्या संबंधाने शासनाचा एम.ओ.यु. झालेला आहे. पुण्यातील 18 हजार लोकांना यामुळे रोजगार मिळणार आहे, एवढी त्या उद्योगाची क्षमता आहे. जुन्या उद्योगामध्ये काम करणारे लोक आहेत त्यांना नवीन उद्योगामध्ये नोकरी मिळविण्यासाठी एम.सी.अे.डी.सारखी संस्था आहे, ती नवीन उद्योगाच्या संबंधाचे ट्रेनिंग देते, तसे त्यांनी ट्रेंनिंग घेतले तर त्यांना काम उपलब्ध करुन देता येईल. शेवटी नवीन कारखान्यांमध्ये आपल्या जुन्या कारखान्यातील लोकांना सामावून घेण्याचे धोरण शासन घेईल. परंतु सगळयाच लोकांना त्या ठिकाणी सामावून घेण्याची जबाबदारी घेता येणार नाही. परंतु जे काही कामगार रिटायर झालेले आहेत, त्यांचे त्या कंपनीकडून जे काही येणे आहे, ते मिळवून देण्याच्यादृष्टीने लेबर विभागाकडून प्रयत्न केला जातो.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या ठिकाणी ठाणे जिल्ह्यातील प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. मंत्री महोदयांनी साडे तीन हजार उद्योग बंद पडल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे नागपूर येथील एम.आय.डी.सी.मध्ये हीच अवस्था आहे. परंतु हा प्रश्न केवळ ठाणे जिल्ह्याशी निगडित आहे. जवळपास साडे तीन हजार उद्योग बंद पडलेले आहेत, असे सांगण्यात आले. ते उद्योग पुन्हा सुरु करण्याच्यादृष्टीने शासन पुढाकार घेणार आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : दोन पध्दतीने हा प्रश्न हाताळला जाणे शक्य आहे. ज्या लोकांचे उद्योग व्यवसाय बंद पडलेला आहे, तो उद्योग लीजवर देण्याच्याबाबतीत त्यांची भूमिका असेल तर लीजवर देण्यासाठी त्यांना परवानगी द्यावी,जेणेकरुन दुसऱ्याने उद्योग घेतला तर तो नवीन पध्दतीने उद्योग चालविला जातो. त्यामुळे लीजवर तो व्यवसाय देऊन सुरु करावा, अशाप्रकारचे नवीन धोरणे अनेक देशामध्ये पहायला मिळते. महाराष्ट्रामध्ये देखील हीच मागणी आहे. उद्योग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.अशोक चव्हाण (पुढे सुरु.....

लीजवर देण्याबाबतचे प्रस्ताव आले तर त्यामधून एम.आय.डी.सी.लाही पैसे मिळतील. या दृष्टीने धोरणात्मक निर्णय दोन-तीन महिन्यामध्ये घेण्याच्या संबंधात बोर्डापुढे प्रस्ताव आहे. बंद पडलेल्या कारखान्यांच्या संबंधात शासन स्तरावर काही प्रश्न असतील तर निश्चित त्याबाबतची नोंद घेतली जाईल व शक्य असेल तेवढे ते सोडविण्याबाबत विचार केला जाईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : या पध्दतीने हाऊसिंगसाठी जशी परवानगी देणार आहात,तशीच कमर्शियलसाठी परवानगी दिली जाईल काय ?

श्री.अशोक चव्हाण : कमर्शियलला परवानगी देण्याचे धोरण आहे. एम.आय.डी.सी.मध्ये ले आऊट आहे, त्या ठिकाणी रेशिडेन्शियल बेनिफीट देण्याचे धोरण आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : त्यांना कमर्शियल करण्यासाठी परवानगी देणार आहात काय ?

श्री.अशोक चव्हाण : कोणत्या झोनमध्ये येते याची माहिती घेऊन निर्णय घेतला जाईल.

(एकाचवेळी अनेक सनमाननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी उभे रहातात.)

**उपसभापती** : आता पाचवी लक्षवेधी घेण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : या लक्षवेधीवर चर्चा सुरु झाली तेव्हा पासून मी हात वर केला आहे पण आमच्याकडे आपण लक्ष दिले नाही.

**उपसभापती** : मी पुढची लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे.

---

एफएफ-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर शहरातील इंदिरा गांधी वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालयातील प्रादेशिक सिकलसेल संशोधन व उपचार केंद्र राज्य शासनाच्या दुर्लक्षतेमुळे मागील वर्षापासून बंद स्थितीत असणे.

**मु. शी** : नागपूर शहरातील इंदिरा गांधी वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालयातील प्रादेशिक सिकलसेल संशोधन व उपचार केंद्र राज्य शासनाच्या दुर्लक्षतेमुळे मागील वर्षापासून बंद स्थितीत असण्यासंबंधी सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता वि.प.स. यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा.

श्री. सागर मेघे ( नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ □ियम 101 अ□्वये पुढील तातडीच्या व सार्वज□ि□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□ीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ि त्याबाबत त्यां□ी □िवेद□ □रावे, अशी वि□ंती □रतो.

"नागपूर शहरातील इंदिरा गांधी वैद्याकीय रुग्णालय व महाविद्यालयातील प्रादेशिक सिकलसेल संशोधन व उपचार केंद्र राज्य शासनाच्या दुर्लक्षतेमुळे, उदासीनतेमुळे मागील वर्षापासून बंद स्थितीत असणे, विदर्भात मोठया प्रमाणावर असलेल्या सिकलसेल रुग्णांवर उपचार करण्याकरिता चार वर्षापूर्वी हे केंद्र स्थापित करणे, राज्याचे तत्कालीन आरोग्यमंत्री यांनी या केंद्रासाठी 74 कोटी रुपये देण्याची घोषणा करणे, परंतु या घोषणेपैकी एकही पैसा अद्यापपावेतो या केंद्राला न देणे, केंद्रासाठी कोणताही स्वतंत्रपणे कर्मचारीवर्ग नसणे, यामुळे रुग्णांच्या रक्त तपासणीत अडचणी येणे, औषधसाठा देखील उपलब्ध नसणे, शासनाच्या उदासिनतेमुळे सिकलसेल रुग्णांवर उपचार न होणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

श्री.सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, ल□वेधी सूच□ासंबंधीच्या □िवेद□ाच्या प्रती मा□□ीय सदस्यां□ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते □िवेद□ आपल्या अ□ुमती□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, विदर्भातील चार ते पाच जिल्हयात सर्वाधिक सिकलसेल या आजाराचे रोगी आढळतात. आज विदर्भातील लोकसंख्या जवळपास 3 कोटी आहे. त्यामध्ये आदिवासी समजाची लोकसंख्या 33 लाख आहे. त्यापैकी 42 टक्के आदिवासी लोकांमध्ये या आजाराचे प्रमाण आढळते. अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या 51 लाक्ष आहे. त्यापैकी 27 टक्के लोकसंख्येमध्ये या आजाराचे प्रमाण आढळते. ओ.बी.सी.ची लोकसंख्या दीड कोटी आहे. त्यापैकी 60 टक्के लोकांमध्ये या आजाराचे प्रमाण आढळते. मुस्लिम समाजाची 30 लाख लोकसंख्या आहे. त्यापैकी 2 टक्के लोकांमध्ये हा आजार दिसून येतो. विदर्भातील लोकसंख्येच्या प्रमाणात अंदाजे 20 टक्के लोकांमध्ये या आजाराचे प्रमाण आढळते. इतकी गंभीर आकडेवारी असतांनाही शासन या आजाराकडे गांभीर्याने पाहात नाही. हे खेदजनक आहे.माझे स्पेसिफिक एक-दोन प्रश्न आहेत. या रुग्णालयात 18 लाख रुपये किंमतीचे एच.पी.एल.सी. यंत्र दिले असून या यंत्रासोबत 80 हजार किंमतीचे एक किट देण्यात आले होते. एका किटमध्ये साधारणत:300 रुग्णांची तपासणी केली जाते. परंतु सद्य:स्थितीत या केंद्रात किट उपलब्ध नसल्याने रुग्णांची रक्ताची तपासणी करण्यात अडचणी येत आहेत. तरी हे किट त्वरित उपलब्ध करुन देण्यात येईल काय? या रुग्णालयात विदर्भातील रुग्ण येतात. परंतु या सिकलसेल केंद्रासाठी प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे पॅथॉलॉजी विभागातील कर्मचा-यांना कामाचा अतिरिक्त भार दिला आहे. तरी या केंद्रासाठी चार तज्ञ डॉक्टर व इतर कर्मचारी त्वरित नियुक्त केले जातील काय? या रुग्णालयात गर्भजल परीक्षणासाठी 17 लाख रुपये किंमतीचे पी.सी.आर. नावाचे यंत्र घेण्यात आले आहे.हे यंत्र गेल्या सहा महिन्यापासून वापरात नसल्यामुळे शासनाला हा कार्यक्रम राबविण्याची इच्छा नसल्याचे दिसून येते तर हे यंत्र कधी सुरु करण्यात येईल ?

श्री.ी सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हे सिकलसेल केंद्र 2001 मध्ये सुरु झाले आहे. त्यावेळी असा निर्णय घेतला होता की, शासकीय वैद्याकीय महाविद्यालयात जो एक्झिस्टिंग स्टाफ आहे. तसेच पॅथॉलॉजिस्ट, डॉक्टर्स आहेत तेच हा सेल सांभाळतील. यासाठी नवीन डॉक्टर्स आणि नवीन स्टाफ नेमण्यात येणार नाही असा, 2001 मध्ये निर्णय झाला होता. 2001 पासून आजपर्यंत या सेलने नागपूर असो, भंडारा असो, चंद्रपूर असो संपूर्ण विदर्भात चांगले काम केले आहे.

श्री. नितीन गडकरी : ते केंद्र बंद पडले आहे. तेथे किट उपलब्ध नाहीत.

..4..

श्री. सुरेश शेट्टी :श्री. गडकरी साहेब तेथे किट उपलब्ध आहेत. मी स्वत: काल यासंबंधात ब्रिफिंग घेतले आहे आणि आजही माहिती घेतली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी अतिशय जबाबदारीने सांगतो की, गर्भजल परीक्षणासाठी पी.सी.आर.नावाचे 17 लाख रुपये किंमतीचे यंत्र घेण्यात आलेले आहे. ते यंत्र गेल्या सहा महिन्यापासून वापरात नसल्यामुळे बंद आहे. माननीय मंत्रिमहोदयंनी या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे त्यांना ब्रिफिंग केले गेले असेल तर मी त्याबाबत या सभागृहात हक्कभंगाचा मुद्दा उपस्थित करीन. मी स्वत: त्या विभागाकडून खोलात माहिती घेऊन या सभागृहात आलो आहे. माननीय मंत्रिमहोदयांना एक तर चुकीची माहिती दिलेली आहे किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली गेली आहे. श्री.सागर मेघे यांनी हा आजार झालेले किती टक्के रुग्ण आहेत याची माहिती दिलेली आहे. 42 टक्के आदिवासी, 2 टक्के मुस्लिम, 60 टक्के ओ.बी.सी. अशा प्रकारे लाखो लोकांचा हा सिकलसेलचा प्रश्न आहे. दिनांक 10 जुलै, 2001 ला त्या वेळचे आरोग्य मंत्री श्री. दिग्विजय खानविलकर यांनी घोषणा केली होती आणि सांगितले होते की, विदर्भातील गंभीर संकट आहे, यासाठी विदर्भातील लोकांनी लक्ष दिले पाहिजे. 74 कोटी रुपये यासाठी देतो अशी त्यांनी त्या ठिकाणच्या कार्यक्रमात घोषणा केली होती. पण अद्याप एक फुटकी कवडी दिली गेली नाही. त्यामुळे ते सगळे बंद झालेले आहे. सभापती महोदय, माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, आज त्यांच्याकडे यासंबंधीची माहिती नसेल तर त्यांनी स्वत: त्या ठिकाणी जाऊन पाहणी करावी. त्या विभागात काय सुरु आहे ही माहिती आम्ही स्वत: तेथे जाऊन, आतून सगळी माहिती गोळा करुन आणलेली आहे. मंत्रिमहोदयांना वाटले असेल की, आम्ही तेथे जाऊन कशासाठी एवढी माहिती गोळा करणार? पण ती सगळी माहिती घेऊन आल्यानंतरच मी या ठिकाणी ती सांगत आहे. माननीय मंत्रिमहोदयांना सगळी दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. तेव्हा मंत्रिमहोदय, आपण पुन्हा एकदा ही माहिती तपासून घ्यावी. नाही तर तुमची माहिती खरी आहे असे आपण सांगावे. मग मला तुमच्या विरुध्द नाईलाजाने हक्कभंगाचा प्रस्ताव आणावा लागेल.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जी माहिती दिली ती ग्राहय धरुन त्यांना बरोबर घेऊन या हॉस्पिटलला भेट देण्यास मी तयार आहे.

श्री. नितीन गडकरी : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सागर मेघे या ठिकाणी आहेत. माननीय मंत्री महोदयांनी भेटीची एक वेळ ठरवावी आणि या हॉस्पिटलमध्ये इन्स्पेक्शन करावे, कारण फार वाईट परिस्थिती आहे. आदिवासी आणि दलित लोकांशी हा प्रश्न निगडीत आहे. माननीय मंत्री महोदय या कॉलेजला भेट देणारच आहेत म्हणून ही लक्षवेधी सूचना उद्या घ्यावी अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : ठीक आहे, माझी काही हरकत नाही.

डॉ. एन.पी.हिराणी : अध्यक्ष महाराज, माझा याच संदर्भातील एक प्रश्न असून तो मांडण्यासाठी कृपया मला परवानगी मिळावी. सन्माननीय सदस्य श्री. सागर मेघे आणि माननीय श्री. गडकरी यांनी अत्यंत महत्वाचा तसेच विदर्भाच्या दृष्टीने आवश्यक असलेला प्रश्न येथे उपस्थित केलेला आहे. कारण सिकलसेल ॲनिमियासारखा भयानग रोग या भागात असून असंख्य रोगी या रोगाने पछाडलेले आहेत. असे असतांना शासन या बाबीकडे लक्ष न देता उदासीन असल्याचे दिसून येते. आताच माननीय मंत्री महोदयांनी कबूली दिली की ते प्रत्यक्ष इंदिरा गांधी वैद्यकीय कॉलेज आणि महाविद्यालयाला प्रत्यक्ष भेट देणार आणि हा प्रश्न सोडवतील. याच अनुषंगाने इतरही मेडिकल कॉलेजेस आहेत. उदा. यवतमाळ येथील मेडिकल कॉलेजेसबाबत मी सांगू इच्छितो की, या कॉलेजकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष आहे असे म्हटले तरी चालेल. कारण त्या ठिकाणी आवश्यक इन्स्ट्रुमेंट्स पाहिजेत, ॲपरेट्स पाहिजेत, मोठमोठया मशिन्स लागतात. मेडिकल कॉलेज म्हटल्यानंतर लोकांच्या देखील अपेक्षा असतातच. अत्यंत दुर्धर रोगी या ठिकाणी उपचाराच्या अपेक्षेने येतात त्यावेळेस त्यांना सांगण्यात येते की, आमच्याकडे हे साहित्य नाही, आपण बाहेरुन एक्स-रे, स्कॅनिंग, एम.आर.आय. करुन आणा. या सर्व गोष्टी कुठेतरी थांबल्या पाहिजेत. कारण केवळ पांढरा हत्ती म्हणून मेडिकल कॉलेजेसना आपण न पोसता त्यांचा विकास कसा होईल यादृष्टीने शासनाने सर्व कॉलेजेसची तपासणी करणे तितकेच आवश्यक आहे. आता ज्या पध्दतीने इंदिरा गांधी वैद्यकीय कॉलेजला भेट देण्याची तयारी दाखविली त्याप्रमाणेच यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला देखील भेट देऊन त्या ठिकाणचे प्रश्न माननीय मंत्री महोदय समजून घेतील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.......2

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, राज्यात जेवढे मेडिकल कॉलेजेस आहेत त्या सर्व कॉलेजेसचा आढावा शासनाने घेतला असून त्या ठिकाणी ज्या ज्या रिक्वायरमेंट्स आहेत त्याबाबत कंप्लीट सर्वे केला व पुढील बजेटमध्ये तरतूद करुन हॉस्पिटल्समध्ये सर्व इक्विपमेंट्स प्रोव्हाइड करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. तसेच अधिवेशन संपल्यानंतर राज्यातील अशा हॉस्पिटल्स अटॅच असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयांना भेट देण्याचा कार्यक्रम ठरवून सन्माननीय सदस्यांना त्याबाबतची माहिती दिली जाईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : महोदय, अत्यंत गंभीर असा हा प्रश्न असून विदर्भात या सिकलसेल नांवाच्या रोगाचे प्रमाण जास्त आहे. अनुसूचित जाती-जमातीबरोबरच ओबीसी आणि मुस्लीम समाजामध्ये देखील हे प्रमाण वाढत चालले आहे. अलिकडच्या काळातील आकडेवारी पाहिली तर या रोगाचे प्रमाण आता ब्राम्हण समाजामध्ये देखील दिसून आले आहे. यासंदर्भात माजी मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी एक बैठक घेऊन सूचना दिल्या होत्या आणि या रोगाच्या संदर्भात इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज आणि महाविद्यालय, नागपूर या एकाच ठिकाणी संशोधन केले जाते त्या व्यतिरिक्त विदर्भातील शासकीय महाविद्यालयांमध्ये आणि खाजगी महाविद्यालयांमध्ये देखील जे रुग्ण आढळून येतात त्या ठिकाणी सुध्दा यासंबंधीचे संशोधन, इलाज आणि रक्त तपासणीची व्यवस्था शासन करणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, हा रोग एक प्रकारे जेनेटिक डिसऑर्डर अशा प्रकारचा आजार आहे. आतापर्यंत नागपूरला पॅथॉलॉजी लॅबमध्ये हे रक्ताचे नमूने तपासणीचे काम चालत होते. पण हे ट्रेनिंग आता पीएचसी मध्ये जे व्हॉलेंटियर्स असतात त्यांनाही देत आहोत व पुढील एक महिन्यात महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि आदिवासी विकास या तिन्ही विभागांनी मिळून एक धोरण संपूर्ण राज्यासाठी आखण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ....

यामध्ये प्रत्येक पीएचसीला तसेच जिल्हा आरोग्य केंद्राला कसे स्ट्रेन्दनिंग होईल, ब्लडबँक कशी स्ट्रेन्दनिंग करायचे यासंदर्भात आम्ही एक आराखडा तयार केलेला आहे. त्यामुळे एक महिन्याच्या आत सिकलसेलसाठी एक पॉलीसी आम्ही ठरवू. ही पॉलीसी संपूर्ण राज्यासाठी असणार आहे. विदर्भात जेनेटिक डिसऑर्डरचे प्रमाण जास्त आहे तसेच दुस-या एरियात सुध्दा याचे प्रमाण आहे त्यामुळे संपूर्ण राज्यासाठी एक नवीन पॉलीसी आम्ही अनाऊंस करणार आहोत.

प्रा. जोगेंद्र कवाडे : जागतिक आरोग्य संघटनेने देखील या आजाराची गंभीर दखल घेतली असून आपल्या देशासोबतच आफ्रिकन देशामध्ये हा रोग मोठ्या प्रमाणात आढळतो त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने भारताला देखील त्यांच्या प्लॅनमध्ये घेतलेले आहे तसेच यासाठी मोठा निधी उपलबध करुन दिलेला आहे. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेच्या माध्यमातून जो निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे त्याचा वापर आपल्या राज्यात कितपत करण्यात आलेला आहे? हा माझ ा प्रश्न आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जागतिक आरोग्य संघटनेकडून आपल्या राज्याला किती पैसे मिळाले याची माहिती आता माझ्याकडे नाही.

श्री. सागर मेघे : इंदिरा गांधी मेडिकल हॉस्पिटलमध्ये सिकलसेलच्या संदर्भातील सामुग्री नाही तसाच प्रॉब्लेम इतर ठिकाणी सुध्दा आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी दोन वर्षापूर्वी इंदिरागांधी मेडिकल हॉस्पिटलला 200 कोटी रुपयांचा निधी देऊन या ठिकाणी चांगल्या इमारती, सभागृह,स्टाफ क्वार्टर याची सोय करण्यात येईल असे सांगितले होते. मेंडीकल कौन्सीलने या कॉलेजबद्दल बरेज ऑब्जेक्शन घेतले होते. हे कॉलेज बंद पडण्याच्या स्थितीत आहे. 200 कोटी रुपये देण्याच्या संदर्भात घोषणा होऊन दोन वर्षे झालेले आहे असे असतांना या प्रोजक्टला अजून सुरुवात देखील झालेली नाही त्यामुळे या प्रोजेक्ट बद्दल मंत्री महोदय काही माहिती सांगतील काय?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारलेला आहे त्याचा या लक्षवेधीशी काही संबंध नाही तरी सुध्दा मी यासंदर्भातील उत्तर देतो. नागपूर इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट तर्फे याची सुधारणा होणार होती. ज्यावेळी हे प्रपोजल आले होते त्यावेळी आपण यासंदर्भात 2 एफएसआय म्हणून टोटल प्लॅनिंग केले होते. युडी सोबत जी मिटिंग झाली होती त्यामध्ये

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी.....

सांगण्यात आले होते की, हा विभाग कन्जेस्टेड एरियामध्ये येतो त्यामुळे येथे 2 एफएसआय देऊ शकत नाही. एफएसआय साठीच हें सर्व अडकलेले आहे. नागपूर इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट आणि युडी डिपार्टमेंटची आता मिटींग चालू आहे. त्यांचे यांसदर्भातील सॉर्टआऊट झाल्यानंतर या कामाला सुरुवात होऊन जाईल.

श्री. नितीन गडकरी : या प्रश्नाच्या संदर्भातील प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी सांगितलेली आहे की, सिकलसेलच्या संदर्भात जागतिक आरोग्य संघटनेने चिंता व्यक्त केलेली आहे. परंतु महाराष्ट्र शासनाने याबाबत मात्र काहीही चिंता केलेली नाही. आताच माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, तालुका तालुका स्तरावरील आरोग्य केंद्राला स्ट्रेदंनिंग करण्यात येणार आहे. माननीय मंत्रीमहोदयानी आज जे उत्तर दिलेले आहे ते उत्तर माजी माननीय मंत्री श्री. एकनाथराव गायकवाडांपासून ऐकत आहोत. हा प्रश्न मी अडीच वर्षापूर्वी विचारला होता तेव्हापासून या प्रश्नाला तेच उत्तर येत आहे. परंतु प्रत्यक्षात काहीही कार्यवाही झालेली नाही. 71 कोटी रुपयांची जी घोषणा आहे ती माजी मंत्री श्री. खानविलकर साहेबांनी केली होती. परंतु अद्यापपर्यंत एक रुपया देखील मिळालेला नाही. त्यामुळे माझी विनंती अशी आहे की, सिकलसेलचा अतिशय गंभीर प्रश्न आहे. या प्रश्नावर डॉ. हिरणी यांनी चांगले विचार व्यक्त केलेले आहेत. डॉ. हेगडेवार यांच्या तर्फे उत्तर नागपूरमध्ये अभ्यास करण्यात आलेला असून त्याचा सर्व्हे तयार करण्यात आला, त्यातील रोगी आयडेन्टीफाय केले. नागपूरमधील यासंदर्भातील गंभीर संकट लक्षात घेता यासाठी काही विशिष्ट तरतूद करण्याची आवश्यकता आहे. 71 कोटीचा कार्यक्रम फार आधी ठरविला गेला आहे. हा कार्यक्रम प्रत्यक्षात उतरला नाही. याची प्रायोरिटी अर्थविभागाला समजून सांगण्यात आपल्याला काय अडचण आहे हे समजत नाही. 71 कोटी रुपयांची घोषणा मा. खानविलकर साहेबांनी केली होती ते पैसे या वर्षात मेओ हॉस्पिटलला मिळतील आणि त्या ठिकाणी सर्व सुविधा मिळेल यासंदर्भात आपण आश्वासन दिले तर मी आपले जरुर अभिनंदन करीन.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी या सभागृहाला सांगू इच्छितो की, एक महिन्याच्या आत विदर्भातील आमदारांची मिटिंग घेऊन यासंदर्भाती नवीन धोरण डिक्लेअर करु.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी...

यासंबंधी जो कार्यक्रम घेण्यात येणार आहे, त्यासाठी निधीची अडचण येणार नाही. या कार्यक्रमासाठी निधी देखील उपलब्ध करून देण्यात येईल. यासंबंधी नागपूरमध्ये बैठक घेण्यात येऊन सन्माननीय सदस्यांशी चर्चा केल्यानंतर मगच घोषणा करण्यात येईल.

.....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ.शी.**: कोल्हापूर जिल्हयातील कबनूर येथील जमिनींच्या नोंदीत जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या फेरफारीमुळे शेतकऱ्यांची झालेली कुचंबणा.

**मु.शी.**: कोल्हापूर जिल्हयातील कबनूर येथील जमिनींच्या नोंदीत जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या फेरफारीमुळे शेतकऱ्यांची झालेली कुचंबणा याबाबत प्रा.शरद पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा.शरद पाटील (पुणे पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कोल्हापूर जिल्हयातील कबनूर येथील काही जमिनीच्या मालकी हक्काच्या नोंदीत कायम निरंजन (1) धर्मादाय हरिहर पंडित उर्फ गुरूमहाराज असा गाव नमुना नं.3 इनाम पत्र अशा नोंदी होत्या. सन 1954 साली सदर गावातील जमिनी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी खालसा प्रकारात दाखवल्यानंतर या जमिनीचा अशा परिस्थितीत सदर जमिनीबाबत बिगर शेती कारणाकरिता वर्ग 1 चे दाखले देण्यास शासकीय अधिकारी टाळाटाळ करीत असल्यामुळे बिगर शेतीचा दाखला मिळण्यासाठी नजराना भरण्याचा भूर्दंड पडत असल्यामुळे शेतकऱ्यांची कुचंबणा झालेली आहे, याचा परिणाम रहिवाशी व औद्यागिक वापरासाठी कबनूर परिसरात जमिनीचा बेकायदेशीर वापर मोठया प्रमाणात सुरू असणे, त्यामुळे जनतेची निर्माण झालेली कोंडी व शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

===

**उपसभापती** : यानंतरची विशेष उल्लेखाची सूचना सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते पाटील यांची आहे. ते सभागृहात नसल्यामुळे मी सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांना विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यास अनुमती देत आहे.

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कविवर्य बा.सी.मर्ढेकर यांचे स्मारक उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे.

**मु.शी.**: कविवर्य बा.सी.मर्ढेकर यांचे स्मारक उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे याबाबत श्रीमती कांता नलावडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती कांता नलावडे (विधानसभाद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, गेल्या वर्षी हिवाळी अधिवेशनामध्येच मी हा विषय उपस्थित केला होता. आजच्या पुरवणी मागण्या पाहिल्यानंतर काही स्मारकांसाठी निधीची तरतूद केल्याचे दिसून आले. पण कविवर्य बा.सी.मर्ढेकर यांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाने निधीची तरतूद केलेली नाही. हा जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा प्रकार आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी भाषण ठोकू नये. आपली विशेष उल्लेखाची जी सूचना असते ती वाचून दाखवावयाची असते.

श्रीमती कांता नलावडे : भाषण ठोकू नये म्हणजे काय ..... ?

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, विशेष उल्लेख सूचना मांडत असताना त्याची पार्श्वभूमी सांगण्याची आवश्यकता नसते. विशेष उल्लेखाची जी सूचना दिलेली असते ती सभागृहात वाचावयाची असते. आपल्या बद्दल जे उद्‌गार काढण्यात आले आहे, त्याबद्दल मी नापसंती व्यक्त करतो.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, मी काही आपल्याला उद्देशून बोललेले नाही.

**उपसभापती** : आपण आपली विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, कविवर्य बा.सी.मर्ढेकरांचे स्मारक उभारण्यासंबंधीचा प्रश्न आहे. सन 20002 मध्ये तत्कालीन पालकमंत्री श्री.अजितदादा पवार हे मर्ढेला जाऊन आले होते. तेथील ग्रामपंचायतीच्या मालकीची असलेली इमारत पाडून टाकायला सांगितली होती. सन 2003-2004 च्या अर्थसंकल्पामध्ये 30 लाख रुपयाची घोषणा झाली होती.

..4..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे....

गेल्या वर्षी अधिवेशनामध्ये मी हा विषय उपस्थित केला होता. यासंबंधी मी पालकमंत्र्यांना देखील भेटले होते. परंतु, अद्यापपर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. "धैर्य दे अन नम्रता दे, पाहण्या जे जे पहाणे" या मर्ढेकराच्या कवितेतील ओळी आहेत. आज त्यांचे स्मारक पूर्ण होण्यासाठी त्यांच्या कवितेतील या ओळी त्यांच्याच नशिबी आलेल्या आहेत. तेव्हा या बाबत शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी मी विनंती करते. सदर स्मारकासाठी 3 वर्षापूर्वी निधी घोषित झालेला आहे पण स्मारकाचा काही पत्ता नाही.

.....

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दंत आरोग्य तज्ज्ञ या अभ्यासक्रमाची शैक्षणिक अर्हता एस.एस.सी.ऐवजी एच.एस.सी.ठेवण्याबाबत.

**मु.शी.**: दंत आरोग्य तज्ज्ञ या अभ्यासक्रमाची शैक्षणिक अर्हता एस.एस.सी.ऐवजी एच.एस.सी.ठेवण्याबाबत डॉ.दीपक सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत (विधानसभाद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

नागपूर येथे डेंटल हायजेनिस्ट कॉलेज असून सदर अभ्यासक्रमाची शैक्षणिक अर्हता एस.एस.सी आहे. डेंटल हायजेनिस्टचा अभ्यासक्रम हा इंग्रजी भाषेत असतो. दहावी नंतर या अभ्यासक्रमासाठी परीक्षा द्यावी लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांची मागणी अशी आहे की, डेंटल हायजेनिस्ट या अभ्यासक्रमाची शैक्षणिक अर्हता एस.एस.सी न ठेवता एच.एस.सी.ठेवण्यात यावी. असे केले तर सदर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना बी.डी.एस.आणि एम.डी.एस.यांच्या हाताखाली काम करता येईल.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

ते परदेशात सुध्दा जातात. हा महत्वाचा कोर्स असतानादेखील आजपर्यंत तो महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाला सलंग्न केला नाही. हा दोन वर्षाचा कोर्स आहे. हा कोर्स इंग्रजीमधून शिकविला जात असल्यामुळे तो बारावी नंतर घेण्यात यावा अशी मी विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: माहीम, मुंबई येथील गोपीटँक मंडईमध्ये पसरलेले घाणीचे साम्राज्य.

**मु.शी.**: माहीम, मुंबई येथील गोपीटँक मंडईमध्ये पसरलेले घाणीचे साम्राज्य याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती सुधा जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

" माहीम ( मुंबई ) येथील गोपीटँक मंडईमध्ये मोठ्या प्रमाणात मासळी विक्रीचा व्यवसाय असून मासळी खरेदीसाठी नागरिकांची गर्दी फारच असते. या मासळी मंडईत मासळीची घाण तेथेच बाजुला फेकली जाते त्यामुळे मासळी खरेदी करता आलेले नागरिक अनेकवेळा या मासळीच्या घाणीतून जाताना पाय घसरुन पडल्याच्या अनेक घटना घडून मोठे अपघात झाले आहेत. त्यात बऱ्याच नागरिकांना अपंगत्व आले आहे. तसेच सदर ठिकाणच्या घाणीमुळे विविध रोगाच्या साथीचा प्रादूर्भाव होऊन अनेकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत नागरिकांनी मासळी मंडईत टाकलेली घाण वेळोवेळी साफ करण्याबाबत मंडईतील संबंधित कार्यालयाकडे वारंवार तक्रार करुनही ते या तक्रारीची योग्य ती दखल घेत नाहीत, त्यामुळे नागरिकांच्या मनात असंतोष पसरला आहे. शासनाने या घटनेची चौकशी करुन नागरिकांशी निगडीत असलेला हा प्रश्न सोडविण्यासाठी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नेवासे व शेवगाव तालुक्यातील उपसा जलसिंचन योजना बंद असल्याबाबत

**मु.शी.**: नेवासे व शेवगाव तालुक्यातील उपसा जलसिंचन योजना बंद असल्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.यशवंतराव गडाख (अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबधीची सूचना मांडतो.

"ज्याअर्थी नेवासे व शेवगाव तालुक्यातील 22 उपसा जलसिंचन योजना केवळ नैसर्गिक आपत्तीमुळे बंद पडणे, योजना उभारणीनंतर सलग चार-पाच वर्षे मुळा व जायकवाडी जलाशयामध्ये पावसाअभावी पुरेसा पाणी साठा नसणे, त्यानंतरही एक दोन वर्षाचा अपवाद वगळता दोन्ही धरणांची परिस्थिती अशीच खडतर राहणे. त्यामुळे या योजना अक्षरश: बंद पडणे, कोट्यावधी रुपयांचे कर्ज व त्यावरील व्याजाचा भूर्दंड शेतकरी सहन करीत असणे, योजना बंद पडूनही अति उच्च दाबाच्या दराने प्रत्येक योजनेवर लाखो रुपयांची वीज बिले आकारली जाणे व ती थकणे, कालांतराने वीज पुरवठाही खंडीत करणे.

ज्याअर्थी,राज्य शासनाने कृष्णा व तापी खोऱ्यातील उपसा जलसिंचन योजना चालविण्यास घेण्यासाठी तत्वत: मान्यता दिली असून त्यासाठी जवळपास 300 कोटी रुपयांची तरतुदीही करणे.

ज्याअर्थी, या योजनांवर असलेले कोट्यावधी रुपयांचे कर्ज व त्यावरील व्याज फेडण्याची शेतकऱ्यांची कुवत नसणे, सदरचे कर्ज व त्यावरील व्याज माफ करण्याची निर्माण झालेली निकडीची गरज तसेच या योजना शासनाने चोलविण्यास घेण्याची नितांत गरज.

ज्याअर्थी याबाबतीत संबधित शेतकरी वारंवार विनंती करीत असुनही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष व निर्णय घेण्यासाठी करीत असलेली दिरंगाई याकडे लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडली आहे.

-----------

..4..

**पृ.शी.**: मौजे वासाळा, ता.आरमोरी,जि.गडचिरोली येथे दीक्षाभूमीच्या जागेजवळ सुरु असलेले मंदिराचे बांधकाम.

**मु.शी.**: मौजे वासाळा, ता.आरमोरी,जि.गडचिरोली येथे दीक्षाभूमीच्या जागेजवळ सुरु असलेले मंदिराचे बांधकाम याबाबत सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबधीची सूचना मांडतो.

"मौजा वासळा ( ता.आरमोरी, जि.गडचिरोली ) येथे दीक्षाभुमीची जागा असून जागेचा भूमापन क्र.बंदोबस्त क्र. 390 व एकत्रिकरण भूमापन क्र. 205 असून तलाठी रेकॉर्डला तशी नोंद उपलब्ध आहे. तसेच या दीक्षाभूमीवर मागील 30 वर्षापासून गावातील बौध्दांचे धार्मिक कार्यक्रम सुरु आहेत.

मौजा वासळा येथे बल्कीदेव मंदिर सदर दीक्षाभूमी पासून सुमाने 100 फूट अंतरावर रस्त्याच्या दुसऱ्या बाजुला होते. काही दिवसांपूर्वी गावातील हिंदू लोकांनी ते 50 फुटावर आणून ठेवले आणि सद्य:स्थितीत बल्कीदेव गावाच्या दीक्षाभूमीच्या जागेवर दिनांक 18.10.2005 ला प्रस्थापित करुन त्याठिकाणी बल्कीदेवाच्या मंदिराचे बांधकाम सुरु केले आहे.

तहसिलदार आरमोरी यांनी पत्र क्र.कली/1256:2005 दिनांक 10.11.2005 ला बल्कीदेव मंदिराचे बांधकाम तात्काळ थांबविण्याबाबत सा.जा.क्र.8 वासाळा येथील तलाठी श्री.राऊत यांना आदेश दिला. संबंधित तलाठ्यानी मंदिर बांधकाम थांबविण्यात हिंदू लोकांना सूचना दिली. परंतु तलाठ्याला न जुमानता वासाळा येथील सरपंच जागोजी पीपरखेडे यांनी बळजबरीने बांधकाम करुन तहसिलदार आरमोरी यांचे आदेशाची पायमल्ली केली.

यानंतर श्री.बोर्डे.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

बल्कीदेव मंदिराच्या बांधकामात तहसिलदार खुरमोडे (आरमोरी) व पोलीस निरीक्षक चिंचोळीकर तसेच उपनिरिक्षक श्री.ठाकरे (पो.स्टे.आरमोरी) यांनी स्थानिक हिंदू लोकांशी संगनमत करुन, बळजबरीने मंदिराचे बांधकाम करण्यात विशेष अभिरुची घेऊन मदत केलेली आहे. तहसिलदार खुरमोडे आणि पो.नि.चिंचोळकर व उपनिरिक्षक श्री.ठाकरे यांनी हिंदू लोकांची एकतर्फी बाजू घेऊन बौध्दांशी पक्षपात केला आहे. वासाळा येथील हिंदू आणि बौध्दांमध्ये जो संघर्ष वाढला आहे त्याला तहसिलदार खुरमोडे, पोलीस निरीक्षक चिंचोळकर आणि पोलीस उपनिरिक्षक ठाकरे हे सर्वस्वी जबाबदार असून, त्यांना हया प्रकरणी निलंबित करण्याची मागणी वासाळा येथील बौध्दांनी केलेली आहे.

पोलीस निरीक्षक चिंचोळकर हयांनी बौध्द समाजाच्या तक्रारी घेण्यास प्रत्येक वेळी टाळाटाळ केली आहे. "माझी नोकरी गेली तरी बेहत्तर पण मी तुमची तक्रार घेणार नाही, तुम्ही एस.पी.कडे तक्रार देऊ शकता" असे बेजबाबदार वक्तव्य केले आहे.

या अधिकाऱ्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे वासाळा येथे जातीय तणाव निर्माण झाला आहे. तसेच हिंदु बांधवांनी गावातील संपूर्ण बौध्दांवर सामाजिक बहिष्कार टाकून सर्वप्रकारचे व्यवहार करणे बंद केले आहेत. जसे गुरेढोरे राखण्यास मनाई करणे, दलित समाजाच्या टेलरकडे शिवण्याकरिता दिलेले कपडे परत घेणे, बौध्दांच्या शेतकामावर न जाणे, न बोलावणे, पीठ गिरणीवर दळण दळून न देणे, बौध्द व्यक्तींकडून भाजीपाला घेण्यास मनाई करणे अशाप्रकारे बहिष्कार टाकण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासन गृह विभागाच्या निर्देशाप्रमाणे एका धार्मिक स्थळापासून दुसरे धार्मिक स्थळ 500 फूट अंतरावर असावे असे शासनाचे निर्देश असताना सुध्दा संबंधित उपरोक्त अधिकाऱ्यांनी बौध्दांच्या दिक्षाभूमीच्या जागेवरच बल्कीदेवाचे बांधकाम करण्यास प्रोत्साहन का दिले असा सवाल आहे. वरील बल्कीदेव चे बांधकाम करण्याबाबत जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनास वारंवार निवेदनाद्वारे कळविले आहे. परंतु या प्रकरणाकडे त्यांचेकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले आहे आणि यामुळे गावामध्ये हिंदू आणि बौध्द समाजात प्रचंड प्रमाणात जातीय तणाव निर्माण झाला आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

वासाळा येथील बौध्दांच्या दिक्षाभूमीवरील अवैध बल्कीदेव मंदिराचे बांधकाम हटविण्यात यावे. बौध्द बांधवांनी तक्रार देऊन सुध्दा योग्य कारवाई न करता उलट बल्कीदेव मंदिर बांधकामास प्रोत्साहन देणारे पोलिस निरीक्षक चिंचोळीकर, उपनिरिक्षक ठाकरे, तहसिलदार खुरमोडे हया अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. बौध्द धम्मगुरु भंते धम्मपाल यांना उपरोक्त प्रकरणी जातीवाचक शिवीगाळ करुन, अपमानास्पद वागणूक देणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, तसेच मौजा वासाळा येथील बौध्दांवरील अत्याचार थांबविण्यात यावे आदी मागण्यांसाठी स्थानिक बौध्द बांधवांनी दिनांक 28 नोव्हेंबर, 2005 पासून बेमुदत उपोषण आंदोलन सुरु केले आहे आणि अद्यापही ते आंदोलन सुरुच आहे.

प्रशासकीय महसूल यंत्रणा, पोलीस यंत्रणा अल्पसंख्यांकांसोबत कसे निष्ठुरपणे, बेदरकारपणे आणि पक्षपातीपणे वागते हे याचे ज्वलंत उदाहरण आहे. त्यामुळे शासनाने याप्रकरणी तात्काळ निर्देश दयावे अशी या विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करीत आहे."

---------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील वन संपत्तीचा झपाटयाने ऱ्हास होत असल्याबाबत.

**मु.शी.**: राज्यातील वन संपत्तीचा झपाटयाने ऱ्हास होत असल्याबाबत माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"एकेकाळी आपले राज्य वनसंपत्तीने नटलेले होते. प्रचंड प्रमाणात राज्यात जंगले उपलब्ध होती. सहयाद्री, सातपुडा, बालाघाट, महादेव, अजिंठा आदि पर्वतरांगा सर्वत्र जंगलांनी व्यापलेल्या होत्या. विविध प्रकारची वनसंपत्ती या जंगलातून आम्हास प्राप्त होत होती. कोकणकिनारपट्टीवर अतिवृष्टीमुळे वर्षभर सदाहरित अरण्याचा पट्टा आम्हास पहावयास मिळत असे म्हणून या महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा.खासदार बॅरिस्टर अंतुलेसाहेब यांनी कोकणाचा कॅलिफोर्निया करण्याचे स्वप्न उरी बाळगले होते. त्यांचे स्वप्न पूर्णत्वाव आणण्याची जबाबदारी आम्हा सर्वांवर आहे.

कोकणकिनारपट्टयाची कॅलिफोर्नियाशी तुलना करता येईल अशी घनदाट वृक्षवल्ली ऐकेकाळी होती, मात्र आज कोकणकिनारपट्टी असो वा सहयाद्रीचे कडे असो, राज्याच्या सर्व पर्वत रांगा, ओसाड दिसत आहेत.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त..

जंगल तोड प्रचंड प्रमाणात होत असून आपल्या राज्याच्या जंगल संपत्तीचे नुकसान फार मोठया प्रमाणात होत आहे. ही जंगल तोड जर वेळीच थांबविली नाही तर संपूर्ण महाराष्ट्राची जंगले नष्ट होतील अशी भीती निर्माण झाली आहे. जंगलाचे रक्षणकर्तेच जंगलाचे भक्षण करीत असून राजरोसपणे त्यांचा हा धंदा तेजीत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील जंगले जर वाचववावयाची असतील तर उपलब्ध असलेल्या कायद्यात बदल करुन अतिशय कडक कायदे बनविणे गरजेचे आहे. वनसंवर्धनाचे महत्व पटवून देण्यासाठी तसेच असलेली जंगले वाचविण्यासाठी व नवीन वृक्ष लागवड करण्यंासाठी आपल्या जनताभिमुख सरकारनचे कायम स्वरुपी योजना राबविणे गरजेचे आहे. पल्स पोलिओ सारख्या धडक योजनेची गरज आज या विभागासाठी जरुर आहे . यासाठी या सभागृहास मी सुचवू इच्छितो की, प्राथमिक स्तरापासून महाविद्यालयीन स्तरापर्यन्त वनसंवर्धन हा विषय असावा. कार्यानुभव या विषया ऐवजी वनसंवर्धन हा विषय प्रत्येक विद्यार्थ्याच्या सहभागाने शिकविणे गरजेचे आहे . प्राथमिक स्तरापासूनच जर बाल वयात ावनसंपत्तीचे महत्व पटवून दिले तर ते त्यांच्या बालमनावर बिंबविले जाईल व कायम स्वरुपी ते उपयोगात येईल.अध्यक्ष महोदय, जंगले वाचलीत तर आपण जगू व जंगले नष्ट झाली तर या धरतीवरील प्राणी नष्ट होणार आहेत कारण जंगले ही पृथ्वीची फुप्फुसे आहेत व ही आता शेवटीची घटिका मोजत आहे. म्हणून अध्यक्ष महोदय, राज्यातील जंगलतोड थांबवून जंगलाच्या प्रमाणात वाढ होण्याकरीता मी केलेल्या सूचनांचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या माध्यमातून विनंती करीत आहे

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पृ.शी .मु.शी :लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे</u>**

श्री.धर्मारावबाबा आत्राम ( सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने "अंगणवाडयांसाठी पुरविण्यात येणा-या पोषण आहारातील निविदा प्रक्रियेत झालेला भ्रष्टाचार " या विषयासंबंधी श्री. गोपालदास अग्रवाल,माजी वि.प.स. श्री जयंत प्र.पाटील,वि.प.स. व श्री हुसेन दलवाई माजी वि.प.स. यांनी दिनांक 25 जुलै 2003 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**<u>अधिक माहिती</u>**

( प्रेस :कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

**उपसभापती** : या नंतर मध्यंतर घ्यावयाचे काय ?

डॉ.अशोक मोडक : 3.00 वाजेपर्यन्त मध्यंतर घेण्यात यावे.

एक सन्माननीय सदस्य : कामकाज बरेच असल्यामुळे 2.45 पर्यन्त मध्यंतर घेण्यात यावे.

**उपसभापती** :ठीक आहे. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि 2.45 वाजता पुन्हा भरेल.

( 2.17 ते 2.45 पर्यन्त मध्यंतर )

--

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ D/ RJW/ श्री.गायकवाड नंतर --- 14:45

( मध्यंतरा नंतर ... )

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**पृ.शी./मु.शी.** : सन 2005-06 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

---

**उपसभापती** : माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चा आज व उद्या दिनांक 14 डिसेंबर 2005 रोजी घ्यावयाचे ठरले आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्या खालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग 2 द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या.**

**उपसभापती** : आज खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील. ---

1) मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - ए2, ए-4, ए-5, ए-6, एफ-2, जे-1.
2) सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एच-2, एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9.
3) जलसंपदा (कृष्णा खेरे पाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - आय-1, आय-3, आय-5, वाय-2.
4) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - जी-1, ओ-1.
5) उद्योग व खनिकर्म, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - ए-4, के-7, एन-1, एन-2.
6) ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून), वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - के-6, के-11, एस-1, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4.

..... एमएम 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** (पुढे चालू..

7) अपारंपारिक ऊर्जा व फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - के-6.

8) राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण व कामगार मंत्र्यांच्या पूरक मागण्या क्रमांक - के-4.

9) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - ई-2, आणि ई-3.

10) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - टी-2, टी-5, टी-6.

आता यानंतर या चर्चेला प्रथमत: सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी सुरूवात करतील. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट हे भाषण करतील.

..... एमएम 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, प्रथमत: मी माननीय मुख्यमंत्र्यांकडे असलेल्या नगरविकास विभागाच्या पूरक मागण्यांवर बोलू इच्छिते. पृ.63, बाब क्रमांक 90 - मुंबई मध्ये एमएमआरडीए ने घेतलेल्या अंधेरी ते घाटकोपर या लिंक रोडच्या कामाच्या संदर्भात मी या ठिकाणी सांगू इच्छिते की, असल्फा व्हिलेज ते श्रेयस सिग्नल पर्यंतचा केवळ 500 मीटरचा रस्ता गेली अनेक वर्षांपासून अर्धवट अवस्थेमध्ये आहे, तुटलेल्या अवस्थेमध्ये आहे. त्यामुळे अंधेरी ते साकीनाका या परिसरातून येणाऱ्या वाहनांना माणिकलाल कंपौंड कडून वळसा घालून जावे लागते. त्यामुळे एल.बी.एस. मार्गावर घाटकोपर पश्चिमेला वाहतुकीची प्रचंड कोंडी होत आहे. मी या निमित्ताने माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करते की, हा केवळ 500 मीटरचा रस्ता तातडीने पूर्ण करण्याबाबत आपण एमएमआरडीए ला योग्य त्या सूचना द्याव्यात. याबाबतची आपली भूमिका आपल्या उत्तराच्या भाषणातून कृपया स्पष्ट करावी ही विनंती.

( यानंतर श्री.सरफरे ..... एनएन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी...

सभापती महोदय, बाब क्रमांक 90 व पृष्ठ क्रमांक 63 च्या अनुषंगाने रस्त्यांच्या संदर्भात सांगू इच्छिते की, हिरानंदानी गार्डन पवई या मुंबईच्या जवळ असलेल्या एस.एम.शेट्टी स्कूल ते चांदीवली मार्गे आय.आय.टी. स्टाफ हौसिंग सोसायटी, पंचसृष्टी कॉम्प्लेक्स, रहेजा विहार येथील रस्त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. वाहनांची वहातूक मोठया प्रमाणावर होत असल्यामुळे व रस्त्यावरील खड्डयांमुळे नेहमी अपघात होत असतात. व रहिवाश्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. तरी हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत महानगरपालिकेला शासनाने सूचना द्याव्यात. तसेच, मुंबईतील विक्रोळी पार्क साईट येथील आनंदगड नाका ते शंकर मंदीर हा एकमेव मार्ग या विभागात आहे यासंबंधी मी दोन ते तीन वेळा सभागृहामध्ये म्हणणे मांडले आहे. या मार्गावरील भाजीवाले व दुकानदार यांनी मोठया प्रमाणात अतिक्रमणे केली असून लहान मुले व सामान्य माणसांना चालता येत नाही. अतिक्रमणे आणि खराब रस्ता यामुळे येथील नागरीकांचे प्रचंड हाल होत आहेत. याबाबत कृपया आपण लक्ष घालावे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्र. 79 व बाब क्र. 96 च्या अनुषंगाने राज्यातील अनेक रुग्णालयांच्या मेंटेनन्सकडे सार्वजनिक बांधकाम विभाग अजिबात लक्ष देत नाही. फुटलेल्या काचांची तावदाने, लाईट, पंखे यांची दुरावस्था झाली आहे. आजूबाजूच्या परिसरातील कुचकामी ड्रेनेजमुळे डासांचा उपद्रव होऊन रोगराई पसरत आहे. म्हणून रुग्णालयाच्या देखभालीसाठी निधीची तरतूद करावी. विधान भवनातील स्वच्छता गृहांबाबत मी मागे एकदा बोलले होते. मी यापूर्वी मुंबई येथील विधान भवनातील महिलांच्या स्वच्छता गृहांबाबत प्रश्न उपस्थित केला होता. तरी देखील त्या स्वच्छता गृहांचे स्वरुप अजून बदलले नाही. आज मी या नागपूरच्या विधान भवनातील महिलांच्या स्वच्छता गृहांबाबत सांगू इच्छिते. ही महिलांची स्वच्छतागृहे स्वच्छतेपासून संपूर्णपणे दूर आहेत. विधानसभेच्या माननीय अध्यक्षांच्या दालनापासून जवळ असलेल्या महिलांच्या स्वच्छता गृहाच्या दरवाजाचे स्टॉपर बिघडले आहे. त्यामुळे दरवाजा नीट लागत नाही. मी त्या ठिकाणी तीन-चार वेळा जाऊन आले तरी देखील तीच अवस्था आहे. या लहान लहान गोष्टी असल्या तरी त्यामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. या साध्या गोष्टी जर आपले खाते करीत नसेल तर मोठया गोष्टींकडे ते कसे लक्ष देणार? तेव्हा या बाबीकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) NN 2

DGS/ D/ RJW/ पूर्वी श्री. सुंबरे 14:25

श्रीमती सुधा जोशी...

आपण लक्ष देऊन महिलांच्या स्वच्छता गृहांचे नूतनीकरण करावे. तसेच, त्या स्वच्छतागृहांची देखभाल चांगल्या प्रकारे करावी. या दृष्टीने आपण विचार करावा अशी विनंती करते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 97 व पृष्ठ क्र. 78 च्या अनुषंगाने अतिवृष्टीच्या काळात मुंबईसह राज्यातील अनेक जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग, राजमार्ग, जिल्हा मार्ग तसेच गावांना जोडणारे अनेक रस्ते यांची अत्यंत दुरावस्था झाल्यामुळे वहातुकीत अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे वाहनांचे मेंटेनन्स वाढले आहे. नागरीकांना वेळेवर इच्छित ठिकाणी पोहोचता येत नाही. तरीही तातडीने हे रस्ते दुरुस्त करावेत. उदा. सांगली जिल्हयातील मिरज ते सलगरे व्हाया एरंडोली शिपूर या रस्त्याच्या दुरुस्तीच्या संदर्भात मी या पूर्वीही सभागृहात उल्लेख केला होता. पण अद्यापि या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही. आता तर अतिवृष्टीमुळे हा रस्ता अत्यंत खराब झाला आहे. त्याची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. या तातडीने करावयाच्या गोष्टींबाबत मी या ठिकाणी उल्लेख केला आहे. तेव्हा या दोन्ही विभागाच्या प्रश्नांकडे मंत्रिमहोदयांनी लक्ष पुरवावे व त्यावर कारवाई करावी अशी विनंती करुन माझे दोन शब्द पूर्ण करते. धन्यवाद.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र.2, पान क्र.5 बाबत सांगावयाचे तर आतापर्यंत 4,44,55,999 इतक्या मतदारांना ओळखपत्रे दिलेली आहेत आणि उर्वरित मतदारांना ओळखपत्रे देण्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, 4,44,55,999 मतदारांना ओळखपत्रे दिलेली आहेत म्हणजे अजून उर्वरित किती मतदारांना ओळखपत्रे द्यावयाची आहेत याचे सर्व्हेक्षण केले असेल तर ते याठिकाणी समजणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या बाब क्र.65, पान क्र.48 बाबत सांगावयाचे तर मंत्रीमंडळाने संभाजीनगरच्या बाबतीत निर्णय घेतला त्याबद्दल मी धन्यवाद देतो. नांदेड महानगरपालिका 10 कोटी, संभाजीनगर महानगरपालिका 25 कोटी असे मिळून 35 कोटी रुपयांचे विशेष अनुदान दिलेले आहे याबद्दल स्वागत करताना, अभिनंदन करताना मुंबई महानगर पालिकेकच्या बाबतीत मात्र सापत्नभाव का ? मुंबई महानगरपालिकेचे राज्य शासनाकडून 570 कोटी रुपयांचे येणे आहे. सभापती महोदय, यासंदर्भात वर्तमानपत्रामध्ये जी माहिती आलेली आहे, ती मी आपल्या परवानगीने वाचून दाखवतो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "पालिकेची राज्य शासनाकडे 570 कोटीची थकबाकी : वसुलीसाठी राष्ट्रवादीचे प्रयत्न" या शिर्षकाखाली ही बातमी आली आहे. त्यात असे म्हटलेले आहे की, "मुंबई महापालिकेची राज्य शासनाकडे तब्बल 570 कोटी रुपयांची थकबाकी असून ती मिळण्यासाठी पालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेसने उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांची भेट घेऊन पालिकेची थकबाकी देण्याची मागणी केली आहे. महापालिका व राज्य शासन यांच्यातील विविध विषय तसेच थकबाकीबाबत यापूर्वी समन्वय समितीच्या माध्यमातून निर्णय प्रथा होती. समन्वय समितीची ही बैठक वर्षातून किमान दोन वेळा होणे अपेक्षित होते. या बैठकीला मुख्यमंत्री, मुख्य सचिव, संबंधित खात्याचे मंत्री तसेच पालिका आयुक्त, महापौर व गटनेते उपस्थित असावेत असा संकेत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांच्या कालावधीत ही प्रथा सुरु झाली. मुख्यमंत्रीपदाच्या मागच्या कालावधीत विलासराव देशमुख यांनीही समन्वय समितीची बैठक घेतली होती. मात्र गेल्या दोन वर्षात अशी बैठक झाली नसून पालिकेचे राज्य शासनाकडे अनेक विषय प्रलंबितच राहिलेले आहेत.राष्ट्रवादी काँग्रेसचे मुंबई अध्यक्ष सचिन अहिर व गटनेते रविंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने सह्याद्री अतिथिगृहा वर उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांची भेट घेऊन पालिकेची थकबाकी देण्याची मागणी केली.

. . . .2 ओ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट . . . .

याबाबत पवार यांनी सांगितले की, प्राथमिक शिक्षणापोटी 123 कोटी रुपये, माध्यमिक शिक्षणापोटी 143 कोटी रुपये तसेच आरोग्य, मालमत्ता व पाण्यापोटी असे मिळून 570 कोटी रुपयांची थकबाकी आहे. एकीकडे राज्य शासन अंतर्गत निधीतून कर्ज घेण्यास पालिकेला परवानगी नाकारते तर दुसरीकडे पालिकेची थकबाकीही देत नाही." म्हणून मी माननीय राज्यमंत्र्यांचे या बाबीकडे लक्ष वेधत आहेत. ज्याप्रमाणे आपले आघाडी सरकार राजकीय दृष्टया संक्रमणावस्थेतून जात आहे, त्याच प्रमाणे मुंबई महानगरपालिका सुध्दा याच अवस्थेतून जात आहे. अशा वेळी मुंबई महानगरपालिकेचे 570 कोटी रुपये दिले तर अनेक प्रश्न मार्गी लागतील अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.102, पान क्र.80 बाबत बोलावयाचे तर बी.डी.डी.चाळींसाठी 4 कोटी 75 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. बी.डी.डी.चाळींच्या पुनर्बांधणीसाठी याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी अनेक प्रस्ताव आणले होते. काही वेळेला असे सांगितले की, म्हाडाच्या माध्यमातून पुनर्बांधणी होणार आहे. काही वेळा असे सांगितले की, खाजगी विकासकाला पुनर्बांधणी करण्यासाठी परवानगी दिली जाणार आहे आणि याठिकाणी 4 कोटी 75 लाख रुपये देऊन दुरुस्ती करीत आहात म्हणजे बी.डी.डी.चाळींच्या पुनर्बांधणीच्या बाबतीत शासनाचे नक्की धोरण काय आहे हे समजणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पान क्र.84, बाब क्र.106 याठिकाणी राज्य महामार्गासाठी 150 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर तळेगाव टोलनाक्यापासून उर्सेखिंडीतून तळेगावसाठी जवळचा रस्ता आहे आणि हा एक कि.मी.चा मार्ग आहे. त्यावेळी माननीय राज्यमंत्री श्री.शिवरकर होते. मागच्या वेळीही पुरवणी मागण्यांवर बोलत असताना मी सांगितले होते. तेथील मुख्य अभियंता श्री.देशपांडे त्यांनी याबाबत असे सांगितले की, याबाबतीत निविदा मागविल्या आहेत आणि पावसाळयापूर्वी म्हणजे मे महिन्यापर्यंत हा एक कि.मी.लांबीचा रस्ता पूर्ण होईल. माननीय मंत्री महोदयांनी तेथील रस्त्याची अवस्था पहावी. जर फेब्रुवारी-मार्च पर्यंत निविदा काढल्या असतील तर येत्या मे महिन्याच्या अखेरपर्यंत हे काम पूर्ण होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

-----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या ठिकाणी वित्त मंत्र्यांनी खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहापुढे ठेवलेले आहे. त्यामधील बाब क्रमांक 2, पान क्रमांक 4 च्या संबंधाने मी बोलणार आहे. सभापती महोदय, पोट निवडणुका झाल्या त्यामध्ये शासनाचा एकंदरीत खर्च 4 कोटी 7 लक्ष 15 हजार रुपये झाल्याचे दाखविलेले आहे. दोन पोट निवडणुका झाल्या, एका पोट निवडणूक खासदार सुनील दत्त यांच्या निधनामुळे झाली आणि दुसरी पोट निवडणूक घाऊक पक्षांतर झाल्यामुळे झाली.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय सुधा जोशी)**

आपल्याकडे ॲन्टी डिफेक्शनचा कायदा आहे. यापूर्वीच्या कायद्याप्रमाणे एक तृतीयांश सदस्यांनी पक्षांतर केले तर त्यांचे सदस्यत्व अबाधित राखले जात होते. परंतु एन.डी.ए.चे सरकार असताना या संदर्भाने नवीन कायदा आला. ज्या कोणा सदस्यांना पक्षांतर करायचे असेल तर त्यांना सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागतो आणि पुन्हा दुसऱ्या पक्षात जाऊन निवडणुकीला सामोरे जावे लागते. आता विधानसभेतील 10 आमदारांनी पक्षांतर केलेले आहे. त्यातील काही आमदारांनी राजीनामे दिलेले आहेत. ते पुन्हा नव्याने निवडणुकीला उभे राहिलेले आहेत. जे पाच वर्षासाठी सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत ते पक्षांतर कायद्याचा अर्थ लावून निवडणूका लढवत आहेत. त्यासाठीचा भुर्दंड पोट निवडणुकीच्या निमित्ताने पडलेला आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी ज्या बाबीवर बोलत आहेत ती बाब महाराष्ट्र सरकारच्या अखत्यारितील नाही. सरकारच्या अधिकारामध्येही ती बाब येत नाही. पार्लमेंटने पक्षांतर बंदीच्या संबंधातील जो कायदा पास केलेला आहे तो सर्व पक्षांच्या सहकार्याने केलेला आहे. त्यामध्ये कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचेही एकमत होते. नवीन कायद्यानुसार एखाद्या सदस्याला पक्ष सोडायचा असेल तर त्याने प्रथम आमदारकीचा राजीनामा दिला पाहिजे, अशाप्रकारचा कायद्यामध्ये उल्लेख आहे. भारतीय घटनेप्रमाणे कायद्यामध्ये दुरुस्ती करुन नवीन कायदा आणला. पार्लमेंटने केलेला कायदा हा बंधनकारक आहे. त्यामध्ये महाराष्ट्र सरकारला किंवा विधिमंडळाला हा कायदा बदलविण्याचा अधिकार नाही. पार्लमेंटने केलेला कायदा हा आपल्यावर बंधनकारक आहे. ज्याप्रमाणे माननीय



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ MHM/ D/ SBT/

श्री. नितीन गडकरी (पुढे सुरु....

राज्यपालांच्या खर्चाच्या संबंधात आणि माननीय सभापती महोदयांच्या खर्चाच्या संबंधात काही बोलू नये असे संकेत आहेत तसेच निवडणूक आयुक्तांच्या खर्चाच्या संबंधात या ठिकाणी बोलू नये असे संकेत आहेत . सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी 10 आमदारांनी पक्षांतर केल्याचे सांगतात परंतु अजून सगळ्यांनी राजीनामे दिलेले नाहीत. त्यापैकी तिघांनीच राजीनामे दिलेले आहेत. ते लाईनमध्ये असल्याचे सांगत आहेत. ही काय भानगड आहे ? याचा खुलासा त्यांनी केला पाहिजे. माझी एवढीच विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी जे वक्तव्य केलेले आहे त्याचा दुरान्वयानेही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष या सभागृहाशी संबंध येत नाही. तो या सभागृहाला अधिकारही नाही. पार्लमेंटने जो कायदा केलेला आहे तो बंधनकारक आहे. त्या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याचा आपल्याला अधिकार नाही. अशा निवडणुका झाल्या तर त्यावर खर्च करावाच लागणार आहे. त्याबाबत बोलून काही उपयोग नाही. ते आपल्याला मॅन्डेटरी आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ 15:05

श्री. नितीन गडकरी...

असे असतांना ते पार्लमेंटच्या कायद्यावर या ठिकाणी मल्लीनाथी करीत आहेत ते बरोबर नाही. सबब त्यांचे वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे आणि याबाबतीत त्यांनी कुठल्याही प्रकारची चर्चा उपस्थित करु नये अशी दुरुस्ती करावी.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हे सार्वभौम सभागृह आहे. या सार्वभौम सभागृहात निरनिराळया पक्षाचे प्रतिनिधी आणि सदस्य बसलेले आहेत. त्यामुळे मी सन्माननीय नितीन गडकरी यांच्या म्हणण्याला दुजोरा देतो. पण या सभागृहात माझी अशी भावना आहे की, उद्या पक्षांतर करुन त्या ठिकाणी सरकारवर ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण या ठिकाणी भावना व्यक्त करीत नाही. सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत आहोत.वित्त आणि नियोजन विभागाकडून जो खर्च आलेला आहे त्या खर्चाला सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे विरोध करीत आहेत. हा विरोध करीत असतांना पार्लमेंटच्या कायद्याबद्दल मल्लिनाथी करीत आहेत. तीन लोकांनी राजीनामा दिल्यानंतर पक्षांतर केले हेही सांगत आहेत. ते त्यांनी सांगावे.पक्षांतराच्या बाबतीत मी काय बोलणार? माझ्यापेक्षा जास्त अनुभव त्यांना आहे. ते आणि त्यांचे नेते अनेक वेळा पक्ष बदलतात त्यामुळे यातील एक्सपर्ट...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : आम्ही पक्ष बदलत नाही, मीही पक्ष बदलेला नाही.

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी ) : सन्माननीय सदस्यांना त्यांचे विचार मांडू द्यावेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पार्लमेंटमध्ये पास केलेल्या कायद्यावर ज्याप्रमाणे पक्षांतर बंदीचा कायदा आहे. त्याप्रमाणे राजीनामा दिलेल्या आमदारांना, राजीनामा द्यावा लागतो. आणि फॉर मँडेटरी या निवडणुका घेणे हे राज्य सरकारला क्रमप्राप्त आहे. हा जो खर्च आहे. हा मँडेटरी आहे. यावर चर्चा होऊच शकत नाही. आपण हे तपासून घ्यावे अथवा कोणाचे ओपिनियन घ्यावे.माझा पॉईंट ऑफ ऑर्डर असा आहे की, सन्माननीय गुरुनाथ कुलकर्णी यांनी यासंबंधातील त्यांचे वक्तव्य मागे घ्यावे आणि सभापती महोदया आपण निर्णय द्यावा की, पार्लमेंटच्या कायद्यामुळे जर या राज्यात निवडणूका घ्याव्या लागल्या असतील तर त्या खर्चाला ही विधानमंडळ विधान परिषद कात्री लागू शकत नाही. हा खर्च मँडेटरी ---------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

आहे.घटनात्मकरीत्या आहे. पार्लमेंटचा कायदा राज्य शासनावर, राज्य विधानमंडळावर बंधनकारक आहे. त्यामुळे आपण कायद्याशिवाय दुस-या विषयावर बोलू शकता. ज्या पुरवणी मागण्यावर आपण चर्चा करीत आहोत. त्या पुरवणी मागण्या विधानपरिषेला मंजूर करण्याचा अधिकार नाही. येथे त्यावर फक्त चर्चा होते. पण उद्या विधानमंडळामध्ये जसे राज्यपालांचा पगार असेल, त्यांचा खर्च असेल, सभापतींचा खर्च असेल किंवा मॅंडेटरी एक्सपेंडिचर ऑफ इलेक्शन कमिशन असेल तर त्या खर्चावर कपात सूचना देता येत नाही. याचे कारण तो खर्च मॅंडेटरी असतो.घटनात्मकरीत्या असतो. त्यामुळे त्यावर बोलत असतांना पार्लमेंटच्या कायद्याबद्दलची मल्लिनाथी या सभागृहात करणे हे डायरेक्टली आणि इनडायरेक्टली आपल्या अधिकारात येत नाही.त्यामुळे यावर चर्चा करणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांच्या भावनेशी मी सहमत आहे.कारण आज वन थर्डचा कायदा असता तर आज मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुखांना सुखाने झोपू दिले नसते. त्याचा श्री. राणे साहेबांना आणि मला चांगला अनुभव आहे. म्हणून वनथर्डचा कायदा असता तर हे सुखात राहिले नसते. त्यांच्या झोपा आम्ही रोज खराब केल्या असत्या.सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांच्या भावनेशी मी सहमत आहे.माझाही त्याला पाठींबा आहे पण ते येथे मांडता येत नाही. त्यावर चर्चा करता येत नाही.

**तालिका सभापती** :सन्माननीय सदस्यांना त्यांच्या पध्दतीने विचार मांडू द्यावेत. श्री. गुरुनाथ कुलकर्णींचे भाषण पूर्ण झालेले नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यांनी त्या बाबीला विरोध केलेला आहे. तेव्हा सभापती महोदयां आपण रुलिंग द्यावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, श्री.गुरुनाथ कुलकर्णी पुरवणी मागण्यांच्या चर्चेमध्ये भाग घेत असतांना त्यांचे मत याठिकाणी मांडीत होते. मत मांडत असतांना त्यांचे सगळे वाक्य पूर्ण व्हायच्या आधीच या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य माननीय नितीन गडकरी यांनी त्याला हरकत घेतलेली आहे. निदान या सभागृहात कशावर चर्चा करता येते कशावर चर्चा करता येणार नाही हा जरी कायदेशीर भाग असेल तर सभापती महोदया, आपल्याला नंतरही काढून टाकता येईल. परंतु पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असतांना सन्माननीय सदस्य जोपर्यंत काही राष्ट्राच्या विरोधी बोलत नाहीत तोपर्यंत त्यांना अशा पध्दतीने थांबविता येईल काय हा खरा त्यातील मुद्दा

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. हा सन्माननीय सदस्यांच्या भाषण स्वातंत्र्यावर किंवा व्यक्ती स्वातंत्र्यांचा संकोच त्याच्यामध्ये होत आहे. त्यानीं केंद्र सरकारच्या कुठल्याही कायद्याबद्दल, घटनेबद्दल किंवा राज्य घटनेवर टीका केलेली नाही. ते एवढेच मांडत होते की, हा जो खर्च झाला आहे हा खर्च योग्य आहे की अयोग्य आहे. त्यांनी कुठलिही टीकाटिपण्णी केलेली नाही. त्यामुळे या संदर्भात त्यांनी जो पाईंट ऑफ ऑर्डर उपस्थित केला आहे आणि मी जो पॉइंट ऑफ ऑर्डर उपस्थित केला आहे या दोन्हीचा एकत्रित विचार करुन आपण निर्णय दिला तर बरे होईल. ....

यानंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ RJW/ D/ पूर्वी कु. थोरात.... 15:10

श्री. नितीन गडकरी : महोदय, मला आपण कृपया संरक्षण द्यावे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुळकर्णी यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. त्यांनी जो खर्च झालेला आहे तो पोटनिवडणूकीत झालेला असून त्यावर आक्षेप घेतला आहे त्यासंदर्भात मी हरकत घेतली.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांचे भाषण अजून पूर्ण झालेले नाही. ते कोणत्या पध्दतीने आपले विचार मांडत आहेत ते प्रथम सन्माननीय सदस्यांनी समजून घ्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे त्यावर मी बोलणार नाही. कारण मला माहिती आहे की, हा खर्च जो आहे तो बंधनकारक आहे. कारण निवडणूक आयुक्तांच्या माध्यमातून सार्वत्रिक निवडणूकांवर जो खर्च होतो तो आपल्याला करावाच लागतो. याबाबत माझी अशी भूमिका मला मांडावयाची होती की या सभागृहात सर्व पक्षाचे सन्माननीय सदस्य बसलेले आहेत. पक्षांतर बंदीच्या संदर्भात कायदयात जो बदल झालेला आहे त्या बदलामुळे ही परिस्थिती निर्माण होते. जे कोणी निवडून येतात ते पाच वर्षासाठी निवडून आलेले असतात. पण या पाच वर्षाच्या आतच अशी कोणती घटना घडते, कोणते असे वैचारिक बदल होतात आणि या बदलामुळे घाऊक स्वरुपात पक्षांतर होत असेल आणि त्यावर असा खर्च होत आहे, हे मी या ठिकाणी सर्वपक्षीय सदस्य बसलेले आहेत या निमित्ताने सांगू इच्छितो.

**तालिका सभापती** : आपण केलेला खुलासा पुरेसा आहे, आपले भाषण सुरु करावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : दुसरी बाब या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, वित्त विभाग, बाब क्र. 94, पृ.क्र.68 - नवीन तालुके जे नव्याने तयार केलेले आहेत त्यांच्यासाठी काही पदे तसेच कोषागरे व त्यांची पदे याबाबतची मागणी आलेली आहे. यासंदर्भात मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडा मार्ग हा तालुका 8 ते 10 वर्षापूर्वी तयार झालेला असून अद्यापही तेथे कोषागराची निर्मिती करण्यात आलेली नाही, तसेच साधी इमारत सुध्दा बांधलेली नाही. याबाबत मी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सभागृहात वारंवार मागणी केली व तसे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले होते, दुर्देवाने अद्यापही त्याबाबतची कार्यवाही झालेली नाही. या निमित्ताने माननीय वित्तमंत्र्यांना माझी विनंती आहे की, किमान पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंत तरी याबाबतची कार्यवाही करावी.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ........

यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, बाब क्र. 98, पृ.क्र.79 केंद्र-मार्ग निधी, रस्ते व पूल यासंबंधीची मागणी करण्यात आली आहे. हा प्रश्नही मी वारंवार मांडत आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मिळकुमरी-उंबरेश्वर येथे एक पूल व्हावा अशी मागणी वारंवार करीत आहे. एवढेच नव्हे तर राज्यशासनाने शिफारस केली आहे की, केंद्रशासनाच्या एसआरएफ या फंडातून हा पूल घेण्यात यावा व त्याला मान्यताही मिळाली, परंतु अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही. म्हणून या पुलाच्या बाबतीत सद्य:स्थिती काय आहे? मागील अधिवेशनाच्या वेळी शासन जी कार्यवाही करणार होते ती अद्यापपर्यन्त झालेली नाही म्हणून त्याबाबतीतील माहिती मिळावी. त्याचप्रमाणे मसुरे-बांदिवडे हा एक पूल युतीच्या काळात घेण्याचे मान्य केले होते व त्यासाठी 2 लाखाची तरतूद देखील करुन ठेवण्यात आली, पण पुढील कार्यवाही अद्यापही झाली नाही. आपण पुरवणी मागणीच्या निमित्ताने याबाबत सांगितले होते की, काहीतरी निर्णय घेण्यात येईल पण अद्यापही काहीच केलेले दिसून येत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .........

तसेच मोंड-वानिवडे-टेंभिवली या पुलाच्या संदर्भातील मागणी आम्ही अनेक वर्षापासून करीत आहोत. कोकणामध्ये खाडयांचे प्रमाण मोठया प्रमाणात असल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेमध्ये जाण्यासाठी होंडयांचा वापर करावा लागतो. त्यामुळे या ठिकाणी पूल होण्याच्या दृष्टीने सातत्याने मागणी करीत आहोत. हे प्रकरण कोठपर्यंत आलेले आहे याच्या संदर्भातील माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी. आरोंदा-किरणपाणी पूल व्हावा यासाठी आम्ही वर्षानुवर्षे मागणी करीत आहोत. गोव्याचे मुख्यमंत्री श्री. मनोहर पर्रीकर होते त्यावेळी त्यांनी जाहीर केले होते की, आम्हाला जर महाराष्ट्र शासनाने ना हरकत दिली तर गोवा शासनाच्या वतीने हा पूल बांधण्यात येईल. ज्यावेळी श्री. पर्रीकर यांचे सरकार होते त्यावेळी यांसदर्भात मी त्यांना दोनदा भेटण्यासाठी गेलो होतो. परंतु ते काम होऊ शकलेले नाही. गोवा-सावंतवाडी बॉर्डरवरचा हा 18 कोटी रुपयांचा पूल आहे. मला अशी माहिती देण्यात आली होती की, केंद्राकडून या कामाला परवानगी मिळालेली आहे. राज्य शासनाने देखील या कामाला मंजूरी दिलेली आहे. परंतु पूलाचे टेंडर अजूनपर्यंत काढण्यात आलेले नाही. त्यामुळे या पुलाच्या कामाकडे लक्ष देऊन त्याबाबत आज नेमकी काय परिस्थिती आहे याची माहिती शासनाने द्यावी अशी विनंती आहे

यानंतर मी बाब क्रमांक 100 वरील जिल्हा व इतर मार्गाच्या संदर्भात विचार मांडणार आहे. एक दोन दिवसापूर्वी मोंड गावाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी प्रश्न विचारला होता. या प्रश्नावर या सभागृहात बरीच चर्चा देखील झाली होती. मोंड गावातील जो रस्ता आहे तो अतिशय अरुंद असून या गावातील लोकसंख्या पाच ते साडेपाच हजार आहे. हा रस्ता जिल्हा परिषदेच्या ताब्यात आहे. त्यामुळे या रस्त्याच्या रुंदीकरणाची मागणी आम्ही केलेली आहे. हा रस्ता जिल्हा परिषदेकडून बांधकाम विभागाकडे घेण्यात यावा अशी आमची मागणी आहे, या रस्त्याचे रुंदीकरण व खडीकरण व्हावे या संदर्भात आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत, त्यामुळे या रस्त्याच्या बाबतीत शासनाने लक्ष घालावे अशी विनंती करतो व पुरवणी विभागाच्या चर्चेवरील माझे विचार पूर्ण करतो.

-------------

......2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, सामान्य प्रशासन विभागातील निवडणूकीच्या खर्चासंबंधी महत्वाचे विचार सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडले तेच विचार मी या ठिकाणी मांडू इच्छितो. मी त्यांच्या विचाराशी सहमत आहे की, असे घाऊक पक्षांतर करणे हे काही बरोबर नाही. मागच्या वेळी या सभागृहात 18 आमदार घेऊन एकाने पक्षांतर केले होते. पण पक्षांतर करणा-या नेत्याला बक्षीस मिळत असते. पक्षांतर केल्याबरोबर त्याचे विचार बदलतात. तो गोडसेचा पुरस्कार करता-करता गांधीचा पुरस्कार करावयास लागतो. पक्षांतर केल्यामुळे मंत्रीपदाचे जे चॉकलेट मिळते त्यांनतर लोकांच्या विचारामध्ये खूप मोठा फरक पडतो. मंत्रीपदाचे चॉकलेट आणि चाटण मिळाल्यामुळे प्रोत्साहन मिळते. तसेच अजून 10 पक्षांतर होणार आहेत असे माननीय गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितलेले आहे. हे लक्षात घेता हा खर्च जनतेवर लादणे योग्य होणार नाही. आता या 10 लोकांच्या पक्षांतरामुळे जो खर्च होणार आहे त्यामुळे त्यांची लोकशाहीच्या मुल्याशी जी कटिबध्दता आहे, अशा प्रकारे त्यांचा पक्षांतर बंदीला विरोध आहे. पक्ष बदलल्यामुळे मंत्रीपदाचे चॉकलेट मिळते त्यामुळे ही अनिष्ठ प्रथेसंदर्भात त्यांनी अतिशय परखड विचार या ठिकाणी मांडलेले आहेत त्यांच्या विचाराशी मी पूर्णपणे सहमत आहे. मी त्यांच्या विचारांचे समर्थन करतो आणि एकच सुधारणा सांगतो की, यानंतर पक्षांतर करणारे जे क्रांतीवीर आहेत त्यांच्यासाठी एक काळजी घेतली पाहिजे की, त्यांना पाच वर्षासाठी मंत्रीपद द्यावयाचे नाही. मंत्रीपद मिळाले नाही तर हे कधीच पक्षांतर करणार नाहीत. कारण पक्षांतर हे विचाराकरिता होत नसते तर ते मंत्रीपदाच्या चॉकलेट करता होते. त्यानंतर लगेच गोडसेला जिंदाबाद करणारे लोक, गोडसेंचे पुतळे उभे करणारे लोक, अचानक गांधीजींचे पुतळे उभे करावयास लागतात. पक्षांतरामुळे इतका वैचारिक क्रांतिकारक बदल होतो. त्यामुळे हा वैचारिक व्याभिचार थांबविला पाहिजे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

या दृष्टीने महनीय विचार श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी व्यक्त केले आहेत. त्यांच्या विचाराशी मी सहमत आहे.

अध्यक्ष महोदय, मी नगरविकास बाब क्रमांक 89 वर बोलणार आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी सांगितले की, मुंबई महानगरपालिकेला 550 कोटी रुपये सरकार देणे आहे. मुख्यमंत्र्यांनी मराठवाडयाला बैठक घेतली आणि मराठवाडयातील नगरपालिका, महानगरपालिकांसाठी अनुदान देण्याचे घोषित केले. श्री.विलासराव देशमुख ज्यावेळी पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले त्यावेळी त्यांचा नागपूर येथील चिटणीस पार्क येथे जाहीर नागरी सत्कार झाला. त्यावेळी नागपूर शहरासाठी 25 कोटी रुपयाचे अनुदान देण्याचे त्यांनी जाहीर केले. पण आम्हाला 25000 रुपये देखील मिळत नाही. पुढील पाच वर्षासाठी 25 कोटी रुपयाचे विशेष अनुदान दिले जाईल असे मुख्यमंत्र्यांनी घोषित केले होते. आम्हा विदर्भातील लोकांना टाळया वाजवायला आणि मोठे कट आऊटस् लावण्याची सवय आहे. त्याप्रमाणे आम्ही लगेच यासंबंधीचे कट आऊटस् लावले. आमच्या वर्तमानपत्रात अग्रलेख आहे. आम्हाला जे 25 कोटी रुपये देण्याचे जाहीर केले होते, ते हातोहात गायब केले आहे. युतीच्या काळात नागपूरसाठी दरवर्षी अनुदान मिळत होते. त्यातील एकही पैसा आम्ही कमी केला नाही. पण आता आमच्या विदर्भातील मंत्र्यांना कोणीही विचारत नाही. त्यांची कुचंबणा होते. 'सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही' याप्रमाणे त्यांची अवस्था झाली आहे. ते जरी बोलले तरी ते सरकारच्या विरूध्द बोलल्यासारखे होते. बाहेर बोलले तरी देखील सरकारच्या विरूध्द बोलल्या सारखे होते. त्यामुळे त्यांची अवस्था केविलवाणी झाली आहे.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र सरकारकडून नागपूर शहरासाठी किती रक्कम येणे आहे यासंबंधीची आकडेवारी माझ्याकडे आहे. स्टॅटयुटरी ग्रँटस् किती देणे बाकी आहे, यासंबंधीची आकडेवारी माझ्याकडे आहे. सभागृहामध्ये नगरविकास राज्यमंत्री आणि वित्त राज्यमंत्री दोघेही आहेत. स्टॅटयुटरी ग्रँट अंतर्गत राज्य सरकारकडून येणारी रक्कम पुढील प्रमाणे आहे :-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) TT 2

BGO/ SBT/ MHM/ जुन्नरे... 15:20

श्री.नितीन गडकरी...

1) Land Revenue and Non Agricultural Cell : Rs. 11.97 Lakhs & Rs. 1570.82 Lakhs respectively. (2) Entertainment Duty : Rs. 348.59 Lakhs. (3) Road Grant : Rs. 611.47 Lakhs. (4) Dues Pending with Government as on 31-3-2005 : Rs. 2350.38 Lakhs. (5) Current Year Grant for the year 2005-2006 : 601.00 Lakhs. (6) Balance of Grant to be received from State Government : Rs. 2542.85 Lakhs. (7) Total balance of Statutory Grant & Non-Statutory Grant to be received from State Government : Rs. 6460.85 Lakhs. एवढी रक्कम शासनाकडून येणे बाकी आहे. आज नागपूर महापालिकेची अवस्था वाईट आहे. आमच्याकडे काँग्रेस पक्षाचे महापौर आहेत. सज्जन माणूस आहे. तीन महिने नागपूर महापालिकेमध्ये आमसभा होत नाही. चतुर्वेदी आणि मुत्तेमवार गटाचे भांडण असल्यामुळे असे घडते.

यानंतर अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी........

महापौर म्हणाले माझ्याकडे बील मागायला कोणी येत नाही. तेव्हा त्यांनी महानगर पालिकेचे लॉन भाड्याने द्यायला सुरुवात केली आणि त्याचे पैसे स्वत: घेतले. त्या लॉनवर लग्न होऊ लागले. लग्नपत्रिकेवर विवाहस्थळ म्हणून त्या लॉनचा उल्लेख आहे. त्यांचेकडे कोणी बील मागायला येत नाही म्हणून त्यांनी हा पर्याय निवडला. इतकी महानगरपालिकेची अवस्था वाईट आहे. म्हणून माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, आपण महानगरपालिकेला निधी दिला पाहिजे. त्यामुळे महापैार व्यवस्थित राहू शकतील जेणेकरुन महापौरांची मानसिकता बिघडणार नाही व अशाप्रकारे आर्थिक गोष्टी घडणार नाहीत. आपण महानगरपालिकेचा ऑक्ट्राय बंद केला. त्यांना आठ आठ महिने पैसे देत नाही.

सभापती महोदया, पूरक मागणी क्रमांक एच-5, मध्ये 3054 मार्ग व पूल- 12 व्या वित्त आयोगाने, महाराष्ट्रासाठी रस्त्याचे परिरक्षण व दुरुस्ती यांचेकरिता सन 2005 ते 2010 या कालावधीकरिता एकूण 1189.68 कोटीस रुपये एवढ्या सहायक अनुदानाची शिफारस केली आहे असा उल्लेख आहे. हा खर्च राज्यातील कोणकोणत्या जिल्ह्यात खर्च करणार आहे याची माहिती दिलेली नाही. ही माहिती देण्याची आवश्यकता आहे. एकूण मार्ग किती आहेत ? काही योजनांमध्ये केंद्र सरकारकडून 100 टक्के निधी प्राप्त होतो आणि राज्य सरकार हे काम आम्हीच केले असा ढोल वाजविते. असे काही वेळा होत असते. केंद्र सरकारकडून 100 टक्के निधी मिळतो, तो घेणे आपला अधिकार आहे. सभापती महोदया, नुकत्याच झालेल्या पुरामध्ये विदर्भातील मार्ग व पूलांची अवस्था फार बिकट झालेली आहे. माझी सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.छगन भुजबळ यांना विनंती आहे की, आपण हे अधिवेशन संपल्यानंतर येथे थांबावे आणि येथील रस्त्यांची अवस्था पहावी. मी काही दिवसांपूर्वी अकोल्याहून नागपूरला येण्यासाठी निघालो होतो पण माझी त्या रस्त्यावरुन जाण्याची हिम्मत झाली नाही. मी दक्षिणेकडे जाणाऱ्या हैद्राबाद गाडीने वर्धा येथे आलो आणि नंतर माझ्या गाडीने नागपूला आलो. आपण अकोला-नागपूर प्रवास रस्त्याने करु शकत नाही. माझी मंत्रिमहोदय श्री.छगन भुजबळ यांना विनंती आहे की, आपण रस्त्यांसाठी पैसे देऊ नका पण त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी........

रस्त्यावरुन प्रवास करावा. आम्हाला तेवढेच समाधान मिळेल. आपल्या शरीरातील प्रत्येक भाग खिळखिळा होऊन जाईल. इतके खड्‌डे त्या रस्त्यांवर आहेत. आपण नवीन रस्ते बांधू नका पण ज्या रस्त्यांवर खड्‌डे पडलेले आहेत ते बुजविण्याचे काम केले तरी आमच्यावर उपकार होतील. इतकी रस्त्यांची वाईट अवस्था आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

मोठे आणि मध्यम पाटबंधारे प्रकल्पांच्या बांधकामांचे परीक्षण आणि दुरुस्ती करण्याबाबत पुरवणी मागणी क्र. आय-3, पान क्र.104 वर अतिरिक्त तरतूद दर्शविण्यात आलेली आहे. दिनांक 1 जानेवारी, 2005 पासून विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत. मागील पाच-सहा वर्षांमध्ये या प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाने कोणताही निधी दिलेला नाही. जर यामध्ये माझी काही चूक होत असेल तर माननीय मंत्रिमहोदयांनी त्यामध्ये दुरुस्ती करावी. आज मोठया व मध्यम प्रकल्पांसाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे ? अनुशेषानुसार किती असावयास पाहिजे होती ? प्रत्यक्षात किती निधी देण्यात आला ? याबाबतचा स्पष्ट उल्लेख या ठिकाणी नाही. महाराष्ट्राचे महामहिम राज्यपाल श्री.अलेक्झांडर यांनी विदर्भ, मराठवाडा, कोकण तसेच उर्वरित उत्तर महाराष्ट्राकरिता घटनेच्या 371 (2)(8) खाली राज्य सरकारला पाटबंधारे खात्याचे बजेट पुढील पाच वर्षात कसे असेल पाहिजे याबाबत निर्देश दिले होते. माननीय राज्यपाल महोदयांचे निर्देश पाळणे सरकारवर बंधनकारक आहे. परंतु त्या निर्देशांची तुम्ही काय वाट लावली सर्वांना माहीत आहे. ते निर्देश केराच्या टोपलीत टाकले गेले आहेत. विदर्भ, मराठवाडा आणि कोकणावर या राज्य सरकारने अन्याय केला आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निर्देशांचे पालन केले जात नाही. सभापती महोदया, मी मुंबई हाय कोर्टामध्ये यासंदर्भात केस टाकली, परंतु मला या ठिकाणी खेदाने नमूद करावेसे वाटते की, आमची केस शासन बोर्डावर लागू देत नाही. ॲडव्होकेट जनरल यांनी सभागृहात कबूल केले होते की, माननीय राज्यपाल महोदयांच्या निर्देशांचे पालन न करणे हे घटनाबाहय वर्तन आहे. असे असताना सुध्दा माननीय डॉ.देशमुखसाहेब तुम्ही अनुशेषाचा विचार करुन गेल्या पाच वर्षाच्या अनुषंगाने विदर्भातील मोठया व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांना किती तरतूद उपलब्ध करुन देणार आहात ? जर तुमच्या हातात नसेल तर कमीतकमी तसे तरी या सभागृहासमोर सांगा. पाटबंधारे प्रकल्पांसाठी अतिरिक्त तरतूदीसंदर्भात उल्लेख केलेला आहे. निदान याबाबतीत तरी अनुशेषासंदर्भात विचार होणार आहे काय ? काहीतरी तरतूद या कामासाठी होणार आहे काय ? याबाबतचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरामध्ये करावा.

..2..

श्री.नितीन गडकरी....

मी आता उद्योग विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलू इच्छितो. उद्योगासंदर्भातील पुरवणी मागणी क्र.के-7, 2852 बाबत मी बोलू इच्छितो. "मराठवाडा एकात्मिक विकास कार्यक्रमांतर्गत लघु, मध्यम व मोठया उद्योगांना प्रोत्साहन देणाऱ्या विकास योजनेच्या अर्थसहाय्याचा अनुशेष दूर करण्यासाठी तरतूद करणे" ही बाब क्रमांक 166 आहे. या ठिकाणी माननीय मंत्री श्री.अशोक चव्हाण उपस्थित नाहीत. महोदया, विदर्भातील 1993 सालच्या पॅकेजमध्ये मराठवाडा, विदर्भातील उद्योगांना प्रकल्प उभारणी कालावधी हा पात्रता प्रमाणपत्रासाठी मिळणारा कालावधी द्यावा अशी मागणी उद्योजकांनी केली आहे. याबाबत कॅबिनेटने निर्णय घेतला. परंतु विदर्भ, मराठवाडयासाठी झालेल्या निर्णयात पश्चिम महाराष्ट्र घालून, उच्चाधिकार समितीकडे तो पाठविण्यात आला. आज कॅबिनेटमध्ये झालेल्या निर्णयाचे पालन करण्यास हे सरकार तयार नाही. विदर्भ, मराठवाडयामध्ये उद्योग उभारणीसाठी आपण बॅकलॉगमधून पैसे द्यावेत. एवढी मागणी करुन माननीय मंत्रिमहोदयांनी मी निदर्शनास आणून दिलेल्या सर्व गोष्टींचा खुलासा करावा एवढेच या निमित्ताने बोलतो व माझे भाषण पूर्ण करतो.

------

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ( विधान सभेने निवडलेले ) सभापती महोदया, पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.सर्व प्रथम मला सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 4 पान नंबर 5 संबंधी बोलावयाचे आहे. मतदारांना देण्यात येणा-या छायाचित्रांकीत ओळखपत्रावर केलेल्या खर्चाची तरतूद करण्याकरता सात कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. त्याबाबतीत मघाशी सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी काही मुद्दे मांडले होते. या पूरक मागणीच्या संदर्भात बोलत असतांना मला असे सांगावयाचे आहे की, सामान्य प्रशासन विभागाकडून आतापर्यन्त मतदारांना ओळखपत्रे देण्यासाठी कोटयावधी रुपये खर्च केलेले आहेत. आता पर्यन्त मतदारांना जी ओळखपत्रे देण्यात आली होती ती बरोबर नाहीत त्यामध्ये अनेक प्रकारच्या चुका आहेत. या चुका ज्या अधिका-याने वा ज्या विभागाने केलेल्या आहेत त्या विभागाची वा
अधिका-याची चौकशी करण्यात आली पाहिजे.मतदारांना ओळखपत्रे देण्याचे काम केव्हा पूर्ण केले जाणार आहे ? ओळखपत्रे देण्यात आल्यामुळे निवडणुका पारदर्शी होतील असे त्यावेळी सांगण्यात आले होते. परंतु ओळखपत्रे देऊनसुध्दा अर्धे मतदार मतदान करतात आणि अर्धे लोक मतदान करीत नाहीत अशी स्थिती आहे.अजूनही ओळखपत्रे न दिल्यामुळे मतदार रेशन कार्डस वा इतर कागदपत्रे दाखवत असतात. त्यामुळे अनेक गोंधळ होत असतो.. 1996 सालापासून मतदारांना ओळखपत्रे देण्याचा कार्यक्रम या राज्यात आणि देशात सुरु आहे.परतु अजूनही तो कार्यक्रम पूर्ण झालेला नाही.या विभागाच्या मंत्रिमहोदयांना माझी अशी विनंती आहे की, ते ज्यावेळी उत्तर देतील त्यावेळी हा कार्यक्रम निश्चितपणे कधी पूर्ण होईल यासबंधी त्यांनी ठामपणे उत्तर द्यावे.

सभापती महोदया, यानंतर मला दुस-या एका बाबीच्या संदर्भात बोलावयाचे आहे.विद्रुपीकरण प्रतिबंधक नियम 1995 च्या अधीन राहून. महानगरपालिका नगरपालिका आणि ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये होर्डिंग्ज आणि बॅनर्स लावता येत नाहीत. ही होर्डिंग्ज व बॅनर्स लावण्यास कायद्याने बंदी घालण्यात यावी अशा प्रकारची मागणी मी गेल्या अनेक वर्षापूर्वी केली होती.माननीय मंत्रिमहोदयांनी सुध्दा तसे करण्याचे मान्य केले होते . नागपूरच्या खंड पीठाने आज सार्वजनिक ठिकाणी होर्डिंग्ज लावण्याच्या संदर्भात बंदी केलेली आहे.तेव्हा कायदे हे न्यायालय करणार आहे काय ? आम्ही त्या बाबतीत या ठिकाणी मागणी केली होती.शासनाकडून सुध्दा सांगितले गेले आहे की या संदर्भात निश्चित ठाम भूमिका घेऊन कायदा करु.. ग्रामपंचायतीच्या सदस्या पासून ते माननीय मुख्यमंत्र्यापर्यन्त दररोज कोणाचे ना कोणाचे तरी वाढ दिवस साजरे होत असतात.



श्री.जयंत प्र.पाटील..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आज शासनाकडे पैसे नाहीत तेव्हा यापासून भरपूर उत्पन्न शासनाला मिळू शकेल.ज्याप्रमाणे जाहिरात एजन्सीना सार्वजनिक बांधकाम विभागाला पैसे द्यावे लागतात . त्याप्रमाणे हे होर्डिग्ज लावण्याच्या बाबतीत तरतूद पाहिजे.आज कोणीही होर्डिग्ज सार्वजनिक ठिकाणी लावत असतो. त्यामुळे आम्हाला नको त्या व्यक्तीचे होर्डिग्ज नाईलाजाने पहावे लागतात व नको त्या लोकांचे हात आम्हाला दिसतात. तेव्हा हे प्रकार थांबले पाहिजेत. यासाठी सार्वजनिक ठिकाणी जे होर्डिग्ज लावतील त्यांच्यावर कायदेशीर बंधने घालण्यात आली पाहिजेत असे मला सांगावयाचे आहे..या बाबतीत नागपूर येथील हायकोर्टाच्या खंडपीठाने एक निर्णय दिलेला आहे व तो निर्णय माझ्या वाचनात आला आहे.ज्याने होर्डिग्ज लावलेले आहे त्याच्यावर या खंडपीठाने बंधन घातलेले आहे. हा विषय हसण्यावारी न नेता शासनाने त्याची गंभीरपणे दखल घेतली पाहिजे. दररोज कोणाचे ना कोणाचे तरी दहा वाढदिवस साजरे केले जात असल्याचे वर्तमानपत्रातून मी वाचत असतो आणि ज्याचे वाढदिवस साजरे होत असतात त्याचे होर्डिग्ज शहरातील सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येतात .त्यामुळे शहर विद्रुप होत असते. मुंबईमध्ये मंत्रालयाच्या समोर एवढी मोठ मोठी होर्डिग्ज लावलेली असतात की, त्यामुळे रस्ता दिसत नाही आणि गाडीसुध्दा व्यवस्थितपणे दिसत नाही.तेव्हा यासाठी कायद्याचे बंधने आणण्यासाठी शासनाने लक्ष घालावे अशी मी या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो.

सभापती महोदया,यांनतर मला एक मुद्दा मांडावयाचा आहे. राष्ट्रकुल संसदीय मंडळाने आपल्या राज्यात चांगले काम सुरु केलेले आहे. या राष्ट्रकुल संसदीय मंडळाला शासनाने दोन कोटी रुपये दिलेले आहेत आणि त्या रकमेच्या येणा-या व्याजातून या मंडळाचा दैनंदिन कारभार सुरु आहे. शेजारच्या आंध्र प्रदेश सरकारने त्यांच्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाला 25 कोटी रुपयांचा निधी दिला होता. तेव्हा आपल्या राज्य शासनाने सुध्दा राष्ट्रकुल संसदीय मंडळाला तरतूद वाढवून दिली पाहिजे. महाराष्ट्रातील राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने सर्वच सन्माननीय सदस्यांचा अभ्यासवर्ग घेण्याची तसेच अभ्यास दौरे करण्याची गरज आहे.लोकसभेमधील खासदारांच्या बाबतीत काय घडले आहे हे आपण काल पाहिले आहे.संसदीय लोकशाहीमध्ये विधी मंडळ सदस्यांचे बौध्दिक प्रबोधन करण्याची गरज आता निर्माण झालेली आहे असे मला वाटते. राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने जो अभ्यासवर्ग आपल्याकडे घेण्यात आला त्याचा समारोप आज सकाळी झाला.

(नतर श्री.सुंबरे

अप्रधानित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीने या नागपूरामध्ये चालविल्या जाणाऱ्या अभ्यास वर्गाच्या बैठकीला मी आलो होतो. किंबहुना या अभ्यासवर्गाच्या सर्व बैठकांना मी दररोज लौकर उठून येत असतो आणि सर्वांचे विचार ऐकत असतो. सभापती महोदया, मी निश्चितपणे सांगेन की, या अभ्यासवर्गासाठी राज्यातील विविध विद्यापीठातून विद्यार्थी आणि त्यांचे प्राध्यापक येत असतात. त्यातील नागपूर विद्यापीठाचे एक प्राध्यापक मला आज भेटले आणि मला म्हणाले की, या लोकशाहीमध्ये असलेल्या एकूणच लोकप्रतिनिधींबद्दल आमच्या मनामध्ये एक वेगळे असे मत बनले होते परंतु या अभ्यासवर्गाला आल्यापासून आणि येथे अनेक लोकप्रतिनिधींना भेटल्या-बोलल्यामुळे आमच्या त्या मतामध्ये परिवर्तन झालेले आहे. तेव्हा सभापती महोदया, या ठिकाणी ज्याप्रमाणे हे अभ्यासवर्ग घेतले जातात तसेच ते अगदी खालच्या पातळीवर, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या पर्यंत राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेच्या पुढाकाराने झाले पाहिजेत आणि जे विविध विद्यापीठातील प्राध्यापक आपल्या नागपूरातील अभ्यासवर्गाला येतात त्यांच्या मार्फत हे वर्ग तेथे चालविण्यास सुरूवात करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो. त्यामुळे आपल्या राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेचे बजेट देखील चांगल्या प्रकारचे होईल आणि त्यासाठी चांगल्या तरतुदी येथे झाल्या पाहिजेत असे मी या निमित्ताने सुचवू इच्छितो.

सभापती महोदया, यानंतर बाब क्रमांक 81, पृष्ठ क्रमांक 57 ही शालेण शिक्षण व क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागणीच्या संदर्भात बोलताना मला सांगावयाचे आहे की, प्राथमिक शिक्षण देणे ही जबाबदारी घटनात्मक दृष्ट्या पूर्णपणे शासनाची आहे आणि शासनाला ती बंधनकारक आहे. म्हणूनच माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी या ठिकाणी अनेकवेळा आश्वासन दिले आहे की, विनाअनुदान तत्त्वावरील शाळा, विशेष करून आदिवासी विभागातील अशा ज्या शाळा आहे त्या अनुदान तत्त्वावर आणण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे, त्याबद्दल त्यांचे मी स्वागत करतो, अभिनंदन करतो. यामध्ये प्रामुख्याने डोंगरी विभागातील शाळा आपण अनुदानावर आणल्या पाहिजेत. त्यासाठी वाटल्यास ग्रामीण आणि शहरी असा फरक केला पाहिजे. जे ग्रामीण भागातील, आदिवासी तथा डोंगराळ भागामधील विद्यार्थी आहेत मग ते गडचिरोली, चंद्रपूर अथवा धुळ्यातील असतील, ठाणे जिल्ह्यातील असतील वा पुणे भागातील असतील, त्यांची फी देण्याची देखील कुवत नसते. तेव्हा या शाळा टप्प्याटप्प्याने अनुदानावर कशा येतील याबद्दलचे एक धोरण आपण जाहीर

.... एक्सएक्स 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ....

केले पाहिजे. आता शाळा नव्याने उघडण्याची प्रक्रिया संपलेली आहे. कारण तेवढे विद्यार्थी नाहीत आणि विद्यार्थी वाढत नाहीत त्यामुळे तुकड्या देखील वाढण्याचे कमी झाले आहे. असे असतानाही शासनाच्या बजेटमध्ये मात्र काही फरक होत नाही. अर्थात येथे त्यांच्या पगाराच्या संदर्भात दर आठवड्याला मागणी करण्यात येत असते ती कमी व्हावी. सभापती महोदया, कालच येथे आपण एक विधेयक मागे घेतले आहे. या ठिकाणी शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांच्याबद्दल मला सांगावयाचे आहेत की, सध्या आपल्याकडे जे शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांना आपण कमी करू नका. पण आता शाळांमध्ये शिपाई आणि क्लार्क किती पाहिजेत याचा जो काही आपला स्टाफिंग पॅटर्न आहे तो आपल्याला बदलावा लागेल. जेव्हा 300 विद्यार्थ्यांमागे एक क्लार्क हे सूत्र होते त्यावेळेस आपल्याकडे संगणक नव्हते. त्यावेळेस या पद्धतीची नोंदणी नव्हती. आता ते आले आहे तर मग हा पॅटर्न आपण बदलणार आहोत की नाही ? तेव्हा आज जे सेवेमध्ये आहेत त्यांना आपण कमी करू नका पण नव्याने जी भरती होते त्यावर आपण या पध्दतीने पॅटर्न करून नियंत्रण करा अशी माझी आपल्याला सूचना आहे. चार क्लार्क आणि चार शिपाई अशा पॅटर्न मुळे दरवर्षी आपण कमी केले तरी त्यामुळे खूप मोठा फरक पडणार आहे. त्यातून विनाअनुदानित शाळा अनुदानावर आणण्यासाठी आपल्याला निश्चित काही प्रमाणात मदत होणार आहे. आपणही हे मानता, पण प्रत्यक्ष कृती होत नाही. एका शिपायाला 10 हजार रूपये पगार आहे, म्हणजे चार शिपायांची पदे कमी केली तर त्यातून 40 हजार रूपये वाचवू शकतो हे आपण लक्षात घ्यावे. ...

( यानतर श्री. सरफरे ..... वायवाय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील......

सभापती महोदया, माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी कायम विना अनुदानित तत्वावर असलेल्या शाळांना अनुदान मिळणार नाही असे सांगितले होते. परंतु ग्रामीण भागामध्ये, शहरी भागामध्ये शाळा चालवितांना आपल्याला किती कष्ट पडतात हे मला माहीत आहे. मी आज 32 विना अनुदानित शाळा स्वत: चालवीत आहे. तरीसुध्दा शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महिन्याच्या पाच तारखेला पगार देत आहे. तेव्हा अशाप्रकारे शाळा चालवितांना कसे दु:ख भोगावे लागते हे मी स्वत: अनुभवीत आहे. या सर्व शाळा मी आदिवासी आणि ग्रामीण भागामध्ये चालवीत आहे. तुम्ही जर तुमच्या दहा शाळा आदिवासी विभागामध्ये पनवेल, अलिबाग, व पेण शहरामध्ये चालविल्या तर त्याठिकाणी तुम्हाला उत्पन्न मिळेल. कारण त्या विभागामध्ये फी देणारे विद्यार्थी आहेत. परंतु गरीब समाजासाठी काम करण्याची बांधिलकी ठेवून काम करीत असतांना आदिवासी विभागामध्ये चालविल्या जाणाऱ्या शाळांसाठी शासनाने ठोस निर्णय घेतला पाहिजे. म्हणून मी आपणास नम्रपणे सांगू इच्छितो की, आदिवासी विभागामधील शाळांना आपण 1 हजार नाहीतर किमान 500 रुपये तरी अनुदान द्यावे. याबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन आपण निर्णय घ्यावा. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सुध्दा आपण धोरण बदलले पाहिजे. आज अनेक शाळांमधील शिक्षक काम करीत नाहीत. आपण त्यांना कामावरुन कमी करा असे मी म्हणणार नाही. परंतु आपण यापुढे नवीन पदे भरतांना याही गोष्टींचा विचार करावा. तसेच, शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, रायगड जिल्हयात क्रिडा संकुल बांधण्यासाठी 25 कोटींची तरतूद केली आहे परंतु हे संकुल अजून पूर्ण झाले नाही. परंतु अलिबागला जिल्हा क्रिडा संकुल बांधण्यासाठी मागणी केली होती. त्यासाठी केलेली तरतूद या पुरवणी मागणीमध्ये दिसत नाही. तेव्हा हे क्रिडा संकुल केव्हा पूर्ण होईल हे या मागणीच्या निमित्ताने शासनाकडून खुलासा झाला पाहिजे. सभापती महोदया, बाब क्रमांक 99 व पान क्रमांक 79 वर सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये मुंबई-गोवा महामार्गावर वडखळ येथे निप्पॉन डेन्रो ही कंपनी आहे. मुंबई-गोवा महामार्गावर या कंपनीने गेट केलेला आहे. निप्पॉन डेन्रो कंपनी ज्यावेळी सुरु झाली त्यावेळी वडखळच्या विरुध्द दिशेला अलिबाग तालुक्याकडे जाणारा रस्ता आहे. आज मुंबई-गोवा महामार्गावर वडखळ येथे या उभारण्यात आलेल्या अनधिकृत गेटमुळे दररोज पाच तरी अपघात होत आहेत. मंत्रिमहोदयांच्या मतदारसंघातील हा कारखाना आहे. त्यांचे मत यापेक्षा वेगळे असेल असे मला वाटत नाही. तेव्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील......

हा गेट उभारण्यात आला आहे तो तातडीने बंद करण्याची गरज आहे. दुसरी गंभीर बाब अशी की, पलिकडच्या या गेटमधून आल्यानंतर त्या ठिकाणी मे. पटवर्धन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी बी.ओ.टी. तत्वावर पूल बांधणार आहे. हा पूल झाल्यानंतर सर्व वहातूक तिकडून होईल असे म्हटले आहे.हा पूल उभारण्यासाठी मे. पटवर्धन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने शासनाकडे अडीच कोटी रुपयांची मागणी केली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

आमच्या अटी आणि शर्तींचा भंग केल्यामुळे त्यांनी शासनाकडे मागणी केलेली आहे. आपण येथे गेट केल्यानंतर शासन आज ना उद्या हाय कोर्टामध्ये हरणार आहे आणि शासनावर कारण नसताना भूर्दंड पडणार आहे. याठिकाणी सध्या वारंवार अपघात होत असतात आणि त्यामुळेही शासनाचे आर्थिक नुकसान होणार आहे. तेव्हा हे गेट बंद करुन पूर्ववत तेथे वाहतूक कशी होईल यादृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने खुलासा करावा.

सभापती महोदय, यानंतर शेवटच्या बाबीसंबंधात माझे विचार मांडून मी पुरवणी मागण्यांवरील माझे भाषण संपविणार आहे. कामगार व पर्यावरण विभागाच्या पान क्र.32, बाब क्र.61 बाबत बोलावयाचे आहे. याठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर 740 कि.मी.लांबीच्या समुद्र किनारी होत आहे. जे नवीन प्रकल्प होत आहेत, त्याबद्दल प्रश्न नाही पण जे.टी.बंदराचे नवीन प्रकल्प होत असताना जुन्या प्रकल्पामध्ये त्यांना नव्याने बांधकाम करावयाचे असेल किंवा तो प्रकल्प वाढवावयाचा असेल आणि त्याठिकाणी जनरल वाहतूक करावयाची असेल तर पुन्हा पर्यावरण खात्याची आणि संबंधित खात्याची, शासनाची परवानगी घेऊन तेथे पब्लीक हिअरींग होण्याची गरज आहे अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करेन जेणेकरुन तेथे पाच वर्षापासून असलेली वस्ती, पाच वर्षापासून असलेली समुद्राच्या भरती-ओहोटीची परिस्थिती आणि आताची परिस्थिती विचारात घेतली तर दर दोन वर्षांनी त्यामध्ये अमुलाग्र बदल होत असल्याचे दिसून येते. अशी परवानगी दिली असताना तीन वर्षांपर्यंत त्यांनी जर बांधकाम केले नाही, या कालावधीत त्यांनी आपला प्रोजेक्ट उभा केला नाही तर ती परवानगी रद्द करुन काही कालांतराने पुन्हा परवानगी मागण्याबाबत कायद्यात तरतूद केली पाहिजे. म्हणजे काल याठिकाणी पर्यावरणाच्या बाबतीत लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने प्रश्न उपस्थित झाला, तसे प्रश्न उपस्थित होणार नाहीत. जे कायद्याने बंधन आहे, केंद्र शासनाच्या ॲक्टमध्ये किमान तीन वर्षानंतर ही परवानगी रद्द होते अशी कायद्यात तरतूद असताना, याठिकाणीही तशी तरतूद झाली पाहिजे. पण माननीय मंत्री महोदय याकडे लक्ष देत नाहीत,मंत्री महोदयांना या फाईली बघण्यासाठी वेळ नाही. त्यांना कामगारांच्या बाबतीत जास्त इंटरेस्ट आहे. या फाईली त्यांच्यापर्यंत येतच नाहीत. अधिकारी लेव्हलवरच सगळे होते. तर या फाईली पहाण्यासाठी माननीय मंत्री महोदयांना वेळ मिळेल की नाही ? हे शासन नुसत्या पर्यावरणाच्या बाबतीत गोष्टी करीत आहे. परंतु माननीय मंत्री महोदय त्याकडे अजिबात लक्ष देत

. . . .2 झेड-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

नाहीत. प्रत्यक्ष कृती करावी अशी मी पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना विनंती करीत आहे. या फायली आपल्याकडे येतील यादृष्टीने आपण तरतूद करु शकता का ? की, अधिकाऱ्यांच्याच लेव्हलवरुन हे शासन चालविणार आहात ? या सगळया गोष्टींचा विचार करावा. आणि 740 कि.मी.परिसरामध्ये पर्यावरणाचे संतुलन कसे बिघडणार नाही याची काळजी घ्यावी. नवीन उद्योग यावयास पाहिजेत, आणले पाहिजेत याला आमचा विरोध नाही. पण ते उद्योग आणत असताना पर्यावरण बिघडणार नाही यादृष्टीकोनातून काळजी घ्यावी एवढे बोलून मी माझे विचार संपवितो.

-----

. . . .2 झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज याठिकाणी पुरवणी मागण्यांच्या संदर्भात चर्चा सुरु आहे. या चर्चेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांचा विभाग प्रथम दिलेला आहे आणि त्यामध्ये निवडणुकांचा विषय आला आहे. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या विषयावर थोडेसे भाष्य केले आहे. जो खर्च आहे, तो मंजूर झालेला आहे आणि त्यावर चर्चा करता येत नाही. पण त्यातील जो कमजोर दुवा आहे, त्यावर सन्माननीय सदस्यांनी बरोबर बोट ठेवलेले आहे. एखादा सन्माननीय सदस्य निवडून येतो आणि मग अशा लोकांना लोकसभेसाठी उभे केले जाते. ते लोकसभेमध्ये निवडून गेले की, ताबडतोब पोटनिवडणूक येते.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

काही सन्माननीय आमदार हे कोणत्याही प्रकारचा विचार न करता केवळ सत्ता मिळाली पाहिजे या उद्देशाने पक्षत्याग करतात. त्यासाठी ते सदस्यत्वाचा राजीनामा देतात, पुन्हा निवडणूक लढवितात. मुंबईतील उत्तर-पश्चिम या लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक तेथील सदस्यांच्या देवाज्ञेमुळे झाली, हे समजू शकतो. ती एक नियतीची मेहरबानी आहे. नियती जे करते ते मान्य करावेच लागते. एका पक्षाच्या नावावर सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर पक्षांतर करणे हे कितपत वैध आहे प्रश्न हा आज नाही तर केव्हा तरी समोर येणार आहे. देशामध्ये मान्यताप्राप्त पक्ष आहेत...

डॉ.सुनील देशमुख (बसून) : मागच्यावेळी मातोश्रीवर सदस्यांना नेऊन त्यांना फोडण्याचा प्रयत्न आपल्या पक्षाकडून झालेला होता.

श्री.मधुकर सरपोतदार : त्याचा परिणाम दिसला नाही. प्रयत्न होणे हा भाग वेगळा. असे प्रयत्न होऊ नयेत, या मताचा मी आहे. परंतु मी हे सांगण्याअगोदर आपण बोलण्याची घाई केली. आपण विदर्भातील आहात. ...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु ठेवावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी बसून प्रश्न उपस्थित केला म्हणून मला उत्तर देणे भाग होते. मी जे बोलत आहे ते ठराविक पक्षाच्या संबंधात बोलत नाही. लोकशाहीमध्ये जेवढे पक्ष आहेत त्यांनी याबाबतीत विचार करण्याची आवश्यकता आहे. एकदा निवडून आल्यानंतर पाच वर्षाच्या कालखंडामध्ये विधानसभा किंवा लोकसभा मधेच कोसळली तर काही करता येत नाही. याचा मला अनुभव आहे. मी लोकसभेमध्ये निवडून गेल्यानंतर 13 महिन्यामध्ये लोकसभा बरखास्त झाली. त्यानंतर पुन्हा निवडून गेल्यानंतर 30 महिन्यात लोकसभा विसर्जित झाली. यामध्ये जनतेचा खूप मोठा पैसा खर्च होतो. या दृष्टीने पक्षांनी काळजी घेतली पाहिजे. सत्तेसाठी प्रलोभन निर्माण होते. सत्तेतून मत्ता निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून असे केले जाते. तसा प्रयत्न काही सदस्यांनी केला. यासाठी संघर्ष करावयाचा असेल तर जरुर करावा. या ठिकाणी सदस्यत्वाचा राजीनामा देऊन पुन्हा निवडणुकीला उभे राहून ते निवडून आलेले आहेत. त्या पक्षाशी पटत नसेल

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ D/ RJW/ MHM/

श्री. मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

तर पक्षत्याग करण्याचा प्रत्येकाला लोकशाहीने अधिकार दिलेला आहे. ही पोट निवडणूक लादली गेली. जनतेचा पैसा जनतेच्या कल्याणासाठी खर्च व्हावा, स्वत:साठी त्याचा वापर होऊ नये. या दृष्टीने विचार होण्याची आवश्यकता आहे.

त्यानंतर बाब क्रमांक 4, पृष्ठ क्रमांक 5 यामध्ये मतदारांना ओळखपत्र देण्यासंबंधातील मागणी आहे. माझ्या मतदार संघामध्ये 10 वर्षापासून ओळखपत्र देण्याचे काम चालू आहे. आजही निवडणुकीमध्ये ओळखपत्र असायलाच पाहिजे अशाप्रकारचे बंधन नाही. त्यामुळे बोगस मतदारांची संख्या वाढलेली आहे. निवडणुकीमध्ये प्रत्येकाला ओळखपत्र द्यायला पाहिजे. त्यावेळच्या निवडणूक आयुक्तांनी हा विषय आणलेला होता. आपल्या देशामध्ये ओळखपत्रावर किती कोटी रुपये खर्च झालेले आहेत ? त्याची माहिती द्यावी. ओळखपत्राचे काम सरकार किती दिवसामध्ये संपविणार आहे ? याबाबतची माहिती उपलब्ध असेल तर ती शासनाने द्यावी. या कामासाठी जास्तीत जास्त 7 कोटी रुपये मागितलेले आहेत. अजून असे किती कोटी रुपये खर्च होणार आहेत ? एकूण साडेसहा कोटी मतदारांची संख्या आहे आणि 10 कोटी यावर खर्च होत असतील तर त्याचा विचार व्हायला पाहिजे.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

ओळखपत्र देण्यासाठी किती हजार कोटी रुपये खर्च करावयाचे यावर बंधन असावे. जनतेच्या पैशाचा अपव्यय शक्यतो लवकर थांबावावा अशी विनम्र सूचना शासनाला करावीशी वाटते. माझ्या माहिती प्रमाणे 1996-97, 1997-98 या कालावधीत सहयाद्री अतिथी गृहाचे बांधकाम केलले आहे आणि कोटयावधी रुपये त्यावर खर्च केलेला आहे. असे असतांना तीन-चार वर्षात त्याची दुरुस्ती करावी लागत आहे. गेल्या चार-पाच वर्षात 69 लाख रुपये सलग दुरुस्तीसाठी आणि रंगरंगोटी व इतर कामासाठी खर्च करण्यात येत आहेत याचा विचार करावयास पाहिजे. जी माणसे कॉन्ट्रॅक्ट घेतात, ज्यांच्याकडून हे काम करुन घेतले जाते, त्यांच्यावर काही तरी बंधन असण्याची आवश्यकता आहे. त्या कामाच्या दर्जाबद्दलसुध्दा पाहणी व्हावी.

बाब क्रमांक 6. पृष्ठ क्रमांक 5. शहाजीराजे भोसले यांचे स्मारक बांधणे. सभापती महोदय, या स्मारकात दोन गोष्टी येतात. एखादे स्मारक उभे करावयाचे असेल तर त्याच्यासाठी किती निधी लागतो याचे अंदाजपत्रक बनविले जाते त्यानंतरच ते मंजूर केले जाते. स्मारकासाठी निधी मंजूर करुन घेतल्यानंतर किती कालखंडात स्मारक पूर्ण व्हावयास पाहिजे यावर बंधन असण्याची आवश्यकता आहे. पण तसे बंधन असत नाही. त्यामुळे अनेक स्मारके अद्याप पूर्ण होऊ शकलेली नाहीत.

बाब क्रमांक 7. पृष्ठ क्रमांक 5. श्री. प्रतापराव गुजर यांच्या स्मारक स्थळाचा विकास करण्यासाठी तरतूद. या विकास कामासाठी खर्चाचा जो अंदाज करण्यात आला आहे. त्यापैकी किती खर्च केला ? किती खर्च करावयाचा शिल्लक आहे ? आणि हे काम केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ? या संदर्भातील माहिती शासनाने उपलब्ध करुन दिली तर मी शासनाचा आभारी राहीन. हा विषय जास्त दिवस रेंगाळत ठेवता कामा नये. त्यामुळे त्या निर्णयाचे महत्व कमी होईल, अशा प्रकारचे कुठचेही कृत्य शासनाचे असू नये. यासंदर्भात जाहीर केल्यानंतर दुस-या दिवशी ते वर्तमानपत्रात प्रसिध्द होते. त्यानंतर जनता आणि शासनही विसरुन जाते आणि ते स्मारक होत नाही. त्यावर किती निधी खर्च झाला हेही नीट कळत नाही. त्याबद्दलची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही हे दुर्दैव आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ RJW/ MHM/ SBT/ 16:00

श्री. मधुकर सरपोतदार..

हजला जाणा-या यात्रेकरुंसाठी मदत दिली जाते. याबाबतीत अमुक धर्मियासाठी मदत देण्यात यावी आणि अमुक धर्मियांसाठी ती देऊ नये असा आमचा आग्रह नाही. हज यात्रा करुन जे यात्रेकरु येतात त्यांना "हाजी" म्हणतात. या हज यात्रेकरुंवर वर्षातून किती खर्च व्हावा, किती लोकांना हज यात्रेला परवानगी द्यावी याच्या काही मर्यादा, निकष ठरले आहेत काय? असतील तर त्याची माहिती सदनाला उपलब्ध करुन द्यावी.

बाब क्रमांक 87. पृष्ठ क्रमांक 59. क्रीडा संकुले स्थापन करणे या विषयावर मी बोलणार आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे बजेट किती आहे ? आणि त्यातील किती टक्के रक्कम या क्रीडा प्रकारासाठी खर्च करण्यात येते, याची माहिती सदनाला दिली तर बरे होईल.खरे म्हणजे स्वातंत्र्य मिळून 58 वर्षे झाली आहेत. 58 वर्षापूर्वी या क्रीडा क्षेत्राची जी परिस्थिती होती त्याच्यापेक्षाही जास्त खराब परिस्थिती आज आहे. एक क्रिकेट सोडले तर बाकी क्षेत्रात एकही नांव दिसत नाही. काल सुदैवाने चांगली बातमी ऐकायला मिळाली. हॉकीचा काल स्पेनमध्ये पाकिस्तान विरुध्द भारताचा सामना होता. पाकिस्तानबरोबर भारत जिंकला. आज ऑस्ट्रेलियाबरोबर सामना आहे.ऑस्ट्रेलिया हा बलवान संघ आहे. अशा पध्दतीने हॉकी, कबड्डी , कुस्ती वा फुटबॉलचा खेळ असेल.........................................................................................................

यानंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधूकर सरपोतदार ......

जगाच्या नकाशावर फूटबॉलचे आंतरराष्ट्रीय सामने खेळले जातात त्यामध्ये आपली काय परिस्थिती आहे ? असे होण्याचे कारण म्हणजे क्रीडा क्षेत्रासाठी आपण जी तरतूद करतो त्या तरतुदीतून क्रीडा क्षेत्राचे किती भले करु शकतो यासंबंधीचे काहीतरी निश्चित असे धोरण आपण आखले पाहिजे. अमुक बजेट असेल तर त्याच्या अमुक इतके टक्के एवढी रक्कम संपूर्ण राज्यातील क्रीडा क्षेत्रासाठी आपण उपलब्ध करुन दिली पाहिजे, अशी माझी सूचना आहे. त्यात प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी क्रीडा संकुले उभारण्यासंबंधीचा देखील आयटेम अंतर्भुत आहे. इतक्या वर्षानंतर आपण या क्रीडा विभागाला चालना देऊ शकलो नाही हे दुर्देव आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मॅरेथॉन स्पर्धा होतात, परदेशातून खेळाडू येतात आणि आपल्याकडे ते जिंकून जातात, आमचे खेळाडू का जिंकू शकत नाहीत याचे कारण कुठेतरी शोधणे आवश्यक आहे. याचे एकमेव कारण आहे ते म्हणजे क्रीडा क्षेत्राकडे पाहण्याचा जो दृष्टीकोन आहे तो अत्यंत उदासीनतेचा आहे. आणि ही उदासीन वृत्ती जोपर्यंत आपण सोडत नाही तोपर्यंत यामध्ये बदल होऊ शकणार नाही. शासनाचा या क्रीडा क्षेत्राबाबत जरी उदासीन दृष्टीकोन असला तरी देशाच्या पातळीवर अनेक संस्था स्वयंप्रेरणेने या क्रीडा क्षेत्रात काम करतांना आपण पाहतो. त्यात कलकत्त्याच्या मोहन बागान आणि इस्ट बेंगाल या दोन संस्थांचा समावेश करता येईल. अशा प्रकारची सोय आपल्या राज्यामध्ये काहीच केलेली दिसून येत नाही.

महोदया, आपल्या राज्यात कबड्डीबाबत काय परिस्थिती आहे याचा विचार केला तर राज्यात मला असे सांगावयाचे आहे की, कबड्डी नेहमीच पहिल्या किंवा दुसऱ्या नंबरवर अगोदर राहत होती. आज जर दहा राज्यांचे सामने झाले तर खालून आपला नंबर शोधावा लागतो व तो सातवा, सहावा असाच असतो. एक काळ असा होता की, मुंबईतील गिरणी कामगार आणि त्यांचे कुटुंबिय यांनी या कबड्डी संघाची वाढ केली. कबड्डी खेळासाठी अनेक उत्तम खेळाडू निर्माण केले. पण आज अशी परिस्थिती आहे की, आपल्या राज्याचे प्रतिनिधीत्व निर्माण करण्यासाठी एक एक खेळाडू जिल्हयातून निवडणे कठीण होते. त्याचे कारण या खेळाबाबत जी जिद्द असते, जी महत्वाकांक्षा असायला पाहिजे तीच मुळात लोप पावली आहे आणि त्याचा प्रतिकूल परिणाम या खेळावर झाला, या दृष्टीकोनातून या खेळाकडे पाहिले पाहिजे. या ठिकाणी शालेय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत,

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधूकर सरपोतदार .......

त्यांना माझी अशी विनंती आहे की, त्यांनी याबाबत पुढाकार घेऊन क्रीडा क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना बोलावून त्यांच्या अडचणी समजावून घ्याव्यात आणि जे बजेट या क्रीडा क्षेत्रासाठी तयार करणार त्यातून या खेळांसाठी प्रोत्साहन द्यावे. या निमित्ताने हनुमान व्यायाम शाळा, अमरावती या संघटनेचे उदाहरण देऊ इच्छितो. ही एक अशी व्यायामशाळा आहे की, जी परदेशात जाऊन आलेली संघटना आहे. अशा संस्थांना बोलावून त्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्यांच्यातील औदासिन्य घालविण्याचा प्रयत्न करावा. आज खेळाडूंना नोक-या मिळू शकत नाही, कारण कंपन्या मोठया प्रमाणावर बंद पडलेल्या आहेत. दुसरीकडे मात्र क्रिकेटवर करोडो रुपयांचा खर्च होतो. सर्वात श्रीमंत खेळ म्हणून या क्रिकेटकडे पाहिले जाते. एक सामना झाला तरी कोटयावधी रुपये मिळतात. एकंदर जाहिरातींच्या माध्यमातून तसेच मिडिया देखील त्यांच्या पाठीमागे असतो. स्वाभाविकच त्या खेळासंबंधी सर्वात जास्त आकर्षण आज निर्माण झालेले दिसून येते. असेच आकर्षण ब्राझिलमध्ये फुटबॉलच्या खेळाचे आहे. त्या देशात त्यांची टीम जर हरली तर लोक दोन-दोन, तीन-तीन दिवस अन्न सुध्दा खात नाही. याउलट आपल्याकडे काय परिस्थिती आहे याचाही विचार होणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे आकर्षण कसे निर्माण होईल यादृष्टीने या क्रीडा क्षेत्राकडे पाहणे आवश्यक आहे. वय आणि खेळ यांचे जवळचे नाते आहे त्यादृष्टीने या खेळाकडे पाहिले पाहिजे. पुर्वीच्या काळात संस्थानिक पैलवान सांभाळत होते परंतु आजच्या परिस्थितीत पैलवान सांभाळणे अशक्य झालेले आहे. कारण पैलवानाला खाण्यासाठी लागणारे खुराक परवडणारे नसते. त्यांची दररोजची खुराक 400 रुपयाची असते, आणि इकडे महिन्याला 200 रुपये सुध्दा मिळणे कठीण असतात म्हणून आपल्याला ते परवडणारे नाही. माझी अशी सूचना आहे की, याकडे शासनाने डोळसपणे लक्ष घालून ज्याप्रमाणे इतर गोष्टींकडे आपण पाहतो त्याप्रमाणेच खेळाडूंकडे लक्ष द्यावे. या खेळांना प्रोत्साहन कशा प्रकारे मिळेल तिकडे लक्ष द्यावे अशी विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.

----------------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री नतिकोद्दीन खतिब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : माननीय सभापति महोदय, वर्ष 2005-2006 की पूरक मांगों पर अपने विचार रखने के लिए और उन मांगों को अपना समर्थन देने के लिए मैं यहां पर खड़ा हुआ हूं.

सभापति महोदय, बाब क्रमांक 89 के अंतर्गत अकोला जिले में बालापुर नगर परिषद क्षेत्र में भयंकर बाढ़ और अतिवृष्टि की वजह से करीब 3 करोड़ रुपए का नुकसान हुआ. लेकिन आपत्ति निधि से उस परिषद को कुछ भी मदद सरकार की तरफ से नहीं दी गयी. हमारा कहना है कि जिस तरह से मराठवाडा को एक स्पेशन पॅकेज दिया गया उसी तरह से बालापुर नगर परिषद को भी स्पेशल ग्रांट दी जाये ताकि वहां पर अतिवृष्टि की वजह से हुए नुकसान की भरपाई हो सके.

माननीय सभापति महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग की बाब क्रमांक 97-98 पर बोलते हुए मैं कहना चाहूंगा कि अकोला जिले में बालापुर तालुका है. वहां से नेशनल हायवे नंबर 6 जाता है. वहां पर एक पुल मस नदी पर और एक पुल मन नदी पर है. ये दोनों पुल कम से कम 60 वर्ष पुराने हैं. वहां पर मस नदी पर नया पुल बनाने के लिए इस्टीमेट हो चुका है. परन्तु उसकी बजट प्रोवीजन अभी तक नहीं हुई है. इन पुलों के लिए बजट में प्रोवीजन किया जाना बहुत आवश्यक है. मंत्री महोदय इन पुलों के लिए बजट प्रोवीजन करें, ऐसी उनसे हमारी विनती है. साथ ही बालापुर से पारस फाटा तक का जो रस्ता है वह भी बहुत खराब हो चुका है इसलिए उस रस्ते की रिपेयरिंग होना बहुत जरुरी है, माननीय मंत्री महोदय उस रस्ते की रिपेयरिंग की उचित व्यवस्था करेंगे, ऐसी हम उनसे उम्मीद करते हैं.

माननीय सभापति महोदय, मैं बाब क्रमांक 163 के संबंध में बोलना चाहूंगा. यह विषय अपारंपरिक उर्जा से संबंधित है. मैं उर्जा मंत्री महोदय से विनती करना चाहूंगा कि आज हमारे राज्य में उर्जा की बहुत कमी है. उर्जा की कमी की वजह से हमें लोड शेडिंग करनी पड़ती है. इसलिए जरुरी है कि हम कुछ नगर परिषदों को चुनें और वहां पर जो स्ट्रीट लाइट इत्यादि के लिए उर्जा लगती है उसकी पूर्ति सोलर उर्जा के द्वारा की जाये. सोलर उर्जा का उपयोग करने से हमारी दूसरी इलेक्ट्रिसिटी की बचत होगी और लोड शेडिंग भी कम करना पड़ेगा. साथ ही नगर परिषदों का खर्च कम होगा. इसलिए हमारा कहना है कि 10-15 नगरपरिषदों को चुनकर वहां

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री नतिकोद्दीन खतिब....

पर सोलर उर्जा यंत्र लगाएं. इससे वहां की नगरपरिषदों को जरुर फायदा होगा. माननीय मंत्री महोदय इस ओर जरुर ध्यान देंगे, ऐसी उम्मीद है.

माननीय सभापति महोदय, बाब क्रमांक 84 जो कि शालेय शिक्षण से संबंधित है. उस संबंध में मैं कहना चाहूंगा कि अभी यहां पर माननीय सदस्य श्री जयंत पाटील साहब ने माननीय शिक्षण मंत्री महोदय का अभिनन्दन इस बात के लिए किया क्योंकि जो आदिवासी स्कूल हैं उन स्कूलों को ग्रांट देने की बात मंत्री महोदय ने हाउस में कही है. मैं माननीय मंत्री महोदय को कहना चाहूंगा कि हमारे राज्य में जो अल्पसंख्यकों के स्कूल हैं, वे अल्प प्रमाण में हैं. मायॅनरिटी क्लास में एजुकेशन बढ़ाना बहुत जरुरी है. लेकिन आर्थिक रुप से उनकी हालत मजबूत नहीं है. इसलिए वे अपने स्कूल परमानेंटली नान ग्रांट बेस पर नहीं चला सकते. इसलिए माननीय मंत्री महोदय ने जिस तरह से आदिवासी विभाग के स्कूलों को ग्रांट देने की बात कही है उसी तरह से माननीय मंत्री महोदय अल्पसंख्यकों के स्कूलों को भी ग्रांट देंगे और उनके जो कायम बिना अनुदान स्कूल हैं उनको अब अनुदानित स्कूल करने का काम माननीय मंत्री महोदय करेंगे ताकि अल्पसंख्यकों को तालिम हासिल करने में सहूलियत हो सके. माननीय मंत्री महोदय से इतनी विनती करते हुए मैं अपनी बात खत्म करता हूं और यहां पर पेश की गयी पूरक मांगों को सपोर्ट करता हूं. धन्यवाद.

-0-

( इसके बाद श्री भारवि )..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मी सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 5 वर बोलण्यासाठी उभा आहे. मतदारांना ओळखपत्र देण्यासाठी 7 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यासाठी आपण एक काळजी घेतली पाहिजे. आपल्या राज्यात बऱ्याच बांगलादेशी नागरिकांनी घुसखोरी केलेली आहे. त्यांना मतदानाचे ओळखपत्र देऊन मतदानाचा अधिकारी दिला जाणार नाही याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. मतदारांच्या ओळखपत्रासाठी शासन कोटयवधी रुपये खर्च करणार आहे. त्यामुळे या राज्यातील जे खरोखरचे रहिवासी असतील त्यांनाच ओळखपत्र देण्याची व्यवस्था आपण केली पाहिजे.

यानंतर मी बाब क्रमांक 6 वर बोलणार आहे. राष्ट्रपुरूष व थोर व्यक्तींच्या स्मारकांसाठी व पुतळयांसाठी तरतूद करण्यात आली आहे. शहाजीराजे भोसले, डॉ.रफीक झकेरीया, गोविंदभाई श्रॉफ व शंकरराव चव्हाण यांचे पुतळे उभारण्यात येणार आहेत. या सर्वांचे राजकीय व सामाजिक क्षेत्रात फार मोठे योगदान आहे,याबद्दल वाद नाही. नामदार श्री.अंतुले हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी स्मारके उभी करण्याबाबत, पुतळे उभे करण्याबाबत क्रांतिकारक निर्णय घेतला. आता त्या स्मारकात गुरू-ढोरे जाऊन बसतात. विशेषत: रायगड जिल्हयातील स्मारकांमध्ये. तेव्हा या स्मारकाची देखभाल करण्याचे काम शासनाने केले पाहिजे. समाजसुधारकांची स्मारके करायची असतील तर त्यांची देखभाल होईल हे देखील पाहिले गेले पाहिजे. रायगड किल्ल्यावर रोप-वे ने गेल्यानंतर असे लक्षात येते की, तेथे एक मंदिर आहे. कुत्र्याची समाधी आहे. राष्ट्रपुरूष श्री शिवाजी महाराज यांचे स्मारक आहे. त्यांच्या स्मारकाजवळ महाराजांच्या आयुष्यातील चांगल्या गोष्टीचा इतिहास सर्वांना कळवा म्हणून तेथे खरे तर वचने कोरली गेली पाहिजेत. शासन बांधत असलेली स्मारके ही गुरा-ढोरांना बसण्याची जागा होता कामा नये, अशी माझी सूचना आहे.

आजच सकाळी आमच्या सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. कविवर्य बा.सी.मर्ढेकर यांचे स्मारक बांधण्यासाठी सन 2003 मध्ये शासनाने रुपये 30 लाखाची तरतूद केली होती. एका सदस्याने मागणी केली म्हणून त्याला खूष करण्यासाठी तरतूद केली असे शासनाने म्हणता कामा नये. शासनाकडे अनेक शिष्टमंडळे येत असतात. तेव्हा शासनाने आपली सूचना तपासून पाहतो असे सांगायला हवे. ज्यावेळी ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )3E2

BGO/ D/ RJW/ 16:15

श्री.मधुकर चव्हाण....

अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली जाईल त्यावेळी ते करू असे सांगितले पाहिजे. पण येथे लोकांच्या डोळयामध्ये धूळ फेकण्याचे काम शासनाने केलेले आहे. ते शासनाने थांबविले पाहिजे अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदया, यानंतर मी शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 81 वर बोलणार आहे. दुपारचे जेवण योजना-अन्न शिजवणे यासाठी शासनाने अतिरिक्त तरतूद केली आहे. दुपारचे अन्न शिजविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने दर दिवशी प्रत्येक विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु.1 व रुपये 0.50 या दराने अनुदान देण्याची तरतूद केली आहे. मी एका शाळेचा चेअरमन आहे. त्यामुळे दुपारच्या वेळी शिपाई किंवा शिक्षक जो कोणी असेल तो विद्यार्थ्यांसाठी कसे तरी जेवण करतो हे मला माहित आहे. चटावरच्या श्राध्दाप्रमाणे तो सर्वकाही उरकतो. मुलांच्या जेवणावर आज कोटयवधी रुपये खर्च केले जात आहेत. जी सर्वसामान्य गरीब, गरजू मुले आहेत, त्यांना सकस आहार काय असतो हे माहित देखील नसते. त्यांच्यासाठी ही योजना आहे. सुशिक्षित विद्यार्थ्याचे पालक आपल्या मुलांना बालरोग तज्ज्ञांकडे नेतो. तो स्वत:च्या मुलांना सकाळी दूध-फळे देतो. ज्यांची आर्थिक स्थिती चांगली नसते अशा मुलांसाठी शासन आहारावर कोटयवधी रुपये खर्च करीत असते.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

तेव्हा विद्यार्थ्यांना चवदार आणि चांगले जेवण दिले जाईल याची काळजी घेतली पाहिजे. कारण तुम्ही अन्न शिजवण्याकरिता एका विद्यार्थ्यांमागे एक रुपया पन्नास पैसे खर्च करता. म्हणजे तुम्ही 100 विद्यार्थ्यांना जेवण देत असाल तर जवळपास 150 रुपये स्वयंपाक करण्यासाठी खर्च करीत आहात. जिल्हापरिषदेच्या वर्गखोल्यांच्या बांधकामाची महाराष्ट्रातील स्थिती काय आहे हे मला माहीत नाही. परंतु कोकणातील जिल्हापरिषदेच्या वर्गखोल्यांचे बांधकाम झाल्यानंतर दोन वर्षात त्या खोल्यांमध्ये पाणी गळते, कौले फुटलेली असतात वा खोल्यांची पडझड झालेली असते. आपण जो पैसा खर्च करता तो जनतेचा पैसा आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी सुपरव्हायझर असतात, सर्कल इन्स्पेक्टर असतात त्यांनी बांधकाम व्यवस्थित झाले की नाही याची पाहणी केली पाहिजे.

सभापती महोदया, मी बाब क्रमांक 87- क्रीडा संकुले स्थापन करणे - या विषयावर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार व अन्य सदस्यांनी येथे विचार मांडले. आपण महाराष्ट्रात जी क्रीडा संकुले बांधली आहेत त्याची आज काय अवस्था आहे हे आपण पाहिले आहे काय ? 17 कोटी रुपये, 16 कोटी रुपये, 6 कोटी रुपये व 5 कोटी रुपये इतक्या रकमेची पुरवणी मागणी केलेली आहे. आपण इतकी मागणी करता पण त्या क्रीडा संकुलात कोणते खेळ खेळले जातात ? फक्त त्याठिकाणी राजकीय पक्षांच्या सभा होतात किंवा अन्य काही कार्यक्रम होतात. क्रीडा संकुलामुळे त्या परिसरातील शाळांचे एकत्रित क्रीडा महोत्सव होतील. विद्यार्थ्यांच्या अंगातील क्रीडा गुणांना प्रेरणा मिळेल यासाठी आपण ही क्रीडा संकुले बांधतो. त्याठिकाणी आंतरशालेय व आंतर जिल्ह्यांच्या स्पर्धा भरविल्या जातील अशा काही योजना आहेत काय ? आपण रत्नागिरी, कोल्हापूर, सोलापूर व नगर येथे क्रीडा संकुले बांधली. पण आज त्यांची अवस्था वाईट आहे. त्याठिकाणी मुले खेळू शकत नाहीत. आपण क्रीडा संकुलासाठी कोट्यावधी रुपये खर्च करता पण त्याची व्यवस्थित काळजी घेत नाही. आपण एखादे नवीन घर किंवा बंगला घेतो. जर त्या बंगल्यामध्ये राहण्याची व्यवस्था नसेल तर त्याठिकाणी झुंबर गालिचा वगैरे असून काही उपयोग नाही. आपण कोटयावधी रुपये खर्च करुन क्रीडा संकुले बांधता पण त्याबाबत कधी आढावा घेतला आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.........

एखाद्या जिल्ह्यामध्ये क्रीडा संकुल बांधले आहे. त्या संकुलामध्ये किती क्रीडा महोत्सव झाले ? किती शालेय स्पर्धा झाल्या ? फुटबॉलच्या स्पर्धा झाल्या का ? कबड्डीच्या स्पर्धा, खो-खो या खेळाच्या स्पर्धा झाल्या का ? याचा कधी आढावा घेतला काय ? शाळेतील शारीरिक शिक्षणाचा शिक्षक मुलांच्या हातात एक चेंडू देतो आणि सांगतो मुलांनो खेळा. मग मुले 45 मिनिटे मैदानावर जाऊन खेळतात. शाळेत एखादा कार्यक्रम असेल आणि त्याठिकाणी मंत्री येणार असेल तर त्या मुलांना एका रांगेत उभे करणार आणि सॅल्युट करायला शिकविणार. मंत्र्यांना वाटते मला शाळेत सलामी मिळाली. माझी आपल्याला सूचना आहे की, आपण अधिकाऱ्यांना एकदा आढावा बैठक घेण्यास सांगावे. माझी या निमित्ताने प्रत्येक मंत्रिहोदयांना विनंती आहे की, आपण आपल्याकडे असलेल्या खात्यांची एक आढावा बैठक घेतली पाहिजे. गेल्या महिन्याभरात माझ्याकडे असलेल्या खात्यामध्ये काय काय झाले, किती पैसा खर्च झाला ? त्याचे रिर्टन किती मिळाले ? क्वॉलिटी मिळाली का? क्वॉन्टीटी मिळाली का ? याचा आढावा घ्यावा. या संबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, नगर विकास विभागासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी जे सांगितले ते बरोबर आहे. या मुंबई शहरामध्ये 1 कोटी 50 हजार लोक राहतात. मुंबईमध्ये पोलीस बेस्टमधून प्रवास करतात. त्यांना आपण वेगवेगळ्या सोयी देतो. मुंबई महानगरपालिकेबद्दल शासनाचे काही कर्तव्य आहे की नाही ? आपण फक्त नियम 37 खाली अमूक अमूक मैदान मोकळे करा, अमूक अमूक भूखंड मोकळा करा. शासन फक्त मंत्रालयात बसून भूखंड मोकळे करण्याचे आदेश देतात. येथे सगळे सांगतात "कोई भी आओ, कहीं भी रहो. कैसे भी रहो. मार्गारेट अल्वा किंवा अय्यर येणार आणि सांगणार मुंबई में कोई भी आ सकता है, रह सकता है. ठीक है. आओ और रहो. मग ही मंडळी मुंबईसाठी जादा पैसा द्यायला पाहिजे असे केंद्राला का सांगत नाहीत ? मुंबईमध्ये फूटपाथ राहिलेला नाही. खेळाचे मैदान राहिलेले नाही. आज मुंबई ज्वालामुखीच्या तोंडावर उभी आहे. महाराष्ट्र शासनाचे काही कर्तव्य आहे की नाही ? मुंबई शहर वाचवावयाचे असेल तर या मुंबई महानगरपालिकेला केवळ नगरविकास विभागाने भूखंड सोडण्याचे आदेश देता कामा नये तर या मुंबई महानगरपालिकेला नागरी सुविधा मिळतील हे पाहिले पाहिजे. केंद्र शासनाच्या वतीने जो जागतिक बँकेचा पैसा आलेला असतो तो पैसाही दिला जात नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

जागतिक बँकेचे कर्ज केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकारच्या मार्फत महानगरपालिकेच्या तिजोरीत जात असते. त्यामुळे आपण मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत एक निश्चित असे धोरण आखले पाहिजे. आज तर अशी परिस्थिती आहे की, होणाऱ्या बांधकामाला तुमचेच काही मंत्री स्टे देतात. मी तुम्हाला सांगू इच्छितो की, साकीनाका येथे आज बांधकाम होत आहे. पूर्वीचे तुमचेच राज्यमंत्री श्री.नवाब मलिक यांनी बांधकामाला मान्यता दिली होती. या मुंबईची सारी वाट आघाडी सरकारच्या काळामध्ये लागली आहे. युतीच्या काळात मुंबईची वाट लागली नाही. तुमच्या सरकारमध्ये पूर्वीचे असलेले मंत्री प्रा.जावेद खान यांनी तर झोपडपट्टयांच्या झोपडपट्टया उभारल्या. खऱ्या अर्थाने मुंबई शहराची जी वाट लागली त्या पापाचे धनी तुम्ही आहात. जसजशा निवडणुका येत गेल्या तसतसे झोपडट्टयांना आपण मान्यता देत गेलात. 1980 च्या निवडणुकीत 85 पर्यंतच्या झोपडयांना, 85 च्या निवडणुकीत 90 पर्यंतच्या आणि नुकत्याच झालेल्या निवडणुकीत जानेवारी 2001 पर्यंतच्या झोपडयांना मान्यता देण्याचे आश्वासन दिले होते. आपण मला सांगा बाळासाहेब ठाकरे झोपडपट्टी, अटलबिहारी वाजपेयी झोपडपट्टी अशा झोपडपट्टयांची नावे कोठेही दिसत नाहीत. आपल्याला मुंबईमध्ये संजय गांधी झोपडपट्टी, सोनिया गांधी झोपडपट्टी, इंदिरा गांधी झोपडपट्टी, कामराज-यमराज झोपडपट्टी असल्याचे दिसून येईल. स्मशानभूमींना नाव दिल्याचे दिसून येईल. आमच्या नेत्यांच्या नावाची एकही झोपडपट्टी नाही. आमच्या नेत्यांची नावे बागांना, क्रीडांगणांना, व्यायामशाळांना, नागरी प्रकल्पांना, क्रीडा संकुलांना देण्यात आलेली आहेत. या मुंबई शहराच्या विकासासाठी आपण 1 हजार कोटी रुपये देणे आवश्यक आहे. नुकताच मुंबई शहरामध्ये पूर आल्यामुळे संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडली होती. त्यामुळे या सर्व अडचणीतून मार्ग काढून मुंबई शहराचा विकास करण्यासाठी किमान 500 कोटी रुपये आपण दिले पाहिजेत अशी मी मागणी करतो. जर तुम्हाला झोपडपट्टयाच वाढवावयाच्या असतील तर त्या ठिकाणी पाणी द्या, शौचालयांची व्यवस्था करा, रस्ते करा, त्यांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन द्या. आपल्याला दिसून येईल की, श्रीमंतांची मुले स्वीमिंग पूलमध्ये पोहताना दिसतात. परंतु धारावीसारख्या झोपडपट्टीतील मुले पावसाळयामध्ये साचलेल्या पाण्यात, गटारात माशांसारखे तरंगत असतात. त्यामुळे मुळात हे चित्र बदलण्याची आज खरी आवश्यकता आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

महोदया, यानंतर मी पृष्ठ क्र.127, विधी व न्याय विभागाच्या बाब क्र.159 व 160-सरकारी वकील कार्यालये यावर माझे विचार व्यक्त करु इच्छितो. आपण मला सांगा आज किती सरकारी वकील न्यायालयात जातात. महोदया, केवळ तारखांवर तारखा घेण्याचेच काम हे सरकारी वकील करीत असतात. हे सरकारी वकील केवळ समोरच्या माणसाशी हात मिळविण्याचे काम करीत असतात. सरकार विनामूल्य सल्ला देते असे म्हटले जाते. परंतु खऱ्या अर्थाने न्याय देण्याचे काम सरकारी वकिलांकडून होताना दिसून येत नाही. त्यासाठी सरकारी वकीलाने डोळयात तेल घालून काम करणे आवश्यक असते. कारण तो शासनाचा प्रतिनिधी म्हणून काम करीत असतो. समोरचा जो आरोपी असतो तो चांगल्या वकीलाकडे केस देतो. परंतु ज्याची वकीली चालत नाही अशा आमदाराच्या मेव्हण्याची किंवा त्याच्या कोणत्याही नातेवाईकाची सरकारी वकिल म्हणून नियुक्ती होते. त्यामुळे न्यायालयात एकतर्फी डिसिजन होऊन, लागणारा निर्णय गरीबांच्या विरोधात जातो. 15 दिवस, 7 दिवस किंवा वॉर्निंगसारखी शिक्षा होण्यासारखे जे खटले असतात ते खटले सरकारी वकील न्यायालयात उपस्थित राहत नसल्यामुळे दोन-दोन वर्षे चालतात. त्या सरकारी वकिलाचा ड्रेस, वेष, रुप मोठे पाहण्यासारखे असते. सरकारी वकिलाला खऱ्या अर्थाने परिपूर्ण असे कायद्याचे ज्ञान नसते, तशा वकिलाची सरकारी म्हणून नेमणूक केली जाते. आपण महाराष्ट्र राज्याला कल्याणकारी राज्य म्हणतो. कल्याणकारी राज्याचा एक निकष गरीबाला लवकरात लवकर आणि योग्य न्याय देणे हा आहे. सरकारी वकिलाने हृदयापासून सरकारी केस चालविली पाहिजे. त्यामुळे सरकारी वकील नियुक्त करताना शासनाने काळजी घेणे आवश्यक आहे. शेवटी माननीय सभापती महोदया आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण आटोपते घेतो.

----------

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदया,सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्याकरता मी उभा आहे.आज सभागृहासमोर ज्या मागण्या ठेवण्यात आलेल्या आहे त्या मागण्यांना माझा पाठिंबा आहे.सर्व प्रथम मला सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 6 व 7 , पान नंबर 5 सबंधी बोलावयाचे आहे शहाजीराजे भोसले,डॉ.रफीक झकेरिया,गोविंदभाई श्रॉफ, शंकरराव चव्हाण व प्रतापराव गुजर या .थोर महापुरुषांचे पुतळे आणि स्मारके बांधण्याच्या संदर्भात ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. या निमित्ताने बोलत असतांना मला असे सांगावयाचे आहे की,या थोर पुरुषांचे पुतळे आणि स्मारके उभारण्यामध्ये बराच विलंब लागत आहे. तेव्हा अशा प्रकारे विलंब लागता कामा नये.स्मारके आणि पुतळे बांधण्याचे औचित्य,पावित्र्य आणि गांभीर्य या गोष्टी लक्षात घेऊन तसेच त्यांचा सन्मान राखला जावा म्हणून त्याचे पुतळे वेळेतच उभारण्यात आले पाहिजेत.सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी या बाबतीत जी भूमिका मांडली होती ती उचित आहे असे मला वाटते. तेव्हा कोणताही पुतळा उभारतांना त्यामध्ये विलंब होता कामा नये.

सभापती महोदया, यानंतर नगर विकास विभागाची बाब क्रमांक 90पान नबर 63 सबंधी मला बोलावयाचे आहे नगरपालिका आणि महानगरपालिका यांना विशेष अनुदान देण्याकरता ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे औरंगाबाद आणि नांदेड या महानगरपालिकांना विशेष अनुदान देण्यासाठी 61 कोटी रुपयांची पूरक मागणी केलेली आहे. त्याबद्दल मला शासनाचे अभिनंदन करावयाचे आहे.या सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असतांना नागपूर महानगरपालिकेच्या बाबतीत जी भूमिका मांडली होती त्याकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. आज अशी परिस्थिती आहे की निधी अभावी नागपूर मधील विकासाची कामे जवळजवळ ठप्प झालेली आहेत तेव्हा या शहरातील विकासाची कामे गतीने होण्या करता नागपूर महानगरपालिकेसाठी विशेष पॅकेज देण्याची गरज आहे तेव्हा या संदर्भात शासनाने विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदया, विधी व न्याय विभागाची बाब क्रमांक 157 बाब क्रमांक 126 संबंधी मला बोलावयाचे आहे.उच्च न्यायाधीशांना सहाय्य करण्याकरता विधी लिपिकाची 60 पदे निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे ही चांगली गोष्ट आहे.ही पदे भरण्यात आल्यामुळे उच्च न्यायालयाच्या कार्यात गती येणार आहे. परंतु या चर्चेच्या निमित्ताने मला शासनाला अशी विनंती





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ...

करावयाची आहे की, औरंगाबाद उच्च न्यायालयातील श्री. दांडगे आणि श्री.सुरवसे या दोन लिपिकांना अतिरिक्त ठरवून त्यांना काढून टाकण्यात आले होते आणि ते मॅटमध्ये गेले . त्यांना कामावर घेण्यात यावे असे त्यांनी आदेश दिला होता. तेव्हा जी 60 पदे निर्माण करण्यात येणार आहेत त्या निमित्ताने औरंगाबद येथील उच्च न्यायालयात अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या श्री.दांडगे व श्री.सुरवसे या दोन लिपिकांना पुन्हा त्वरित कामावर घेण्यात येईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदया, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 96 पान नंबर 78सबंधी मला बोलावयाचे आहे.मुबई शहरातील शासकीय निवासस्थानाचे परीरक्षण आणि दुरुस्त्या करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आली आहे या इमारतींच्या दुरुस्त्या करणे ही फार महत्वाची गोष्ट आहे. गेल्या अनेक वर्षा पासून या इमारतीचे परीरक्षण आणि दुरुस्त्या करण्यात आलेल्या नाही. त्यामुळे त्या मोडकळीस आलेल्या आहेत त्यामुळे त्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे . मुंबई शहरातील शासकीय इमारतीचे परीरक्षण आणि दुरुस्ती करण्यासाठी या ठिकाणी जी पूरक मागण करण्यात आलेली आहे ती अत्यंत योग्य आहे . तेव्हा या इमारतींची दुरुस्ती ताबडतोबीने करण्यात यावी असे मला सांगावयाचे आहे. सभापती महोदया, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 102 पान नबर 80 संबंधी मला बोलावयाचे आहे. मुंबई जवळ वरळी येथे बी.डी.डी. चाळी आहेत त्यांचे परीरक्षण व दुरुस्ती करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आली आहे या चाळींची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे या सर्व चाळीतील इमारती जीर्णावस्थेत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून त्या इमारतीची डागडुजी केलेली नाही. त्यामुळे या चाळीतील इमारतीची अवस्था अत्यंत दयनीय अशी झालेली आहे. तेव्हा या इमारतींची दुरुस्ती विभागाने तातडीने करावी असे मला सांगावयाचे आहे .त्याकरता 4.75 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे ती तरतुद पुरेशी आहे किंवा नाही याबद्दल मला शंका वाटते.तेव्हा वरळी येथील बी.डी.डी. चाळींची दुरुस्ती करण्यासाठी जी तरतूद करण्यात आलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो व हे काम त्वरित करण्यात यावे अशी विनती करतो.यानंतर मला बाब क्रमांक 117 पान नंबर 91 संबंधी बोलावयाचे आहे नागपूर शहरामध्ये उत्तर नागपूर हा एक भाग आहे त्या भागात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग इत्यादी समाजातील लोक मोठया प्रमाणावर राहतात तसेच उत्तर नागपूर हा विधानसभेचा मतदारसंघ सुध्दा आहे त्या ठिकाणी इंदोरा नावाची वस्ती आहे ..

नंतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ...

इंदोरा विभागामध्ये जो मुंबई-कोलकता राष्ट्रीय महामार्ग जातो त्यावरील कामठी येथे 250 खाटांचे रूग्णालय आणि बाह्यरूग्णांसाठी एक इमारत बांधणे यासाठी 5 लाखाची मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदया, गेल्या अनेक वर्षांपासून त्याची निर्मिती सुरू आहे पण अद्यापपर्यंत ते पूर्णपणे बांधण्यात आलेले नाही. तेथे कोणत्याही सोयी-सुविधा दिल्या गेलेल्या नाहीत. मागासवर्गीय बहुल असलेल्या या भागामध्ये त्यामुळे मागासवर्गीय समाजाची मोठ्या प्रमाणात अडचण होते. त्यामुळे उत्तर नागपूरातील हे रूग्णालय चांगल्याप्रकारे सुरू करण्यात यावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

त्यानंतर जलसंपदा मंत्र्यांच्या विभागाच्या बाब क्रमांक 146, पृष्ठ 121 संदर्भात बोलताना मी सांगू इच्छितो की, कोकण आणि विदर्भ देशातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी संपादित केलेल्या जमिनींची नुकसान भरपाई देण्यासाठी 7 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदया, मी आपल्या आणि सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, गोसीखुर्द प्रकल्प - इंदिरा सागर जो आहे तो अजूनही पूर्णत्वास केलेला नाही त्यामुळे या प्रकल्पासाठी शासनाने जी जमीन संपादित केलेली आहे तिची नुकसान भरपाई संबंधित जमीन मालकांना अजूनही मिळालेली नाही, त्यांचे पुनर्वसन देखील झालेले नाही. अशा परिस्थितीमध्ये काल परवा हे प्रकल्पग्रस्त एक मोठा मोर्चा घेऊ, या गोसीखुर्द पासून जवळ जवळ 70 कि.मी. अंतरावरून नागपूर पर्यंत आलेले आहेत आणि त्यांनी या संदर्भात निवेदन देखील दिलेले आहे. सभापती महोदया, विदर्भा देशातील पाटबंधाऱ्यां साठी ज्या जमिनी संपादित करण्यात आलेल्या आहेत त्यांची भरपाई त्वरित करण्याची भूमिका शासनाने घ्यावी अशी विनंती मी या निमित्ताने करीत आहे, तिचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

सभापती महोदया, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची बाब क्रमांक 264, पृष्ठ क्र.238 - या मध्ये महानगरपालिका, त्यांचा प्रशासकीय विभाग आणि राज्यातील गट 2 व गट 3 मधील संत गाडगेबाबा नागरी अभियान संबंधात बक्षिसे आणि प्रसिद्धी शासनाच्या वतीने दिली जात असतात. तसेच पृष्ठ 239, बाब क्रमांक 265 - संत गाडगेबाबा ग्रामीण स्वच्छता अभियान या अंतर्गत पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावर उत्कृष्ट पुरस्कार दिले जात असतात. परंतु याबाबतीत आता अशा तक्रारी आहेत की, या बाबतीत देखील पक्षपात आणि भेदभाव केला जातो. त्यामुळे अनेक

..... 3आय 2 ..

प्रा. कवाडे ....

ग्रामपंचायतींनी, पंचायत समित्यांनी नाराजी व्यक्त करून मार्चे देखील काढले आहेत. तेव्हा ही जी बक्षिसे आणि प्रसिद्धी दिली जाते त्यामध्ये कोठल्याही प्रकारे पक्षपात न करता ती दिली जावीत अशी या निमित्ताने मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदया, त्यानंतर ऊर्जा आणि कामगार विभाग - पृष्ठ 133, बाब क्रमांक 165-166 - राज्यातील मागास क्षेत्रात उद्योगवाढीस उत्तेजन देण्यासाठी योजनेंतर्गत सिकॉमच्या माध्यमातून औद्योगिक विकास वाढीला चालना देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत त्याबद्दल शासनाचे अभिनंदन. त्यानंतर बाब क्रमांक 183 - बीड, उस्मानाबाद आणि हिंगोली जिल्ह्यात बंदिस्त सभागृह बांधण्यासाठी पूरक मागणी केलेली आहे त्याबद्दल देखील मी शासनाचे अभिनंदन करतो. सभापती महोदया, नागपूरातील चॉस कॉलनीमध्ये कामगार कल्याण केंद्राचे सभागृह, मंच आहे. मी अनेकदा मागणी केलेली आहे की, हे सभागृह ऊर्जितावस्थेत आणा. त्या ठिकाणी चांगल्या प्रकारे संकुल उभे करावे अशीही मागणी वारंवार केली होती परंतु अद्यापपर्यंत त्याकडे गंभीरपणे शासनाने लक्ष दिलेले नाही. तेव्हा आता तरी निश्चितपणे आपण त्याकडे गंभीरपणे लक्ष दिल्यास मी आपल्याला धन्यवाद देईन.

त्यांनतर वैद्यकीय शिक्षण आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या बाब क्रमांक 212, पृ.69 बाबत मी बोलणार आहे. नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालय यामध्ये यंत्रसामग्री साठी तरतूद केलेली आहे त्याचे मी मनापासून अभिनंदन करतो.

( यानंतर श्री. सरफरे ..... 3जे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदया, नागपूरचे हे शासकीय मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल हे विदर्भातील नव्हे तर महाराष्ट्रासाठी, मध्य भारतासाठी गौरवाचे स्थान आहे. या हॉस्पिटलमधील कोबाल्ट युनिट अनेक वर्षापासून बंद असल्यामुळे ते अनेक वर्षापासून दुर्लक्षित होते. मध्यप्रदेश, छत्तीसगढ, पश्चिम विदर्भातील, खानदेशातील अनेक रुग्ण त्याचा लाभ घेत होते. शासनाने या हॉस्पिटलसाठी आता यंत्रसामुग्री उपलब्ध करुन दिल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. कारण हे वैद्यकीय महाविद्यालयाचे रुग्णालय नव्हे तर ते सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल करण्यात आले आहे. हे करीत असतांना सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी ज्या काही आवश्यक बाबी आहेत, तेथील यंत्रे, उपकरणे ही अद्ययावत केली पाहिजेत.आणि या विभागातील रुग्णांना त्याचा जास्तीत जास्त लाभ दिला पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदया, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्र. 926 व बाब क्रमांक 245-246 मध्ये एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाला अत्यंत मनापासून धन्यवाद देतो. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या दोन्ही विद्यापीठांच्या विकासासाठी एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत अनुक्रमे 4 कोटींची तरतूद केलेली आहे. या रकमेमध्ये निश्चितपणे इमारतीचे बांधकाम, विस्तार व विद्यापीठाच्या विकासासाठी मदत होणार आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाड विद्यापीठ, नांदेडसाठी शासनाने लक्ष घालून तरतूद केली ही स्वागतार्ह बाब आहे. त्याचप्रमाणे औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विकासासाठी देखील तरतूद केली आहे याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्र 182 व बाब क्रमांक 226 मध्ये एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत अंगणवाडी कार्यकर्त्यां व मदतनीस यांना खास बाब म्हणून भाऊबीज भेट 500 रुपये दिले आहेत. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी त्याला "चॉकेलेट" हा शब्द वापरतात. तेव्हा हा शब्द वापरुन आपण या मदतीचा अवमान करु नये असे मला वाटते. त्यांना कमीत कमी 500 ऐवजी 1000 रुपये तरी भाऊबीज भेट दिली गेली पाहिजे. कारण अंगणवाडी सेविका व कार्यकर्त्या ही समाजातील शेवटची माणसे आहेत. त्यांचा अशाप्रकारे अवमान झाला आहे. ही रक्कम आपण वाढवून दिल्यास मी शासनास धन्यवाद देईन. सभापती महोदया, आपण मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

विस्ताराने माझी मते मांडण्यास संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन व या पुरवणी मागण्यांना समर्थन देऊन माझे भाषण संपवितो. जय हिंद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र. 6, पृष्ठ क्र. 6 मध्ये "राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांची स्मारके किंवा पुतळे यांचे बांधकाम" या शीर्षकाखाली ही पुरवणी मागणी करण्यात आली आहे. यामध्ये शहाजी राजे भोसले यांचे स्मारक बांधणे, डॉ. रफिक झकेरीया, गोविंदभाई श्रॉफ, शंकरराव चव्हाण यांचे पुतळे उभारण्यासाठी 80लाख रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. त्याचप्रमाणे नगर विकास विभागाची पूरक मागणी क्रमांक एफ-5 व बाब क्रमांक 89 मध्ये औरंगाबाद येथील उध्दवराव पाटील यांच्या पुतळयाच्या उभारणीसाठी व तेथील जागेच्या सुशोभिकरणासाठी अतिरिक्त 10 लाख रुपयांची तरतूद केली आहे. या दोन्ही तरतुदी स्तुत्य आहेत. या थोर राष्ट्र पुरुषांनी महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये योगदान दिले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/D/RJW पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:45

प्रा.शरद पाटील . . . .

त्यांचे यथोचित स्मारक होणे योग्य आहे. माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर सरपोतदार व जोगेंद्र कवाडे यांनी सूचित केल्याप्रमाणे ही स्मारके योग्य वेळी, कालबध्द अशा प्रकारचा कार्यक्रम हाती घेऊन पूर्ण करण्यात यावीत. या सर्व स्मारकांच्या प्रस्तावाचे समर्थन करीत असताना मी दोन थोर व्यक्तींच्या स्मारकांविषयी याठिकाणी सूचना करु इच्छितो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे नेते आणि देशातील थोर समाजवादी नेते कै.एस.एम.जोशी यांची जन्मशताब्दी 2004 मध्ये झाली. कै.एस.एम.जोशी यांचा संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमधील सहभाग सर्वज्ञात आहे. तसा त्यांचा सहभाग स्वातंत्र्य लढयात देखील होता. पण संयुक्त महाराष्ट्र चळवळीला जे विधायक वळण मिळाले, त्याला कै.एस.एम.जोशी यांचे नेतृत्व कारणीभूत होते. त्यांच्या या संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीतील योगदानाबद्दल मुंबई येथील संयुक्त सभागृहामध्ये आपण त्यांचे तैलचित्र लावून त्यांचा सन्मान केला आहे. अशा थोर महापुरुषाची जन्मशताब्दी 2004 मध्ये संपन्न झाली. मी शासनाला अशी विनंती करतो की, ज्या पुण्यामध्ये कै.एस.एम.अण्णांनी मोठया प्रमाणात कार्य केले, त्या पुणे शहरात महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने साथी कै.एस.एम.जोशी यांचे यथोचित स्मारक व्हावे आणि त्यासाठी आगामी अर्थसंकल्पिय अधिवेशनात तरतूद करुन त्यादृष्टीने व्यवस्था करण्यात यावी.तसेच महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील एक नेते, लोकनेते कै.राजारामबापू पाटील यांनी जवळपास 40 वर्षे महाराष्ट्राच्या उभारणीसाठी काम केले. ते राज्याचे माननीय मंत्री असताना या राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळावी यासाठी प्रत्येक जिल्हयामध्ये औद्योगिक वसाहती स्थापन व्हाव्यात यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. याठिकाणी त्यांच्याच पुढाकाराने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन झाले. महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीला लोकनेते कै.राजारामबापू पाटील यांनी योगदान आणि चालना दिली. ते शेतीमंत्री असताना शेतकऱ्यांच्या 7/12 उताऱ्याच्या नोंदी योग्य प्रकारे ठेवल्या जाव्यात आणि 7/12 उताऱ्याच्या पुस्तिका तयार करण्यात याव्यात अशा प्रकारचा निर्णय त्यांच्या काळात घेण्यात आला होता. सहकार क्षेत्रात आणि शैक्षणिक क्षेत्रात तसेच महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये लोकनेते कै.राजारामबापू पाटील यांचे योगदान फार मोठे होते. 1999 ते 2004 या कालावधीत लोकशाही आघाडीचे या राज्यात होते. तेव्हा लोकनेते कै.राजाराम बापू पाटील यांच्या स्मारकासाठी शासनाने तत्कालीन माननीय राज्यमंत्री श्री.दादा जाधवराव यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन केली होती. या समितीच्या काही बैठकाही झाल्या.शासनानेही......

. . . .3 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील . . . .

या स्मारकासाठी काही रक्कम मंजूर करण्याचे मान्य केले होते. पण दुर्दैवाने शासनाने यासाठी निधी उपलब्ध करुन दिला नाही. समितीचे काम गुंडाळले गेले आणि कै.राजारामबापू पाटील यांच्या सांगली जिल्हयातील कासेगाव या जन्मगावी स्मारक उभे करण्याचा जो निर्णय झाला होता, तो शासनाने बासनात गुंडाळून ठेवला आहे, तो पुन्हा उघडण्यात यावा.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील (पुढे चालू....

राजारामबापू पाटील यांच्या स्मारकासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देऊन सांगली जिल्ह्यामध्ये स्मारक व्हावे, यासाठी अर्थसकल्पामध्ये तरतूद करावी अशाप्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो.

त्यानंतर आदिवासी विभागगाच्या पूरक मागण्यांच्या संदर्भात मी बोलणार आहे. यामध्ये आदिवासी विभागातील अंगणवाडी कार्यकर्त्या आणि मदतनीस यांना भाऊबीज म्हणून 500 रुपयाची रक्कम देण्यासंबंधीची बाब आहे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेबांनी म्हटल्याप्रमाणे 500 रुपये भाऊबीज देऊन भगिनींची चेष्टा करण्यासारखे आहे. आज महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये अंगणवाडी सेविका आणि मदतनीस काम करतात. तशा प्रकारचे काम शासनाच्या कोणत्याही विभागातील कर्मचाऱ्यांकडून केले जात नाही. त्यांच्याकडून सर्व मातांची, बालकांची गणना केली जाते. गावातील लोकांच्या आरोग्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविलेली आहे. त्यांच्याकडे या जबाबदाऱ्या सोपविल्या जातात. अशा प्रकारचे महत्वाचे काम करणाऱ्या या महिला आहेत. त्यांना पुढील वर्षी 1,000 रुपये भाऊबीज देण्यात यावी अशी या निमित्ताने माझी मागणी आहे.

सभापती महोदया, हे अधिवेशन 5 डिसेंबरपासून या ठिकाणी सुरु झालेले आहे. त्या दिवसापासून आमच्या ज्येष्ठ सन्माननीय नेत्या श्रीमती मृणालताई गोरे या महाराष्ट्रातील अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या आहेत. त्या अंगणवाडी कर्मचारी महिलांची पेन्शन देण्याची मागणी आहे. शासनाने त्यांची पेन्शनची मागणी मंजूर केली. परंतु पेन्शनसाठी अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी स्वत:च्या पगारातून 100 रुपये घालावेत आणि शासन 100 रुपये घालेल, अशा प्रकारची अट आहे. ही अट काढून टाकून शासनानेच ही रक्कम भरावी. त्यांना अत्यंत तुटपुंजा पगार मिळतो. त्यांना महिन्याला 1200 ते 1400 रुपये मिळतात. त्यांनी दर महिन्याला यामधील 100 रुपये धालावेत अशी शासनाने अपेक्षा करु नये. शासनानेच ही रक्कम सोसावी. सन्माननीय मंत्रिमहोदया डॉ. विमल मुंदडा या महिला बाल कल्याण विभागाच्या मंत्री असतांना अंगणवाडी कार्यकर्तीना 100 रुपये आणि मदतनिसांना 50 रुपये वाढ जाहीर केलेली होती. ही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील (पुढे चालू....

100 रुपयाची आणि 50 रुपयाची रक्कम त्यांच्या पगारामध्ये जमा न करता ती रक्कम पेन्शन म्हणून धरावी अशी त्यांची मागणी आहे. ही त्यांची मागणी आपण मान्य करावी अशी विनंती आहे. त्यांच्या पेन्शनच्या मागणीबाबत शासनाने ठोस निर्णय घ्यावा. अंगणवाडी कर्मचारी हे मूलभूत अशाप्रकारची कामे करतात त्यांना न्याय द्यावा अशा प्रकारची सूचना करुन माझे विचार थांबवितो.

--

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, सदस्यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, या चर्चेसाठी किती वेळ द्यावा याला काही मर्यादा नाही. मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, नागपूर विद्यापीठाला संत तुकडोजी महाराज यांचे नाव देण्यासंबंधीचा कार्यक्रम आहे. त्या कार्यक्रमाला सर्व सन्माननीय सदस्यांना जावयाचे आहे.

श्री.अनंत तरे : या ठिकाणी कामकाज चाललेले आहे असे असतांना हे काम सोडून जाणे बरोबर नाही.

श्री. दिलीप वळसे-पाटील : त्या कार्यक्रमाला सदस्यांना सहभागी होता यावे म्हणून मी ही बाब निदर्शनास आणून दिली.

**तालिका सभापती** : माननीय मंत्रीमहोदयांनी कार्यक्रम असल्याचे लक्षात आणून दिलेले आहे. त्यावर सन्माननीय सदस्यांनी ऊहापोह करु नये.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, बाब क्रमांक 185 पृष्ठ क्रमांक 148. राष्ट्र संत तुकडोजी महाराज वस्तुसंग्रहालयाला सहायक अनुदान. देणे.ही चांगली बाब आहे.

**तालिका सभापती** :सदस्यांना माझी नम्र विनंती आहे की, त्यांनी बाबीवरच बोलावे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदया, आपण सुध्दा बाबीवर बोलता तसेच आम्ही बाबीवर बोलत आहोत. आम्ही आपले शिष्य आहोत.

**तालिका सभापती** :आमचा आदर्श ठेवला तर तुमचे भले होईल.

डॉ. दीपक सावंत : मला सभागृहाच्या निदर्शनास आणखी एक गोष्ट आणून द्यावयाची आहे. नागपूरमध्ये सर्वात मोठे संग्रहालय अस्तित्वात आहे. त्याला "अजब बंगला" असे म्हणतात. या संग्रहालयाची तीन दालने गेल्या काही वर्षापासून बंद आहेत. त्यासाठी किती रुपये पाहिजेत ? फक्त 35 लाख रुपयाच्या निधीअभावी हे संग्रहालय बंद आहे. भूगर्भ आणि प्रागतिक ऐतिहासिक दालनासाठी 20 लाख रुपये पाहिजेत. पुरातत्व दालनासाठी 13 लाख रुपये पाहिजेत आणि आदिवासी कला संस्कृतिक दालनासाठी 2 लाख 76 हजार रुपये पाहिजेत. ही एवढी छोटी रक्कम आहे.जर शासनाने ही रक्कम दिली आणि "अजब बंगला" हे संग्रहालय चालू केले तर नागपूरच्यादृष्टीने वेगळा इतिहास होईल आणि या अधिवेशनाचे फलीत होईल असे मला वाटते.

बाब क्रमांक 215. पृष्ठ क्रमांक 171.महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांस प्रलंबित देयकांचे प्रदान करण्यासंबंधीचा प्रश्न आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्री येथे उपस्थित आहेत. त्याच्यासमोर मी एक प्रस्ताव ठेवू इच्छितो. नाशिकला आरोग्य विद्यान विद्यापीठ हे अतिशय सुंदर बनविले आहे. नाशिक शहरापासून ते थोडेसे लांब आहे पण त्याची वास्तू अतिशय सुंदर आहे. त्या इमारतीला पाण्याचा पुरवठा नाही. याचे कारण असे की, या इमारतीला नाशिक महानगरपालिकेने पाणी पुरवठा करावयाचा की, जिल्हा परिषदेने पाणी पुरवठा करावयाचा असा प्रश्न आहे. हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. त्यांना ताबडतोब पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. सध्या ते एका तलावात पाण्याची साठवण करुन ते पाणी वापरतात. त्यामुळे तेथे कर्मचारी आणि प्रोफेसर राहात नाहीत. त्यांना भाडयाच्या रुममध्ये राहावे लागते त्यामुळे त्यांचा ओव्हरहेड एक्सपेंडिचर वाढत आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, त्या ठिकाणी ताबडतोब पाण्याचे कनेक्शन देण्यात यावे.

..2..

डॉ. दीपक सावंत..

बाब क्रमांक 212 पृष्ठ क्रमांक 169 शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांना यंत्रसामग्री व साधनसामग्रीच्या खरेदीसाठी तरतूद करण्यात आली आहे. थोडया वेळापूर्वी प्रा. जोगेंद्र कवाडे साहेबांनी याबद्दल सांगितले आहे.कोबाल्ट युनिट बद्दल त्यांनी शासनाचे अभिंनदन केले होते पण चार अधिवेशन झाले तरी हे कोबाल्ट युनिट चालू स्थितीत नाही. आरोग्य मंत्री श्री. दिग्विजय खानविलकरांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. त्यांनी कोबाल्ट युनिट चालू करतो असे सांगितले होते. 2 कोटी 88 लाख रुपये राज्य शासन विनियोग करण्यास असमर्थ आहे असे त्यावेळी तयांनी सांगितले होते. त्यानंतर पालक मंत्री श्री. सतीश चतुर्वेदी यांनी 600 कोटी रुपयाची घोषणा केली पण अजूनही ते कोबाल्ट युनिट चालू झालेले नाही. या कोबाल्ट युनिटमुळे अनेक गरजू आणि गरीब कॅन्सरग्रस्त रुग्ण ट्रीटमेंट घेण्यास असमर्थ ठरत आहेत. गेल्या चार अधिवेशनात हा कोबाल्ट युनिटचा प्रश्न आम्ही सातत्याने उपस्थिती करीत आहोत. तेव्हा तो प्रश्न शासनाने मार्गी लावावा. तेथे एमआरआय मशीन नाही. त्यामुळे एम.डी. रेडियॉलॉजीचे जे डॉक्टर्स होणार आहेत त्यांना या अत्याधुनिक यंत्र नसल्यामुळे ट्रेनिंग व्यवस्थित मिळत नाही. आणि या डॉक्टर्संना आपण ज्ञानापासून वंचित ठेवित आहोत.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .......

हे अत्यंत आवश्यक असलेले एमआरआय युनिट सुध्दा तेथे नाही. त्यामुळे रुग्णांना एमआरआयसाठी बाहेर जावे लागते व बाहेरच्या अशा सेंटर्सची कमाई मोठया प्रमाणावर होत आहे. दुसरी दुर्देवाची बाब अशी आहे की, या युनिटमध्ये जी सी.टी.स्कॅन मशिन आहे तिची साधारणपणे 50 हजार स्कॅन झाल्यानंतर टयुब बदलावी लागते आणि ती टयूब बदलण्यासाठी मुंबईला परमिशनसाठी जावे लागते, त्यानंतरच ती टयूब बदलविता येते. माझी याबाबत अशी विनंती आहे की, यासंदर्भात काही तरी तोडगा काढून या ठिकाणीच ही टयूब बदलण्याची व्यवस्था करावी.

महोदया, बाब क्र. 265, पृ.क्र.239 - संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आपण सुरु केले आहे त्याबाबत माझे विचार मी व्यक्त करणार आहे. आज आपण संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान योजनेअंतर्गत पुरस्कार देतो. परंतु त्या अनुषंगाने विचार केला तर किती गावांमध्ये आज शुध्द पिण्याचे पाणी मिळत आहे ? याकडे लक्ष दिले पाहिजे. चंद्रपूर जिल्हयातील परिस्थितीचा विचार केला तर असे दिसून येईल की, या जिल्हयात फ्लोराईडयुक्त पाणी अनेक ठिकाणी आढळून आले त्यामुळे हिमोक्रोमॅटॉसिससारख्या आजाराचा धोका निर्माण झाला आहे. आज या जिल्हयामध्ये जवळजवळ 60 गावांमध्ये 70 ते 80 टक्के प्रमाण फ्लोराईडयुक्त पाण्याचे आहे, त्यात नायट्रोजनयुक्त पाणी तसेच लोहाचे देखील प्रमाण आढळून आले आहे. अशा प्रकारे शुध्द पाण्याचा पुरवठा जर पिण्यासाठी करीत नसाल तर शासन काय करते याचाही खुलासा झाला पाहिजे. आपण ग्राम स्वच्छतेच्या गोष्टी एका बाजूला करतो परंतु किती गांवे आज राज्यात हागणदरीमुक्त झ ाालेली आहेत हा देखील संशोधनाचा विषय आहे. माझ्याकडे शासनानेच प्रकाशित केलेले सेहत या संस्थेचे "महाराष्ट्रातील आरोग्य आणि आरोग्यसेवा" नांवाचे पुस्तक आहे. त्या पुस्तिकेतील आकडेवारी पाहिली तर प्रामुख्याने असे दिसून येईल की, फ्लशेसची शौचालये शहरी भागात 35 टक्के आणि ग्रामीण भागात 8 टक्के, सार्वजनिक शौचालयांची संख्या शहरी भागात 38.9 तर ग्रामीण भागात 4 टक्के, टोपल्यांचे आणि खड्डयांचे संडास किंवा मुत्री यांची संख्या पाहिली तर शहरी भागात 4.3 टक्के आणि ग्रामीण भागात 0.02 टक्के तसेच सुविधा नसलेल्या गावांचा विचार केल्यास शहरी भागात हे प्रमाण 13 टक्के आणि ग्रामीण भागात 85 टक्के एवढे आढळून येते. 85 टक्के गांवे हागणदरीमुक्त नाहीत. सन 2004 मधील ही आकडेवारी आहे. माझी शासनाला अशी विनंती आहे की, राज्यात सध्या किती गांवे सध्याच्या परिस्थितीत हागणदरी मुक्त आहेत, याचा खुलासा करावा. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो. ( .......2

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदया, शालेय शिक्षण विभागाच्या पूरक मागण्यांवर माझे विचार प्रामुख्याने व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्र. 80 - शासकीय आणि अशासकीय कर्मचाऱ्यांना 3 टक्के आणि 4 टक्के महागाई भत्ता देण्याच्या संदर्भात 274.49 लाख एवढी तरतूद या ठिकाणी केलेली आहे, त्याबद्दल मी माननीय वित्तमंत्र्यांचे अभिनंदन करतो. या विभागाचा जी.आर. सन 2000 मध्ये आला व त्यामध्ये स्पष्टपणे उल्लेख केला होता. परंतु वित्त विभागाचा असा जी.आर. असतांना आणि त्यामध्ये स्पष्टपणे म्हटले होते की, वित्त विभागाने जी.आर. काढल्यानंतर दुसऱ्या विभागाने जी.आर. काढण्याची गरज नाही, असे असतांना सुध्दा शालेय शिक्षण विभागाच्या संचालकांनी एक महिन्यापुर्वी असा फतवा काढला होता आणि त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केले होते की, शालेय शिक्षण विभाग आणि वित्त विभागाचा जी.आर. असला तरी मी असे म्हणतो की, या हा 3 आणि 4 टक्के महागाई भत्ता देऊ नका. यासंदर्भात शासनाने शिक्षण संचालकांना सांगितले पाहिजे की, वित्त विभागाने जी.आर. काढल्यानंतर इतर विभागाने जी.आर. काढण्याची गरज नाही. अद्याप राज्यात कुठेही अशा प्रकारचा महागाई भत्ता दिलेला नाही. म्हणून संचालकांनी काढलेले परिपत्रक ताबडतोब रद्द करावे आणि जानेवारी पेड इन फेब्रुवारी अशा प्रकारे ही महागाई भत्त्याची रक्कम देण्याची व्यवस्था करावी.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यु.डायगव्हाणे.....

सभापती महोदय, 915 निकषपात्र शाळांची यादी जाहीर होऊन 15 महिने उलटले आहेत. त्यासंदर्भात मी माननीय मंत्रीमहोदयांचे स्वागत देखील केलेले आहे. गेल्या 10-15 वर्षात यासंदर्भातील याद्या जाहीर झाल्या परंतु अनुदानाची तरतुद आजही पुरवणी मागणीत करण्यात आलेली नाही. त्यामुळे यासंदर्भात स्पष्टपणे तरतुद मार्चपूर्वी करण्यात यावी, अशी विनंती आहे. आता विद्यमान स्थितीमध्ये जी निकषपात्र यादी आहे ती जाहीर करण्याची आवश्यकता आहे. तसेच दुसरे असे की, जे नक्षलग्रस्त भाग आहेत, आदिवासी भाग आहेत अशा गावात ज्या शाळा आहेत त्या ठिकाणी 50 टक्के विद्यार्थ्यांची जी अट आहे ती आदिवासी विभागाला न्याय देण्यासारखी नाही. आदिवासी विभागाकडे यासंदर्भात जी.आर.नसतांना त्या ठिकाणी 15 टक्के विद्यार्थी आदिवासी असले पाहिजेत असे बंधन टाकले आहे. असे बंधन टाकले गेले तर कोणतीही आदिवासी शाळा अनुदानावर येणार नाही. त्यामुळे यासंदर्भात निश्चित विचार करण्यात यावा.

आता मी पृष्ठ क्रमांक 58 वरील बाब क्रमांक 84 वर माझे विचार मांडणार आहे. महाराष्ट्रातील सर्व राज्य शासकीय कर्मचा-यांना पाचवा वेतन आयोग 1.1.1996 रोजी दिला गेला होता परंतु असे असतांनाही नागपूर महानगरपालिकेने ठराव करुन त्यांच्या कर्मचा-यांना 1 मार्च 2000 पासून पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे. मंत्रीमंडळाच्या निर्णयापेक्षाही नागपूर महानगरपालिका आता निर्णय घ्यावयास लागली आहे. यासंदर्भात मी सभागृहात प्रश्न देखील उपस्थित केला होता. त्यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी पुढाकारही घेतला होता परंतु अद्याप यासंदर्भात कोणतीही तरतूद झालेली नाही. त्यामुळे यासंदर्भातही निर्णय होणे आवश्यक आहे.

आता मी बाब क्रमांक 81 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी आपण खिचडी देत असतो. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. चव्हाण साहेबांनी सुध्दा आपले विचार व्यक्त केलेले आहेत. खिचडी ही काही केवळ तांदळाची होत नाही तर त्यामध्ये दाळ आणि इतर सामुग्री टाकावी लागते. त्यामुळे यासंदर्भात आपण स्पष्ट निर्देश दिले पाहिजे. यासंदर्भात ऑगस्ट महिन्यापर्यंत वाटप केले होते परंतु ते अजून वितरीत करण्यात आलेले नाही. यातून सुध्दा आपल्याला काही वाटा मिळतो का असे अधिका-यांना वाटत असल्यामुळेच असा प्रकार झाला असावा. खिचडीसाठी तरतूद झालेली आहे परंतु ही तरतूद अजून शाळांपर्यंत पोहचलेली नाही. सप्टेंबर पर्यंतचे जे देणे आहे त्यासंदर्भात तातडीने आदेश

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यु.डायगव्हाणे.....

देण्याची आवश्यकता आहे. 42 कोटी वेतनेतर अनुदानाची पावसाळी अधिवेशनात घोषणा झाली होती परंतु त्यापैकी 21 कोटी रुपयेच देण्यात आलेले असून अजून 21 कोटी रुपये देण्याचे बाकी आहे त्यामुळे उर्वरित पैसे त्वरीत देण्यात यावे.

आता मी पृष्ठ क्रमांक 179 वरील बाब क्रमांक 220 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ अशा नक्षलग्रस्त भागातील शाळांना 15 टक्के प्रोत्साहन भत्ता देण्याचे घोषित करण्यात आले होते. त्यामुळे देय असलेल्या इतर भत्त्यांची व्यवस्था करण्यात यावी अशी विनंती करतो. दुसरे असे की, आपल्या ज्या आदिवासी विभागातील आश्रमशाळा आहेत त्यांच्यामध्ये फार अनियमितता आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्हि.यू.डायगव्हाणे.....

मुलांना पोटभर जेवण मिळत नाही. त्यांच्या राहण्याची व्यवस्था नीट नसते. त्यांना इतर कुठल्याही सुविधा पुरविल्या जात नाहीत. 50 टक्के निधी हा मॅनेजमेंट आणि इतर एजन्सीच्या घशात जातो. याकडे देखील शासनाने लक्ष दिले पाहिजे. म्हणून या सर्व व्यवस्थेची एकदा चौकशी झाली पाहिजे. अशी चौकशी आपण करणार आहात का ? 2-3 वर्षापासून शिक्षकांची थकबाकी देणे बाकी आहे. त्याची तरतूद या पुरवणीत नाही. ती सुध्दा आपण करावी अशी विनंती करतो व माझे विचार थांबवितो. धन्यवाद.

........

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदया, वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना लवकर जायचे असल्यामुळे त्यांचा मुद्दा मी पहिल्यांदा घेतो. मी बाब क्रमांक 212 व 213 वर बोलणार आहे. नांदेड येथे 50 वर्षे पूर्ण झालेले शासनाचे आयुर्वेद महाविद्यालय आहे. पण आज या महाविद्यालयाची अवस्था पडायला आल्यासारखी झाली आहे. हे आपल्यासारख्या कर्तृत्त्ववान, कर्तबगार वैद्यकीय शिक्षण मंत्र्याला शोभा देणारे नाही. यासंबंधीचा उल्लेख येथे कुठेच आलेला नाही. माननीय श्री.वळसे-पाटील यांनी आपली थोडीशी ऊर्जा नांदेडच्या आयुर्वेद महाविद्यालयाला देऊन त्याला ऊर्जितावस्थेत आणले तर मराठवाडा नाही तर संपूर्ण महाराष्ट्र आपला आभारी राहू शकेल. या महाविद्यालयातून अनेक चांगले आयुर्वेदीक डॉक्टर तयार झालेले आहेत. त्यांचे गेट-टू-गेदरचा मोठा कार्यक्रम आपल्याला करता येईल. या आयुर्वेद महाविद्यालयासाठी आपण किमान 5 कोटी रुपयांचा निधा मंजूर करावा. खरे तर मी 50 कोटी रुपये म्हणणार होतो. एवढी रक्कम आपण देणार नाही म्हणून मी 5 कोटी रूपयाच्या निधीची मागणी केली आहे. आजच आपण मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमात यासंबंधीची घोषणा करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

यानंतर पान क्र.59वरील बाब क्रमांक 90 - औरंगाबाद महानगर पालिका अनुदानावर मी बोलणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी संभाजीनगरला 25 कोटी रुपयाचे अनुदान देण्यात येईल अशी घोषणा केली. त्यापूर्वी श्री.टोपे साहेबांनी आश्वासन दिले होते की, 2004 पर्यंत थकलेले 32 कोटी रूपये एवढे अनुदान देऊ. आम्हाला वाटले मागचे 32 कोटी आणि हे 25 कोटी रुपये असे वेगळे मिळणार आहेत. त्यामुळे आम्ही खूष होतो, पण परवाच मी प्रश्न टाकला असता, त्यात असे उत्तर आले की, सिडकोचे हस्तांतरण झाल्याशिवाय आम्ही काहीही करणार नाही. सिडकोने यात 100 कोटी रुपये कमाविले आहेत. हा विषय वेगळा आहे आम्हाला जर तुम्ही पैसे देत नसाल तर आम्हीच तुम्हाला आरबिट्रेटर म्हणून नेमतो. सिडकोने पैसे कमावून मुंबईच्या लोकांना द्यावेत हे बरोबर नाही. मराठवाडयातील आमच्या दोन्ही भूमिपूत्रांनी थोडे मन मोठे केले पाहिजे. आपण एमएसआरडीसीला आणि आयआरडीपीला पैसे देऊ नका. महानगरपलिका आपलीच आहे. कुठल्याही पक्षाचा विचार न करता महापालिकेकडे अनुदान सुपूर्द करावे. यासाठी श्री.टोपे----

श्री.श्रीकांत जोशी...

साहेबांनी जरा ताकद द्यावी. मराठवाडयाचे मुख्यमंत्री आणि आपण असताना खरे म्हणजे आम्हाला हा विषय मांडावा लागू नये असे मला वाटते. आपण पश्चिम महाराष्ट्रपासून शिकावे असे मला या निमित्ताने सुचवावयाचे आहे. मी येथे विषय मांडला तो पुरेसे आहे असे मी समजतो.

यानंतर श्री.बाब क्रमांक 83 वर बोलणार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेच्या वर्ग खोल्यांचे बांधकामासंबंधी मी बोलणार आहे. मला श्री.पुरके साहेबांना विनंती करावयाची आहे की, कृपा करून शिक्षकांना बांधकाम करायला लावू नका. त्यांना मुलांना शिकवू द्या. बांधकाम करीत असताना नीट देखरेख केली नाही म्हणून मराठवाडयातील 22 शिक्षकांना नोटीस देण्यात आलेली आहे. श्री.भुजबळांसारखे तगडे मंत्री असताना शिक्षकांना बांधकामाच्या कामावर कशासाठी नेमता? आणि वर त्यांना कारणे दाखवा नोटीस देता. एक शिक्षक चार हजार रुपयाचे प्रदान करीत असताना लाचलुचपत विभागाने धाड टाकली आणि त्या शिक्षकाला पकडले आणि विचारले की, पैसे कुठून आलेत ? ते, म्हणाले की, कंत्राटदाराने दिलेत. असा जबाब दिल्या बरोबर त्या शिक्षकाला पकडले व लगेच त्यांना निलंबित करण्यात आले. तेव्हा 25 हजार शिक्षकांनी माझ्या नेतृत्त्वाखाली मोर्चा काढला. आम्हाला मुलांना शिकवू दे. बांधकामावर निरीक्षण ठेवण्यासाठी कशाला नेमता ही त्यांची प्रमुख मागणी होती.

यानंतर मी बाब क्र.84 वर माननीय मंत्री श्री.टोपे यांचे लक्ष वेधणार आहे. आपण शिक्षकांच्या पगारासाठी तरतूद केलेली आहे. परभणी नगरपालिकेमध्ये गेले 9 महिने शिक्षकांचे पगार वेळेवर होत नाही. त्यांचा पी.एफ.ग्रॅच्युइटी अकौंट विभागाने खर्च केला आहे. शासनाकडून जो निधी येतो, तो नगराध्यक्ष मनमानी पध्दतीने खर्च करीत आहेत. त्यामुळे आपले नगरविकास खाते काही काम करते का ? असा कधी कधी प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे शिक्षकांसाठी दिलेला पैसा डायरेक्ट त्यांच्या अकौंटवर जमा होईल असा प्रयत्न तुम्ही करणार आहात की नाही ? यासंबंधी देखील उत्तर द्यावे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.ओटवणेकर........ 17:15

श्री.श्रीकांत जोशी...

यानंतर बाब क्रमांक 87- विभागीय क्रीडा संकुल यावर बोलणार आहे. औरंगाबाद क्रीडा संकुलाची काय अवस्था झाली आहे याची आपणाला कल्पना आहे. आपण निधी देणार म्हणून घोषणा केल्या पण अजूनपर्यंत पैसे मिळाले नाहीत. शेवटी आयुक्तांनी ती जागा विकायला काढली. त्या जागेचे उद्या टेंडर निघणार आहे. त्या टेंडरमधील पैसे आता देणार आहात. आपण पाच कोटी रुपये दिले पण सतरा कोटी रुपये गेले. गेली चार वर्षे मी अर्थसंकल्प पाहतो आहे, पण त्यासाठी तरतूद करण्यात येत नाही. औरगाबाद हे महत्वाचे पर्यटन शहर आहे.

बाब क्रमांक 91- संगणकाच्या कागदाची खरेदी संबंधी आहे. परवा विक्रीकर विभागाच्या शिष्टमंडळाला भेटायला गेलो होतो. तेव्हा त्यांना विचारले तुमच्या अडचणी काय आहेत ? त्यांनी मला सांगितले की, आमच्याकडे एकही संगणक नाही. मराठवाडा विभागातून जवळपास 750 कोटी रुपयांचा विक्रीकर गोळा होतो. त्या कार्यालयात एकही संगणक नाही. हे बरोबर नाही. मला राग आला मी त्यांना सांगितले की, आमच्या आमदारांकडून तुम्हाला दहा संगणक देतो. पण तुम्ही छोट्या छोट्या गोष्टींसाठी व्यापाऱ्यांना आणि उद्योजकांना चकरा मारावयास लावू नका. ज्या विभागाकडून आपल्याला 14 हजार ते 18 हजार कोटी रुपये मिळतात त्या कार्यालयाचे संगणकीकरण झालेले नाही ही शरमेची गोष्ट आहे.

बाब क्रमांक 94 - ट्रेझरी ऑफीसचे संगणकीकरण केले पाहिजे. तेथील इन्व्हर्ड सिस्टीमचे संगणकीकरण केले पाहिजे. सार्वजनिक बांधकाम विभागाची देयके गेल्यास ट्रेझरी ऑफीस ती स्वीकारीत नाहीत. हा कोणता तुघलकी कारभार सुरु आहे ? जर बजेटमध्ये तरतूद नसेल तर ते देयक स्वीकारु नका. प्रत्येक ट्रेझरीमधला कागदा हा ट्रान्सफरंट असला पाहिजे. तुमच्याकडे आलेल्या बिलाची नोंद झाली पाहिजे. If it is not having the financial provision, then that should be rejected immediately along with the Rejection Note. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, ट्रेझरी ऑफीसमध्ये 20-20 वर्षे कर्मचारी एकाच ठिकाणी आहेत. सिनिअर क्लर्क या पोझीशनवर आहेत. ते सांगतात आम्हाला बदलायचे नाही. आम्हाला संगणक शिकायचा नाही. ही पध्दत वित्त मंत्रालयाला शोभा देणारी नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

बाब क्रमांक 98 - सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागाचे मंत्री श्री.छगन भुजबळसाहेब आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, हिंगोली या विभागात तर इतका गोंधळ आहे की, सेंट्रल रोड फंड आणि नाबार्डकडून घेतलेले फायनान्शिअल असिसटंटचा निधी तेथील कार्यकारी अभियत्यांने दुसरीकडे वापरला. ही रक्कम काही कोटींमध्ये होती. त्या पैशाची पूर्ण वाट लावून टाकली. नंतर ते रजेवर निघून गेले. मला असे सांगावयाचे आहे की, तुम्हाला जे काही वाटेळे करायचे आहे ते महाराष्ट्राच्या पैशाचे करा, केंद्र सरकारच्या पैशाचे कशाला करता ? कारण मला केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्र्यांनी सांगितले की, " इस तरह की शिकायत आप लोकप्रतिनिधियों की तरफ से आती है तो महाराष्ट्र सरकार को पैसे दिए जाने चाहिए या नहीं, इस बारे में हमें सोचना पड़ेगा. " तेव्हा आपण त्या कार्यकारी अभियंत्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहात ? सेंट्रल रोड फंड आणि नाबार्ड या दोन्ही स्कीममधील हिंगोली आणि परभणी जिल्ह्यातील पैशाचा अपहार झाला याची आपण चौकशी केली पाहिजे. याठिकाणी वित्त राज्य मंत्री उपस्थित आहेत. गेल्या मार्च महिन्यात सेंट्रल रोड फंड, नाबार्ड वर्ल्ड बँक प्रोजेक्टचे मराठवाड्यातील जवळपास 300 ते 400 कोटी रुपये मंजूर असताना वित्त मंत्र्यांनी त्या कामावर खर्च केले नाहीत आणि 15 एप्रिल पर्यंत देयके आली नाहीत म्हणून ती सर्व देयके रिजेक्ट करण्यात आली. त्यातील आजही 150 कोटींची बिले देण्यात आलेली नाहीत. त्यासाठी कॉन्ट्रॅक्टरने औरंगाबादच्या ट्रेझरी ऑफीससमोर तीन वेळा उपोषण केले होते. केंद्र सरकारने दिलेला पैसा हा ट्रेझरीमध्ये येतो. पण सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तो निधी दुसरीकडे खर्च करतात. त्यामुळे पुलासारख्या, सेंट्रल रोडसारख्या कामावरील देयके देता येत नाहीत. आम्ही याचा फार इश्यू केला तर दिल्लीमध्ये महाराष्ट्राची बदनामी होते आणि त्यामुळे पुढे येणाऱ्या निधीसाठी अडचण निर्माण होते. माननीय मंत्रिमहोदय श्री.छगन भुजबळ यांचे विभागावर नियंत्रण नाही. आपण 17 अभियंत्याच्या बदल्या गेल्या. मराठवाड्यातील सगळ्या अभियंत्याच्या बदल्या करुन टाकल्या. दर सहा महिन्याला कार्यकारी अभियंता बदलला जातो. पालकमंत्र्यांच्या बैठकीत लोक गोंधळ घालतात. मार्च महिन्यातील देयके अजून दिली गेली नाहीत. काय पोरखेळ चालू आहे ? श्री.नितीन गडकरी, श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांनी या विभागाला

..3..



AJIT/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.ओटवणेकर........ 17:15

श्री.श्रीकांत जोशी...

जी प्रतिष्ठा मिळवून दिली होती ती पूर्ण लयाला गेली आहे. रस्त्यावर सगळ्या ठिकाणी खड्डे आहेत. आपला काही फायनान्शिअल कंट्रोल राहिलेला नाही. श्री.भुजबळसाहेब तुम्हाला जर ते काम करु देत नाही त्यात माझा काय दोष आहे ? आज परिस्थिती अशी आहे की, सार्वजनिक बांधकात विभागामध्ये गोंधळ चालू आहे. "कार्यकारी अभियंता जागेवर दाखवा आणि 100 रुपये बक्षिस मिळवा" अशी म्हणण्याची आज वेळ आली आहे. त्याठिकाणी कोणतीही माहिती मिळत नाही. ते अधिकारी केव्हाही जागेवर नसतात. काय परिस्थिती आहे हे मला समजत नाही. रस्ते या रक्तवाहिन्या आहेत. वेळ कमी आहे नाही तर मी आपणास पूर्ण आकडेवारी दिली असती . मराठवाड्यातील 15 पैकी 14 कार्यकारी अभियंत्याच्या बदल्या करण्यात आल्या. केवळ लातूरच्या कार्यकारी अभियंत्याची बदली करण्यात आली नाही कारण ते मुख्यमंत्र्यांचे गाव आहे. सर्वच अधिकाऱ्यांना का बदलण्यात आले हे मला समजत नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.अजित.... 17:20

श्री.विलासराव शिंदे : महोदया, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. या ठिकाणी पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु आहे. त्यामुळे ज्यासंदर्भात चर्चा सुरु आहे त्याच विषयावर बोलण्याचा संकेत आहे. माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी हे मात्र विषय सोडून बोलत आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदया मी पुरवणी मागण्यांवरच बोलत आहे. मी आता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.115, पृष्ठ क्र.90 वर माझे विचार व्यक्त करु इच्छितो. औरंगाबादच्या शासकीय फार्मसी कॉलेजच्या संकुलाच्या बांधकामासाठी सहाव्यांदा तरतूद होत आहे. परंतु अजूनही त्या इमारतीचे बांधकाम सुरु झाले नाही. सार्वजनिक बांधकाम खात्याकडून त्या इमारतीचे बांधकाम करणे शक्य नसेल तर, वैद्यकीय शिक्षण खात्याने स्वतंत्र कन्सॉलिडेटेड फंड जमा करुन त्यातून या इमारतीचे बांधकाम करावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

महोदया, मी आता बाब क्र.136 च्या संदर्भात बोलणार आहे. या पुरवणी मागणी अंतर्गत मेजर डॅमच्या रिपेअरसाठी 34.36 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यामध्ये डॅमवाईज अनुशेषाचा प्रश्न लक्षात घेऊन मराठवाडयातील मोठे व मध्यम प्रकल्पांची दुरुस्ती व तरतूद करणे आवश्यक आहे. त्यातल्यात्यात मराठवाडयातील लातूर आणि उस्मानाबाद या भूकंपग्रस्त जिल्हयांसाठी जास्त प्रमाणात तरतूद करावी.

बाब क्र.13, पृष्ठ क्र.116 च्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, जागतिक बँक सहायित महाराष्ट्र जल क्षेत्र सुधारणा प्रकल्पासाठी 1550 कोटी रुपयांचे जागतिक बँकेकडून कर्ज मिळणार आहे. त्याकामी 77 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. महोदया, 1550 कोटी रुपयांमध्ये नियोजन करीत असताना विदर्भ आणि मराठवाडयातील अनुशेष लक्षात घेऊन तेथील प्रकल्पांचा विशेषत: जायकवाडी प्रकल्पाचा जर यामध्ये अंतर्भाव झाला नसेल तर या प्रकल्पासाठी 200 कोटी रुपये आणि अप्पर पैनगंगा या प्रकल्पासाठी 100 कोटी रुपये ठेवणे गरजेचे आहे. काही ठिकाणचे दरवाजे सुध्दा उघडता येणार नाही अशी परिस्थिती त्या ठिकाणी निर्माण झालेली आहे. तो अनुशेषग्रस्त भाग आहे. तसेच विदर्भातील प्रकल्पांना जर तरतूद केली नाही तर मोठी अडचण निर्माण होणार आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

यानंतर मी उद्योग विभागाच्या बाब क्र.165, पृष्ठ क्र.133 वर बोलू इच्छितो. सिकॉम या अभिकरण कंपनीने जकात शुल्क परत करण्यासाठी मे.महिंद्रा आणि महिंद्रा मर्यादित या कंपनीला 92 कोटी रुपयांपैकी 32 कोटी रुपये देण्याचे ठरविले आहे. मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे की, आपण 32 कोटी रुपये केवळ या एकाच कंपनीला का देत आहात ? या कामासाठी गरवारे कंपनी असेल किंवा अन्य कोणती कंपनी असेल की जी अडचणीत आहे तिला मदत करणे आवश्यक आहे. उद्योग खात्याकडे पैशांची कमतरता नसेल किंवा वेगळे रोखे काढण्यात येत असतील तर न्यायबुध्दीने सगळया इंडस्ट्रीजचे पैसे दिले गेले पाहिजेत. परंतु तसे न करता विशिष्ट कंपनीचा उल्लेख करुन ही बाब या ठिकाणी मांडलेली आहे. या कंपनीला निधी देण्यास माझा विरोध नाही, परंतु त्या कंपनीच्या बरोबरच्या जेवढया कंपन्या आहेत त्या कंपन्यांना सुध्दा विशिष्ट दिवसापर्यंतचा जकात शुल्क परतावा मार्चपूर्वी दिला पाहिजे, नाहीतर बाहेर चुकीचा मेसेज जाईल. आपण असे केले नाही तर उद्योग क्षेत्रामध्ये महाराष्ट्राची जी मान ताठ आहे त्यामध्ये अडचण निर्माण होईल. त्यामुळे मी ज्या ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या गोष्टींचा माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात उल्लेख करावा एवढी मागणी करुन, आपण मला बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.वसंत पवार ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, सर्वप्रथम मी सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र.6 वर बोलू इच्छितो. वेरुळला कै.शहाजीराजे भोसले यांचा पुतळा उभा करण्यासाठी जी तरतूद करण्यात आली आहे त्याबद्दल मी प्रथम शासनाला धन्यवाद देतो. औरंगाबादमध्ये आमचे नेते व मार्गदर्शक गोविंदभाई श्रॉफ आणि डॉ.रफीक झकेरीया यांच्या पुतळयांचे स्मारक करण्यात येणार आहे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार ..

त्याबद्दल शासनाने चांगल्या प्रकारची भूमिका घेतली आहे. मला असे सांगावयाचे आहे की, शासनाने प्रत्येक पुतळयासाठी तरतूद केलेली आहे त्यावरुन ही स्मारके आणि पुतळे उभे राहतील याबद्दल मला खात्री वाटते.महाराष्ट्राचे सुपुत्र कै. शंकरराव चव्हाण यांच्या प्रयत्नामुळे पैठण जवळ जायकवाडी धरणाचे काम सुरु झाले होते आणि ते धरणाचे काम पूर्णही झालेले आहे. त्यांचे स्मारक त्या ठिकाणी करण्याचे शासनाने ठरविलेले आहे ही वाखाणण्यासारखी गोष्ट आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देत आहे. सभापती महोदया, आदिवासी भागातील अशासकीय प्राथमिक आणि माध्यमिक शाळां अनुदानावर आणण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो. त्याचबरोबर शिक्षकेतर कर्मचा-यांना कमी करण्यासाठी शासनाने एक जी.आर. काढला होता परंतु आम्ही आग्रह केल्यामुळे शासनाने तो जी.आर. मागे घेतलेला आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.जो जुना आकृतीबंध आहे त्यामुळे अनेक जागा रिक्त होणार आहेत. त्या जागा भरण्याच्या बाबतीत परवानगी देण्यास हरकत नाही असे मला वाटते. असे करण्यात आले तरच शासनाने घेतलेल्या निर्णयाचा फायदा सर्व शाळा व कॉलेजेसना होऊ शकेल अन्यथा त्या निर्णयाचा काहीही फायदा होणार नाही असे मला सांगावयाचे आहे.सभापती महोदया, यानंतर मला दुस-या एक बाबीसबंधी बोलावयाचे आहे शिक्षकाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण आणि शाळा निरीक्षकांसाठी जो उपक्रम सुरु करण्यात आलेला आहे तो अतिशय चांगला आहे त्यातून चांगल्या प्रकारचे शिक्षक निर्माण होतील तसेच शाळांचा गुणवत्ता वाढेल असे मला वाटते.. नगरपालिका आणि महानगरपालिकांचे जे शिक्षण मंडळ आहे त्यांच्या अंतर्गत असलेल्या ज्या शाळा आहेत त्यांना इमारतीची गरज आहे तसेच चांगल्या शिक्षकाची गरज आहे.नाशिक महानगरपालिकेतील शाळांमध्ये उर्दू शिक्षकांची आणि आदिवासी शिक्षकांची कमतरता आहे तेव्हा याबाबतीत सुध्दा शासनाने विचार करणे आवश्यक आहे. असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाला स्थैर्य प्राप्त होईल या दृष्टीने शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.नाशिक महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या अंतर्गत ज्या शाळा सुरु आहेत त्या शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेष अजूनही मिळालेला नाही . विद्यार्थ्यांना द्यावयाच्या गणवेषाबाबत निविदा काढणे आणि इतर सर्व प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाहीत त्यामध्ये काही गैरप्रकार घडतात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार ...

त्यामुळे नाशिक महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या अंतर्गत असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना आणि पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या अंतर्गत असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेष् मिळालेले नाहीत. तेव्हा या बाबतीत मंत्रिमहोदयांनी दक्षता घ्यावी अशी मला त्यांना विनंती करावयाची आहे.सभापती महोदया, यानतर मला बाब क्रमांक 81 संबंधी बोलावयाचे आहे. विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण देण्याच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत बाब क्रमांक 81 मध्ये विद्यार्थ्यांना द्यावयाच्या खिचडीच्या सदर्भात पूरक मागणी करण्यात आली . त्यातून अनेक प्रश्न आज निर्माण झालेले आहेत कोर्टाचा आदेश असल्यामुळे त्या आदेशाचे पालन आपल्याला करावेच लागते. याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, सरकारने सुध्दा कोर्टात जाऊन यातून काही तरी मार्ग काढला पाहिजे. विद्यार्थ्यांना जेवण देण्यामध्ये रिस्क जास्त वाटते. ज्या ठिकाणी स्वंयपाक तयार केला जातो त्या भागाला आगी लागण्याचे प्रकार घडतात.त्याचबरोबर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना त्रास सहन करावा लागतो.तेव्हा या दोन गोष्टीचा विचार शासनाने करावा अशी माझी शासनाला विनती आहे.सभापती महोदया, यानंतर मला बाब क्रमांक 87 पान नबर 59 सबंधी बोलावयाचे आहे क्रीडा संकुले तयार करण्यासाठी 25 कोटी रुपयांची पूरक मागणी केली आहे. क्रीडा संकुलाच्या बाबतीत मला एक मुद्दा मांडावयाचा आहे. क्रीडा संकुलाबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी आपआपले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत.या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयांना एक विनंती करावयाची आहे. सरकार खाजगी शिक्षण संस्थेच्या जागा सरकार आपल्या ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न करीत आहे.त्या बाबतीत जो काही करार करण्यात येतो तो करार करीत असतांना काही अडचणी येतात. त्या संस्थेची जी काही घटना असते त्या घटनेतील अडचणीमुळे ही जागा दुस-या संस्थेला सरकारला देता येत नाही. त्यांच्या नावावर ही जागा करुन देता येत नाही.या संबंधी मी एक उदाहरण या ठिकाणी देऊ इच्छितो. नाशिक जिल्हयात निफाड तालुक्यात आमच्या शाळेची एक संस्था आहे. त्या ठिकाणी क्रीडा संकुल काढण्याचा आमचा प्रयत्न आहे. परतु मी सांगितलेल्या अडचणीमुळे संमतीपत्र होऊ शकत नाही त्यामुळे मला अशी भीती वाटते की, त्या ठिकाणी क्रीडा संकुल न होता ते दुसरीकडे शिफट होईल तेव्हा त्याही बाबतीत शासनाने लक्ष घालावे अशा प्रकारची विनंती करुन मी मंत्रिमहोदयांना करतो.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ श्री. गायकवाड नंतर --- 17:30

डॉ. वसंत पवार ....

सभापती महोदया, विनाअनुदान तत्त्वावरील शाळांच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितलेच आहे. माझ्याकडे देखील याबाबतीत बरीच आकडेवारी आहे पण मी ती येथे सांगत नाही. विनाअनुदान तत्त्वावरील ज्या शाळा ग्रामीण भागामध्ये काढल्या आहेत त्या चांगल्या चालण्यासाठी, तेथील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी सरकारने त्यांना काही तरी तदर्थ अनुदान देणे आवश्यक आहे अन्यथा तेथील शिक्षक हे निश्चितपणे बळी पडतील आणि उद्या त्यांनाही आत्महत्येच्या मार्गाला वळावे लागेल अशी साधार भीती आहे. म्हणून विना अनुदान तत्त्वावरील शाळा आहेत.. आता तर आपण कायम विनाअनुदान तत्त्वावर शाळा दिलेल्या आहेत. आणि त्या शाळांच्या बाबतीत कोणतीही मागणी करावयाची नाही असे म्हटलेले आहे. पण असे केले तर ते गैर होईल. भले त्या संस्था चालकांनी असे काही लिहून दिले असले तरी शेवटी मायबाप सरकारच आहे आणि शेवटी मायबाप सरकारकडेच मागणी करावी लागते. त्यामुळे ती मागणी मी येथे ठेवू इच्छितो.

सभापती महोदया, पाटबंधारे विभागाच्या पूरक मागण्यांसंदर्भात बोलताना मी आपल्या सांगू इच्छितो की, नासिक जिल्ह्यातील अनेक मोठी धरणे आहेत त्यांच्या मेंटेनन्स साठी येथे मोठी तरतूद आपण केली आहे. नासिक जिल्ह्यातील दारणा, गंगापूर, गिरणा, चांगदरी यासाठी अनेक मोठ मोठी धरणे आहेत. यातील महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, या मोठ्या धरणांमध्ये आता गाळ साठलेला आहे. आजही गंगापूर धरणाची कॅपॅसिटी 1200 एमसीएफटी होती ती त्यामध्ये गाळ साठल्याने मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. त्यामुळे आता या धरणांतील गाळ काढण्याच्या बाबतीत देखील आपल्याला निश्चितपणे निर्णय घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी तो गाळ काढावा असे म्हणणे सोपे आहे, पण ते प्रत्यक्षात येणे कठीण आहे. कारण शेतकऱ्यांनी त्यातील गाळ काढणे तितकेसे सोपे नाही शिवाय त्याची वाहतूकही करावी लागेल म्हणजे तेही अडचणीचेच आहे. तेव्हा हा गाळ काढण्यासाठी जो खर्च येणार आहे तो लक्षात घेता त्यामध्ये आपले दुसरे मोठे धरण होऊ शकते. आता गंगापूर धरणाची कॅपॅसिटी 1200 एमसीएफटी असताना त्यात गाळ साठल्यामुळे ती कमी झ ाली आहे आणि त्यातील गाळ काढण्यासाठी जो खर्च येणार आहे त्यामध्ये तेथून जवळच क्वींस नावाची नदी आहे आणि ती पुढे जाऊन गोदावरीला मिळते. तेथे 1400 एमसीएफटीचे धरण होऊ शकते. म्हणजे जी कॅपॅसिटी गंगापूर धरणाची कमी होत आहे वा झालेली आहे ती आपण येथे

...... 3 टी 2 ...

डॉ. पवार ....

भरून काढू शकणार आहोत. शिवाय यामध्ये कायदेशीर अडचण देखील काही येणार नाही. तेवहा त्याही दृष्टीने आपण विचार करावा अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

सभापती महोदया, शेवटी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आता या ठिकाणी सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री. वळसे-पाटील बसलेले आहेत. त्यांच्या बाब क्र. 163 च्या संदर्भात मी एक मुद्दा मांडू इच्छितो. अपारंपारिक ऊर्जा साधनांचा प्रचार ...

श्री. अरविंत सावंत : आज ऊर्जा विभागाच्या पूरक मागण्या चर्चेला असल्या तरी अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या आज चर्चेला नाहीत. ...

डॉ. वसंत पवार : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आज या विभागाच्या पूरक मागण्या देखील चर्चेसाठी आपल्यापुढे आहेत. सभापती महोदया, अपारंपारिक ऊजा साधने यामध्ये अपारंपारिक ऊर्जेचा प्रचार आणि प्रसार हा जास्तीत जास्त होणे गरजेचे आहे असे मला आवर्जून सांगितले पाहिजे. कारण शेवटी आपण कितीही वीज निर्मिती केली तरी विजेची कमतरता ही आपल्याला भविष्यात होणारच आहे. त्यासाठीच अपारंपारिक ऊर्जा व साधने यांचा जास्तीत जास्त प्रचार करावा आणि जे ती वापरायला तयार असतील, मग ती पवन चक्की मार्फत तयार होणारी ऊर्जा असो वा सोलर ऊर्जा असो, त्यासाठी जे जे काही करता येईल ते करावे अशी माझी सूचना आहे, आपण जरूर तिचा विचार करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदया, त्यानंतर सांस्कृतिक कार्या बद्दल मी काही सांगू इच्छितो. मागील वेळेस मी मागणी केली होती. 18 व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनामध्ये ठराव केला होता आणि त्या निमित्ताने मी येथे पुन्हा सांगू इच्छितो की, आज महाराष्ट्राला सगळ्या प्रकारची धोरणे आहेत पण महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण काय आहे हे अद्याप सरकारने ठरविलेले नाही. ते धोरण सरकारने ठरविण्याची गरज आहे आणि तसे झाले तर मराठीवर, मराठी माणसावर बाहेरच्या राज्यामध्ये जो अन्याय होतो त्याला आळा बसेल. .....

( यानंतर श्री. सरफरे .... 3यू 1 ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार....

अाणि मराठी संस्कृती जास्तीत जास्त जतन करुन ठेवण्यासाठी याचा उपयोग होऊ शकेल. शेवटचा महत्वाचा मुद्दा सार्वजनिक बांधकाम विभागाबाबत आहे. बाब क्र. 105 च्या अनुषंगाने नाशिक जिल्हयाचे पालकमंत्री माननीय श्री. भुजबळ साहेबांनी नाशिक जिल्हयामध्ये बऱ्यापैकी रस्त्यांची कामे सुरु केली आहेत. या पूरक मागणीव्दारे त्यांनी महत्वाच्या रस्त्यांसाठी तरतूद केली आहे त्याबद्दल मी त्यांना खास धन्यवाद देतो. त्याचप्रमाणे नाशिक येथे कोर्टाच्या इमारतीचे बांधकाम त्यांनी पूर्ण केले आहे. मुलींच्या वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण केले आहे. तसेच, नवीन इमारतीचे बांधकाम त्यांनी प्रस्तावित केले आहे. येवला व ईगतपूरी येथील ग्रामीण रुग्णालयांच्या नवीन इमारतीची बांधकामे त्यांनी या पूरक मागणीव्दारे प्रस्तावित केली आहेत. त्याबाबत त्यांना धन्यवाद देतो. अशाप्रकारे ही कामे सर्व जिल्हयांमध्ये सर्व तालुक्यांमध्ये हळू हळू होत रहातील. त्यासाठी सर्व विभागांना पाठींबा देणे अत्यंत गरजेचे आहे. एवढेच या ठिकाणी सांगतो व मांडण्यात आलेल्या पूरक मागण्यांना पाठींबा देऊन मी माझे दोन शब्द संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शिक्षण विभागाच्या संदर्भातील बाब क्रमांक 81 च्या अनुषंगाने मी एक गोष्ट शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो. आज मराठी शाळांची अवस्था कशी होत आहे त्याकडे मंत्रीमहोदयांनी लक्ष देणे गरजेचे आहे. त्याबाबत मी आपल्याला एक ठोस उदाहरण देणार आहे. मुंबईच्या सायन विभागामध्ये साधना एज्युकेशन सोसायटीचे साधना विद्यालय आहे. या विद्यालयामध्ये इयत्ता 1 ली ते 4 थीपर्यंत प्राथमिक शाळा भरते. मी अत्यंत खेदाने नमूद करतो की, ही शाळा विना अनुदानित तत्वावर चालविली जाते. परंतु इयत्ता 5 वी पासून पुढील तुकडया मात्र अनुदानित तत्वावर चालविल्या जातात. मध्यंतरी शासनाने शिक्षक,पालक यांच्या संघटनेबरोबर चर्चा करुन निर्णय घेतला. या शाळेमध्ये 2001-02 साली इयत्ता 1 ली ते 4 थीमध्ये 1250 विद्यार्थी होते व शिक्षकांची संख्या 24 होती व इयत्ता 1 ली ते 4 थीची फी 270 रुपये होती. त्यानंतर सन 2002-03 मध्ये विद्यार्थी संख्या 1050 होती, शिक्षकांची संख्या 23 होती व फी 297 रुपये होती. त्यानंतर सन 2003-04 मध्ये विद्यार्थी संख्या 900 झाली, शिक्षकांची संख्या 22 होती व फी 324 रुपये झाली. त्यानंतर सन 2004-05 मध्ये विद्यार्थ्यांची संख्या 750 झाली, शिक्षकांची संख्या 21 झाली व फी 340 रुपये झाली, आणि आज सन 2005-06 मध्ये या शाळेतील विद्यार्थी संख्या 689 असून शिक्षक 21 आहेत आणि विद्यमान फी 375 रुपये घेतली जाते.

सभापती महोदय, आपणास माहीत आहे की, या शाळेमध्ये येणारे विद्यार्थी हे जवळच्या धारावीमध्ये रहाणारे आहेत. त्याचप्रमाणे कुर्ल्याच्या स्वदेशी कंपाऊंडमध्ये रहाणारे गरीब पालक आपल्या मुलांना मोठया हायस्कूलमध्ये पाठवू शकत नाहीत, ती मुले सुध्दा या खाजगी शाळेमध्ये शिक्षण घेण्यासाठी येतात. ही शाळा विना अनुदानित चालते. फीमध्ये दरवर्षी सतत वाढ होत असल्यामुळे गरीब पालक हैराण झाले आहेत. त्या संस्थेचे चालक गरीब पालकांना दाद लागू देत नाहीत. मध्यंतरी त्यांनी आंदोलनाचा प्रयत्न केला. शिक्षण उपसंचालकांना त्यांनी पत्र पाठवून विनंती केली तरी देखील त्याची दखल घेतली गेली नाही. एकीकडे विद्यार्थ्यांची संख्या कमी होत चालली आहे, त्याबरोबर शिक्षकांची संख्या कमी होत चालली आहे. हीच परिस्थिती राजा शिवाजी विद्यालयाच्या किंग जॉर्ज हायस्कूलमध्ये आहे. या संस्थांनी मराठी विद्यार्थ्यांच्या मराठी शाळा बंद पाडण्याचा घाट घातला आहे. त्यांना त्याठिकाणी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करावयाची आहे. मुंबईमध्ये आजही गरीब व मध्यमवर्गातील माणसे रहात आहेत. त्यांच्या मुलांसाठी मराठी शाळांची

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3U 3
DGS/ MHM/ SBT/ 17:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

आज आवश्यकता आहे. त्याकडे मी आपले लक्ष वेधत असल्यामुळे आपण त्यांना न्याय द्यावा. या शाळा चालकांनी आम्हाला विना अनुदानित रहायचे आहे आम्हाला अनुदानावर यायचे नाही असे सांगितले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

तरी सुध्दा शिक्षण खात्याने याबाबतीत दबाव आणला पाहिजे की, असे जर असेल तर तुमची पाचवी ते दहावी पर्यंतची शाळा विना अनुदानित करु. असे केले तरच म्हणजे नाक दाबल्याशिवाय तोंड उघडणार नाही. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत जातीने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर नगरविकास विभागाच्या बाबतीत सांगावयाचे तर बाब क्र. 90,पान क्र.63 यामध्ये महानगरपालिका आणि नगरपरिषदांना विशेष अनुदान देण्यासाठी तरतूद केली आहे. मुंबईच्या महानगरपालिकेच्या आयुक्तांनी अधिवेशनापूर्वी आमदारांची एक बैठक घेतली होती. मी सतत गेली तीन वर्षे विचारीत आहे की, मुंबई महानगरपालिकेला शासनाकडून किती देणे आहे ? मी सतत दोन अधिवेशनामध्ये हा प्रश्न विचारला होता आणि त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, आम्ही पैसे देतो, पैसे देणार आहोत. पण प्रत्यक्षात महानगरपालिकेला काही मिळाले नाही. आज मुंबई महानगरपालिकेला राज्य शासनाच्या विविध विभागांच्या माध्यमातून जवळजवळ 589 कोटी रुपयांचे येणे आहे. हे पैसे केव्हा देणार आहात ? हा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर द्यावे. पण याबाबतीत केवळ यापूर्वी दिलेले उत्तर देऊ नका. कारण उत्तरे देऊनही त्याची अंमलबजावणी झाली नाही याचा खेद वाटतो. याठिकाणी "खेद" या शब्दामध्ये फार मोठी टीका केलेली आहे असे समजून याबाबतीत कारवाई करावी अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भात सांगावयाचे तर मुंबईतील ट्रॅफीकच्या बाबतीत सांगावयाचे तर सायन आणि प्रियदर्शनी येथे, तसेच पश्चिम उपनगरामध्ये गोरेगाव-मालाड मध्ये रहेजा कॉम्प्लेक्सजवळ जो टर्न आहे त्याठिकाणी, तसेच ठाकूर कॉम्प्लेक्स येथे तातडीने फ्लाय ओव्हर होण्याची आवश्यकता आहे. नवीन फ्लाय ओव्हर बांधण्यासाठी आपल्याला वेळ लागेल याची कल्पना आहे. पण सध्या सायन येथील जो फ्लाय ओव्हर आहे तेथे ट्रॅफीकचा प्रश्न निर्माण होतो. आपल्याला माहिती आहे की,सकाळी दक्षिणेच्या दिशेने जास्त ट्रॅफीक असतो आणि अशा वेळी तेथील एक बाजू दक्षिणेकडे सुरु करावी. पण तसे होत नाही. त्यामुळे सगळा ट्रॅफिक जाम होतो. याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष द्यावे आणि याबाबतीत तातडीने कारवाई करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव पवार यांनी मांडलेल्या मुद्याबाबत

. . . .3 व्ही-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

मी विचार मांडू इच्छितो. ऊर्जा विभागाच्या बाब क्र.164, पान क्र.133 मला सांगावयाचे आहे की, या विषयाच्या संदर्भात मी गेली सात वर्षे सातत्याने बोलत आहे. अपारंपारिक ऊर्जेच्या संदर्भात केंद्र शासनाकडून राज्य शासनाला निधी मिळतो. पण आपण त्यासंदर्भात कोणतीही योजना, कोणतेही प्लॅनिंग किंवा पॉलिसी ठरवित नाही. एकच गोष्ट लक्षात घ्या की, शाश्वत काय आहे ? पाणी हे शाश्वत नाही कारण पाऊस पडला नाही तर धरणात पाणी साठणार नाही आणि मग विजेचा प्रश्न निर्माण होईल. कोळसा सुध्दा शाश्वत नाही. केवळ प्रकाश शाश्वत आहे. म्हणून सूर्याच्या प्रकाशाचा वापर करणे म्हणजे सौर ऊर्जेचा वापर करावयास पाहिजे. मला याची कल्पना आहे की, यासाठी जो प्लॅन्ट उभा करावा लागणार आहे, त्याचा खर्च खूप जास्त आहे. यासाठी पंचताराकित हॉटेल किंवा मोठमोठी जी कार्यालये आहेत, त्यांना एक गोष्ट मॅन्डेटरी केली पाहिजे की, तुम्हाला लिफ्ट साठी लागणारी पॉवर आम्ही सप्लाय करु. तेथे 24 तास दिवे जळत असतात. येथेही जळतात, मी मागच्या वेळी विधान भवनामध्येही किती दिवे जळत असतात ते मोजून दाखविले होते. जर आपण सौरऊर्जेचा वापर केला तर हे सर्व दिवे सौरऊर्जेवर सुरु रहातील. असे म्हटले जाते की, "Energy saved is energy earned". परंतु अपारंपारिक ऊर्जेच्या बाबतीत शासन अजूनही काहीही करीत नाही. तरी याबाबतीत पॉलिसी ठरवून त्याची अंमलबजावणी केव्हा करणार आहात याची माननीय मंत्री महोदयांकडून माहिती हवी आहे.

. सभापती महोदय, आदिवासी विभागाच्या बाब क्र.221 ते 224 बाबत सांगावयाचे तर यामध्ये दोन विषय मांडलेले आहेत. एक विषय आंगणवाडयांना पैसे देण्याच्या संदर्भातील आहे आणि मी त्याला पाठिंबा देतो. माझा मुद्दा त्यापलिकडचा आहे. या अंगणवाडीमधील सेविकांची जबाबदारी काय आहे ? खिचडी आणि आहार बनविणे ही त्यांचीच जबाबदारी आहे. पण हा आहार लाकूड जाळून चुलीवर बनविला जातो. आजही त्या लोकांना गॅस दिलेला नाही. माझ्या माहिती प्रमाणे प्रत्येक लाभार्थीमागे दर दिवशी शासन 18 पैसे देते म्हणजे महिन्याला पाच रुपये देते आणि तेथे 10-10 हजार लाभार्थी आहेत. तेथे केवळ आदिवासी बालकेच नसतात तर कुपोषित माता, गर्भवती स्त्रिया या सुध्दा लाभार्थी असतात.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे चालू...

या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, मी मोखाडा तालुक्यामध्ये प्रयोग केला. त्या तालुक्यामध्ये 110 अंगणवाडयांना सिलेंडरर्स आणि 110 हाय प्रेशर शेगडया स्वत: दिल्या. यामुळे दोन-तीन गोष्टी झालेल्या आहेत. एक म्हणजे प्रदुषण नियंत्रण झाले. लाकडे तोडतात म्हणजे पर्यायाने जंगीलतोड करतात. त्याच ठिकाणी मुले बसतात. त्या ठिकाणचा धूर, धुरळा उडत असतो. एकच आहार दिला जातो. माझी विनंती आहे की, जे आपण पैसे देता, त्यामधून महिन्याला दोन सिलेंडर्स घेता येतील. दहा-दहा हजार लाभार्थी आहेत त्यांचे 18 हजार रुपये जमा झाले तर त्यामधून दोन सिलेंडर्स घेता येतील. यामुळे त्या परिसरातील लोकूडतोड कमी होईल. प्रदुषण थांबेल. झाडे वाचवा आणि पर्यावरण रोखा, अशाप्रकारचा शहाणपणा घ्यावा. सन्माननीय सदस्यांनी अंगणवाडी सेविकांचे हात भाजतात असे सांगितले. परंतु लाकडे आपण जाळतो हे त्यामध्ये एक कारण आहे. ती टनावारी लागडे प्रत्येक तालुक्याला लागतात. मी मोखाडयामध्ये 110 अंगणवाडया आहेत. या एका तालुक्यामध्ये आहेत,मग जिल्ह्यामध्ये कितीतरी अंगणवाडया असतील. म्हणून अशाप्रकारचा एक प्रयोग करावा, त्यांना गॅस सिलेंडर्स द्यावेत आणि कायमस्वरुपी त्यांचा त्रास वाचववावा. जे काही आपण 18 पैसे 25 पैसे त्यांना देता, त्यातून हे सगळे साकारले जाईल.

दुसरा मुद्दा हा आदिवासी आश्रमशाळेचा आहे. त्या शाळांची अवस्था पाहून वाईट वाटते. त्या ठिक्राणी माध्यमिक शाळा आहेत. त्या माध्यमिक शाळेतील दहावीच्या विद्यार्थीनी शिकतात. तेथे गेल्यानंतर विदारक स्थिती दिसते. त्या मुलींची रहाण्याची व्यवस्था, तेथील होस्टेलवर केली जाते, याबाबतीत मंत्री महोदयांना विनंती आहे की, आश्रमशाळा जाऊन त्यांनी पहाव्यात. त्या ठिकाणी स्वच्छतागृह नाही, पाणी नाही. मी त्यांना पाणी कोठे आहे असे विचारल्यानंतर त्यांनी पाण्याची टाकी दाखविली. वीज नसली तर पाणी चढविता येत नाही असे सांगण्यात आले. पाणी आले तर वीज नाही. वीज नाही म्हणून टाकीत पाणी नाही. वीज नाही तर खाली अंघोळीला पाणी नाही. बाकी तर दूरच. स्वच्छतागृहाचे कित्येक महिने दरवाजे उघडलेले नव्हते. तेथे घाण होती. माझ्या मुलीच्या वयाच्या त्या मुली होत्या. मला त्यांना विचारायचे होते पण मी धाडस करु शकलो नाही. ही त्या ठिकाणची अवस्था आहे. तरी देखील आपण पुढारलेला महाराष्ट्र म्हणून बोलत असतो. माझ ी हात जोडून विनंती आहे. मला गहिवरुन येते. आपण त्या आश्रमशाळेमध्ये जाऊन पहा. निदान मुलींची आश्रम शाळा आहे तेथे जाऊन आपण पहा. जेव्हा तुम्ही माध्यमिक शाळांचा विचार करता, तेव्हा त्या ठिकाणच्या मुलींचा विचार करा. त्यांनी कोठे जायचे ? त्या मुली समोर उभ्या

श्री.अरविंद सावंत (पुढे चालू....

रहायला तयार नव्हत्या इतक्या त्या लाजत होत्या. म्हणून मी या निमित्ताने विनंती करतो की, आपण पूरक मागण्या सभागृहासमोर ठेवता, त्याहीपेक्षा त्यामध्ये जातीने लक्ष देऊन काम करावे, अशी मी आपणास विनंती करतो. आता आपण माता आणि बालकांच्या आरोग्याच्या संबंधात 1 हजाराची तरतूद केलेली आहे, ती कायमस्वरुपी केलेली आहे. ती तरतूद मला योग्य वाटली. पण आरोग्याच्या संबंधात जातीने लक्ष देऊन तरतुद वाढवावी. त्या सगळया मूलभूत सुविधा, मूलभूत गरजा तेवढया पूर्ण होतील अशी अपेक्षा करतो आणि माझे भाषण संपवितो. जयहिंद जयमहाराष्ट्र.

---

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, मी अत्यंत संक्षेपाने 7-8 मुद्दे मांडून माझे बोलणे संपविणार आहे. बाब क्रमांक 7, पान क्रमांक 5, सामान्य प्रशासन विभाग. प्रतापराव गुजर यांचे स्मारक उभे करत आहात, त्याचे मी स्वागत करतो. कुसुमाग्रजांची कविता ही त्यांच्या बलिदानावरच आहे. "वेडात दौडले वीर मराठे सात " इतके चांगले स्मारक उभे रहाणार आहे, त्या स्मारकावर ही कविता टंकित झाली तर कदाचित शाळेतील मुलांना त्या कवितेतून अधिक चांगला अर्थ कळेल. दुर्दैव असे की, प्रतापराव गुजर असतील, बाजीप्रभू देशपांडे असतील त्यांचा त्याग तर अवर्णनीय आहे. पण जीवा महाला, हिरोजी फर्जद हे जे अनामिक वीर आपण होऊन मरणाला सामोरे गेले म्हणून शिवाजी राजे जिवंत राहिले. त्यांचा विचार कोण करणार ? यापैकी जीवा महालाचा येथे अनेकदा उल्लेख झालेला आहे. मी चातकासारखे अनेकदा पुस्तक धुंडाळले, मला उल्लेख आढळला नाही. मला आपल्यामार्फत सभापती महोदयांना विनंती करावयाची आहे की, या समोरच्या लोकांची झोप केव्हा उडेल याचा विचार करा.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक....

जीवा महालाच्या स्मारकाच्या बाबतीत सभागृहात कमिटमेंट झालेली आहे. तेव्हा ते स्मारक व्हायला हवे. तसेच प्रतापगडावर "शिवप्रताप भूमी" असा फलक लागेल असेही मंत्रिमहोदयांनी सांगावे.मी सभागृहाला संगू इच्छितो की, शिवाजी महाराजांच्या पुतळयाची पूजा आता संपलेली आहे. कारण बहुदा आचार्य विनोबा भावे म्हणतात ते खरे आहे."सरकारी काम असरकारी कधीही नसते". हे सगळे सरकारकडे सोपविले आहे. सरकारने त्याबाबतीत काय करायचे ठरविले आहे ते मला माहीत नाही. म्हणून मी केवळ मंत्रिमहोदयांना आठवण करुन देतो की, कृपाकरुन त्या जीवा महालाला विसरु नका.त्याचे स्मारक उभे रहील आणि तेथे जे जे करावयाचे शासनाने कबूल केलेले आहे, त्याची अंमलबजावणी होईल एवढेच ध्यानात ठेवावे.

बाब क्रमांक 251, पृष्ठ क्रमांक 228. उच्च व तंत्र शिक्षण विभाग. 100 वर्षे पूर्ण झालेल्या सार्वजनिक ग्रंथालयांसाठी अतिरिक्त तरतूद 3 कोटी 35 लाख रुपयाची मागणी केलेली आहे. चाळीसगावला नारायण बंकट वाचनालय आहे. त्या ग्रंथालयाची आत्ताच 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. मी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे पत्रव्यवहार केलेला आहे. या वाचनालयांच्या अध्यक्षांची एक मागणी आहे. तेथील महानगरपालिकेने त्यांच्यावर घरपट्टी आकारली आहे. नगरपालिकेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी या वाचनालयाला तसे कळविले आहे. आम्ही सरकारकडे याचना करीत आहोत की, या वास्तूला 100 वर्षे पूर्ण झाली आहेत म्हणून जी सवलत मिळते ती कमीत कमी आवश्य द्याच परंतु त्याठिकाणची घरपट्टी कशी माफ करता येईल याचीही शासनाने काळजी घ्यावी. तरच ज्या वाचनालयांची 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत त्यांना शासनाने न्याय दिला आहे असे खरे समाधान आम्हालाही बाळगता येईल.

बाब क्रमांक 254 पृष्ठ क्रमांक 229.उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग. या तरतुदीचे मी मनापासून स्वागत करणार आहे. याचे कारण असे की, आय.टी.आय.मध्ये अनुसूचित जातीचे जे विद्यार्थी शिकतात त्यांना शासन हत्यार पेटया पुरविणार आहे.गेल्या वर्षी केंद्र सरकारच्या बजेटमध्ये आय.टी.आय.चा उल्लेख होता. मी ते बजेट फार काळजीपूर्वक वाचले आहे. फार स्वच्छ शब्दात श्री. चिदंबरम साहेबांनी म्हटले आहे की, I refer to I.T.I. & not I.I.T. शवेटी आय.टी.आय.चा उपयोग सामान्य माणसाला आहे. आणि आय.आय.टी.चा उपयोग उच्चभ्रू -------





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक...

माणसांसाठी आहे. आय.टी.आय. बाबतची केंद्र सरकारची कमिटमेंट या योजनेतून पूर्ण होणार आहे. मी त्याचे स्वागत करतो पण एक सूचनाही करतो. मध्यंतरी एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या भूतपूर्व कुलगुरु श्रीमती सु. मा. चिटणीस यांनी अतिशय चांगला उपक्रम केला. रीझर्व कॅटॅगरीतील मुलांना प्रवेश मिळतो पण दुर्दैवाने जी मुले पुढे नापास होतात, ती नापास होऊ नयेत, त्यांचा आत्मविश्वास खच्ची होऊ नये म्हणून एक सप्लीमेंटरी कोचिंग देण्याचा या श्रीमती सु.मा. चिटणीसांनी विचार केला आणि तो विचार त्यांनी अंमलात आणला म्हणून त्यांनी त्यांच्या लेखात अभिमानाने असे म्हटले आहे की, "मला त्यात यश मिळाले". एका बाजूने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना हत्यार पेटया पुरवून शासन एक चांगला उपक्रम राबविणार आहे. Please think of supplimantry coching as wel.म्हणजे ते पैसे सत्कारणी लागतील. आणि सगळयात महत्वाचा विषय भविष्यामध्ये तो मुलगा न्यूनगंडाने संत्रस्त होणार नाही.

बाब क्रमांक 256 मध्ये "मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांचा पूर्ण संच" असे म्हटले आहे. मी त्याच्या पुढील क्रियापदाची अपेक्षा करीत होतो. पण मला ते क्रियापद आढळून आले नाही. हत्यार पेट्या शासन पुरविणार आहे. मग पुस्तक संचही शासन पुरविणार आहे काय? मला ते क्रियापद येथे आढळले नाही. मंत्रिमहोदयांनी याबाबतचा खुलासा केला तर बरे वाटेल. शेवटी त्या पुस्तकांचा संच त्या शिक्षणार्थ्यांच्या पदरात गेला तर त्यांना त्याचा उपयोग होणार आहे. म्हणून मंत्रिमहोदयांनी याचा खुलासा करावा.

बाब क्रमांक 225 पृष्ठ क्रमांक 181.एका राज्यातील लोकांना दुस-या राज्यात भेटी देण्याची योजना. महाराष्ट्रातील 10 आदिवासीं व्यक्तिना कर्नाटक या राज्याला भेट देण्यासाठी घेऊन जाण्याची योजना शासनाने आखलेली आहे. चांगली गोष्ट आहे. पण जरा संपूर्ण भारताचा नकाशा डोळयासमोर ठेवा. आज आसामच्या पलीकडे सात राज्य आहेत. त्यांना Seven Sisters असे म्हटले जाते. त्या सातही राज्यामध्ये खिश्चन मिशन-यांनी धुमाकूळ घातला आहे. समजा उद्या जर ही घुसखोरी सातत्याने होत राहिली आणि आसाम कट ऑफ झाला तर पुढची सातही राज्ये Seven Sisters धोक्यात येतील. कृपा करुन आमच्या आदिवासी बांधवांना तिकडे नेण्याची आणि तिकडच्या मुलांना इकडे आणण्याची तरतूद केली तर मी संपूर्ण भारताचा आहे.माझे या देशाशी काही देणे आहे, हा भाव त्यातून आपल्याला संक्रांत करता येईल, याचाही शासनाने कृपाकरुन विचार करावा.

यानंतर श्री. खर्चे..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MHM/ पूर्वी कु. थोरात.... 17:55

डॉ. अशोक मोडक ......

योजना चांगली आहे पण Please think of all India. अशी सूचना मी करु इच्छितो.

त्यानंतर बाब क्र. 81, पृ.क्र.57-दुपारचे जेवण, मिड-डे मिल. तामिळनाडूतील आपत्ती जी मिड-डे मिलमुळे उद्‌भवली होती तशी वेळ त्या बालकांवर येणार नाही याची काळजी घेण्यात यावी असे मला वाटते. त्यानंतर बाब क्र. 84 च्या अंतर्गत आपण स्थानिक संस्था असा उल्लेख केला. या ठिकाणी "स्थानिक स्वराज्य संस्था" असा शब्दप्रयोग करायला हवा असे मला वाटते, म्हणून तशी दुरुस्ती करुन घ्यावी अशी मी विनंती करतो. "बाब क्र. 80 - सार्वजनिक बांधकाम या तरतुदीअन्वये राज्यसरकारच्या महामंडळाची वित्तीय तूट भरुन काढण्यासाठी सरकारने आमच्याकडे 183.60 कोटीची मागणी केलेली आहे. माझ्या मनातील धास्ती अशी आहे की, याच मंडळाकडून शीळ फाटा ते डोंबिवली कल्याण-भिवंडी रस्ता बांधला जाणार आहे. भविष्यात त्याचाही टोल आम्हाला द्यावा लागणार आहे. या महामंडळाकडून टोल गोळा केला जातो. एका बाजुला नागरिकांकडून टोल गोळा करणार आणि तरीही वित्तीय तूट दाखवून शासनाच्या तिजोरीवर डल्ला घातला जातो हे संयुक्तिक वाटत नाही. अशा प्रकारची तूट वारंवार येत राहिली तर That will be aggression on the Govt. Treasury, म्हणून यासंबंधात खुलासा करावा. ही वित्तीय तूट का आली याचा छडा लावला जाणार की नाही ?आणि अशी तूट भविष्यात येऊ नये अशी गॅरंटी शासन देणार आहे काय ? याचाही खुलासा करावा. बाब क्र. 104, पृ.क्र.81-सार्वजनिक बांधकाम विभागाची ही मागणी असून त्या मागणीच्या माध्यमातून समुद्र धूप प्रतिबंधक बंधारे बांधकामासाठी रु. 23.35 लाखाची मागणी करण्यात आली आहे. या माध्यमातून 24 बंधारे उभे राहणार आहेत. पण माझी अशी सूचना आहे की, कोकणात फक्त एवढीच अडचण आहे काय ? एका बाजूला बंधाऱ्यांची धूप होत आहे आणि दुसऱ्या बाजूला गाळ साचतो. लोटे-परशुराम ते अंजनवेल हा समुद्रकिनारा आज धोक्यात आहे. माजी राज्यमंत्री श्री. शिवाजीराव कर्डिले या खात्याचे राज्यमंत्री असतांना ते माझ्या आग्रहास्तव रत्नागिरी आणि सिंधुदुर्गचा प्रवास करण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी प्रामाणिकपणे सांगितले होते की, मी केंद्रशासनाकडे 63 कोटीची मागणी धूप प्रतिबंधकसाठी केली आहे. या बाबीचा छडा कृपया माननीय मंत्री महोदयांनी लावावा आणि जर या कामासाठी केंद्र शासनाकडून पैसे मिळत असतील तर आपल्याच राज्याच्या तिजोरीवर हा भार का टाकावा? कारण समुद्र हा केवळ कोंकणचा नसून भारताचा सुध्दा आहे, म्हणून केंद्र शासनाची तरतूद यासाठी मिळू शकणार असेल तर ती घ्यावी, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3Y-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, सन 2005-06 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, बाब क्र. 4 - मतदारांना देण्यात येणारी छायाचित्रांकित ओळखपत्रे याबाबत मी माझे विचार व्यक्त करणार आहे. महोदया, ही अत्यंत गंभीर आणि महत्वाची बाब आहे. या ठिकाणी बऱ्याच वेळा परदेशातून आलेल्या नागरिकांना रेशन कार्ड्स आणि पासपोर्ट्स देण्यात आलेले आहेत आणि अशा प्रकारे जर त्यांना मतदानाचा अधिकार मिळणार असेल तर ते देशाचे 100 टक्के नागरिक होणार आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, ही ओळखपत्रे देत असतांना त्यासंबंधीची योग्य ती तपासणी होणे आवश्यक आहे. आपण जर परप्रांतीयांना रेशन कार्ड देतो त्यावेळी त्यांच्या मूळ ठिकाणची एन.ओ.सी. घेणे आवश्यक असते व तो पुरावा म्हणून घेणेही आवश्यक असते. आमच्या मुंब्रा, मीरा-भाईंदर भागात परप्रांतीय लोकांना अशा प्रकारचे कार्ड्स दिल्याचे आढळून आले त्याबाबत चौकशी करावी व अशा प्रकारची ओळखपत्रे देतांना आवश्यक ती काळजी घेण्यात यावी.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे ......

सभापती महोदया, बाब क्रमांक 82-83 च्या संदर्भात मी आता माझे विचार व्यक्त करणार आहे. ठाणे जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळांना आता टाळे लावण्याची वेळ आलेली आहे. या ठिकाणच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण व्यवस्थित मिळत नाही . या ठिकाणच्या जिल्हा परिषदेच्या शाळांना जर टाळे लागले तर या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे बदं करावे लागेल त्यामुळे यादृष्टीनेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

आता मी बाब क्रमांक 87 वर बोलणार आहे. बालेवाडीच्या`क्रीडा संकुलासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे. गेल्या कित्येक वर्षापासून हे काम सुरु आहे. 99 पासून आज पर्यंत`क्रीडा संकूल पूर्ण झालेले नाही. या`क्रीडा संकुलासाठी शासनाकडून निधीची मागणी केलेली आहे. परंतु या `क्रीडा संकुलासाठी या वर्षात पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही. बालेवाडीच्या संकुलासाठी हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले असून हे`क्रीडा संकूल 100 एकरावर तयार करण्यात आलेले आहे परंतु या ठिकाणी मेंटेनन्स व्यवस्थित होत नसल्यामुळे या क्रीडा संकुलात झ ाडे उगली आहेत. या संकुलात जर युनिव्हर्सीटी किंवा कॉलेजचे खेळ आयोजित केले तर या ठिकाणचा मेंन्टेनन्सचा खर्च सुध्दा वाचू शकेल.

आता मी बाब क्रमांक 10 वर बोलणार आहे. आपण महानगर पालिकेला अनुदान देत असतो. उल्हासनगर येथील 885 इमारती पाडण्याचे निर्देश हायकोर्टाने दिलेले आहेत. या ठिकाणी राहणा-या लोकांचे आता काय होणार असा प्रश्न निर्माण झालेला आहे. यासंदर्भात मी माननीय टोपे साहेबांना पत्र सुध्दा दिलेले आहे. ज्या प्रमाणे आपली पंचायत राज समिती जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांवर अंकुश ठेवते तशाच प्रकारे महानगरपालिकेवर अंकुश ठेवणारी एक कमिटी आपण निर्माण करावी व त्यांच्याकडेच यासंदर्भातील अतिरिक्त कारभार सोपवावा. आज महानगरपालिकेच्या ऑडीटचे पुनर्विलोकन होत नाही, त्यावर चर्चा देखील होत नाही. त्यामुळे महानगरपालिका व नगरपालिकांवर अंकुश ठेवण्याचे काम आपल्या पीआरसी सारख्या कमिटीकडे सोपविण्यात यावे तसेच या कमिटीला तसा अतिरिक्त कारभार सोपविण्यात यावा.

आता मी बाब क्रमांक 106 वरील रस्ते आणि पुलाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. 1999 साली माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख साहेबांनी ठाण्याच्या कॅडबरी नाक्यावरील उड्डाण पुलाचे उद्घाटन केले होते. हा

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे ......

पूल 100 कोटीचा असून हा पूल सर्वात लांब आहे. परंतु आता या रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडल्यामुळे हा पूल 10 दिवसापासून बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे या पुलाचे काम करणारे ठेकेदार कोण होते, या पूलाची किती वर्षाची गॅरंटी होती? याबाबतची संपूर्ण चौकशी करण्यात यावी. हा पूल 10 दिवसापासून बंद पडल्यामुळे नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे. ठाणे शहरातील नागरिक या पूलाचा मोठा प्रमाणात लाभ घेत होते परंतु आता हा पूल बंद पडल्यामुळे नागरिकांना फार त्रास सहन करावा लागत आहे. हा पूल बंद पडल्यामुळे लोकांना मिरा-भाईंदर, भिवंडी या ठिकाणावरुन मुंबईला जावे लागते. त्यामुळे या पूलाच्या संदर्भात संपूर्ण चौकशी करण्यात यावी तसेच हा पूल लवकरात लवकर सुरु करावा अशी माझी मागणी आहे. आज आपण एक दोन किलोमिटर गेलो नाही तर लगेच टोल द्यावा लागतो. जनता टोल भरण्यास तयार आहे परंतु या ठिकाणच्या रत्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडलेले असतांनाही टोल द्यावा लागत आहे. मागे एकदा माननीय मंत्रीमहोदय श्री. गणेश नाईक आणि मी स्वत: ज्या रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडले होते अशा टोल नाक्याला सिल ठोकले होते. मिरा-भाईंदर रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडले आहेत. ठाणे महानगर पालिकेच्या बसला मुलूंडला जायचे म्हटले तरी त्यांना मोठया प्रमाणात टोल द्यावा लागतो हे अन्यायकारक आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विलास अवचट)**

श्री.अनंत तरे...

ठाण्याहून ऐरोलीकडे जाण्यासाठी परिवहन सेवेची बस निघाली असताना मुंबईचा टोलसुध्दा भरावा लागतो. डावीकडे वळले की, ऐरोली पूलाचा टोल भरावा लागतो. मुंबईकडे बसगाडी जात नसतानासुध्दा मुंबईसाठीचा टोल आपण कशासाठी घेत आहात ? ठाण्याहून ऐरोलीकडे निघालेल्या माणसांना नाहक टोल भरावा लागतो. तेव्हा टोलसंबंधी शासनाने विचार करावा.

यानंतर मी बाब क्रमांक 161वर बोलणार आहे. औद्योगिक न्यायालयाचा कारभार सुधारण्यासाठी शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. कर्मचारी कोर्टात गेल्यानंतर त्याच्या केसेस अनेक वर्ष प्रलंबित राहतात.म्हणून औद्योगिक न्यायालयाकडे देखील शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. आज ठाण्यातील औद्योगिक क्षेत्र बंद पडत चालले आहे. ठाण्यातील हिंद कंटेनरमधील कामगारांना गेल्या 16 वर्षापासून पैसे मिळालेले नाहीत. या खात्याचे मंत्री व आमचे पालक मंत्री श्री.गणेश नाईक यांनी निश्चित अशी भूमिका घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. श्री.गणेश नाईक यांच्या प्रयत्नामुळे हिंद कंटेनरमधील कामगारांना 1 कोटी 64 लाख रुपये मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मंत्रिमहोदयांनी विकास नियमावलीमध्ये बदल सुचविले आहेत म्हणून मी त्यांना धन्यवाद देतो. याचा फायदा पुढचे जे कर्मचारी आहेत, त्यांना होणार आहे. तसेच विकास आराखडा मंजूर झाल्यानंतर तेथील I to R zone मध्ये 15 वर्षे बदल करू नये. हा बदलाचा अधिकार आपण पूर्वी ज्याप्रमाणे ठाणे महानगरपालिका होता, तो त्यांना परत बहाल केला पाहिजे. म्हणजे आपल्या प्रभागामध्ये कोणती कंपनी बंद पडली आहे. यासंबंधीची माहिती तेथील नगरसेवकांना मिळेल व तेथील कर्मचाऱ्यांना पैसे मिळवून देण्यास ते मदत करतील. हिंद कंटेनरमधील कर्मचाऱ्यांना पैसे मिळवून देण्यासाठी श्री.गणेश नाईक यांनी प्रयत्न केल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. युती शासनापासून सुरू झालेली टोल संस्कृती हा फार वाढलेले आहे. त्यावर अंकुश ठेवून ठाणे जिल्हयातील नागरिकांना रिलिफ द्यावा.

यानंतर मी आदिवासी विभागाच्या बाब क्र.225 वर बोलणार आहे. येथे श्री.गावित साहेब सुध्दा आहेत. श्री.गोविंद गारे व श्री.मधुकर पिचड या दोन मान्यवरांच्या जातीच्या पडताळणीत दोष आढळले. यासंबंधी प्रश्न व लक्षवेधी सूचना देखील सभागृहात उपस्थित झाली होती. तेव्हा असे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )4A 2

BGO/ D/ RJW/ 18:05

श्री.अनंत तरे....

उत्तर देण्यात आले होते की, जात पडताळणी समितीने जे निकष सर्वश्री गोविंद गारे आणि मधुकर पिचड यांना लावले आहेत, ते महाराष्ट्रातील महादेव कोळी या जातीच्या उमेदवारांना मिळतील. पण आज पर्यंत त्यासंबंधीची कुठलीही कार्यवाही शासनाने केलेली नाही. तेव्हा यासंबंधी संबंधित अधिकाऱ्यां समवेत माननीय सभापतींनी बैठक लावावी अशी मी विनंती करतो. तसेच जे खरे आदिवासी आहेत, त्यांना सोयी-सवलतीपासून वंचित ठेवता कामा नये. सर्वश्री गोविंद गारे व मधुकर पिचड यांच्या जातीच्या प्रमाणपत्राला वैधता दिलेली आहे. त्याप्रमाणे ती इतर महादेव कोळी समाजाच्या उमेदवारांसाठी देखील ग्राहय धरावी अशी मी विनंती करतो. एस.टी.साठी 50 वर्ष वास्तवाच्या दाखला अनिवार्य केला आहे. ही अट फक्त महादेव कोळी जातीच्या उमेदवारांसाठी लागू आहे. असे केल्यामुळे घटनेप्रमाणे त्यांच्यावर अन्याय होत आहे, तो दूर करावा. धन्यवाद.

....

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 80 वर मी बोलणार आहे. शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर आणि शासकीय कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देण्यासाठी 274,49,96,000 इतक्या रकमेची मागणी केलेली आहे. खरे म्हणजे याबद्दल शिक्षण मंत्री आणि शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. जेव्हापासून केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांच्या भत्त्यात वाढ होते तेव्हापासून शासकीय कर्मचाऱ्यांच्या आणि अनुदानित संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यामध्ये वाढ केली पाहिजे. परंतु आपण तसे केले नाही. असे केले असते तर अधिक बरे झाले असते.

बाब क्रमांक 81, पान क्रमांक 57- शालेय पोषण आहार संबंधी पुरवणी मागणी केलेली आहे. आपण पोषण आहार कायम अनुदानित शाळांना देतो परंतु काही शाळांमध्ये असे काही वर्ग आहेत की जे कायम विनाअनुदानित आहेत. मग एकाच शाळेतील एका वर्गाला खिचडी मिळते तर दुसऱ्या वर्गाला खिचडीपासून वंचित रहावे लागते. ही तफावत आपण दूर करणे आवश्यक आहे. खिचडीमध्ये अळ्या सापडतात, साप सापडतात. जळगावमध्ये एका ठिकाणी खिचडीमध्ये साप आढळला होता. म्हणून खिचडीला पर्याय म्हणून आम्ही ड्रायफ्रूट किंवा बिस्कीटे देण्याचे सुचविले होते. याबाबत शिक्षण मंत्र्यांबरोबर चर्चा देखील केली होती. परंतु त्यांनी सांगितले की, हा सुप्रीम कोर्टाचा आदेश असल्यामुळे त्यांची परवानगी घ्यावी लागेल. तेव्हा आम्ही या संदर्भात सुप्रीम कोर्टाचे आदेश मिळवावेत असेही म्हणणे मांडले होते. पण याबाबत पुढे काय झाले ते मला समजू शकले नाही.

बाब क्रमांक 82- बालवाड्यांमधील बालवाडी सेविकांना भाऊबीज म्हणून प्रत्येक वर्षी 500 रुपये भेट देण्यासाठी 41,77,000 रुपयांची पुरवणी मागणी मांडण्यात आलेली आहे. बालवाडी सेविकांबरोबर महाराष्ट्रात ज्या वसतिशाळा सुरु झालेल्या आहेत. त्यामध्ये जवळपास 9 हजार वसतिशाळा शिक्षक आहेत. त्यांना दरमहा एक हजार रुपये पगार दिला जातो. पण त्यांना वर्षातील 12 महिन्यांपैकी 10 महिनेच पगार मिळतो. वसतिशाळा शिक्षकाच्या वेतनात 500 रुपये वाढ करण्याचा निर्णय झालेला आहे, पण त्याचा लाभ त्या शिक्षकांना दिलेला नाही. त्यामुळे ते शिक्षक दिनांक 12 डिसेंबरपासून आमरण उपोषणास बसले आहेत. ते अतिशय हताश झालेले आहेत.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.........

त्यांच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर त्यांनी सामुहिक आत्महत्या करणार असल्याचे सांगितले आहे. ते शिक्षक फक्त 500 रुपये पगारवाढ मिळावा यासाठी उपोषण करीत नसून त्यांच्या अन्य मागण्या सुध्दा आहेत. त्या संदर्भात मंत्रिमहोदयांनी गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

बाब क्रमांक 83- जिल्हापरिषदांकरिता वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यासाठी 1 कोटी 50 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ज्या काही शाळा आहेत त्या शाळांचा मध्यंतरी सर्व्हे झाला त्यामध्ये जवळपास 55 हजार वर्गखोल्यांचा अनुशेष आहे असे वर्तमानपत्रात वाचनात आले. आपण फक्त 1 कोटी 50 लाख रुपयांची पुरवणी मागणी करीत आहात. ही रक्कम अत्यंत अपुरी आहे. आपल्याला जर खऱ्या अर्थाने ग्रामीण शिक्षणाकडे लक्ष द्यावयाचे असेल तर 55 हजार वर्गखोल्यांचा अनुशेष भरुन काढणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या अनुदानीत शाळा आहेत त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसेल, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नसतील तर अशा शाळांची मान्यता काढून घेण्याची व्यवस्था आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

परंतु ज्या जिल्हा परिषदेच्या, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा आहेत त्यातील 60 टक्के शाळांमध्ये चांगल्याप्रकारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नाहीत. त्यामुळे यामध्ये देखील तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर मी बाब क्र.84, पृष्ठ क्र.88 वर बोलू इच्छितो. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी अनुदान देण्याची पुरवणी मागणी आहे. यासाठी 64 कोटी, 19 लाख 81 हजार रुपयांची मागणी करण्यात आली आहे. सन्माननीय मंत्री श्री.पुरकेसाहेबांना मी याबाबत धन्यवाद देऊ इच्छितो. जिल्हा परिषद आणि उच्च माध्यमिक ज्या शाळा आहेत त्या शाळेमध्ये काम करणाऱ्या पूर्णवेळ शिक्षकांना दिनांक 3 जून, 2000 च्या शासन निर्णयानुसार वेतनश्रेणी लागू झाली होती. ती वेतनश्रेणी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लागू झाली नव्हती. म्हणून आम्ही मागच्या अधिवेशनात ही वेतनश्रेणी मिळावी म्हणून मागणी केली होती. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, यासंदर्भात 1 महिन्यात जी.आर. काढला जाईल. परंतु तो जी.आर. काही निघाला नाही, ग्रामविकास विभागाने यासंदर्भातील जी.आर. नुकताच 11 नोव्हेंबरला काढला आहे. परंतु त्यासाठी शालेय शिक्षण विभागाने पुरवणी मागणी केलेली नाही. त्यामुळे त्या शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू होऊ शकणार नाही. त्यामुळे या दृष्टिकोनातून सुध्दा शासनाने योग्य तो विचार करावा.

यानंतर बाब क्र.85, पृष्ठ क्र.88 वर मी बोलू इच्छितो. लातूरला शाळा न्यायाधिकरण करण्यात आलेले आहे. शाळा न्यायाधिकरणासाठी एका वर्षाला 10 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येते. पंरतु लातूर येथील शाळा न्यायाधिकरणासाठी उर्वरित तीन-चार महिन्यांसाठी 90 हजार रुपयांची मागणी करण्यासंदर्भातील प्रस्ताव आहे. आज महाराष्ट्रात शाळा न्यायाधिकरणाची खरोखरच आवश्यकता आहे काय ? मी मागणी केली होती की, कोकण विभागासाठी स्वतंत्र शाळा न्यायाधिकरण द्या, परंतु त्याबाबत विचार झाला नाही. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हा कोल्हापूरशी जोडला गेला, रायगड जिल्हा पुण्याशी, ठाणे जिल्हा मुंबईला जोडून एकाच विभागाची चार ठिकाणी चिरफाड केली आहे. ही चिरफाड थांबवून कोकणसाठी स्वतंत्र शाळा न्यायाधिकरण देण्यात यावे अशा प्रकारची मी पुन्हा मागणी करीत आहे. शालेय शिक्षण मंत्र्यांनी उत्तर दिले होते की, ज्या ठिकाणी महसुली विभाग आहे त्या ठिकाणी शाळा न्यायाधिकरण देण्याचा शासनाचा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

धोरणात्मक निर्णय आहे. लातूर हा महसुली विभाग नसताना त्या ठिकाणी शाळा न्यायाधिकरण देण्यात आलेले आहे. लातूरला हे न्यायाधिकरण देण्याबाबत माझा विरोध नाही. आपण मला सांगा ज्या ठिकाणी शाळा न्यायाधिकरण स्थापन केले आहे त्या ठिकाणी पदांना मान्यता आहे काय? तेथील कर्मचाऱ्यांना वेतन मिळते काय ? जागेसाठी काय व्यवस्था केली आहे ? महोदय, आज या शाळा न्यायाधिकरणाची दुरावस्था झाल्याचे दिसत आहे.

महोदय, राज्यात शिक्षण सेवक योजना जून, 2000 पासून अस्तित्वात आली आहे. त्यामुळे लिटीगेशन कमी झालेले आहे. ज्यांची सेवा कमी करण्यात आलेली आहे किंवा पदोन्नतीच्या संदर्भातील प्रकरणे असतील तर त्यांना शाळा न्यायाधिकरणाकडे जाता येते. जर कोणावर अन्याय झाला तर यासाठी एक सदस्य समितीकडे जाण्याची तरतूद आहे. न्यायाधिकरणाकडे आता जेवढया पेंडिंग केसेस आहेत तेवढयाच ते काढणार आहे. त्यामुळे या गोष्टीचाही विचार होणे आवश्यक आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील दहाच्या दहा शाळा न्यायाधिकरणांचा आढावा घेतला तर एका न्यायाधिकरणाला पुरेल एवढेच काम आज महाराष्ट्रामध्ये आहे. राज्यातील 915 विनाअनुदानित शाळा शासनाने दिनांक 27 ऑक्टोबर, 2000 च्या निर्णयानुसार अनुदानावर आणल्या आहेत. परंतु पुरवणी मागणीच्या निमित्ताने शासनाने काहीही तरतूद केलेली नाही. त्यामुळे ते शिक्षक आपल्याकडे मोठया अपेक्षने पाहत आहे.

महोदय, यानंतर मी बाब क्र. 86, पृष्ठ क्र.59 वर बोलू इच्छितो. टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना आपण फी माफी देतो. या सवलतीसाठी 1 कोटी 82 लाख, 63 हजार रुपयांची पुरवणी मागणी आलेली आहे. 2004-2005 ची ही मागणी आहे. महोदय, त्या शाळेत 10 वीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी आज शाळा सोडून गेलेले आहेत आणि 12 वीच्या विद्यार्थ्यांनी इतर महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला. त्यामुळे या पुरवण्या मागण्या जरी मंजूर झाल्या तरी मूळ विद्यार्थ्यांना त्याचा काहीएक उपयोग होणार नाही. हा पैसा शाळेकडे गेला तर कशाप्रकारे सह्या आणि अंगठे होतील हे मला माहीत आहे.

नंतर श्री.पुरी....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ..

मी या चर्चेच्या निमित्ताने स्पेसिफिक मागणी करणार आहे, टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्याची फी माफीची जी रक्कम आहे ती रक्कम त्यांना प्रत्यक्षात मिळणार नाही म्हणून इतर व्यक्तीला रक्कम देत असतांना अकाऊन्ट उघडावयास सागितले जाते त्याप्रमाणे 1 कोटी 45 लाख रुपये या विद्यार्थ्यांना चेकने मिळाले पाहिजेत.या दृष्टीने शासन प्रयत्न करणार आहे काय ? या विद्यार्थ्यांना या पध्दतीनेच पैसे दिले गेले पाहिजेत अशी माझी शासनाला नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 87 मध्ये जिल्हा आणि विभागीय क्रीडा संकुलासाठी 25 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे ही फार चांगली गोष्ट आहे.परंतु आज 50 टक्के शाळांना क्रीडांगणे नाहीत. जिल्हा क्रीडा संकुले आणि विभागीय क्रीडा संकुलाचे कामकाज सुरु आहे परंतु त्यांचा उपयोग केव्हा होईल याबाबतीत काही सांगता येत नाही. केवळ क्रीडा संकुले उभे करण्यामध्ये काही अर्थ नाही.त्यासाठी आवश्यक असलेले क्रीडा शिक्षक नेमण्यात आले पाहिजेत. माझ्या माहिती प्रमाणे 40 ते 45 क्रीडा शिक्षकांची पदे महाराष्ट्रात आजही रिक्त आहेत .या संदर्भात मी प्रश्न विचारला होता पंरतु त्या प्रश्नाचे उत्तर मला अजूनही आलेले नाही.परंतु ही पदे भरण्यात आली नसतांना केवळ क्रीडा संकुले बांधण्यात येणार असतील तर त्याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.सभापती महोदय, या शाळांबरोबर तसेच क्रीडा संकुलाबरोबर आज महाराष्ट्रात अनेक क्रीडा मंडळे चांगल्या प्रकारचे काम करीत आहेत. शासनाचे अनुदान मिळो अथवा न मिळो. वेतन मिळो अथवा न मिळो, शासनाचा कोच मिळो अगर न मिळो तरी सुध्दा काही क्रीडा मंडळे चांगल्या प्रकारचे काम करीत आहेत. परवा मी ठाणे येथील एका कार्यक्रमासाठी गेलो होतो आणि श्री. भाई नगराळे हे त्या कार्यक्रमास उपस्थित होते.मल्लखांबावरील विद्यार्थ्याची प्रात्याक्षिके पाहून त्यांना सुध्दा फार आनंद वाटला होता.तेव्हा अशा प्रकारे या. संस्था स्वत: खर्च करुन विद्यार्थी तयार करीत आहेत. राज्य स्तरावरच नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर हे विद्यार्थी आपली चमक दाखवू शकतील आणि ठाण्याचे , महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करु शकतील अशा प्रकारचे कलागुण त्या विद्यार्थ्यांनी दाखवलेले आहे.तेव्हा अशा शाळांना, संस्थाना वा क्रीडा मंडळांना शासन विशेष प्रकारचे अनुदान देणार आहे काय ?या संदर्भात सुध्दा विचार होणे आवश्यक आहे

. सभापती महोदय, यानंतर मी आदिवासी विकासाच्या पूरक मागण्यासंबंधी बोलणार आहे बाब क्रमांक 222 पान नंबर 180 मध्ये अतिरिक्त तुकडयांना सहाय्यक



13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही 4D 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ..

अनुदान देण्यासाठी 65 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमिक शिक्षकांना 7225 रुपये ही वेतनश्रेणी मिळत आहे.ग्राम विकास विभागाने जिल्हा परिषदेच्या उच्च माध्यमिक शिक्षकांना 7225 रुपये ही वेतनश्रेणी दिलेली आहे.आदिवासी भागात काम करणा-या आमच्या उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी शासनाचे असे काय घोडे मारलेले आहे की, त्यांना 7225 रुपये ही वेतनश्रेणी दिली जात नाही.?गेल्या चार पाच वर्षापासून आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत की ,6540 रुपये या वेतनश्रेणी ऐवजी 7225रुपये ही वेतनश्रेणी त्यांना देण्यात यावी. परंतु अद्यापही त्या शिक्षकांना ही वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही. आदिवासी आश्रमशाळेतील अधीक्षकांची शेकडो पदे आजही रिक्त आहेत. त्याचा अतिरिक्त कार्यभार अन्य कर्मचा-यांवर पडत असतो. तेव्हा अधीक्षकांची पदे भरण्याच्या बाबतीत शासन गांभीर्याने विचार करणार आहे काय ? असे मला या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे.सभापती महोदय, यानंतर उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्या पूरक मागण्या सबंधी मला बोलावयाचे आहे.बाब क्रमांक 249 व पान नंबर 227 संबंधी मला एक मुद्दा मांडावयाचा आहे. 17 जानेवारी 2004 च्या जी.आर.नुसार थकबाकी देण्यासाठी 55 कोटी 96 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. त्याबद्दल मी माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांचे अभिनंदन करतो. हा चागला निर्णय शासनाने घेतला असून कर्मचा-यांच्या हिताचा प्रश्न सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. 1 जानेवारी 1996 ते 31 मार्च 2000 पर्यन्तची ही थकबाकी द्यावयाची आहे.ही थकबाकी आता देण्यात येत आहे. पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी प्रमाणे ज्यावेळी थकबाकी देण्यात आली होती त्यावेळी आम्हाला थकबाकी उशिरा देण्यात आली होती.थकबाकी केव्हाही पी.एफ.मध्ये जमा झालेली असली तरी ज्या तारखेला जी.आर. निघाला आणि ज्या तारखेपासून ही वेतनश्रेणी लागू केली तेव्हा पासून भविष्य निर्वाह निधीच्या रकमेवरील व्याज देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. आता सुध्दा 1 जानेवारी 1996 पासूनची आमची थकबाकीची रक्कम असून ही रक्कम आता जमा करण्यात येणार आहे. शासनाने ज्या दिवसापासून हा निर्णय घेतलेला आहे त्या दिवसापासून भविष्य निर्वाह निधीच्या खात्यावर जमा होणा-या रकमेवरील व्याजाची रक्कम दिली पाहिजे. व त्या संदर्भात शासनाने तसा आदेश काढला पाहिजे. या पूर्वी शासनाने राज्य सरकारी कर्मचा-यांच्या बाबतीत निर्णय घेतला होता व शिक्षकांच्या बाबतीत सहा महिने उशिराने

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्णय घेऊन त्यांच्यावर अन्याय केला होता हा भाग वेगळा आहे.परतु राज्य सरकारी कर्मचा-याच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये केव्हाही रक्कम जमा झाली तरी निर्णयाच्या दिनांकापासून व्याज देण्याचा निर्णय घेतला आहे. तेव्हा मी आता सांगितल्याप्रमाणे शासनाने निर्णय घ्यावा अशी विनंती करतो तसेच माझे मनोगत मांडण्यासाठी मला संधी दिल्याबद्दल सभापती महोदय, आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

----

नंतर श्री. सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : माननीय सभापती महोदय, दर अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये आम्ही जे मुद्दे मांडत असतो त्याबाबतीत मला सार्वजनिक बांधकाम विभागाचा अनुभव जो मला आला तो मला येथे सांगितला पाहिजे. उस्मानाबाद-लातूर-नांदेड या रस्त्यासाठी मी एक वर्षापासून वारंवार मागणी केली होती. त्याबद्दल खास म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाने पत्र पाठवून देखील त्या मागणीचा अंतर्भाव यामध्ये केलेला आहे असे मला अधिवेशना अगोदर वेळेवर कळविले त्याबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाचे मी आभार मानते. सभापती महोदय, या वेळच्या पुरवणी मागण्यांमध्ये आपण उस्मानाबाद-लातूर-नांदेड या रस्त्यासाठी जी तरतूद केली आहे ती गोष्ट निश्चितच महत्त्वाची आहे. याच बरोबर आणखी काही रस्त्यांची दुरावस्था मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छिते की ज्यांचा समावेश आपण दिलेल्या या यादीमध्ये नाही. एक म्हणजे औचित्त्याच्या मुद्याद्वारे मी लक्ष वेधले होते ते म्हणजे पुणे-सातारा रस्त्यावर वाईपासून मांढरदेवी आणि मांढरदेवी वरूनच भोर मार्गे पुणे जिल्ह्यात जाण्याचा रस्ता आहे आणि तो अतिशय अरूंद असा घाटरस्ता आहे. तेथून मांढरदेवीला जात असताना अनेक वाहनांचे अपघात झालेले आहेत. शेवटी अक्षरश: विभागीय आयुक्तांना देवीची शांतता करण्यासाठी मांढरदेवीसमोर यज्ञ करावा लागला. माझे असे म्हणणे आहे की, अशा प्रकारे शांतता यज्ञ करण्यापेक्षा तेथे अपघातच घडू नयेत या दृष्टीने सुव्यवस्थित असे रस्ते करण्याचे काम आपण अतिशय युद्ध पातळीवर आपण घेतले पाहिजे. कारण आता यंदा 14 जानेवारीला संक्रात आणि पौष पोर्णिमा असे दोन्ही एकदमच येत आहे आणि त्या दिवशी तेथे प्रचंड प्रमाणात भाविक दोन्ही रस्त्यांनी म्हणजे भोरवरच्या घाटातून की जो अगदी एकेरीच रस्ता आहे आणि वाई वरून वरपर्यंत जाऊन पोहोचणार आहेत आणि या रस्त्यामध्ये अजूनही सुधारणा झालेली नाही. त्याचप्रमाणे ओझर-जुन्नर रस्ताच्या बाबतीत देखील आम्ही पुणे जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये वारंवार मागणी केलेली आहे आणि लोक देखील अष्टविनायकासाठी येतात. परंतु तीर्थ क्षेत्र पर्यटन विकास कार्यक्रमामध्ये त्या पर्यटन क्षेत्राजवळचा रस्ता जोडला जातो परंतु मधले रस्ते जोडले जात नाहीत. परिणामी लोकांचे अतिशय हाल होतात. मी त्या वर्णनामध्ये जात नाही. सभापती महोदय, या ठिकाणी नाशिक जिल्ह्याची खूप मोठी रस्त्यांची यादी दिलेली आहे. पण त्यामध्ये विशेष म्हणजे नाशिक-चांदवड रस्ता हा एवढा भयानक अवस्थेत आहे. सन्माननीय सदस्य

..... 3इ 2 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

डॉ.वसंतराव पवार यांनी उल्लेख केला की, नाशिक मधील रस्ते चांगले झाले आहेत. पण मी सांगू इच्छितो की, आम्ही पुण्यात असलो तरी काही काही वेळेस नाशिकला येत असतो. त्यामुळे मला माहीत आहे की, हा रस्ता इतका हॉरिबल आहे की विचारू नका. हजारो भाविक त्या रस्त्याने वणीला जात असतात. हा रस्ता तातडीने दुरूस्त होणे अत्यंत आवश्यक आहे. तसे पाहिले तर नाशिक ते चांदवड रस्त्याने प्रवास करण्यास साधारणपणे रस्ता चांगला असेल तर तास-सव्वा तास लागतो पण सध्या त्या रस्त्याची अवस्था भयानक झाली असल्याने त्याच प्रवासाला दोन ते अडीच तास वेळ लागतो आहे. त्याचप्रमाणे पुण्यामध्ये चिंचवड-लोणावळा हा तळेगाववरूनचा जुना मुंबई-पुणे रस्ता आहे, त्या रस्त्याकडे देखील मी या निमित्ताने आपले लक्ष वेधते. कारण आता आपला प्रवास हायवेने होत असला तरी मध्यंतरी मला या रस्त्यानेही प्रवास करण्याचा योग आला होता. त्यावेळेस पुणे जिल्ह्यातील आपले सन्माननीय सदस्य या रस्त्यातील खड्ड्यांमुळे कमरेला दुखापत होऊन आजारी पडले होते असे समजले. पिंपरी-चिंचवड-देहू रोड या रस्त्याने तुम्ही बहुतेक सर्व मंत्री लोक नेहमी पुण्याला येत असता. तेव्हा पुण्याच्या आसपासच्या रस्त्यांची देखील काय अवस्था आहे हे आपण जाणून घ्यावे. जिल्हा नियोजन मंडळामध्ये 4-5 मंत्री महोदय असतात आणि त्यावेळेस हा प्रश्न मांडला असता आम्हाला आश्वासने दिली जातात. परंतु सध्या पुण्याच्या आसपासच्या रस्त्यांची आपण परिस्थिती पाहिली तर आज पुणे जिल्हा हा जास्तीत जास्त रस्ते अपघात होणारा जिल्हा म्हणून पुढे येऊ लागला आहे असे आपणा समजून येईल. म्हणून निदान आमच्या जनतेसाठी नाही तर तुमच्या नेतेमंडळींचे स्वास्थ्य चांगले रहावे यासाठी तरी हे रस्ते चांगले करावेत अन्यथा सगळ्यांना विमानानेच ये-जा करण्याची वेळ येईल. म्हणून माझी अशी विनंती आहे की, पुण्याच्या आसपासचे जे रस्ते आहेत त्यांचे बाबतीत आपण स्वत: दोन दिवस वेळ काढून पाहणी करा, म्हणजे त्या रस्त्यांची परिस्थिती काय आहे हे तुमच्या लक्षात येईल. या खेरीज आम्ही मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये वाचले की, पुणे शहरातील खड्डे बुजविण्यासाठी मॉरिशसहून तंत्रज्ञान आणले जाणार आहे. तेव्हा सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांना मला विचारावयाचे आहे की, मॉरिशसच्या विभागाशी आपली काही देवाण-घेवाण, म्हणजे चांगल्या अर्थाने, ज्ञानाची देवाण

.....4इ 3 ...



KBS/ D/ RJW/ श्री.गायकवाड नंतर --- 18:25

घेवाण झाली आहे का ? हे खड्डे बुजविण्याचे तंत्रज्ञान आपण पुणे आणि इतर महानगरपालिका मध्ये वापरणार आहात का याबद्दल खुलासा व्हावा. जेणे करून लोकांनाही याचा फायदा होऊ शकेल.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्याच अखत्यारीतील दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा मी या ठिकाणी मांडणार आहे. अनेक जिल्हाधिकारी आम्ही जेव्हा त्यांच्याकडे भेट देतो तेव्हा आमच्यापुढे सांगत असतात आणि तो म्हणजे अनेक जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये आता महिला कर्मचाऱ्यांची संख्या गेल्या काही वर्षांमध्ये वाढलेली आहे. विशेषत: 33 टक्के महिलांसाठी आरक्षण ठेवण्याची भूमिका आपण स्वीकारल्यापासून, गेल्या दहा वर्षात महिला कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे तसेच ज्या महिला नागरिक जिल्हाधिकारी कार्यालयात जातात. पण त्यांच्यासाठी त्या ठिकाणी स्वच्छता गृहांची संख्या अत्यंत अपुरी आहे. अनेक ठिकाणी आम्हाला विधान परिषद सदस्य म्हणून आमदार निधी मागितला जातो की, महिला कर्मचाऱ्यांसाठी तुम्ही येथे स्वच्छतागृह बांधून देऊ शकाल का म्हणून. तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत जी जी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालये, तालुकाची तहसिलदार कार्यालये वगैरे आहेत त्या ठिकाणी असलेल्या महिला कर्मचाऱ्यांसाठी तसेच तेथे येणाऱ्या महिला नागरिकांसाठी स्वच्छतागृह असणे अत्यंत आवश्यक आहे त्यासाठी स्वच्छतागृहांचा हेड पुढील पुरवणी मागण्यांमध्ये तरी आम्हाला दिसला पाहिजे यादृष्टीने आपण जरूर पाठपुरावा करावा. अजून एक मुद्दा असा आहे की, बारामती येथे नवीन कोर्टाची इमारत तयार झालेली आहे आणि त्यामुळे जुनी इमारत रिकामी झालेली आहे. महिला बालकल्याण विभागाकडून सदरहू जुनी कोर्टाची इमारत महिला वसतीगृहासाठी म्हणून वापरता येईल काय म्हणून विचारणा केलेली आहे आणि महिला आमदारांच्या समितीने 6 महिन्यपूर्वी जेव्हा तेथे भेट दिली होती त्यावेळेसही आम्हाला असे दिसले की, तेथे भाड्याच्या इमारतीमध्ये सदर महिला वसतीगृह आहे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडे गेली सहा वर्षे ते यासाठी प्रस्ताव देत आहेत की, आम्हाला दुसरी एखादी इमारत बारामतीमध्ये उपलब्ध करून द्यावी.

( यानंतर श्री. सरफरे ... 4एफ ...

अशुध्दप्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

ही इमारत उपलब्ध झाली नाही तर महिलांचे वसतिगृह बारामतीवरुन शिरुरला हलवावे लागेल. कारण आज ते भाडयाच्या इमारतीमध्ये आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, जुनी बारामती कोर्टाची इमारत आहे तिची थोडीशी डागडुजी करुन महिलांच्या वसतिगृहासाठी तिचा उपयोग करता येईल. कोर्टाने ती इमारत सरेंडर केली आहे, त्यांना नवीन इमारत मिळाली आहे. या विभागाला समितीपुढे साक्षीसाठी बोलाविण्या अगोदर त्यावर कारवाई झाली तर ते अधिक चांगले होईल असे मला सांगावेसे वाटते. नगर विकास विभागाच्या संदर्भात बाब क्रमांक 89-90 मध्ये नाशिक महानगरपालिकेमध्ये प्राथमिक विकासासाठी तरतूद कली आहे. सर्व महानगरपालिकांमध्ये महिला व बाल कल्याण समित्या आहेत. त्या समित्यांना 10 टक्के निधी उपलब्ध करुन द्यावा असे सांगितले आहे. परंतु ज्या सोयी-सुविधांसाठी महानगरपालिकेला निधी मिळतो त्यामध्ये देखील काही विषय असे आहेत .उदा. पाण्याच्या संदर्भात, इस्पितळाच्या संदर्भात, आरोग्य केंद्राच्या संदर्भात, मुलींच्या शाळा गळतीच्या संदर्भात, महिला बचत गटासाठी असलेल्या विकास भवनाच्या संदर्भात स्थायी समितीमार्फत तरतूद केली पाहिजे. फक्त महिला व बाल कल्याण समितीच्या निधीमधून त्यांचा विकास होईल असे नाही. जो निधी उपलब्ध करुन देता तो देतांना सर्वांचा विकास होईल, या दृष्टीकोनातून एक नागरी विकास धोरण अंमलात आणावे. त्यामधून महानगरपालिकांना स्वत:च्या विकास योजना आखणे सोपे होईल.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र. 12 मध्ये माहिती व प्रसारणासाठी वर्तमानपत्रांना आणि इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांसाठी आपण निधीची तरतूद केली आहे ही चांगली गोष्ट आहे. माझी विनंती आहे की, मराठी वृत्तपत्रे आणि मराठी वाहिन्यांवर मराठी जाहिराती देण्यासाठी हा निधी वापरला पाहिजे. मी हिंदी वाहिन्यांच्या विरुध्द नाही. परंतु आपले मराठी लाभधारक आहेत. मी नेहमी वर्तमानपत्रांमध्ये पाहिले आहे की, सातत्याने एका पक्षाच्या बातम्या येतात. याचे कारण दिल्लीतील लोक इंग्रजी बातम्या वाचतात. इतर वर्तमानपत्रांमधील अग्रलेख ट्रान्सलेट होऊन ते दिल्लीला जातात. म्हणून आपल्याला सांगावयाचे आहे की, जनतेला माहिती पोहोचवायची आहे, ती मराठी वाहिन्यांवरुन पोहोचविली पाहिजे. दुसरे असे की, तुम्ही स्वत:च्या जाहिरातींचे विश्लेषण करा. त्यामध्ये जाहिरातींवरील माणसे जी मराठी भाषा बोलतात ती खोटारडी ग्रामीण भाषा दाखवितात, ती हास्यास्पद वाटते. त्या माणसाची भाषा शुध्द असते, त्यासाठी तुम्हाला पुण्यातील मॉडेल्स मिळत असतील. त्या खोटारडया भाषेचा मेसेज काय जातो हे मला कळत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

नाही. इतके प्रगत शास्त्र झाले आहे. त्या जाहिराती इफेक्टिव्ह कशा होतील, त्यामधून लोकांपर्यंत कसा मेसेज पोहोचेल हे बघणे आवश्यक आहे असे मला सांगावेसे वाटते.

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भात एक मुद्दा सांगणार आहे. आपल्याला कल्पना आहे की, विधान परिषदेचे माजी सभापती माननीय श्री. ना. स. फरांदे होते तेव्हा अनेक वर्षे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या नेवासे येथील समाधी स्थळाच्या निधीसाठी आवाज उठविला जायचा. शासनाने वेळोवेळी त्यांची मागणी मान्य केली आहे. ज्यावेळी माननीय श्री. फरांदे सर हे सभापती पदावरुन दूर झाले त्यानंतर शासनाला नेवासे येथील संत ज्ञानेश्वरांच्या समाधी स्थळाचा विसर पडल्याचे दिसते. मी एकदा वर्तमानपत्रामध्ये वाचले की, माननीय श्री. फरांदे सर हे वारकऱ्याच्या वेशामध्ये संभाजीनगर येथील मंत्रिमंडळाच्या बैठकीनिमित्त किर्तन-भजन करीत जाणार होते. त्यावेळी तुम्ही असे करु नका अशाप्रकारची विनंती शासनाने त्यांना केली. या निमित्ताने मला मराठी गाण्यातील "विसरशील खास मला दृष्टीआड होता" या ओळी आठवतात. तसे माननीय श्री. फरांदे सरांच्या बाबतीत कुणीही करु नये. संत ज्ञानेश्वरांच्या समाधी स्थानासाठी निधीची तरतूद करणे ही सर्वांची कमिटमेंट आहे. त्या दृष्टीकोनातून शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने विचार केला पाहिजे असे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, आदिवासी विभागातील अंगणवाडी शिक्षिकेसाठी भाऊ बीजेची तरतूद केली आहे हे एक सुचिन्ह आहे असे मला वाटते. माननीय श्री. मनोहर जोशी हे मुख्यमंत्री असतांना त्यांनी एका चांगल्या प्रघाताला सुरुवात झाली. परंतु यामध्ये अंगणवाडी सेविका समाधानी नाहीत. याचे महत्वाचे कारण असे की, गावामध्ये एक ग्रामस्थांचे दैवत असते. ग्रामीण भागात, गावामध्ये कोणताही कार्यक्रम असेल तर खंडोबाला, म्हसोबाला नमस्कार करुन तो सुरु होतो. कोणतीही शासनाच्या विकासाची योजना ही अंगणवाडी शिक्षिकेशिवाय पूर्ण होत नाही. पोलीओची लस, धान्य वाटप, पिण्याचे पाणी योजना राबवायची असेल, कुपोषण देखील थांबवायचे असेलतर अंगणवाडी शिक्षिकांना न्याय देणे आवश्यक आहे. आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग आणि महिला व बाल कल्याण विभाग यांनी मिळून त्यांना पूर्ण वेळ कामाची जबाबदारी देऊन त्यांच्या वेतनाच्या संदर्भात विचार झाला पाहिजे असे मला सुचवावेसे वाटते. शालेय शिक्षण विभागाने बालवाडी शिक्षिकांसाठी भाऊबीजेची व्यवस्था केली आहे.परंतु ज्या वस्ती शाळा आहेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

त्यांची कांही संस्थांनी पहाणी केली. त्यावरुन असे चित्र दिसते की, 48 टक्के शाळांमध्ये पूरक आहार मिळालेला नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

37 टक्के शाळांमध्ये खडू-फळाच नाही आणि 8 हजार वसती शाळांवर 52 कोटी रुपये खर्च झाले आहेत. माझी शालेय शिक्षण विभागाला अशी विनंती आहे की, आपण या सर्व लोकांना विश्वासात घेऊन या वसती शाळा कशा परिणामकारक होतील हे पहावे. त्याचबरोबर आदरणीय माननीय मंत्री श्री.हसनजी मुश्रीफ सभागृहात आहेत. आम्ही ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या प्रश्नाबाबत सतत दोन वर्षे ठराव देत आहोत आणि माननीय मंत्री महोदय श्री.हसन मुश्रीफसाहेब, आपण आम्हाला एवढे मोठे आश्वासन दिले की, आमचा खरोखरच त्या आश्वासनावर विश्वास बसला. तुम्ही मला असे सांगितले होते की, ताई, तुम्हाला विधानपरिषदेमध्ये परत हा विषय मांडण्याची वेळ येऊ देणार नाही. त्यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडेसरांनीही परत तसाच ठराव आणला, त्यालाही तुम्ही तसेच उत्तर दिले आणि ऊस तोड कामगारांची मुले अजूनही वणवण भटकत आहेत. त्यांच्यासाठी एका पैशाची तरतूद केली नाही. आम्ही जेव्हा आदरणीय सभापतींना विचारतो की, अशा अनिर्णित प्रश्नांचे काय ? तेव्हा माननीय सभापती महोदय सांगतात की, तुम्ही पुरवणी मागण्यांच्या वेळी हा विषय उपस्थित करा. त्यामुळे आम्हाला इच्छा नसली तरी सर्व माननीय मंत्री महोदयांची उत्तरे ऐकत रहावेच लागते.कारण त्या प्रश्नांना काही वावच नाही. त्यामुळे या ऊस कामगारांच्या मुलांच्या शाळेसाठी यावेळी सुध्दा तुम्ही तरतूद का केली नाही ? याचे कारण मला माहिती नाही. त्यांच्यासाठी देखील पुढच्या वेळी तरतूद केली पाहिजे असे मला खास करुन सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, उच्च तंत्रशिक्षण विभागाच्या पान क्र.77,बाब क्र.251 यामध्ये आपण सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदान देण्याच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. मी त्याचे स्वागत करते.या सदनाचे माजी सन्माननीय सदस्य श्री.गंगाधरजी पटने सातत्याने ग्रंथालयांच्या प्रश्नाबाबत आवाज उठवित असत. परंतु पुणे विद्यापीठामध्ये गेल्या आठ वर्षापासून स्त्री अभ्यास केंद्र काम करीत आहे. गेल्या तीन वर्षापासून सातत्याने मी यासंदर्भात ज्या मागण्या मांडल्या आहेत, त्या जेव्हा मी स्वत:च नीट वाचल्या. या पुणे विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्राला किती अनुदान पाहिजे तर 12 ते 15 लाख रुपयांचे अनुदान त्यांना अपेक्षित आहे. यासाठी दहा वर्षे त्यांचे प्रयत्न सुरु आहेत. त्याठिकाणी लोकसभेच्या आणि राज्यसभेच्या सन्माननीय सदस्यांनाही बोलविण्यात आले होते, तेव्हा त्यांनीही त्यांच्या कामाचे कौतुक केले आहे. पण महाराष्ट्र शासन पुणे विद्यापीठातील स्त्री अभ्यास

. . . .4 जी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

केंद्राबद्दल एवढे नाराज का आहे याचे कारण त्यांचे त्यांनाच माहिती. पण स्त्री अभ्यास केंद्राला अनुदान देण्याच्या संबंधातील फाईल माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याकडे पडलेली आहे अशा प्रकारचे उत्तर गेली तीन वर्षे हे अभ्यास केंद्र ऐकत आहे. मी त्या अभ्यास केंद्राची एक सल्लागार आहे. या दृष्टीकोनातून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने पुढील एक महिन्याच्या आज याबाबतीत मान्यता दिलीच पाहिजे अशी मी मागणी करते आणि माझे दोन शब्द संपविते.

-----

. . . .4 जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या पान क्र.5, बाब क्र.6 संबंधात बरेच सन्माननीय सदस्य बोलले आहेत. याठिकाणी कै.शहाजीराजे भोसले यांच्या स्मारकासाठी 50 लाख रुपये आणि कै.डॉ.रफीक झकेरिया, थोर स्वातंत्र्यसैनिक कै.गोविंदभाई श्रॉफ आणि माजी मुख्यमंत्री कै.शंकरराव चव्हाण यांचे पुतळे उभे करण्यासाठी प्रत्येकी दहा लाख रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, फक्त पुतळे उभारण्यापेक्षा त्यांच्या कार्याची सर्वांना ओळख व्हावी, त्यांची आठवण रहावी म्हणून त्यांच्या वस्तू किंवा त्यांची ग्रंथसंपदा याची माहिती मिळेल यादृष्टीने स्मारक उभे करावे असे मला वाटते. तसेच कै.प्रतापराव गुजर यांच्याबद्दल सन्माननीय सदस्य बोलले आहेत. पण हा निर्णय फार उशीरा घेतलेला आहे.

वेडात मराठे वीर दौडले सात,
श्रुती धन्य जाहल्या श्रवुनी आपुली वार्ता
रण सोडूनी सेना सागर आमुचे पळता
भर दिवसा आम्हा दिसू लागली रात

ही संपूर्ण कविताच त्यावर कोरण्यात यावी असे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, याच विभागाच्या पान क्र.6, बाब क्र.10 यामध्ये माहितीच्या अधिकाराअंतर्गत राज्य माहिती आयोग व त्याच्या आस्थेपनेवरील 18 पदे आणि वार्षिक खर्च 22 लाख 40 हजाराची आणि 16 हजाराची पूरक मागणी करण्यात आली आहे. हा चांगला उपक्रम आहे आणि याचे सर्वांनी खरोखर स्वागत केले आहे. पण याचा उपयोग चांगल्या प्रकारे व्हावा आणि योग्य माहिती मिळावी अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, पान क्र.7, बाब क्र.13 मध्ये पूर परिस्थितीची माहिती देण्यासाठी जाहिरात खर्चासाठी 1 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. पण हे उशीरा सूचलेले शहाणपण आहे असे म्हणावयास हरकत नाही. म्हणजे अशा प्रकारचा पुढे प्रसंग ओढावला तर यापूर्वी झाले तसे होणार नाही अशी अपेक्षा करावयास हरकत नाही.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्र.80 याबाबतीत बऱ्याच जणांनी उल्लेख केलेला आहे. पण जेव्हा सरकारी कर्मचाऱ्यांना डी.ए.मिळतो, तेव्हा तो सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना का मिळत नाही ? तुम्हाला माहिती असते की, दर सहा-सहा महिन्यांनी

. . . .4 जी-4



श्रीमती संजीवनी रायकर . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डी.ए.मिळणार आहे. पण त्याबाबतीत अगोदरच तरतूद का करीत नाही ? सरकारी कर्मचाऱ्यांसाठी तरतूद करता, तशी ती शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी का करीत नाही ? प्रत्येक वेळी आम्हाला हाच प्रश्न विचारला जातो की, सरकारी कर्मचाऱ्यांना डी.ए.मिळतो मग आम्हालाच डी.ए.मिळण्यासाठी एवढा उशीर का होतो ? मग असाही प्रश्न विचारला जातो की, डी.ए.उशीरा दिल्यामुळे तो व्याजासकट देणार आहात का ? सोलापूर येथील कनिष्ठ महाविद्यालयातील जी मंडळी आहेत, त्यांना तीन-तीन वर्षे झाली तरी मान्यताच मिळालेली नाही. ते सारखे प्रश्न विचारतात की, आम्हाला कधी मान्यता देणार आहात ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर

काहींना आपण डी.अे.देतो आहोत आणि काहींना अजून मान्यता दिलेली नाही. तीन-तीन वर्षे ते फुकट शिकवत आहेत.

त्यानंतर पृष्ठ क्रमांक 57, बाब क्रमांक 81 दुपारच्या जेवणाबाबत बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी ऊहापोह केला. केंद्र शासन 1 रुपया देते, महाराष्ट्र शासन 50 पैसे देते. खाजगी प्राथमिक शिक्षकांना फक्त एक रुपयाच मिळतो, महाराट्र शासनाचे 50 पैसे मिळत नाहीत. दुपारच्या भोजनाचे अनुदान काही शाळांना कमी दिले जाते आणि काही शाळांना अजिबात अनुदान मिळत नाही. मिळाले तर ते फार उशिरा अनुदान मिळते. दोन-दोन महिन्याचे अजूनही वाटप झालेलेच नाही, असे आढळलेले आहे. काही कार्पोरेशनने बिस्कीटे अशाप्रकारचा कोरडा खाऊ देऊ करत आहेत,तसे आपण करावे. मघाशी उल्लेख झाल्याप्रमाणे कोणातरी पालकांना खिचडीमध्ये साप पडलेला आढळला म्हणून त्या शिक्षकाला सस्पेंड करण्यात आले. तो शिक्षण सेवक होता. त्याचा खरा तर दोष नाही, हेडमास्तर त्या दिवशी गैरहजर होते, म्हणून तो खिचडीचे वाटप करत होता. एवढाच त्याचा दोष. तो शिक्षक सस्पेंड झालेला आहे. बऱ्याचवेळा वरुन पाली पडतात. तशा प्रकारे या मध्ये झालेले नाही. साप पडला आहे, असे म्हटल्यानंतर मुले घाबरतात आणि मुलांना उलट्या होतात. प्रत्यक्षात त्यांना विषबाधा झालेली नसते, असे आढळून आलेले आहे. याची देखील चौकशी व्हावी आणि शिक्षकांवर जे संकट आहे ते आपण दूर करावे.

त्यानंतर पृष्ठ क्रमांक 58, बाब क्रमांक 64, माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्यक अनुदान. 64 कोटी 19 लाख 81 हजार रुपयाची मागणी केलेली आहे. मुंबई महानगरपालिकेच्याबाबतीत मी मघाशी उल्लेख केला. मी सांगते की, पाच-सहा वर्षे या शिक्षकांना रिटायर झाल्यानंतर त्यांना पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळालेली नाही. ते असे म्हणतात की, आम्ही जिवंत असेपर्यन्त तरी आम्हाला ही थकबाकी मिळणार आहे काय ? याबाबत कार्पोरेशनकडे विचारणा केली असता ते सांगतात की,महाराष्ट्र शासनाने आम्हाला रक्कम दिलेली नाही. ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे, याचाही विचार शासनाने करावा.

पृष्ठ क्रमांक 55 यामध्ये अशासकीय प्राथमिक शाळांना सहाय्यक अनुदान 10 लाख 10 हजार दिलेले आहेत, ती रक्कम फार अपुरी आहेत. त्यामध्ये काही बाबींचा उल्लेख केला पाहिजे. नगरपालिका आणि जिल्हा परिषद हद्दीतील प्राथमिक शाळांचे थकित वेतनेतर अनुदान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर.....

मिळाले पाहिजे. माध्यमिकला अनुदान मिळाले, परंतु प्राथमिक शाळांना अनुदान मिळत नाही. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रिक्त जागा भरण्यासाठी तरतूद केली पाहिजे. यासाठी पैसे उपलब्ध करुन दिले पाहिजेत. नैसगिक वाढीच्या तुकडयांवर काम करणाऱ्या शिक्षकांना, कर्मचाऱ्यांना वेतनाची तरतूद केली पाहिजे. त्याचबरोबर प्लॅनमधील शाळांच्या अनुदानाचा समावेश केला पाहिजे, तो केलेला नाही. गडचिरोली विभागामध्ये प्राथमिक विभागाला प्रोत्साहन भत्ता मे-जूनमध्ये दिला जात नाही. बाकी सगळयांना प्रोत्साहन भत्ता दिला जातो, परंतु यांनाच दिला जात नाही याचा देखील आपण विचार करावा. उच्च व तंत्र विभाग पृष्ठ क्रमांक 227, बाब 248, अशासकीय महाविद्यालयांना अनुदान. मघाशी देखील मी मुद्दा उपस्थित केलेला आहे. जुलैपासूनच्या महागाई भत्त्याची तरतूद आता आपण केलेली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना जेव्हा महागाई भत्ता दिला जातो, त्याच वेळी त्यांनाही देण्याची व्यवस्था करावी. बाब क्रमांक 249, व्यवसाय तंत्र शिक्षणाची सर्वांची सुधारित वेतनश्रेणीची थकबाकी देण्याबाबतची मागणी आहे. खरे म्हणजे गेल्या अधिवेशनामध्ये ही तरतूद करायला पाहिजे होती. ती आता आपण करत आहात. भविष्य निर्वाह निधीमध्ये 50 टक्के रक्कम द्यावयाची आहे, ती व्याजासहित द्यावी, अशाप्रकारची मागणी यापूर्वी केलेली आहे त्यामुळे पुन्हा त्याबाबत सांगत नाही. पृष्ठ क्र. 228, बाब क्र. 251, 100 वर्षे पूर्ण झालेल्या 77 सार्वजनिक ग्रंथालयांना म्हणजे शासनाला उशिराने का होईना पण काही तरी करावेसे वाटले. ही आनंदाची गोष्ट आहे. बाब क्रमांक 252, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची थकबाकी देण्याबाबतची मागणी आहे. 3 कोटी 60 लाख 90 हजार तरतूद केलेली आहे. ही अनेक दिवसापासूनची मागणी पूर्ण केली जाणार आहे त्यामुळे त्यांना थोडा आनंद वाटेल. त्याचबरोबर विनाअनुदानित शाळा ज्या अनुदानावर आलेल्या आहेत, त्यांना अनुदान जी.आर. काढून जाहीर केल्याबरोबर कित्येक शाळांनी जिल्ह्याजिल्ह्यामधून आनंदोत्सव साजरे केले. पण प्रत्यक्षात याबाबत तरतूदच नाही. लोक माझ्याकडे विचारणा करत आहेत की,ज्या अनुदानावर आलेल्या तुकड्या आहेत त्याचे काय ? त्यावर मी म्हटले की, तुकड्या सोडा,अगोदर अनुदानित म्हणून ज्या शाळांना मान्यता मिळालेली आहे, त्यांची तरतूद अजूनही झालेली नाही. तुमची तुकड्यांची तरतूद नंतर होईल. आम्ही त्यांना काय आश्वासन देणार ? आता शिक्षण मंत्री काय आश्वासन देतात ते पाहू या. पृष्ठ क्रमांक 67 बाब क्रमाकं 92 मूल्य वर्धित कराची प्रसिध्दी यासाठी 2 कोटी 30 लाख रुपये जाहीर झालेले आहेत. या विधेयकाच्यावेळी मी एक सुधारणा सुचविली होती.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर..

या विधेयकाला कलम 61 ला एक सुधारणा सुचविली होती. अकाऊंटन्टची व्याख्या अकाऊंटन्ट म्हणजे चार्टर्ड अकाऊंटन्ट असे म्हटले होते. त्यात बदल झाला आहे असे ऐकीवात आहे. चॅर्टर्ड अकाऊंटन्टच्या बरोबर कॉस्ट अकाऊंटन्टचासुध्दा समावेश केला आहे असे ऐकले आहे. प्रत्यक्षात तसा बदल केला आहे काय ?याचा खुलासा करावा. झाला असल्यास त्याबद्दल मी शासनाला आगोदरच धन्यवाद देते. आदिवासी विकास यामध्ये पृष्ठ 182, बाब 226. अंगणवाडी कर्मचा-यांना भाऊबीज. ही भाऊबीज पुरवणी मागण्यांत कशासाठी देता? त्यांना 500 रुपये देण्याचे एकदा ठरले आहे. मग आगोदरच त्याची तरतूद का करण्यात आली नाही? बालवाडी शिक्षकांच्या बाबतीत सुध्दा ती गोष्ट आहे. तेव्हा शासनाने यासंबंधीची तरतूद अगोदरच करावी, अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करते. धन्यवाद.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्यारा निर्वाचित )सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलावेसे वाटत नव्हते. कारण गेल्या पाच वर्षापासून या पुरवणी मागण्यांवर मी सातत्याने विचार मांडीत आहे, परंतु त्यातून काही निष्पन्न होत नाही. बाब क्रमांक 5,6 आणि 7. शहाजीराजे भोसले यांचे स्मारक बांधणे, डॉ. रफिक झकेरिया आणि श्री. गोविंदभाई श्रॉफ आणि श्री. शंकरराव चव्हाण यांचे पुतळे उभारणे. तसेच प्रतापराव गुजर यांच्या स्मारक स्थळाचा विकास करण्यासाठी तरतूद केलेली आहे. ही अभिनंदनीय गोष्ट आहे. थोर समाजसेवक किंवा श्री. प्रतापराव गुजरांसारखे ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली अशा व्यक्तिची स्मारके होणे गरजेचे आहे. मला शासनाला विनंती कराविशी वाटते की, ज्या वेळी अशा प्रकारे स्मारकांसाठी किंवा पुतळयांसाठी तरतुदी करण्यात येतात त्यावेळी त्या मनापासून कराव्यात. त्या अंमलात येतात कां ? किंवा त्या कृतीत येतात कां? हे सुध्दा पाहणे गरजेचे आहे. गेल्या तीन वर्षापासून मी श्री. बा.सी. मर्ढेकरांच्या स्मारकासाच्या संदर्भात मागणी केलेली आहे.त्या गावाला मी जेव्हा जाते तेव्हा हे स्मारक कधी होणार आहे असे तेथील लोक मला विचारात असतात.कारण त्या स्मारकाच्या संदर्भात अद्याप काहीच झालेले नाही. तेव्हा शासनाने या स्मारकांच्या बाबतीत अशी उदासिनता ठेवू नये असे मला शासनाला सांगावेसे वाटते.

बाब क्रमांक 81. दुपारचे अन्न खिचडी शिजविण्याच्या बाबतीत मी सांगणार आहे. याचे कारण असे की, मी पंचायती राज समितीमध्ये असल्यामुळे अनेक जिल्हयांमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये जाऊन आम्ही तपासणी केलेली आहे. याबाबतीत प्रामाणिकपणे माझे असे मत झाले आहे की, खिचडी शिजवणे बंद केले पाहिजे. कारण मुलांना योग्य प्रकारे खिचडी मिळत नाही. ज्या ठिकाणी खिचडी शिजवली जाते ती जागा अस्वच्छ असते, पाणी अस्वच्छ असते. एका शाळेत तर असे आढळून आले की, शाळेत मुले येत होती. त्यावेळी मी शिक्षकांना प्रश्न विचारला की, मुलांना कां सोडण्यात आले ? तर त्यांनी सांगितले की, डबे खायला मुलांना सोडण्यात आले आहे. तेव्हा आम्ही प्रश्न विचारला की, मुलांना खिचडी खायला दिली नाही काय? त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, आज जी खिचडी शिजविण्यात आली होती, तिचा वास येत होता. म्हणून आम्ही मुलांना जेवायला घरी सोडले होते. त्यानंतर आम्ही तेथील डाळ आणि तांदूळ पाहिला. त्या ठिकाणी दुसरा तांदूमळ आणि डाळ चांगली होती. शिजवतांना हे लक्षात आले असते. असा प्रकार आहे. काही शाळांमध्ये फक्त भात शिजवतात आणि मुलांना घरुन पातळ भाजी आणायला

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

सांगतात. मग ती मुले डब्यातून पातळ भाजी आणतात त्यामुळे त्यांची वहया-पुस्तके खराब होतात. आम्ही स्वत पाहिलेले हे सांगत आहे.मी ऐकीव सांगत नाही. ज्या ज्या जिल्हा परिषदांना आम्ही भेटी दिल्या त्या ठिकाणी आम्ही हे पाहिलेले आहे.म्हणून माझी सूचना अशी आहे की, हा खिचडीचा प्रकार बंद करुन पुन्हा विद्यार्थ्यांना धान्य देण्यात यावे.

बाब क्रमांक 83 पान क्रमांक 57. जिल्हा परिषदेकरिता वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्यासाठी या ठिकाणी तरतूद केलेली आहे. खरोखरच याची गरज आहे.काही ठिकाणी इयत्ता पाचवी-सहावीचे वर्ग एकाच वर्गात भरविण्यात येतात तसेच इयत्ता तिसरी-चौथीचे वर्ग देखील एकाच वर्गात भरविण्यात येतात. ही आवश्यक बाब आहे. परंतु शासनाचे एका गोष्टीकडे मला लक्ष वेधावयाचे आहे. काही जिल्हा परिषदांच्या शाळामध्ये मुलांना थंडीच्या दिवसात सुध्दा खाली जमिनीवर बसावे लागते. तेव्हा सर्व शिक्षा अभियानातून त्या विद्यार्थ्यांसाठी बस्करपट्टया देऊ शकतो. जिल्हा परिषदेच्या एका शाळेत मुलींच्या अंगावर गणवेश नव्हता. त्याबाबत चौकशी केली असता त्या मुलीने सांगितले की, माझ्या छोटया बहिणीने तो गणवेश घातला आहे. हे गणवेश अशा लोकांकडून शिवून घेण्यात येतात की, त्या विद्यार्थ्यांची नीट मापे देखील घेण्यात येत नाहीत त्यामुळे त्यांना तो गणवेश येत नाही. त्यामुळे त्यांचा गणवेश त्यांची लहान भावंडे घालतात असे त्या ठिकाणी आढळले, हे सुध्दा बरोबर नाही. गणवेश द्यायचे आहेत तर ते व्यवस्थित दिले पाहिजे. अनेक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुलांसाठी आणि मुलींसाठी शौचालयाची व्यवस्था नाही. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. या गोष्टीकडे सुध्दा लक्ष दिले पाहिजे. त्याचबरोबर त्या मुलांचे शिक्षण कसे चालले आहे या गोष्टीकडेही लक्ष द्यायला पाहिजे. अनेक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आम्ही मुलांना उभे करुन त्यांना पाढे विचारले परंतु मुलांना पाढे म्हणता आले नाहीत. त्यांना लिहिता वाचता येत नाही. यासाठी शासनाने केंद्र प्रमुख नेमले आहेत. पण ते काय करतात? ते तासिका घेतात कां दुसरेच उद्योग करीत असतात याकडे सुध्दा लक्ष देण्याची गरज आहे.

यानंतर श्री.पी. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे .......

महोदय, बाब क्र. 223, पृ.क्र.180, शालेय शिक्षण विभाग, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी या मागणीअन्वये तरतूद केलेली आहे. हा उपक्रम सुध्दा अत्यंत चांगला आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे परंतु दुर्गम भागात पाहिले तर असे लक्षात येते की, शालेय आरोग्य तपासणीसाठी गेले असता सर्वच विद्यार्थी एका वेळी हजर नसतात त्यामुळे त्यांची आरोग्य तपासणी राहून जाते. तसेच ज्यांची आरोग्य तपासणी होऊन काही मुलांना साधी लागण तर काहींना दुर्धर आजाराची लागण झाल्याचेही आढळून येते. या आजारी मुलांचा पुढील उपचारासाठी फॉलो-अप कशा प्रकारे केला जातो याची माहिती कुठेही योग्य प्रकारे मिळत नाही, याबाबतचा आढावा मंत्रालयाच्या पातळीवर होणे आवश्यक आहे तसेच हे आजार पुन्हा होऊ नये याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. त्यानंतर बाब क्र. 224 या ठिकाणी सुध्दा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह सुरु करणे यासंदर्भात पूरक मागणी करण्यात आली आहे. याबाबत मला असे सुचवावयाचे आहे की, मुंबईच्या वसतिगृहाची अवस्था आज अत्यंत वाईट आहे, ती अवस्था दूर करावी व त्या वसतिगृहामध्ये प्राथमिक सुविधा मिळाव्यात. कारण अशा ठिकाणी मुलांना आंघोळीची देखील व्यवस्था नसते, शौचालयाची सोय नसते यादृष्टीने लक्ष दिले पाहिजे, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

--------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्र.6, पृ.क्र.5 बाबत या विवरण पत्रात नमूद केले आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करणार आहे. कारण शहाजी राजे भोसले, रफिक झकेरिया, गोविंद श्रॉफ आणि शंकरराव चव्हाण यांचे स्मारक बांधण्यासाठी ही तरतूद केलेली आहे. शहाजी राजे भोसले यांचे स्मारक औरंगाबाद येथे बांधले जाणार आहे आणि त्यासाठी 50 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. उशिरा का होईना परंतु याबाबत शासनाला जाग आली त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. पण याच प्रसंगी एक गोष्ट मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, यापूर्वी अशी जी स्मारके बांधली गेली आहेत, त्यांची जी दुरावस्था सध्याच्या परिस्थितीत आहे ती पाहिली तर मन विषण्ण होईल अशी आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर चौंडी येथील अहिल्यादेवीचे स्मारक बांधण्यासाठी युती शासनाच्या काळात 2 कोटी रुपये खर्च करुन ते बांधण्यात आले. हे काम शेवटच्या टप्प्यात असतांना युती शासन गेले आणि कॉंग्रेस सरकार सत्तेवर आले. त्यावेळी राहिलेली 20 लाखाची रक्कम या कॉंग्रेसच्या सरकारने अडविली. मुख्य म्हणजे माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी चौंडी या गावाला एक मेळावा घेतला होता, त्या मेळाव्याला अनेक मंत्री व लोकप्रतिनिधी देखील उपस्थित होते. त्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, चौंडीच्या विकासाला निधी कमी पडू दिला जाणार नाही. या गोष्टीला जवळजवळ 6 वर्षे झाली परंतु अद्याप निधी मिळू शकला नाही. अशा प्रकारे महाराष्ट्र कन्या अहिल्यादेवीच्या स्मारकाची अवहेलना होणे ही महाराष्ट्राला शोभनीय बाब नाही. युतीच्या काळात 20 कलमी कार्यक्रम सुध्दा अहिल्यादेवीचाच होता व यासंबंधीचा रिपोर्ट आपल्या अधिकाऱ्यामार्फत शसनाने मागवून घ्यावा. या स्मारकाच्या ठिकाणी आज सगळया जागेवर कॉंग्रेस नांवाचे विषारी गवत उगवलेले आहे. ....त्या गवताचे नांव "कॉंग्रेस" आहे, त्यात माझा दोष नाही. हे गवत विषारी आहे आणि ते खाण्यासाठी गुरे जातात म्हणून कंपाऊंड वॉल बांधणे आवश्यक आहे. या गवताला हात जरी लावला तरी हाताला ते चावते. या स्मारकाच्या ठिकाणी आतमध्ये एक हॉल तयार केलेला असून त्या हॉलमध्ये जाऊन बिचारी गुरे विश्रांती घेतात, अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ....

या ठिकाणी जे गेस्ट हाऊस आहे ते सुध्दा बंद पडलेले आहे. गेल्या चार वर्षापासून या गेस्ट हाऊसवर अटेन्डन्ट सुध्दा नाही. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी स्मारके बांधलेली आहेत त्यांची देखभाल करण्यासाठी शासनाकडे निधी नसेल तर शासनाने तसे स्पष्ट सांगावे की, स्मारकांना निधी देण्यासाठी आमच्याकडे पैसे नाहीत. असे जर शासनाने सांगितले तर या ठिकाणचा धनगर समाज वर्गणी काढून हे काम पूर्ण करेल. मी मध्यंतरी प्रतापगडावर गेलो होतो. या गडावरील मुख्य बुरुजाची अवस्था तर अत्यंत दयनीय झालेली आहे. हा बुरुज पडायला आला आहे. हा बुरुज पडू नये, त्याची डागडूजी व्हावी यासाठी सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी आमदार फंडातून एक लाख रुपये दिलेले आहेत. प्रतापगडाजवळील जी स्थानिक मुले आहेत ती गाईडचे काम करतात. आता या मुलांनी या बुरुजाच्या डागडूजीसाठी वर्गणी गोळा करण्याच्या कामाला सुरुवात केलेली आहे. मी महाबळेश्वर महानगर पालिकेला भेट दिली होती त्यावेळेस त्यांना सांगितले होते की, तुम्ही प्रतापगडावरील मुख्य बुरुजाची डागडूजी करण्यासाठी निधी का देत नाही तर त्यांनी मला सांगितले होते की, या बुरुजाची डागडूजी करण्याची आमची इच्छा आहे परंतु सातारा कलेक्टरला यासंदर्भात आम्ही अर्ज केलेला आहे. त्यांना अर्ज करुन जवळपास पाच वर्षे झाली परंतु त्यांच्याकडून आम्हाला कसल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळालेला नाही. जोपर्यंत आम्हाला सातारा कलेक्टर कडून परवानगी मिळत नाही तोपर्यंत आम्ही प्रतापगडाची डागडूजी करु शकत नाही, त्यासाठी निधी देऊ शकत नाही. यासंदर्भात माझी शासनाला विनंती आहे की, सगळया किल्ल्यांचे संरक्षण व्हावे म्हणून शासनाने प्रत्येक किल्ल्यावर एखादा अधिकारी नेमून किल्ल्याची डागडूजी करुन आपला जो अमुल्य ठेवा आहे तो जतन करावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------------

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास,सामान्य प्रशासन,जलासंधारण व संसदीय कार्यमंत्री ) : सभापती महोदया, मी या ठिकाणी दोन विभागाच्या मागण्यांना उत्तर देण्यासाठी उभा आहे. सुरुवातीला मी सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भात ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत त्याला उत्तर देणार आहे. माझ्या दोन्ही बाबीवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. बाब क्रमांक 6 च्या संदर्भात ब-याचशा स्मारकांना निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. आपापल्या भागातील स्मारकांना निधी मिळावा यासाठी अनेक महिन्यांपासून-वर्षापासून सदस्य मागणी करीत आहेत. त्यांची मागणी आता लवकरच पूर्ण होईल. स्मारकाच्या संदर्भात श्रीमती नलावडे यांनी बा.सी.मर्ढेकर यांचे स्मारक व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. या स्मारकासाठी खाजगी वास्तुशास्त्रज्ञ श्री. उदय कुलकर्णी यांनी 24 लाख रुपयांचे प्रपोजल सुध्दा दिलेले आहे. परंतु मी सांगू इच्छितो खाजगी वास्तुशास्त्रज्ञाचा अहवाल शासन स्वीकारीत नाही . त्यामुळे आम्ही पीडब्ल्यूडीला सांगितले आहे की, या स्मारकाच्या संदर्भातील काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपवून त्यांच्याकडून यासंदर्भातील अहवाल मागवून घ्यावा. मी आपल्याला खात्री देतो की, बजेट सेशनच्या अगोदर सर्व पुर्तता करुन अर्थसंकल्पात बा.सी.मर्ढेकरांच्या स्मारकासाठी तरतूद करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जाईल एवढेच मी या निमित्ताने सांगतो.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

त्याच बरोबर डॉ.अशोक मोडक यांनी जीवा महालाचे स्मारक व्हावे अशी सूचना केली आहे. प्रतापगडावर जीवा महालाचे स्मारक व्हावे म्हणून शासनाला शिफारस करण्यासाठी पालकमंत्री, सातारा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 3.2005 रोजी शासन निर्णयाच्या माध्यमातून समिती नेमली असून त्या समितीचा अहवाल आल्यानंतर स्मारकासाठी निधी उपलब्ध करून देण्यासंबंधीची व्यवस्था करण्यात येईल. तसेच, प्रा.शरद पाटील यांनी राजाराम पाटील यांचे स्मारक व्हावे अशी सूचना केली आहे, त्याबाबत देखील विचार करण्यात येईल.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, शासनाने समिती नेमली होती तिचे काय झाले आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, निश्चितपणे शासन सन्माननीय सदस्यांच्या सूचनेची नोंद घेईल. सामान्य प्रशासन विभागावर बोलताना ओळखपत्रासंबंधी देखील अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या आहेत. तसेच अनेक सन्माननीय सदस्यांनी विविध ठिकाणी स्मारके व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्या सर्वांची नोंद शासनाच्यावतीने घेण्यात आली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, मधुकर सरपोतदार, गुरूनाथ कुलकर्णी, मधुकर चव्हाण इत्यादींनी ओळखपत्रासंबंधी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. दिनांक 1.1.2005 ही अर्हता धरून 6,58,74,000 एवढी मतदार संख्या नोंदविलेली आहे. त्यापैकी 4,44,55,999 ओळखपत्र देण्यात आली असून 2,14,18,003 इतक्या मतदारांना ओळखपत्र देणे बाकी आहे. यासाठी एकूण 32.12 कोटी रुपयाची आवश्यकता आहे. सगळे काम मार्चमध्ये पूर्ण होऊ शकते म्हणून 7 कोटी रुपयाची पूरक मागणी ठेवण्यात आली आहे. काही सन्माननीय सदस्यांनी बांगला देशीय लोकांना ओळखपत्र किंवा परदेशी लोकांना ओळखपत्र दिले जाण्यासंबंधीची भिती व्यक्त केली आहे. ओळखपत्र देताना मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. तसेच त्या रहिवाशाचे 15 वर्ष वास्तव असणे आवश्यक आहेत या व अन्य काही अटी आहेत. तरी सुध्दा त्यात काही त्रुटी असतील तर त्या दुरूस्त करण्यासंबंधीची कार्यवाही केली जाईल. सामान्य प्रशासन विभागाच्या संबंधित अनेक छोटे-मोठे प्रश्न आहेत. त्या सर्वांना हात घालून मी सभागृहाचा जास्त वेळ घेत नाही. सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या मान्य कराव्या अशी विनंती करीत असताना मी नगरविकास खात्यावर करण्यात आलेल्या सूचनांची देखील नोंद घेतलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

नगरविकास विभागाच्या खात्यावर सन्माननीय सदस्य सर्वश्री विलास अवचट, अरविंद सावंत, श्रीमती सुधा जोशी यांनी मुंबईच्या विकासासंबंधी, मुंबईची थकित रक्कम मिळण्यासंबंधीचे प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याच बरोबर मराठवाडयाच्या प्रश्नासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, नतिकोद्दीन खतिब यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत व सूचना देखील मांडलेल्या आहेत. त्याबद्दल मी या सगळयांचा आभारी आहे. राज्यातील 9 कोटी लोकसंख्ये पैकी 50 टक्के लोक हे शहरी भागामध्ये राहत आहेत. त्याप्रमाणात शहरी भागासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जात नाही. हे मी मान्य करतो. शहरी भागाच्या अनेक मागण्या आहेत. लोकांना चांगले रस्ते लागतात, लोकांना स्वच्छता पाहिजे असते, दिवाबत्तीची सोय पाहिजे असते. या सर्व सोयी सुविधा लोकांना अपेक्षित आहेत आणि रास्त देखील आहेत व त्या योग्य आहेत. आपण 74 वी घटना दुरूस्ती केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ........

त्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वबळावर उभे राहिले पाहिजे. पण आज कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर उभी नाही. हीच परिस्थिती महाराष्ट्रामध्ये सर्वदूर पहावयास मिळते. महानगरपालिका आणि नगरपालिकांना ग्रँटची अडचण आहे. या स्थानिक संस्था स्वबळावर उभ्या न राहिल्यामुळे राज्य सरकारकडे ग्रँटची मागणी करतात. प्रापॅर्टी टॅक्स, वॅाटर टॅक्स, ऑक्ट्राय यातून स्थानिक स्वराज्य संस्थांना उत्पन्न मिळते. या उत्पानतून स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर उभी रहायला पाहिजे अशी शासनाची अपेक्षा आहे. आज फक्त नोकर भरतीवर व आस्थापनेवर भरपूर खर्च करु होत असल्याचे चित्र अलीकडच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये पहावयास मिळते. चीप पॅाप्युलॅरिटीच्या मागे नगराध्यक्ष लागलेले आहेत. कोणत्याही नगराध्यक्षाला वाटते की, माझ्या काळात जास्तीत जास्त नोकर भरती झाली पाहिजे. तात्पुरता लावलेला माणूस परमनन्ट व्हावयास पाहिजे. या सगळ्या अनुषंगाने आस्थापनेवरील खर्च वाढत चाललेला आहे. म्हणून नगरविकास विभागाकडून या सर्वांना निर्बंध घातलेला आहे. अ वर्ग नगरपालिकेचा कोणत्याही परिस्थितीत आस्थापना खर्च 50 टक्केंपेक्षा जास्त जाऊ नये, ब वर्ग नगरपालिकेला 55 टक्केच्यावर जाऊ नये आणि क वर्गाची 60 टक्केपेक्षा जास्त जाऊ नये असे निर्बंध घालण्यात आले आहेत. विकास कामाला पैसे उपलब्ध झाले पाहिजेत म्हणून हे निर्बंध घालण्यात आले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था सेवा देणारी आहे. मागच्यावेळी मी या विषयावर विधानसभेत बोलत असताना सांगितले होते की, आपण लोकांना तत्पर सेवा दिली पाहिजे. 50 टक्के लोकांचा स्थानिक स्वराज्य, महानगरपालिका आणि नगरपालिकेशी दररोजचा संबंध येतो. लोकांचा जन्म दाखला काढण्यापासून मृत्युची नोंद करण्यापर्यंत महानगरपालिका आणि नगरपालिकेशी दररोजचा संबंध येतो. ही कामे लवकर होण्याच्या दृष्टीकोनातून केडरायझेशन करण्यासंबंधी मागच्या बजेटमध्ये सांगितले होते. या सर्व गोष्टी आता जवळ जवळ पूर्ण झाल्या आहेत. त्यासंबंधीचे फायनल नोटीफिकेशन येणाऱ्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात निघायला वेळ लागणार नाही. वित्त विभागामध्ये या सगळ्या गोष्टींसाठी वेळ लागला. त्यामुळे दिरंगाई जरुर झालेली आहे. केडरायझशनमुळे जे सहा केडर निर्माण होतील. त्या सहा केडरच्या माध्यमातून नगरपालिकेला आपल्या हद्दीपर्यंत कर्मचाऱ्यांच्या बदल्या करणे शक्य होणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

त्यामुळे कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने मोठा फरक दिसून येईल. जानेवारी पर्यंत हा बदल होईल अशी मी याठिकाणी खात्री देऊ इच्छितो. तसेच अधिकाधिक संगणकीकरण व्हावे. वन विन्डो क्लिअरन्स सिस्टीम व्हावी. एकदा अर्ज दाखल केल्यानंतर त्याचा लवकर निपटारा व्हावा यासाठी नगरविकास विभागाकडून संगणकीकरणासाठी अधिकचा खर्च करीत आहोत. मी सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकली. त्या सर्वांची एकच मागणी होती की निधी द्यावा. पण केंद्र सरकारच्या एन.यु.आर.एम ने छोट्यामोठ्या अटी घातल्या आहेत. असे असले तरी खूप मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद केंद्र सरकारच्या नगरविकास विभागाने केलेली आहे. आपण फक्त एकच प्रस्ताव दाखल करायचा. नगरपालिका प्रस्ताव दाखल करु शकते. महानगरपालिका प्रस्ताव दाखल करु शकते. नोडल एजन्सी म्हणून आपण एम.एम.आर.डी.ए.ला नेमलेले आहे. प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून केंद्र सरकारच्या नगरविकास विभागाकडे जाऊ शकतो आणि आपल्या 25 वर्षाचा परस्पेक्टीव्ह प्लॅन तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. 5 वर्षाचा डिटेल रिपोर्ट तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या माध्यमातून मोठ्या पध्दतीने विकास कामांना निधी मिळणे शक्य झाले आहे. मला याठिकाणी सर्वच सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे की, आपापल्या मतदारसंघामध्ये अशा पध्दतीचे प्रस्ताव आपण लवकर पाठवावेत कारण "फर्स्ट कम फर्स्ट सर्व्ह " अशा पध्दतीची ही व्यवस्था आहे. यासंबंधीच्या सर्व गाईड लाईन्स तयार झ ाालेल्या आहेत. सर्व विकास कामांसाठी मग त्यामध्ये रस्त्याचे काम असेल, शॉपिंग कॉम्प्लेक्सचे बांधकाम असेल, नाल्यांचे बांधकाम असेल.,सिव्हरेजच्या प्लान्टसाठी अलिकडे पैस मिळत नाही, ड्रेनेजच्या कामासाठी पैसे मिळत नाही. या सर्व कामांसाठी आपल्याला एनयुआरएमच्या माध्यमातून पैसे उपलब्ध होऊ शकणार आहेत. सुंदर शहर, स्वच्छ शहरच्या माध्यमातून 50 टक्के निधी अर्बन एन्व्हार्यमेंटवर खर्च व्हावेत असे केंद्र शासनाच्या नगरविकास विभागाचे मत आहे. याठिकाणी निधीच्या स्त्रोताची माहिती सांगितली. सभापती महोदय, मुंबई शहरासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी भाष्य केले.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित.... 19:10

श्री.राजेश टोपे....

मुंबईची वाढती लोकसंख्या हा मोठा प्रश्न आहे. हा भयानक प्रश्न असल्यामुळे शासनाला या प्रश्नाची माहिती आणि गांभीर्य आहे. एमयुटीपी, एमयुआयपी या प्रकल्पांच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर काम सुरु आहे. सप्टेंबर-2005 पर्यंत 1305 कोटी रुपये खर्च झालेला आहे. पुनर्वसन, रेल्वे कंपोनंट, रस्ते कंपोनंटवर मोठया प्रमाणावर आपण खर्च करीत आहोत. 589 कोटी रुपये विविध विभागांच्या माध्यमातून टॅक्सेसद्वारे येण्याची अपेक्षा आहे. शासनाकडील येणी निश्चित बाकी आहे. त्या दृष्टिकोनातून ज्या ज्या विभागांची थकबाकी असेल त्या त्या विभागांना कळविण्यात येईल आणि जर पाठपुरावा करण्याची आवश्यकता पडली तर जानेवारी महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवडयामध्ये महापौर, आयुक्त आणि सर्व सचिवांना बोलवून माझ्या दालनात बैठक घेऊन हा प्रश्न सोडविण्यासाठी मी स्वत: पुढाकार घेईन एवढाच या निमित्ताने सभागृहाला विश्वास देऊ इच्छितो.

मी सन्माननीय सदस्य श्री.गडकरीसाहेबांना सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री ज्यावेळी नागपूरच्या अधिवेशनासाठी येथे आले ते नागपूर महानगरपालिकेसाठी 20 कोटी रुपयांचा चेक सोबत घेऊन आले होते. तो चेक त्यांनी अधिवेशनापूर्वी महानगरपालिकेला दिलेला आहे. नागपूरच्या विकासाच्या दृष्टिकोनातून या रकमेचा वापर होणार आहे. देशातल्या टॉप-10 सिटींमध्ये नागपूर शहराचा समावेश आहे. त्यात महाराष्ट्र सरकारचा मोठा वाटा आहे हे मी अभिमानाने सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी पंचायती राज समितीसारखीच नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधिमंडळाची समिती नेमावी अशी जी सूचना केली आहे त्यासंदर्भात विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी अहील्याबाई होळकरांच्या संदर्भात जी मागणी केली आहे त्याबाबत सुध्दा विचार करण्यात येईल. त्यामुळे मी माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी नगरविकास विभाग आणि सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, ओळखपत्रांच्या बाबतीत शासन गंभीर आहे असे मला वाटत नाही. ओळखपत्रांची संख्या 8 कोटी आहे असे माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले त्यामध्ये 6 कोटींना ओळखपत्रे दिली असून, अजून 2 कोटींना देणे बाकी आहे. नवी मुंबईमध्ये बांगलादेशी लोकांना रेशन कार्ड वितरित करण्यात आले आहेत. माहितीच्या अधिकाराखाली हे सर्व आले आहे. संबंधित अधिकाऱ्यांना माननीय सभापती महोदयांनी बोलावून त्यांना याबाबत सांगितलेले आहे. खरे आणि खोटे अशा दोन्ही प्रकारे रेशन कार्ड वितरित करण्यात आलेले आहेत. या धर्तीवर जर "आय"कार्ड मिळाले तर सर्व ऑथँटीक होणार आहे. त्यामुळे आपण कडक धोरण अवलंबून बोगस रेशन कार्ड आढळून आले तर ते रद्द करणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ओळखपत्रे देण्याच्या प्रक्रियेमध्ये त्रुटी असतील तर त्यामध्ये दुरुस्ती करण्यात येतील. रेशन कार्ड चुकीच्या पध्दतीने दिल्यामुळे आय-कार्ड मिळू शकतात असे सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी जे निदर्शनास आणून दिले आहे त्याबाबत विचार करण्यात येईल.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी प्रत्येक मंत्र्याच्या उत्तरानंतर प्रश्नोत्तरे होणे बरोबर नाही. सर्व मंत्री महोदयांची उत्तरे झाल्यानंतर प्रश्न विचारले तर मी समजू शकतो. या सभागृहाची परंपरा राहिलेली आहे की, ज्या ज्या वेळी मागण्यांवर चर्चा होते त्या मागण्यांवर सर्व मंत्री महोदयांनी चर्चेला उत्तर दिल्यानंतर प्रश्नोत्तरे घेतली गेलेली आहेत.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या सभागृहाचे सदस्य नसलेले माननीय मंत्रीमहोदय या ठिकाणी येऊन आपल्याला मार्गदर्शन करीत आहे. तेव्हा मला असे सांगावयाचे आहे त्यांनी आपल्याला मार्गदर्शन करण्याची वेळ अजून आलेली नाही. त्यांनी अशा प्रकारे आपल्याला मार्गदर्शन करु नये. याबाबतीत आपण त्यांना समजावून सांगावे. सभापती महोदय, त्या ठिकाणाहून आपण जे काही सांगाल ते आम्ही ऐकून धेऊ. आमचे चुकलेले आहे की बरोबर आहे हे सांगण्याचा अधिकार आपल्याला आहे हा अधिकार माननीय मंत्रिमहोदयांना नाही.

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, किमान आपण एवढे तरी रुलिंग दिले पाहिजे की, या सभागृहाचे सदस्य नसलेले परंतु मंत्री असलेल्यांना या ठिकाणी बोलता येते किंवा नाही.?

**तालिका सभापती (श्री.विलास अवचट)** : आपल्याला या सभागृहामध्ये बोलता येते. यानंतर सन्माननीय विधी व न्याय विभागाच्या मंत्र्यांनी उत्तर द्यावे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय मंत्री) : सभापती महोदय,विधी व न्याय विभागाकडून कोणत्याही खात्यावर अन्याय झालेला नसेल असे मला वाटते. या खात्याच्या पूरक मागण्यांवर फक्त सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण बोलले आहेत. त्यांनी असे सागितले की, सरकारी वकिलांच्या बाबतीत अनेक तक्रारी आहेत.दुस-या पार्टीकडून ते पैसे घेतात आणि न्यायालयाकडून पुढील तारखा मिळवत असतात.मी त्यांना सांगू इच्छितो की, सरकारी वकिलांच्या नियुक्त्या शासन करीत नाही. शासन जरी ऑर्डर काढत असले तरी जिल्हयाच्या लेव्हलवर जिल्हाधिकारी आणि डिस्ट्रीक्ट न्यायाधीश यांच्याकडून पॅनल मागवून घेत असतो आणि त्यांच्यातून या सरकारी वकिलांच्या नियुक्त्या करीत असतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी दिशाभूल करता कामा नये.आतापर्यन्त आपण विधी व न्याय विभागाच्या सचिवांना सरकारी वकिलांच्या नियुक्त्या कराव्यात यासाठी किती पत्र देण्यात आले होते आणि किती ठिकाणी नियुक्त्या करण्यात आल्या होत्या.?

श्री.हसन मुश्रीफ : या नियुक्त्या जिल्हाधिकारी आणि जिल्हा न्यायाधीश यांच्या पॅनलमधून केल्या जातात. शासन नेमणुका करीत नाही.

श्री.नितीन गडकरी :आजपर्यन्त जेवढया नियुक्त्या झाल्या आहेत त्यापैकी पॅनलच्या माध्यमातून किती झाल्या आहेत ? याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावी

श्री.हसन मुश्रीफ : ही संपूर्ण माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास मी तयार आहे.

श्री.नितीन गडकरी : या नियुक्त्या करण्याच्या बाबतीत कॉग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाच्या पत्रावर रिकमंडेशन केले जाते.

श्री.हसन मुश्रीफ : उच्च न्यायालयातील सरकारी वकिलांच्या नियुक्त्या करीत असतांना प्रधान सचिव आणि ॲडव्होकेट जनरल यांच्या पॅनलमधून केल्या जातात.त्याचबरोबर प्रधान सचिव, सह सचिव आणि सचिवांना अशा सूचना दिलेल्या आहेत की, जिल्हयाच्या पातळीवर जे सरकारी वकील आहेत त्याच्याकडे किती प्रकरणे पेन्डीग आहेत ...

श्री.नितीन गडकरी : माननीय मंत्रीमहोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत असे मला वाटते.आमचे राज्य ज्यावेळी होते त्यावेळी तीच पध्दत होती आणि आता आपले राज्य असतांनासुध्दा तीच पध्दत सुरु आहे.या नियुक्त्या करत असतांना जिल्हा न्यायालयांचा काहीही सबंध येत नाही.या सगळया नियुक्त्या राजकीय आधारावर होत असतात.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफः सन्माननीय सदस्यांच्या ज्ञानात मी भर घालू इच्छितो की , नोटरीची नेमणूक करीत असतांनासुध्दा आता जाहिरात द्यावयाची आहे.सरकारी वकिलांच्या नेमणुका पॅनलमधून केल्या जातात.

श्री.नितीन गडकरी : या अगोदर ज्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या त्या कशा पध्दतीने करण्यात आल्या होत्या? मी जर माननीय मंत्रिमहोदयांच्या विरुध्द हक्क भंगाची सूचना आणली तर ते एक्सपोज होतील. नागपूरच्या जिल्हा न्यायालयात सरकारी वकील म्हणून ज्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यातील अनेक लोक कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी आहेत.काही नेत्यांचे ते चिरंजीव आहेत.

श्री.हसन मुश्रीफ : ही सगळी माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे.सर्व माहिती दाखविण्यास मी तयार आहे.

श्री.नितीन गडकरी :. आपण माझी दिशाभूल करीत आहात.

श्री.हसन मुश्रीफ : माझ्याविरुध्द सन्माननीय सदस्यांनी हक्कभंगाची सूचना द्यावी.

**तालिका सभापती ( श्री.विलास अवचट )** : ही माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.हसन मुश्रीफ : ठीक आहे. आमच्या विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

-----

**तालिका सभापती (श्री.विलास अवचट )** यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्र्यांनी उत्तर द्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) :सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम बांधकाम आणि आदिवासी विकास विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेत ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आणि आपले विचार व्यक्त केले त्यांचे मी आभारी आहे. 2005-2006 सालच्या पूरक मागण्यांमध्ये 35 पूरक मागण्या सादर करण्यात आल्या असून त्यातील एकूण रक्कम 738 कोटी रुपये एवढी आहे.यामध्ये पुरामध्ये हानी पोहोचलेले रस्ते आणि पुलांच्या बांधकामाकरता 200 कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे.12 व्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार रस्ते व पुलाच्या परीरक्षणासाठी तसेच दुरुस्तीसाठी चालू वर्षी आवश्यक तो निधी उपलब्ध व्हावा म्हणून अतिरिक्त तरतुदीसाठी 145 कोटी रुपये इतक्या रकमेची पूरक मागणी सादर करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, नव्याने घोषित करण्यात आलेल्या मराठवाडा एकात्मिक विकास कार्यक्रमा अंतर्गत रस्ते व पुलाच्या बांधकामासासठी 123 कोटी रुपये आणि इमारतीच्या बांधकामासाठी 11 कोटी 97 लाख रुपये इतक्या रकमेचा अंतर्भाव या पूरक मागण्यांमध्ये करण्यात आलेला आहे...

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, या पूरक मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने आम्ही जे काही मुद्दे उपस्थित केले होते त्या संदर्भात मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले पाहिजे.

श्री.रविशेठ पाटील :त्याही बाबतीत मी नंतर खुलासा करणार आहे.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय,सन्माननीय बांधकाम मंत्री या संदर्भात का बोलत नाही हे मला समजत नाही . त्यांच्या विभागाचे 70 टक्के बजेट कमी केल्यामुळे निषेध म्हणून ते यावर बोलत नाहीत काय ? रस्त्यांना जे खड्डे पडलेले आहेत ते सुध्दा बुजवले जात नाहीत आणि या पूरक मागण्यांवर सुध्दा ते बोलत नाहीत हे आश्चर्यकारक वाटते.पूर्वी ते नेहमी उत्तर देत असत परंतु आता उत्तर देण्याचे अप्रिय काम त्यांनी राज्यमंत्र्यांवर टाकून दिलेले आहे.उपस्थित असतांनासुध्दा ते बोलत नाहीत त्याचे काय कारण आहे ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, खानदेश विकास कार्यक्रमांतर्गत रस्ते व पूलांच्या प्रगतीपथावर असलेल्या बांधकामासाठी 7 कोटी रकमेचा अंतर्भाव या पुरवणी मागण्यांमध्ये केलेला आहे.

श्री. नितीन गडकरी : राज्यमंत्री महोदय आपण जे काही सांगता आहात ते सगळे आमही वाचलेले आहे. आपण आम्ही जे आक्षेप घेतलेले आहे त्यावर काही उत्तर द्या.

**तालिका सभापती (श्री.विलास अवचट)** : सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, सदस्यांनी ज्या काही सूचना येथे केल्या आहेत, आक्षेप घेतले आहे ते मंत्री महोदयांनी सारे ऐकले आहेत. तेव्हा आता मंत्री महोदय जे सांगत आहेत तेही आपण जरा एकून घ्यावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदय येथे वाचून दाखवित आहेत, त्याबद्दल माझी काहीच हरकत नाही. त्यांनी जरूर वाचून दाखववावे. पण आतापर्यंत ते जेवढे म्हणून बोलले आहेत ते त्यांनी या पुस्तकामध्ये जे लिहिलेले आहे तेच बोलले आहेत. ते तर आम्ही देखील वाचले आहे आणि आम्हाला ते समजले देखील आहे. आणि त्यावर आम्ही जे काही बोललो वा आक्षेप घेतले आहेत त्याबद्दल बाब क्रमांकांनुरून राज्य मंत्री महोदयांनी खुलासा करावा एवढेच माझे म्हणणे आहे, एवढीच माझी हरकत आहे.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांनी 12 व्या वित्त आयोगाच्या निधीतून राज्यातील रस्ते दुरूस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत असे उद्‌गार काढले. सभापती महोदय, केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत राजरस्ते, प्रमुख जिल्हा मार्ग म्हणजे ओडीआर, रस्त्यावरील सुधारणा आणि पूलांची कामे ही लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार केली जातील. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी सीआरएफ व नाबार्डच्या निधी संबंधी बोलताना तो निधी इतरत्र वापरला जातो अशा पद्धतीने येथे निवेदन केले. त्यासंबंधी मी आपल्याला सांगू इच्छितो की, 2005-06 या वर्षामध्ये नाबार्ड व हुडको साठी नियत व्यय मिळण्यावर लक्ष पुरविले जाईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, हे पैसे सीआरए साठी वापरले गेले नाहीत आणि त्याबद्दल संबंधितांवर कारवाई करणार की नाही हा महत्त्वाचा प्रश्न मी केला होता. आपण याबद्दल काही सांगितल्यास बरे होईल अन्यथा आम्हाला त्याबद्दल बाहेर काही बोलताही येत नाही.

..... 4पी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील : मी त्याबद्दलही नंतर सांगतो. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.मोडक साहेबांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या कर्जरोख्यांची परतफेड वेळेवर करता यावी व कर्जरोखे परतफेडीसंबंधी कसूरदार ठरवू नये याकरिता शासनाने आवश्यक ते 138 कोटी 60 लाख रूपयांचा निधी अंतरिम सहाय्य म्हणून आकस्मिक निधीतून अग्रीम म्हणून तीन महिन्यांच्या कालावधीकरिता व दरशेकडा साडेनऊ टक्के व्याज दराने 25.11.2005 रोजी देण्यात आला. सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुणे-सातारा रस्ता आणि मांढरादेवी-वाई रस्ता, सुधारणा घाट रस्ता हा सीआरएफ मधून सुचविलेला आहे, प्रस्तावित केलेला आहे आणि त्याचा पाठपुरावा आमचेकडून चालू आहे. त्यास मंजुरी मिळाल्यानंतर काम चालू करण्यात येईल. सभापती महोदय, सातारा जिल्ह्यातून मांढरादेवी येथे जाण्याकरिता सोयीचा रस्ता व्हावा म्हणून नवीन रस्त्याचे काम अर्थसंकल्पामध्ये घेण्यात आले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुळकर्णी साहेबांनी मिठमुंबरी-कुणकेश्वर पूल आणि आरोंदा किरणपाटी पूल या कामांबाबत विचारले होते. ही दोन्ही कामे सीआरएफ मधून मंजुरीसाठी आम्ही केंद्र सरकारकडे पाठविली आहेत.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आता सन्माननीय राज्यमंत्र्यांनी जी माहिती दिली आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, खरे म्हणजे आरोंदा-किरणपाटी पुलाला मंजुरी मिळालेली आहे आणि त्याचे टेंडर काढण्याच्या प्रक्रियेमध्ये सध्या हे प्रकरण आहे. सन्माननीय बांधकाम मंत्री श्री. भुजबळ साहेबांनी या कामाची पूर्ण कल्पना आहे माहिती आहे. तेव्हा त्यांनीच ती माहिती येथे द्यावी अशी मी विनंती करतो. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 4क्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या मागण्यांबाबत माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांनी आपले विचार व्यक्त करीत असतांना विदर्भातील आदिवासी व नक्षलग्रस्त विभागामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना 15 टक्के प्रोत्साहन भत्ता मंजूर झाला आहे तो ताबडतोब अदा करण्यासाठी शासनाकडे निधी नाही असे निवेदन केले. याबाबत मार्च अखेरपर्यंत तपासणी करुन निधीची तरतूद केली जाईल.

त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी अंगणवाडी सेविका या स्वत: आहार बनवितात. तो आहार बनविण्यासाठी त्या लाकडे जाळतात. त्यामुळे वृक्षांची तोड होते. ती चूल पेटवितांना त्यामधून निघणाऱ्या धुरामुळे मुले व महिलांचे आरोग्य बिघडते. त्यासाठी त्याठिकाणी स्वयंपाक बनविण्यासाठी गॅसचा पुरवठा केला पाहिजे अशी मागणी केली. त्याकरिता लवकरात लवकर तरतूद करण्यात येईल असे मी त्यांना सांगू इच्छितो.

माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी देखील अंगणवाडी सेविकांना दिल्या जाणाऱ्या भाऊबिजेच्या रकमेमध्ये 1 हजार रुपयांपर्यंत वाढ करावी असे म्हटले आहे. त्यांना 100 टक्के निवृत्ती वेतन मंजूर करावे अशी मागणी केली आहे. त्यासाठी त्यांना वाढीव निधी मंजूर करण्याबाबत विचार केला जाईल. त्याचप्रमाणे माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी आदिवासी लोकांना कर्नाटकमध्ये नेण्यासाठी व्यापक योजना राबवावी अशी सूचना केली आहे त्या सूचनेचा देखील विचार करु. त्याचप्रमाणे माननीय सदस्य डॉ. वसंत पवार व माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी धरमतर या ठिकाणी निप्पॉन डेन्रो या कंपनीसंबंधी प्रश्न विचारला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, ती जागा जर आमच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची असेल तर ती ताबडतोब ताब्यात घेऊ. त्या ठिकाणी जर अतिक्रमण केले गेले असेल तर त्याचा ताबडतोब बंदोबस्त करुन ती जमीन ताब्यात घेऊ. तेव्हा आदिवासी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मागणी करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या पुरवणी मागण्यांवर माननीय सदस्य सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, जोगेंद्र कवाडे, श्रीकांत जोशी, वसंत पवार व माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपले विचार मांडले आहेत. या विभागाच्या एकूण 21 पुरवणी मागण्या आहेत. त्यावर एकूण 575.66 कोटी इतकी रक्कमेची तरतूद केली आहे. त्यामध्ये योजनेंतर्गत 331.65 कोटी व योजनेतर 244 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यामध्ये एल.आय.सी. कडून जे 500 कोटी रुपयांचे कर्ज घेतले त्यांची 7.75 टक्केप्रमाणे व्याजाची रक्कम 34.60 लाख होते त्यासाठी तरतूद केली आहे. मराठवाडा पॅकेजमध्ये मध्यम, मेजर , मायनर हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 225 कोटी रुपये व या महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी 134 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्याचप्रमाणे लघु पाटबंधारेच्या दुरुस्तीसाठी 15 कोटी, जलसुधारणा प्रकल्पांतर्गत 77 कोटी, पालघर योजनेंतर्गत अप्पर गोदावरी प्रकल्प दुरुस्तीसाठी 9.31 कोटी रुपयांची मागणी केली आहे.

माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी व डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सूचना केल्या. त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, महामंडळाकडील मोठया व मध्यम प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी 34.60 लाख रुपयांची पूरक मागणी केलेली आहे. माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसार ती रक्कम खर्च करण्याबाबत आपल्या भाषणामध्ये मुद्दा मांडण्यात आला होता. त्यांना सांगू इच्छितो की, मागच्या ज्या पुरवणी मागण्या आहेत त्यानुसार विदर्भाला पैसे दिले आहेत. 34.60 कोटी हे ज्या ज्याठिकाणी पाटबंधारेच्या चाऱ्या व कालव्यांची दुरुस्ती करावयाची आहे त्यासाठी निधी कमी पडू नये यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रात एकूण जेवढे कालवे आणि पाटचाऱ्या आहेत त्यांच्या दुरुस्तीसाठी पैसे काढले आहेत. त्यामुळे ज्या ज्याठिकाणी कालवे, पाटचाऱ्या नादुरुस्त असतील त्या प्राधान्याने दुरुस्त करणे गरजेचे आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख . . . .

आपण तेथे राज्यपालांचा फॉर्म्युला न लावता जे खराब आहेत, जे नादुरुस्त आहेत त्यासाठी पैसे ठेवलेले आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपल्या भाषणात गोसीखूर्दचा प्रश्न उपस्थित केला होता. मी त्यांना सांगू इच्छितो की, गोसीखुर्द प्रकल्पाच्या भूसंपादनाची एकूण रक्कम 184.3 कोटी इतकी होते आणि आतापर्यंत सर्व शेतकऱ्यांचे 152.54 कोटीचे भुगतान केले आहे आणि बाकी 31.49 कोटी रुपये राहीलेले आहेत. यावेळी आपल्याला ए.आय.पी.पी.मध्ये जवळजवळ 221 कोटी रुपये गोसीखूर्दच्या प्रकल्पासाठी मिळणार आहेत. त्यामधून जवळजवळ अजून 45 कोटी रुपयांची रक्कम आम्ही भूसंपदनासाठी आणि पुनर्वसनासाठी बाजूला काढलेली आहे. या रकमेतून गोसीखूर्द प्रकल्पाचे पुनर्वसन पूर्ण होईल याबद्दल मला खात्री आहे. सन्माननीय सदस्य श्री.वसंतरावजी पवार यांनी गंगापूर धरणाची कपॅसिटी गाळामुळे कमी झाल्याने 84 एम.सी.एफ.टी.चे टिटवी धरण ते बांधावे अशी आपल्या भाषणामध्ये विनंती केली होती. याबद्दल त्याचा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यासाठी आणि हा प्रकल्प यशस्वी होईल की नाही याची खातरमजा करुन घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले जातील. जो सर्वात महत्वाचा प्रकल्प आहे की, जलक्षेत्रातील एकात्मिक विकास व दीर्घकालीन टिकाऊ व्यवस्थापनासाठी आपण महाराष्ट्र जल क्षेत्र सुधार प्रकल्पाचा पहिला टप्पा सुरु केला आणि हा सहा वर्षाचा प्रकल्प असून त्यासाठी जवळजवळ 325 द.श.ल.डॉलर म्हणजे जवळजवळ 1500 कोटीचे कर्ज आपल्याला जागतिक बँकेने मंजूर केलेले आहे. त्याचा पहिला टप्पा आपण सुरु करणार आहोत आणि त्यासाठी महाराष्ट्र शासनाला स्वत:चा हिस्सा म्हणून जवळजवळ 300 कोटी रुपये यामध्ये टाकावयाचे आहेत. त्यापैकी यावर्षी 76 कोटी रुपये रिलीज करुन महाराष्ट्रातील प्रकल्प, प्रकल्पाची दुरुस्ती आणि पुनर्स्थापनेची कामे, घनमापन पध्दतीने पाणी वाटपासाठी अधुनिक यंत्रणा बसविणे, धरण सुरक्षा बांधकामे, जलवापर संस्था निर्माण करुन त्याकडे पाटबंधारे व्यवस्थापन सुपूर्द करणे व कृषीविषयक आधार बांधकाम करणे ही सर्व कामे आपण येत्या काळामध्ये करणार आहोत. त्यामुळे महाराष्ट्रातील जे जुने प्रकल्प आहेत, त्यांचे अप ग्रेडेशन करुन, काही ठिकाणी ऊंची वाढवून, काही ठिकाणी त्यांचे कालवे दुरुस्त करुन एक मोठी सिंचन क्षमता येणाऱ्या काळामध्ये आपण महाराष्ट्रात निर्माण करणार आहोत.

श्री.श्रीकांत जोशी(खाली बसून) : त्यात जायकवाडी धरण आहे का ?

. . . .4 आर-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, आता माझ्याकडे नावे नाहीत. जेवढे प्रकल्प आहेत त्यांची यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, कृपया त्यांनी जलसंपदा विभागाच्या मागण्यांना मान्यता द्यावी. त्याचप्रमाणे वित्त व नियोजन विभागाच्या . . . .

श्री.नितीन गडकरी(खाली बसून) : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी निवडणूका वारंवार होतात, त्यासंदर्भात मुद्दा मांडला होता.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, तो विषय माझ्या विभागाशी संबंधित नाही. तो विषय सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित आहे. वित्त विभागाच्या एकंदर चार मागण्या आहेत आणि त्याची टोटल रक्कम 2 कोटी 75 लाख 98 इतकी आहे आणि वित्त विभागाच्या मागण्यांवर बोलताना सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी दोडामार्ग येथे कोषागार नाही, इमारत नाही असा मुद्दा उपस्थित केला होता. आपण राज्यामध्ये 29 तालुके निर्माण केलेले आहेत. या तालुक्यामधील कोषागार आणि उप कोषागारापैकी 6 बँकींग उपकोषागरे व 4 बँकेतर उप कोषागरे अशा 10 उप कोषागार कार्यालय प्रत्यक्षात सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. उप कोषागरे सुरु करतो, तेव्हा सुरक्षेची देखील आपल्याला हमी घ्यावी लागते. यासाठी पोलिसांची भरती करणे, इतर कर्मचारी नेमणे यांचाही खर्च येतो. त्यामुळे टप्प्याटप्प्याने आपण कोषागरे आणि उप कोषागरे सुरु करणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी दोडामार्ग येथे कोषागरे आणि उपकोषागरे सुरु करण्याबाबत सूचना केली, तर त्याचाही येणाऱ्या काळात प्राथम्याने विचार करुन तेथेही उपकोषागरे आणि कोषागरे सुरु करण्याबाबत संबंधितांना निर्देश देऊ. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांतजी जोशी यांनी संगणकाच्या बाबतीत अतिशय चांगला प्रश्न उपस्थित केला.

यानंतर श्री.किल्लेदार . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुनील देशमुख (पुढे सुरु....

आतापर्यन्त महाराष्ट्र शासनाची परिस्थिती पाहिली तर जोपर्यन्त रेव्हेन्यू साईडला, इन्कम साईडला महत्व देत नाही. एक्सपेंडीचर साईडला महत्व दिले तर काय होते, याबाबत गेल्या पाच-सात वर्षाचा महाराष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला तर लक्षात येते. आपण वारंवार रिव्हेन्यू एक्स्पेंडीचरच्या विभागांच्या बैठका घेतो. त्यामध्ये बांधकाम आणि इरिगेशन हे विभाग येतात. त्यांच्याबरोबर आपण बैठका घेतो. पण जी रिव्हेन्यू इन्कमची डिपार्टमेंट आहेत, ती म्हणजे सेल्स् टॅक्स आणि एक्साईज विभाग आहे. त्याच्यावर कोणी सिरियसली विचार केला नाही. आपण सांगितले त्याप्रमाणे मागील तीन महिन्याच्या कालावधीमध्ये सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी याच डिपार्टमेंटच्या बैठका घेऊन या डिपार्टमेंटचे काय प्रश्न आहेत, ते समजून घेतले. जसा संगणकाचा प्रश्न राहिला होता. लाखो, करोडो रुपये महाराष्ट्र शासनाला मिळवून देणारे एक्साईज डिपार्टमेंट आणि सेल्स् टॅक्स डिपार्टमेंट आहे त्यांच्या संगणकीकरणाचा कित्येक दिवसापासून प्रश्न प्रलंबित होता. आता आपण त्यास सुरुवात केलेली आहे. येणाऱ्या दोन वर्षाच्या काळामध्ये जास्तीत जास्त पैसे देऊन पूर्ण संगणकीकरण करण्याचा आमचा प्रयत्न रहाणार आहेत.

त्यानंतर नियोजन विभागाची एकच मागणी आहे, ती म्हणजे मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यामध्ये मानव विकास निर्देशांक राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहे, ज्याची सरासरी 58 आहे. मराठवाडयातील जिल्ह्यांचा निर्देशांक वाढवावा यादृष्टीने एकात्मिक विकास कार्यक्रम राबविण्याचा निर्णय 20 आणि 21 सप्टेंबर रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आला होता. त्याप्रमाणे मराठवाडयातील सर्वात मागास तालुक्याचा मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी 5 कोटी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या निधीची तरतूद अर्थसंकल्प पुरवणी मागणीद्वारे केलेली आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, नियोजन विभाग, अर्थ विभाग आणि जलसंपदा विभाग या विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.रणजित कांबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्रमांक 260,261,262,263, 264,265 या सात बाबींबरील 111 कोटीची मागणी केलेली आहे. या संदर्भाने सन्मानीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, स्वच्छतेच्याबाबतीत किती हागणदरी मुक्त गावे मुक्त झाली, किती ग्रामपंचायती या कार्यक्रमामध्ये भाग घेत आहेत. मी सदनाला माहिती देऊ इच्छितो की, एक हजार गावच्या वर हागणदरी मुक्त कार्यक्रमामध्ये भाग घेत आहेत. 515 ग्रामपंचातींची यादी ....

डॉ.दीपक सावंत : एकूण ग्रामपंचायती किती आहेत त्याचे उत्तर द्यावे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. 515 ग्रामपंचायती हागणदरी मुक्त झालेल्या आहेत. त्याचबरोबर पंचायत समिती,महाबळेश्वर आणि रायगड जिल्ह्यातील मुरुड ही पंचायत समिती हागणदरी मुक्त झालेली आहे.

डॉ.दीपक सावंत : एकूण ग्रामपंचायती किती, त्यापैकी किती ग्रामपंचायती हागणदरी मुक्त झालेल्या आहेत, हे विचारले त्याचे उत्तर मिळाले नाही.

श्री.रणजित कांबळे : आपण संख्या विचारली, त्याबाबतची टक्केवारीची माहिती आता माझ्याकडे नाही. ती माहिती मी पटलावर ठेवतो. बाब क्रमांक 259. मराठवाडा पॅकेजमध्ये पाणीपुरवठा विभागाने 50 कोटी रुपयाची मागणी केलेली आहे. 8 जिल्ह्ये आहेत, त्या प्रत्येक जिल्ह्याला 6.25 कोटी रुपयाची मागणी केलेली आहे. टोटल पॅकेज 50 कोटीची आहे. त्यामध्ये शहरी योजनेसाठी 9 कोटी 31 लाखाची मागणी आहे एम.जी.पी.ची ग्रामीण योजना जवळजवळ 28 कोटीची आहे. जिल्हापरिषदांसाठी 22 कोटी रुपयाची मागणी आहे. सभापती महोदय, अजंठा, एलोरा केव्हज् हे टयुरिझम डिपार्टमेंटचा कॉझर्वेशन अॅन्ड डेव्हलपमेंट स्टेज 2, हा जो कार्यक्रम आहे, तो गव्हर्नमेंट ऑफ जपान स्पॉन्सर्ड करणार आहे. यासाठी एम.जी.पी.ची पाणीपुरवठा योजना आहे .एलोरा येथील वॉटर सप्लाय स्कीम आणि अजंठा व्ह्यू पॉईन्ट वॉटर सप्लाय स्कीम यासाठी 3.69 कोटी रुपयाची मागणी आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे...

तसेच केंद्र शासनाची ॲक्सीलरेटेड अर्बन वॉटर सप्लाय स्कीम आहे. ती केंद्र शासन 50 टक्के आणि राज्य शासनाचे 50 टक्के अशी 50-50 टक्क्यांची ही योजना आहे. केंद्र शासनाने सांगितलेले आहे की, मार्च 2006 नंतर ही योजना बंद होणार आहे. या योजनेच्या अंतर्गत 37 शहरांच्या पाणी पुरवठा योजना चालू आहेत. त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. त्यासाठी शासनाने 17 कोटी 75 लाख रुपयाची मागणी केलेली आहे. तसेच ॲक्सीलरेटेड अर्बन वॉटर सप्लाय स्कीम अंतर्गत आणखी एक 20 कोटी रुपयांची मागणी आहे. सभापती महोदय, सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट ॲण्ड ड्रेनेज ही केंद्र शासनाची एक नवीन 100 टक्के स्पॉन्सर्ड योजना आहे. या योजनेमध्ये दहा इंडियन एअरपोर्ट आणि शहरे घेतलेली आहेत. त्यांच्यामध्ये मध्ये पुणे शहराचा समावेश आहे. त्यासाठी पहिल्या टप्प्याचे 8 कोटी 54 लाख रुपये अनुदान मिळालेले आहे.त्याच्या दुस-या टप्प्याची बजेटरी प्रोव्हिजन करण्यात येत आहे. संत गाडगे बाबा स्वच्छता अभियानाच्या रोख बक्षिसासाठी 11 कोटीच्या तरतुदीची गरज आहे. सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची बाब क्रमांक 259, 260,261, 262,263,264 आणि 265 या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) :सभापती महोदय, उद्योग विभागाच्या चार पुरवणी मागण्या साधारण: 53 कोटी रुपयांच्या आहेत. प्रामुख्याने बाब क्रमांक 135 मध्ये महिंद्र आणि महिंद्र या कंपनीला आपण 32 कोटी रुपये देणार आहोत. पॅकेज स्कीम ऑफ इन्सेटिव्ह-93 च्या अंतर्गत हे पैसे परत देण्यात येत आहेत. ते देण्याचे कारण असे की, ते 700 कोटी रुपयाची इन्व्हेस्टमेंट नाशिक शहराच्या जवळपास आणार आहेत. "लोगान कार" अशा नावाचा प्रोजेक्ट तेथे उभा करणार आहेत. त्यासाठी एमओयु साईन करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, हा मेगा प्रोजेक्ट असल्यामुळे एमओयु साईन करतांना ज्या वाटाघाटी झाल्या त्याच्यामध्ये असे ठरविण्यात आले होते की, हे मेगा प्रॉजेक्ट आणीत असल्यामुळे त्यांना स्पेशल कंसीडरेशन देण्यात यावे.

श्री. श्रीकांत जोशी : 25 उद्योगा पैकी एका उद्योगाचे पैसे शासन देणार. त्या ठिकाणी 24 उद्योग इलिजिबल असतांना त्यांना पैसे देणार नाही त्यामुळे हे 24 उद्योग नाराज होण्याची शक्यता आहे. म्हणून त्यांना मार्चपर्यंत पैसे देतो असे मंत्रिमहोदयांनी म्हणायला पाहिजे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, याच्या व्यतिरिक्त औरंगाबादला मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्यामध्ये असे ठरविण्यात आले की, हे बॅकलॉगचे पैसे आहेत. मराठवाडयाचे जवळ जवळ 40 कोटी रुपये स्मॉलस्केल, मिडिएम स्केल आणि लार्जस्केल इंडस्ट्रिला देय आहेत. त्यापैकी 50 टक्के म्हणजे साधारण 20 कोटी रुपयाची आता तरतूद करण्यात येत आहे.मार्चच्या आधी ते देणार आहोत. आणि निधी जसा उपलब्ध होईल त्याप्रमाणे मग मराठवाडा असेल किंवा इतर भागामध्ये देण्यात येतील. श्री. नितीन गडकरी साहेबांनी उल्लेख केला की, विदर्भातील पैसे देय आहेत. निधी जसा उपलब्ध होईल त्याप्रमाणे बाकीचे पैसे वितरीत करण्यात येतील. याच्या व्यतिरिक्त 1987-88 साली काही अधिक खर्च झाला होता. तो नियमित करण्यासाठी म्हणून यामध्ये बाब क्रमांक 38 आणि 39 चा या पुरवणी मागण्यांमध्ये उल्लेख केलेला आहे. सांस्कृतिक खात्याच्या मागण्या बाब क्रमांक 182,183,184 आणि 185 अशा आहेत. याच्यामध्ये प्रामुख्याने सांगण्यासारखी बाब म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या वस्तु संग्रहालयासाठी 50 लाख रुपयाची तरतूद करण्यात येत आहे.त्याच बरोबर राजशिष्टाचार या विभागाची बाब क्रमांक 5 सहयाद्री अतिथीगृहाच्या दुरुस्तीसाठी 69 लाख रुपयाची तरतूद करण्यात येत आहे. 1997 मध्ये हे अतिथीगृह बांधले होते. त्यानंतर इन्टेरिअरवर विशेष काही खर्च केला नव्हता.

..3..



SMT/ MHM/ SBT/ 19:40

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत :सभापती महोदय, नागपूरच्या वस्तू संग्रहालयासाठी मी 35 लाख रुपयाची मागणी केलेली होती. हे अधिवेशन नागपूर मध्ये आहे. तेव्हा माझ्या मागणीचे काय -----
झाले ?

यानंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : ज्यावेळी ही मागणी केली होती त्यावेळी मी असे म्हणालो होतो की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे वस्तुसंग्रहालय या नागपूर शहरामध्ये आहे, आपले अधिवेशन देखील नागपूर शहरातच सुरु आहे. त्या संग्रहालयासाठी 35 लाख रुपयांची गरज आहे. जगातील एक अप्रतिम असा नमूना हे संग्रहालय असून त्याला "अजब महल" असे म्हणतात. त्यासाठी 35 लाख रुपये उपलब्ध करुन दिले तर हे वस्तुसंग्रहालय सुरु होऊ शकते.

राणा जगजितसिंह पाटील : महोदय, यासंदर्भात मी जातीने माहिती घेईन आणि योग्य तो निर्णय घेण्याचा प्रयत्न करीन. एवढे बोलून माझ्या तीन विभागाच्या मागण्यांना मान्यता द्यावी अशी विनंती सभागृहाला करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, उर्जा, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण तसेच माननीय मंत्री श्री. विनय कोरे यांच्याकडे असलेला अपारंपारिक उर्जा विभाग, त्यांनी विनंती केल्यानुसार त्या विभागाच्या मागण्यांनाही मीच उत्तर देणार आहे.

महोदय, आजच्या मागण्यांमध्ये उर्जा विभागाच्या वतीने महत्वाच्या तीन मागण्या या ठिकाणी मांडण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये 189 कोटी रुपयांची जी मागणी करण्यात आली ती प्रामुख्याने दाभोळ प्रकल्पाची जी पूनर्रचना आपण केलेली आहे त्यासंदर्भात करण्यात आली आहे. सभागृहाला हे कदाचित माहितीच असेल की, दाभोळ प्रकल्पाविषयी सदनात भरपूर चर्चा झालेली आहे तसेच देशातही त्यासंबंधीची चर्चा झाली आहे. गेल्या वर्षभराच्या कालावधीत दाभोळचा इश्यू रिझॉल्व्ह करण्याच्या संदर्भात राज्यशासन आणि केंद्रशासनाने पूढाकार घेतला आणि 18 हजार कोटीच्या जवळपास असलेला हा प्रकल्प ज्यावेळी वादाच्या भोवऱ्यात होता, त्यानंतर त्याबाबत लिटीगेशन झ ाालेले आहेत आणि हे संपले नसते तर आपल्या राज्याला 27 हजार कोटीची नुकसान भरपाई द्यावी लागली असती. गेले वर्षभर प्रयत्न करुन दाभोळचा प्रकल्प पूर्णपणे भारताच्या मालकीचा झालेला आहे त्यामध्ये असलेल्या एनरॉन, जी.ई., बेक्टेल या सर्व विदेशी कंपन्या गेलेल्या आहेत. केंद्रशासन, एनटीपीसी, गेल, इन्डियन इन्व्हेस्टर्स तसेच महाराष्ट्र शासन यांनी पूढाकार घेऊन रत्नागिरी पॉवर आणि गॅस नांवाची नवीन कंपनी स्थापन केली आहे. ज्यावेळी दाभोळ कंपनी बंद पडली त्यावेळी दाभोळला आपण 495 कोटीचे देणे वीज मंडळाच्या वतीने वीज खरेदी केली म्हणून आपल्याकडे हे पैसे बाकी होते. यासंदर्भात ज्यावेळी वाटाघाटी झाल्या त्यावेळी 495 कोटीची रक्कम महाराष्ट्र शासनाने दिली पाहिजे असे सांगण्यात आले. त्यानंतर मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला की, राज्य वीज मंडळाने बाजारातून हा पैसा उभा करावा आणि वीज मंडळ ही रक्कम देईल. ही सर्व 495 कोटीची रक्कम आपण ॲग्रीमेंटमध्ये देऊन टाकली आणि त्याच्या बदल्यात आपण जसे पूर्वीच्या प्रकल्पामध्ये राज्यशासनाचा 15 टक्के इक्विटी शेअर होता त्याच पध्दतीने नवीन प्रकल्पामध्ये सुध्दा 15 टक्के इक्विटी शेअर आहे फक्त फरक इतकाच झालेला आहे की, पूर्वीच्या प्रकल्पामध्ये फक्त पॉवर प्लांटमध्ये आपण होतो पण आता जी रिगॅसिफिकेशनची योजना आहे त्यामध्ये आपला पूर्वी सहभाग नव्हता आता या नवीन कंपनीमध्ये रिगॅसिफिकेशन प्लांटमध्ये सुध्दा आपल्याला सहभाग मिळालेला आहे आणि त्यामधून जे उत्पन्न येईल ते उत्पन्न

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

सुध्दा 15 टक्के इक्विटी शेअर्सच्या प्रमाणात आपले राहील. यासाठीच ही 495 कोटीची रक्कम शासनाने उभी केलेली होती व ही रक्कम राज्य वीज मंडळाला तरतूद करण्याच्या दृष्टीने ही मागणी आहे. ही रक्कम आपण पॉवर फायनान्स कार्पोरेशनकडून कर्जरुपाने घेतली होती.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील......

आयसीआयसीआय बँकेकडून आपण कर्ज काढले होते त्याचे 189.66 कोटी रपये आपल्याला द्यावयाचे त्यामुळे यासंदर्भातील मागणी सभागृहाला सादर करण्यात आलेली आहे.

बाब क्रमांक 167 मधील दुसरी मागणी 316 कोटी रुपयांची आहे. परळी आणि पारस या ठिकाणी आपण दोन नवीन प्रोजेक्ट सुरु केलेले आहेत. यातील 20 टक्के हिस्सा राज्यशासनाचा राहणार असून 80 टक्के पैसे बाजारातून उपलब्ध केले जाणार आहेत. गेल्या 11 वर्षापासून या राज्यात नवीन वीज निर्मितीचा एकही प्रोजेक्ट झालेला नाही. परंतु या सरकारने परळी आणि पारस या ठिकाणी प्रत्येक 250 मेगावॅट वीज निर्माण केली जाणार आहे. हा प्रकल्प 36 महिन्यात पूर्ण केला जाणार होता. सरकार समोर काही आर्थिक अडचण होत्या. ही आर्थिक अडचण दूर करण्यासाठी वीज मंडळाने मार्केटमधून पैसा उभा करण्याचा निर्णय घेतला. मी परवा परळी येथे गेलो होतो त्या ठिकाणच्या कामाची स्थिती पाहिल्यानंतर मला असे वाटते की, हे काम 36 महिन्याच्या ऐवजी 33 महिन्यातच पूर्ण होईल. साधारणपणे मार्च महिन्यापासून परळीच्या वीज प्रकल्पातून 250 मेगावॅट वीज आणि जून महिन्यापासून पारसच्या प्रकल्पातून 250 मेगावॅट वीज मिळणार आहे. रत्नागिरी पॉवर गॅस कंपनीच्या पहिल्या टप्प्यातून साधारणत: मे 2006 पर्यंत आपल्याला 700 मेगावॅट वीज मिळू शकणार आहे. अजून या ठिकाणच्या गॅसच्या संदर्भात काही अडचणी आहेत. पहिल्या दोन महिन्यात हा प्रोजेक्ट नाफ्त्यावर चालणार असून त्या माध्यमातून आता पुढे जाण्याची भूमिका राज्य शासनाने स्वीकारली आहे. परळी येथील प्रकल्पाच्या संदर्भातील राज्य सरकारच्या 20 टक्के वाटयाचे 165 कोटी रुपये आणि पारस येथील प्रकल्पाच्या संदर्भातील राज्य सरकारच्या 20 टक्के वाटयाचे 151 कोटी असे 316 कोटी रुपयांची मागणी या सभागृहापुढे ठेवण्यात आलेली आहे. हा निधी उपलब्ध झाल्यानंतर या प्रकल्पांना गती देणे शक्य होईल व त्यामुळे या राज्याचा विजेचा प्रश्न सुटेल. रत्नागिरी गॅस कंपनीच्या पहिल्या टप्प्यातून आपल्याला 700 मेगावॅट वीज मिळणार असून दुस-या टप्प्यातून 1400 मेगावॅट वीज मिटणार आहे. यासाठी सरकार प्रयत्नशील आहे आणि हा प्रकल्प सहा महिन्यात सुरु करण्याचा प्रयत्न राहील. यामध्ये एनटीपीसीने पुढाकार घेतलेला आहे. याबाबत कंद्रीय ऊर्जा सचिवांच्या अध्यक्षतेखाली गॅसच्या संदर्भात एक शिष्टमंडळ कतारला जाऊन आले आहे. अजून यामध्ये काही प्रश्न राहिलेले आहेत. यातून मार्ग काढण्याचा आम्ही प्रयत्न

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.......

करीत आहोत. तसेच ओमानला एक शिष्टमंडळ जाणार आहे. ऑस्ट्रेलिया,इंडोनिशिया या ठिकाणावरुन गॅस मिळण्याच्या संदर्भात प्रयत्न केले जात आहेत. जागतिक बाजारात गॅसची किंमत प्रती बॅरल 10 वर गेलेली आहे. अशा वेळेला अल्टरनेट व्यवस्था करण्याच्या संदर्भात आपल्याला विचार करता येईल. परळी आणि पारस या ठिकाणचा पहिला टप्पा पूर्ण केल्यानंतर या ठिकाणी अजून 250-250 मेगावॅटचे एक्सपांशन, चंद्रपूरचे एक्सपांशन, खापरखेडयाचे एक्सपांशन तसेच भुसावळ आणि नाशिक येथील प्रकल्पामध्ये काही एक्सपांशन करता येते का यांसदर्भात आम्ही विचार करतो त्यावेळेला राज्यसरकार समोर कोळसा आणि फयूअलच्या संदर्भात अडचणी आपल्या समोर उभ्या राहतात. त्याच्यावर मात करण्याच्या दृष्टीने सभागृहाला मी हे सांगू इच्छितो की, गेल्या रविवारीच मी अहमदाबाद येथे गेलो होतो त्यावेळी गुजरातच्या ऊर्जा मंत्र्यांशी आमची चर्चा झाली आणि त्या चर्चेच्या माध्यमातून गुजरात राज्य आणि महाराष्ट्र राज्य असे एकत्रिपणाने ओरिसामध्ये मछाकाटाची कोळशाची खाण दोन्ही राज्यांना एकत्रित मिळावी आणि त्याच्या माध्यमातून कॅप्टीव्ह माईनिंग करुन ऊर्जा निर्मितीच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाला 60 टक्के कोळसा आणि गुजरात शासनाला 40 टक्के कोळसा या खाणीतून मिळण्याच्या संदर्भात राज्यसरकारचा प्रयत्न चालू आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, परदेशातून कोळसा आयात करणार आहोत असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. ऑस्ट्रेलिया आणि इंडोनेशियामध्ये आपण स्वत:च्या माईन्स घेणार आहोत, अशा पध्दतीचे बिल मंत्रिमहोदयांनी आणले होते.

श्री.दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, या पूर्व काळामध्ये सभागृहामध्ये कोळशाच्या साठयावर मर्यादा येत असल्याबद्दल मी बोललो आहे. आज गॅस देखील महाग होत चालला आहे. तो उपलब्ध होईल किंवा नाही अशी परिस्थिती आहे. अशा वेळी आपल्याला इम्पोर्टेड गॅस किंवा वॉश कोल शिवाय पर्याय नाही. आज आपण 10 मिलियन कोळसा हा परदेशातून आयात करून आपल्या राज्यातील वीज निर्मितीसाठी वापरण्याचे धोरण स्वीकारले आहे. ज्यावेळी आपण राज्याचा 5-25 वर्षाचा पुढचा विचार करतो, त्यावेळी आपण ऑस्ट्रेलिया, चायना, इंडोनेशिया, या सर्व देशामध्ये कोळशासंबंधी चौकशी सरु केलेली आहे. आपल्याला जमले तर आपण कोल माईन्स घेणार आहोत. जमले तर आपण आपल्या आजूबाजूच्या राज्यांना देखील सहभागी करून घेणार आहोत. आपल्या राज्याची विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी कॅप्टीव्ह मायनिंग करावी लागणार आहे.

आज अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताच्या माध्यमातून एक मागणी मी सभागृहापुढे मांडलेली आहे. आपल्या सर्वांना आठवत असेल की, मधल्या काळामध्ये 4 पैशाचा कर इंडस्ट्रीयल आणि कमर्शिअल ग्राहकांवर बसवून ग्रीनसेस निर्माण करण्याच्या दृष्टीने चर्चा केलेली आहे. आता आपण आपल्या राज्यामध्ये अपारंपरिक ऊर्जासाठी स्वतंत्र विभाग निर्माण केला आहे. यात श्री.विनय कोरे यांनी पुढाकार घेतलेला आहे. यासंबंधी राज्य शासनाने एक निर्णय घेतला आहे. या राज्यातील अपारंपरिक क्षेत्रातील पोटेंशिअल पाहिले तर देशात 77900 मे.वॅ.इतकी वीज अपारंपरिक पध्दतीने निर्माण होऊ शकते. यापैकी 7731 मे.वॅ.वीज आपल्या राज्यामध्ये निर्माण करू शकतो. आजच्या तारखेला आपल्याकडे 697 मे.वॅ.चे प्रकल्प उभे आहेत. 1 मे.वॅ.चा प्रकल्प लावला तर त्यातून फक्त 20 टक्के वीज आपल्याला उपलब्ध होते. किंमत मात्र तेवढीच असते. म्हणून 4 पैशाचा जो कर लावला होता, त्यातून मिळणारी रक्कम राज्याच्या आकस्मित निधीमध्ये जमा होते, ती रक्कम आता अपारंपरिक ऊर्जा विभागाकडे वर्ग करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. त्यासाठीच सभागृहापुढे 100 कोटी रुपयांची मागणी मांडण्यात आली आहे. राज्य शासनाच्या वतीने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील...

3 वर्षामध्ये 218 कोटी रूपये राज्याच्या बजेटमधून द्यावयाचे आहेत. ही रक्कम कराच्या रूपातून येणाऱ्या रकमेतून द्यावयाची आहे. तसेच 200 कोटी रूपये अन्य मार्गाने उभे करावयाचे आहेत. या राज्यामध्ये ऊर्जेची पुनर्निर्मिती करण्यासाठी 2800 कोटी रुपयाचा प्रकल्प प्रायव्हेट पाटीसिपेशनद्वारे व सरकारच्या भागिदारीने गुंतवणूक करून उभारण्याचा निर्णय घेतलेला आहे. माझी खात्री आहे की, या माध्यमातून राज्याला अधिकचा वीज पुरवठा उपलब्ध होऊ शकेल आणि राज्याची गरज आपण काही प्रमाणात कमी करू शकू.

अध्यक्ष महाराज, येथे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या देखील 14 प्रमुख मागण्या आहेत. यासाठी आपण वेगवेगळया कामासाठी 91 कोटीची तरतूद करीत आहोत.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MHM/ D/ RJW/ SBT/ 20:00

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ प्रौढ व निरंतर शिक्षणाच्या संदर्भात एक नवीन विभाग सुरु करीत आहोत. तेथे लाक्षणिक मागणी हजार रुपयांची आहे. मार्चपर्यंत याची गरज लागणार नाही. पण तो कार्यक्रम त्यांना पुढे नेता यावा. यासाठी त्या विद्यापीठाला हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला चार कोटी रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचबरोबर डॉ.बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठाला पदव्युत्तर विभागासाठी वैज्ञानिक वस्तू उपकरणे खरेदीसाठी तसेच नाट्यगृहाचे बांधकाम करण्यासाठी त्यांची अनेक दिवसांपासूनची मागणी होती, त्यासाठी चार कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतलेला आहे. उस्मानाबाद येथे मराठवाडा विद्यापीठाचे उपकेंद्र करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी दोन कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य, विधीमहालयाच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्याची रक्कम देणे प्रलंबित होते यासाठी 10 कोटी 80 लाख रुपयांची मागणी सभागृहासमोर ठेवण्यात आलेली आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय जी माहिती सांगत आहेत ती सर्व माहिती आम्ही पुस्तकात वाचलेली आहे. आपण जर इतका वेळ घेतला तर पुढील कामकाजावर त्याचा परिणाम होईल एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, विभागाचे म्हणणे रेकॉर्डवर येणे महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे अध्यापक, अध्यापकेतर कर्मचाऱ्यांना थकबाकी आणि नियमित वेतनाची रक्कम देण्यासाठी 55 कोटी मागणी केलेली आहे. गुरु गोविंद अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड साठी आपण तीन कोटी रुपये उपलब्ध करुन देत आहोत. तसेच राज्यातील ज्या ग्रंथालयांना 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्या प्रत्येक ग्रंथालयाला पाच लाख रुपये देण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. त्यासाठी 3 कोटी 85 लाख रुपयांची मागणी सादर करण्यात आलेली आहे. औद्याोगिक संस्थाना भाडे देण्यासाठी 3 कोटी 60 लाख रुपये, औद्योगिक संस्थामधील साधनसामुग्रीची तूट भरुन काढण्यासाठी 16 लक्ष 10 हजार रुपये त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना हत्यार पेट्या पुरविण्यासाठी 31 लक्ष 61 हजार रुपये आणि इतर अशा महत्वाच्या मागण्या याठिकाणी मांडलेल्या आहेत. तंत्रशिक्षणामधील अनुशेष दूर करण्यासाठी 3 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मेडीकल एज्युकेशनच्या माध्यमातून मेडिकलसाठी 17 कोटी 95 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे.

AJIT/ MHM/ D/ RJW/ SBT/ 20:00

श्री.दिलीप वळसे-पाटील....

तसेच मेडीकल कॉलेजच्या मेटेंनन्ससाठी, बांधकामासाठी जवळपास 23 कोटी 78 लाख रुपयांची भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, नांदेड येथील आयुर्वेदिक महाविद्यालयाला 50 वर्षे पूर्ण झाली. त्या महाविद्यालयातून शेकडो डॉक्टरांनी पदव्या घेतल्या. आपण त्या विद्यालयासाठी काही तरी तरतूद करावयास पाहिजे होती. तुमच्यासारख्या मंत्रिमहोदयांनी या महाविद्यालयाला एकदम ऊर्जितावस्थेत टाकून द्यावे हे बरोबर नाही. एवढेच मला बोलावयाचे आहे.

नंतर श्री.बोर्डे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ RJW/ पूर्वी श्री.अजित.... 20:05

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांना जे अपेक्षित आहे तेच ते या ठिकाणी सांगत आहेत. समोरच्या बाकावरील सदस्यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्याबाबत मात्र ते काही सांगत नाही. त्यांच्या प्रश्नांना बगल देणे योग्य नाही एवढेच मी सांगू इच्छितो.

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र या नावाने संस्थेचे काम सुरु आहे. त्या महिला आपल्याकडे निधीसाठी वारंवार फेऱ्या मारत आहेत. तुम्ही एक-दोन कोटी रुपये दिल्याचे आश्वासन देता. परंतु अगोदरच्या 16 कोटी रुपयांचे काय झाले ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी प्रश्न विचारल्यामुळे मी बसलो होतो, माझे उत्तर संपलेले नव्हते. मी सभागृहामध्ये कोबाल्ट युनिटबाबत भूमिका मांडली. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, चार-पाच अधिवेशन होऊन गेले तरी कोबाल्टबाबत काहीच झालेले नाही. परंतु मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, पुरवणी मागण्या वित्त विभागाला सादर केल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार कोणाला प्राधान्य द्यावे ही त्यामध्ये प्रामुख्याने अडचण असते. उर्जेसारख्या क्षेत्रात सुध्दा 11 वर्षामध्ये वीजनिर्मीतीसाठी बजेटरी तरतूद करु शकलो नव्हतो. यावेळी प्रथमच मोठया प्रमाणावर ऊर्जा विभाग विजेच्या निर्मितीसाठी तरतूद करु शकलेले आहे.

प्राथमिक शाळेला जरी प्राधान्य मिळत असले तरी हायर एज्युकेशनला मिळणारा निधी हा मोठया प्रमाणावर कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च होतो. या ठिकाणी विकासाच्या दृष्टिकोनातून विचार मांडण्याचा प्रयत्न केला गेला. मेडिकल कॉलेज किंवा त्याच्याशी संलग्न जे हॉस्पीटल आहे, मग त्यामध्ये नागपूरचे सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल असेल, त्या हॉस्पीटलमध्ये आज दुर्दैवाने नगरपालिका किंवा महानगरपालिकांनी प्राथमिक उपचारासाठी जी हॉस्पीटल तयार करावयास पाहिजे ती न केल्यामुळे त्याचा ताण या सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलवर येऊ लागला आहे. नागपूरचे सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल आज जनरल हॉस्पीटलसारखे होऊ लागले आहे. नागपूर शहराचे उदाहरण घेतले तर नागपूर शहर महानगरपालिकेच्या मॅटर्निटी नर्सिंग होम किंवा जनरल हॉस्पीटलमध्ये जाण्याऐवजी जनता सरकारच्या हॉस्पीटलमध्ये येण्यास प्राधान्य देत आहे. सरकारी रुग्णालयात बेड जरी नसले तर रुग्णांना खाली ठेवावे लागते. त्यामुळे सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये किंवा शासनाच्या हॉस्पीटलमध्ये भगिनी किंवा अन्य पेशंटला स्पेशल ट्रिटमेंट देता

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील....

येत नाही. आपण कापूस, कांदा, दूध, लोकरी मावा या प्रश्नांना प्राधान्य देतो आहोत. त्यामुळे हायर एज्युकेशनला बजेटमध्ये प्राधान्य मिळू शकत नाही. हायर एज्युकेशनला निधी न मिळाल्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या भावना अनावर होऊ शकतात हे मी समजू शकतो.

सभापती महोदय, मेडिकल कॉलेजची हॉस्पीटल असतील, होमिओपॅथी किंवा आयुर्वेद हॉस्पीटल असतील त्या सर्वांची पुनर्रचना करण्यासंदर्भात नवीन अभ्यास सुरु केला आहे. या कामासाठी जर जादा निधीची आवश्यकता पडली तर बाहेरुन निधी उभा केला जाईल. यातून आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमाशी स्पर्धा करण्याचा आम्ही आग्रह धरणार आहोत. विभागात 50 टक्के जागा शिल्लक आहेत, अनेक ठिकाणी आवश्यक मशिनरी नाहीत अशी जी आजपर्यंतची भूमिका होती ती यापुढे चालणार नाही एवढेच या निमित्ताने सांगू इच्छितो. राज्याच्या अर्थमंत्र्यांनी अभ्यासपूर्वक प्रयत्न करुन, महसुली तुटीमध्ये असलेले राज्य सरप्लसमध्ये आणलेले आहे. "कॅश-फ्लो" बजेटची कल्पना मांडली गेली. मार्च महिन्याच्या बजेटमध्ये तरतूद करण्यासाठी विभागाने प्रत्येक महिन्याला योग्य प्रस्ताव सादर केल्यानंतर पैसा मिळेल. त्यामुळेच आज एवढया मोठया प्रमाणावर प्रत्येक विभागाला निधी रिलीज होत आहे. त्यामुळे यातून आपल्याला निश्चितपणाने पुढे जाता येईल.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील..

सभापती महोदय, या सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या पूरक मागण्यावरील चर्चेत भाग घेत असतांना माननीय सदय्य प्रा.जोगेन्द्र कवाडे यांनी नांदेड आणि औरंगाबाद येथील विद्यापीठाला अनुदान दिल्याबद्दल शासनाचे अभिनंदन केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी औरंगाबाद येथील फार्मसी महाविद्यालयाला 1 कोटी रुपयाची तरतूद करण्याच्या बाबतीत आग्रह धरलेला आहे. रिॲप्रोप्रिएशनमध्ये याकरता निधी मिळावा म्हणून मी निश्चितपणे प्रयत्न करणार आहे.सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी वाचनालयासाठी शासनाने अनुदान देण्यासाठी तरतूद केली म्हणून शासनाचे अभिनंदन केलेले आहे.आपण जी भावना व्यक्त केली होती त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

डॉ.अशोक मोडक : मी आपले अभिनंदन केले होते त्याचबरोबर मी एक विनंती सुध्दा केली होती. चाळीसगाव येथील नारायण बनकट वाचनालयाला 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. चाळीसगावच्या नगरपालिकेने त्यांच्यावर घरपट्टी आकारली आहे. तेव्हा ही घरपट्टी माफ करावी यासाठी मी माननीय मुख्यमंत्र्याना विनंती केली होती.त्या नगरपालिकेने सुध्दा आम्ही घरपट्टी माफ करण्यास तयार आहोत असा ठराव केलेला आहे परंतु शासनाच्या ग्रीन सिग्नलची नगरपालिका वाट पहात आहे.तेव्हा या संदर्भात आपण पुढाकार घेऊन त्यांची घरपट्टी माफ करणार आहात काय ?

श्री.दिलीप वळसे - पाटील : घरपट्टी पासून जे उत्पन्न मिळते ते नगरपालिकेच्या उत्पन्नातील एक महत्वाचा भाग आहे.त्याबाबतीत शासनाला काही डायरेक्शन देता येतील किंवा नाही हे मला माहीत नाही. 100 वर्षा पूर्वीचे हे वाचनालाय आहे. या वाचनालयाच्या तीन निरनिराळया ग्रेडस आहेत व त्यांना दरवर्षी परीरक्षण अनुदान देण्यात येत असते त्या अनुदानातून घरपट्टी भरणे हे फार अवघड आहे असे मला वाटत नाही.या सबंधीचा जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो निर्णय त्या नगरपालिकेला घ्यावा लागेल. या सभागृहाच्या आणि सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मी त्या नगरपालिकेच्या मुख्याधिका-यांबरोबर तसेच अध्यक्षांबरोबर बोलून ही बाब तपासून पाहीन परंतु राज्य सरकारच्या वतीने ही घरपट्टी माफ करता येईल असे मला वाटत नाही हा निर्णय नगरपालिकेला घ्यावयाचा आहे.नगरपालिकेने जर तसा ठराव केलेला असेल तर व त्या सदर्भात शासनाकडून काही मान्यता हवी असेल तर ....

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप देशमुख : त्यांनी चुकून हे पत्र आपल्याकडे पाठविलेले आहे.तेव्हा हा निर्णय त्यांनी स्वत: घ्यावा अशा प्रकारचे पत्र त्यांना देणार आहात काय ? ही बॉडी निर्णय घेण्यास सक्षम असल्यामुळे बॉडीनेच याबाबतीत योग्य तो निर्णय घ्यावा असे पत्र पाठविण्यात आले पाहिजे.

श्री.दिलीप वळसे पाटील : मी तेच सांगत होतो. अशा प्रकारचे पत्र त्यांना पाठविण्यात येईल .सन्माननीय सदस्य श्रीमती नीलम गो-हे यांनी पुण्याच्या अभ्यास केन्द्राच्या बाबतीत येथे प्रश्न उपस्थित केला होता. अनेक विद्यापीठे अशी आहेत की जी स्वायत्त आहेत किंवा अनेक शिक्षण संस्था अशा आहेत की ज्यांना आपण स्वायत्तता देण्याचा निर्णय घेतलेला आहे तेव्हा अशा शिक्षण संस्था केन्द्र सरकारच्या यु.जी.सी.किंवा ए.आय.सी.टी.कडे जाऊन त्यामध्ये वेगवेगळया योजनांखाली पैसे आणण्याचा प्रयत्न करीत असतात पुणे येथील विद्यापीठाने अशा प्रकारचा प्रस्ताव केन्द्र सरकारकडे पाठविला आहे. ब-याचदा असे घडते की हा प्रस्ताव परस्पर पाठविला जातो हा प्रस्ताव त्यांच्याकडे गेल्यानंतर पहिली पाच वर्षे केन्द्र सरकार त्यांना पैसे देते परंतु नंतर पैसे देत नाही.त्यामुळे हा बोजा राज्य सरकारवर येतो. त्यामुळे हा प्रस्ताव प्रलंबित आहे बाकीचे प्रस्तावसुध्दा त्याचपध्दतीने प्रलंबित होते. राज्य सरकारच्या वतीने त्या प्रस्तावाबाबत पाठपुरावा करण्यात येईल. पाचव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम दिल्या बद्दल सन्माननीय सदस्या श्रीमती संजवनी रायकर यांनी शासनाचे आभार मानले आहेत. इतरही सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्याची नोंद राज्य सरकारच्या वतीन मी घेतलेली आहे.

श्री.श्रीकांत जोशी : माझ्या प्रश्नाच्या बाबतीत खुलासा केलेला नाही.

श्री.दिलीप वळसे पाटील :मी त्याबाबतीत सांगितले की, नांदेड आयुर्वेद महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या संदर्भात मला आज या ठिकाणी लगेच उत्तर देता येत नसले तरी या प्रश्नाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांना बोलावून एक बैठक घेण्यात येईल .त्याचबरोबर बाकीच्या विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवासाठी राज्य सरकारच्या वतीने जशी आर्थिक मदत केली जाते तशी मदत या महाविद्यालयाला करण्याच्या बाबतीत राज्य सरकारच्या वतीने भूमिका घेतली जाईल एवढेच मी या निमित्ताने सांगतो. तसेच या विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

नतर श्री.सुंबरे

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. गणेश नाईक (राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण व कामगार मंत्री) : सभापती महोदय, आज राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण आणि कामगार या खात्यांच्या पूरक मागण्यांच्या अनुषंगाने या ठिकाणी झालेल्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे यांनी नागपूर मधील इंदोरा येथील कष्टकरी, मागासर्गीयांच्या वस्तीमध्ये कामगार कल्याण केंद्राची सभागृहा सारखी जागा आहे त्या ठिकाणी अतिक्रमण होण्याची शक्य असल्याची भीती व्यक्त केली. तेव्हा मी त्यांना या निमित्ताने सांगू इच्छितो की, त्या परिसरामध्ये तेथील कष्टकरी कामगार आणि मागासवर्गीय समाजांसाठी म्हणून एक सांस्कृतिक कार्य संकुल उभे करण्याच्या दृष्टीने मंडळाचे पदाधिकारी, विभागाचे अधिकारी आणि आपल्या सोबत एक बैठक लावून यातून कसा मार्ग काढता येईल याचा निश्चितपणे आपण विचार करू.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी न्यायालय आणि न्यायालयांच्या इमारतींचा दर्जा आणि एकूणच न्यायालयांची संख्या याबद्दल आपले विचार येथे मांडले. त्या संदर्भात एकूणच व्यावहारिक दृष्टीकोनातून संख्याशास्त्राच्या अनुषंगाने माहिती देण्यापेक्षा भावनिक नात्याने विविध पक्षांचे कामगार नेते, विविध पक्षांचे सन्माननीय सदस्य जेव्हा जेव्हा अशा प्रकारे प्रश्न उपस्थित करतात तेव्हा मी स्वत: जातीने संबंधित व्यवस्थापन आणि कामगार नेते यांची बैठक दालनामध्ये घेऊन संप, टाळेबंदी होणार नाही आणि एकूणच औद्योगिक परिसरामध्ये अशांतता निर्माण होणार नाही असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी हिंद कंटेनर कंपनीच्या कामगारांचा प्रश्न मांडला. खरे तर हा प्रश्न निघून गेला होता. परंतु सन्माननीय सदस्य श्री.तरे यांच्या जागरूकतेमुळे तो प्रश्न सोडविण्यात ते कारणीभूत ठरले हे मला येथे आवर्जून सांगितले पाहिजे. बाब अशी होती की, कंसेट टू नो ड्यूज ......
ही बाब कामगार खात्याकडून जात असताना अधिकारी वर्गाने चूक केली होती. त्यामुळे त्या कामगारांना त्यांचे कष्टाचे पैसे न मिळता, त्या ठिकाणी इमारतींचे संकुल उभे राहिले असते. एक तास जरी उशीर झाला असता तरी ते पैसे त्यांच्या हातून गेले असते. परंतु सन्माननीय सदस्य श्री. तरे सारख्या जागरूक लोकप्रतिनिधींमुळेच त्यांचा हा प्रश्न आता सुटला आहे. तेव्हा या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री. तरे आणि इतरही सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, भविष्य काळामध्ये अशा प्रकारची कोणतीही अडचण असेल तर आपण माझ्याकडे आल्यास ती अडचण दूर करण्याचा निश्चितपणे आपण प्रयत्न करू.

...... 5ए 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नाईक .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी चर्चेमध्ये सहभागी होताना असे म्हटले की, काही खाजगी उद्योजकांनी छोटी बंदरे आणि जेट्टी उभ्या केल्या आहेत आणि आता व्यापारीकरणाच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू झालेली आहे. पण त्यासाठी त्यांना शासनाची परवानगी घ्यावी लागेल. त्यांना त्या जेट्टीचा विस्तार करावयाचा असेल तरी त्यासाठी त्यांना शासनाची परवानगी घ्यावी लागेल. समजा यापूर्वी परवानगी दिली गेली असेल, त्यासाठी त्यांना विहित कालखंडाची मुदत दिली असेल आणि त्या कालखंडामध्ये त्यांनी ते पूर्ण केले नसेल तर त्यांना त्यासाठी पुन्हा शासनाकडे परवानगीसाठी यावे लागणार आहे हे आपण लक्षात घ्यावे. ..

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, त्यावेळेस 30 वर्षाच्या कराराने बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर आपण त्यांना दिले पण तेथे ते बांधकाम सुरूच करीत नाहीत. रेवस साठी आपण 5 कोटी रूपये देतो म्हणून जाहीर केले पण एकही पैसा दिलेला नाही. ...

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, याबाबतीत मी सन्माननीय सदस्यांना निश्चितपणे सांगेन की, त्यांना दिलेला कालखंड उलटला असला तरी त्या लोकांना पुन्हा परवानगी घेण्यासाठी शासनाकडे यावे लागणार आहे. मला वाटते सन्माननीय सदस्यांचे यामुळे समाधान झाले असेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 161 च्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयानुसार आणि शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील दुय्यम न्यायालयातील (औद्योगिक न्यायालय आणि कामगार न्यायालय) न्यायिक अधिकाऱ्यांना रजा प्रवास सवलत, रजा रोखीकरण, बदली अनुदान, विशेष वेतन, दूरध्वनी सुविधा, इंधन भत्ता, वृत्तपत्र भत्ता इत्यादी भत्ते व सवलती शासनाने दिनांक 1 एप्रिल 2004 पासून मंजूर केलेले आहेत आणि दिनांक 1.7.1996 पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. सध्या राज्यात 20 जिल्ह्यांच्या ठिकाणी 36 औद्योगिक न्यायालये आणि 25 जिल्ह्यांच्या ठिकाणी 46 कामगार न्यायालये कार्यरत आहेत. ...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे .... 5बी 1 ..

श्री. गणेश नाईक...

सभापती महोदय, सन 2004-05 व सन 2005-06 या वित्तीय वर्षामध्ये मंजूर केलेल्या अनुदानात वरीलप्रमाणे भत्ते व सवलती (वेतन, कार्यालयीन खर्च आणि तेल व इंधने इ.) या देय रकमा भागविण्यासाठी तरतूद केली नसल्याने चालू वर्षी 2005-06 मध्ये औद्योगिक न्यायालयासाठी रु. 5.87 लाख आणि कामगार न्यायालयासाठी 8.92 लाख अशी एकूण 14.79 लाख इतकी वाढीव रक्कम पूरक मागणीव्दारे सादर केली आहे तिला सभागृहाने संमती द्यावी अशी विनंती करतो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी मी मांडलेल्या काही बाबी मंजूर केल्या आहेत. परंतु दुसरी बाब अशी आहे की, उद्योगधंदे वाढत असताना जनतेच्या हिताची, आरोग्याची काळजी घेतली पाहिजे ती दुर्दैवाने होत नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगधंध्यांना विशेष करुन प्रदूषणकारी उद्योगधंध्यांना कन्सेंट टू एस्टॅब्लिश व कन्सेंट टू ऑपरेट देताना बऱ्याचवेळा गांभीर्याने बाबी तपासण्यात येत नाहीत. तसेच आता नवीन अधिनियमानुसार बांधकामांना पर्यावरणविषयक ना हरकत परवानगी देताना व खाडी व समुद्रालगतच्या बांधकामांना सी.आर.झेड संबंधी परवानगी देतांना शासनाला याबाबत काहीच कल्पना नसते. सी.झेड.एम.ए. समितीच्या निर्णयासंबंधी राज्य शासनाला काहीच कल्पना नसते. बऱ्याच वेळा या परवानग्या देताना सर्व बाबी गांभीर्याने व काटेकोरपणे तपासल्या जातात की नाही याबाबत शासनाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. या सर्व बाबी लक्षात घेता राज्य शासन याबाबत विशेष करुन माननीय मंत्रिमहोदय या विषयी विचार करुन शासनाच्या पूर्व संमतीशिवाय वरील कुठल्याच बाबींचा निर्णय निर्गमित होणार नाही याबाबत काळजी घेणार काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांचे असे म्हणणे आहे की, नवीन उद्योग येतांना ते कन्सेंट टू एस्टॅब्लिश व कन्सेंट टू ऑपरेट, उद्योग स्थापन करणे व उद्योग चालू करण्यासाठी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या पातळीवर परवानगी दिली जाते. त्यामुळे बराच गोंधळ होतो असा त्यांचा आरोप आहे. याबाबतची फाईल ही शासनाच्या पातळीवरच मान्य केली जाईल, शासनाकडूनच त्याचे निरीक्षण केले जाईल अशी त्यांची मागणी आहे. त्यांनी सी.आर. झेडचा उल्लेख केला. भविष्य काळात या संबंधीची फाईल या खात्याच्या सचिवांमार्फत शासनाकडे येईल अशाप्रकारचे वचन निश्चितपणे त्यांना देतो. आणि मी ज्या अर्थी सभागृहामध्ये बोललो आहे त्या अर्थी ती गोष्ट केल्याशिवाय रहाणार नाही.

---

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन 2005-06 च्या माझ्या विभागाच्या पूरक मागण्यांवर चर्चा करीत असतांना माननीय सदस्य सर्वश्री. मधुकर सरपोतदार जयंत प्र. पाटील, प्रा. जोगेंद्र कवाडे, मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, डॉ. अशोक मोडक, नतिकोद्दीन खतिब, डॉ. नीलम गोऱ्हे इत्यादी माननीय सदस्यांनी अतिशय महत्वपूर्ण सूचना केल्या आहेत . त्यांनी केलेल्या सूचनांचा मी पहिल्यांदा आदर करतो. त्या संदर्भात सविस्तर बोलण्याऐवजी माननीय सदस्यांनी ज्या महत्वाच्या सूचना केल्या आहेत त्याबाबत थोडक्यात त्यांच्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न करतो. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी विना अनुदानित संस्थांना अनुदान देणे गरजेचे आहे अशाप्रकारची सूचना केली. त्याचप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नवीन स्टाफींग पॅटर्न करणे आवश्यक आहे. हल्लीच्या ऑटोमायझेशन, कॉप्युटरायझेशनच्या युगामध्ये या कर्मचाऱ्यांची खरोखरच गरज आहे काय? याबाबत निश्चितपणे विचार केला जाईल. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी क्रिडा विभागासाठी अल्प निधी उपलब्ध केला जातो अशाप्रकारचा मुद्दा मांडला. त्यासाठी शासनाने क्रिडा विभागासाठी अंदाजपत्रकामध्ये 5 टक्के निधी राखून ठेवावा अशी सूचना केली. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. नतिकोद्दीन खतिब यांनी डोंगरी भागातील, दुर्गम भागातील अल्पसंख्यांकांच्या संस्थांना, आदिवासी संस्थांना अनुदान द्यावे अशी सूचना केली. त्याबाबत मंडळाकडे ॲफिडेव्हिट केले असून राज्याची वित्तीय स्थिती सुधारल्यानंतर त्याबाबत जरुर विचार करु. त्याचप्रमाणे टी.एस.पी., आदिवासी क्षेत्रामध्ये ज्या शिक्षण संस्था आहेत त्या क्षेत्रामध्ये मुलांची संख्या जास्त असेल त्यांना अनुदान देण्याचा निर्णय दोन वर्षापूर्वी घेण्यात आला. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी महत्वपूर्ण सूचना केली आहे की, राज्यामध्ये क्रिडा क्षेत्राला आपल्याला न्याय द्यायचा असेल तर पहिल्यांदा निधीची तरतूद केली पाहिजे. आज खाजगी संस्था, खाजगी मंडळे स्वत: डेडिकेशनने काम करीत आहेत म्हणून क्रिडा खाते जीवंत आहे असे आपल्याला म्हणावेसे वाटते.

(यानंतर सौ. रणदिवे)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/D/RJW पूर्वी श्री.सरफरे . . . . 20:25

प्रा.वसंत पुरके . . . .

म्हणून जाणीवपूर्वक किमान पाच टक्के आरक्षण ठेऊन माझ्या क्रीडा क्षेत्रातील लोकांच्या मनामध्ये प्रलोभन निर्माण झाले पाहिजे, त्यांचे स्पोटर्स् करिअर आणि एज्युकेशन करिअर हे दोन्हीही घडविणे जर गरजेचे असेल तर आम्हाला समांतर आरक्षण देणे गरजेचे आहे म्हणून जाणीवपूर्वक याबाबतीत बैठक बोलविणे गरजेचे आहे. या क्षेत्रामध्ये ज्या-ज्या लोकांचे प्रचंड मोठे योगदान आहे त्यामध्ये दामलेसाहेबां सारखी शिक्षण संस्था असेल, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे वैद्य यांच्यासारखी जी मंडळी असतील त्याही लोकांबरोबर मी स्वतंत्रपण बैठक घेणार आहे.या राज्यामध्ये आमचे शेकडो क्रीडा मार्गदर्शक आहेत. पण ते स्वत: जिल्हयाच्या ठिकाणी राहतात आणि माझ्या मुलाला जर बॅटमिंटनचा शौक असेल तो मुलगा ग्राऊंडवर जातो आणि त्याचा फक्त खेळ पाहण्याचे काम हे लोक करतात. म्हणून मी महाराष्ट्रात पहिल्यांदा जाणीवपूर्वक यवतमाळ जिल्हयामध्ये ग्रामीण क्रीडा विकास कार्यक्रम सुरु केला. सगळया डी.एस.ओ.,टी.एस.ओ.नां सांगितले की, तुम्ही स्वत: तालुक्यामध्ये जा. किमान तुमचे पाच गेम असतील तर पाच दुणे दहा टीम एका तालुक्यामध्ये निर्माण झाल्याच पाहिजेत अशा प्रकारचे निर्देश दिले आणि याला प्रचंड गती मिळावी म्हणून काही-काही चांगल्या,चांगल्या शिक्षण संस्थांची मी निश्चितपणे बैठक घेणार आहे. यांसदर्भात जी चांगली सूचना आली आहे, ती मी निश्चितपणे ग्राहय समजतो. त्यानंतर माननीय सदस्य प्रा.कवाडेसरांनी आणि अनेक मान्यवरांनी सूचना केली आहे की, अत्यंत उपेक्षित आणि खेडयामध्ये खऱ्याअर्थाने सर्वात जास्त महत्वाची भूमिका बजावणारी आमच्या अंगणवाडीतील, बालवाडीतील जी शिक्षण सेविका आहे. कोणीही जावे, ग्रेड 4,ग्रेड 3, ग्रेड 2 ची मुले किती आहेत? खऱ्या अर्थाने मुलांचे आरोग्य तपासले जाते की नाही, मेडिकल ऑफीसर येतात की नाही? हे सगळे पाहण्याची आणि सर्वांना इत्यंभूत माहिती देण्याची महत्वाची जबाबदारी आमच्या अंगणवाडी सेविकेची किंवा बालवाडी सेविकेची आहे. म्हणून तिला मिळणारे जे वेतन आहे, त्याला वेतन म्हणता येणार नाही. ते मानधन आहे आणि भाऊबीज म्हणून तिला 500 रुपयांची भेट देतो, म्हणजे आपण तिच्यावर काही उपकार करतो अशातला भाग नाही. पण तिच्या कर्तव्याची खरच बूज राखावयाची असेल किंवा जर खरच तिच्या कर्तव्याची कदर करावयाची असेल तर आपले जे म्हणणे आहे की, तिला किमान एक हजार रुपये तरी मिळावेत, तर मी स्वत: या सूचनेची गांभीर्याने नोंद घेतो एवढेच आपल्याला सर्वांना सांगू इच्छितो. त्यानंतर माननीय सदस्य प्रा.शरद पाटील.......

. . . .5 सी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साहेबांनी म्हटले आहे की, भाऊबीजेची भेट म्हणजे चेष्टा आहे. मला सुध्दा यामध्ये समाधान नाही. यासंदर्भात तिला 1000 रुपये द्यावे, त्यापेक्षाही तिच्याकडून 100 रुपये घ्यावयाचे आणि सरकारने 100 रुपये द्यावयाचे आणि नंतर तिच्या पेन्शनची व्यवस्था करावी हे मान्य न करता सरकारनेच पेन्शनची व्यवस्था करावी अशी आपली सूचना आहे. त्याचाही मी निश्चितपणे गांभीर्याने विचार करेन. त्यानंतर शासनाने 100 रुपये द्यावे की नाही याचा निर्णय द्यावा असेही आपण म्हटलेले आहे. याबाबतीत मी चटकन "होय" असे म्हणू शकत नसलो तरी या संदर्भात मी स्वत: बैठक घेऊन संबंधित विभागाशी आणि वित्त विभागाशी चर्चा करेन. सन्माननीय सदस्य श्री.डायगव्हाणेसाहेबांनी डी.ए.चा जो महत्वाचा मुद्दा आहे त्यासंदर्भात सांगितले. महागाई भत्त्याच्या संदर्भातच पहिली 274 कोटी 49 लाख 96 हजाराची मागणी आहे. त्यांची सूचना अशी आहे की, हा जी.आर.निघो अगर न निघो, जेव्हा-जेव्हा डी.ए.जाहीर होतो, तेव्हा सरकारने त्या संदर्भात व्यवस्था करावी. परंतु केंद्र शासन कोणत्या महिन्यामध्ये डी.ए.जाहीर करेल हे निश्चित नसल्यामुळे याबाबतीत थोडासा विलंब होतो हे मला मान्य आहे. पण भविष्यामध्ये याची दखल घेतली जाईल. 915 शाळांमधील आठवी ते दहावीच्या तुकडयांना सुध्दा दिवाळीमध्ये खऱ्या अर्थाने आम्ही अनुदान तत्वावर आणलेले आहे. पण एक महिन्यामध्ये ही यादी जाहीर करावी असा आमच्या सर्व शिक्षक बांधवांचा आग्रह होता, तशी आम्ही यादी जाहीर केली आहे. पण आम्ही त्यासाठी मार्चमध्ये निश्चितपणे तरतूद करु अशी ग्वाही देतो. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या संदर्भात अट रद्द करावी अशीही त्यांची सूचना आहे. मी निश्चितपणे सांगेन की, वेतनेतर अनुदाना संदर्भात त्यांनी घेतलेली आग्रही भूमिका ही मला निश्चितपणे जरी मान्य असली तरी यासाठी जवळजवळ 233 कोटी रुपयांची तरतूद करणे गरजेचे आहे आणि येत्या मार्चपूर्वी तरी ही तरतूद होणार नाही. पण आम्ही मार्चच्या अधिवेशनामध्ये निश्चितपणे तरतूद करु. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी अत्यंत महत्वाची सूचना केलेली आहे. जे वाद होतात, खरे म्हणजे मागच्या अडीच वर्षामध्ये फक्त 52 शाळांच्या खोल्या बांधून झ ाल्या होत्या. पण आजच्या घडीला माझ्या शिक्षक बांधवांनी 17 ते 18 हजार खोल्या बांधल्या. अतिशय चांगल्या खोल्या बांधल्या, त्याची क्वॉलीटी सुध्दा मेन्टेन झाली आहे.पण दुर्दैवाने काही ठिकाणी सरपंच आणि आमचे मुख्याध्यापक यांच्यामध्ये काही वाद सुरु झाले. काही खोल्यांचे दर्जेदार काम न झाल्यामुळे क्वॉलीटी मेन्टेन न

. . . .5सी-3



APR/D/RJW 20:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके . . . .

केल्याबाबत आरोप केले, काही शिक्षकांना त्रास देखील झालेला आहे. आम्ही याबाबतीत सुध्दा निश्चितपणे दखल घेऊ. आपण औरंगाबाद एरियामध्ये क्रीडा संकुलाचा विचार केला आहे. त्या क्रीडा संकुलाचे भूमीपूजन होऊन एक वर्ष देखील झाले नाही तरीही आम्ही युध्दपातळीवरुन 80 लाखाची तरतूद केली. दोन-अडीच कोटीतील 80 लाख रुपये यासाठी एकाच वेळी दिले.यावेळेस आपण त्यांना जवळजवळ पावणेचार कोटी रुपये देत आहोत. तेव्हा बांधकाम अडणार नाही. संपूर्ण महाराष्ट्रात सगळयात गतीमान पध्दतीने बांधकाम होणारे जर कोणते विभागीय क्रीडा संकुल असेल तर ते फक्त औरंगाबादचे आहे. मी याची दखल घेईन. नागपूरच्या क्रीडा संकुलाचे काम पैशाच्या अभावी मागे पडलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.पवारसाहेबांनी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरणे गरजेचे आहे. नगरपालिका,महानगरपालिका विशेषत: उर्दू शिक्षक आणि आदिवासी शिक्षकांचा अनुशेष भरला जात नाही. म्हणून तेथे अप्रशिक्षित लोकांना नियुक्ती देता येईल किंवा कसे याचाही आम्ही विचार करु. माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण मघाशी नव्हते. परंतु त्यांनी क्रीडेच्या संदर्भात जी सूचना केली की, अतिशय डिव्होशनने काम करणारे जे लोक असतील.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके (पुढे चालू..

ज्या ज्या लोकांनी क्रिडा क्षेत्राला न्याय दिलेला आहे... म्हणजे ऑलंपिकच्या स्तरावर, स्टेटच्या स्तरावर जी मुले गेलेली आहेत ती क्रिडा संस्थांच्यामुळे नव्हे, बालेवाडीसारखी संस्था असली तरी ती अतिशय उपेक्षित आहे. चंद्रपूरची बालेवाडीसारखी काम करणारी शिक्षण संस्था देखील बंद पडलेली आहे. म्हणून जाणीवपूर्वक मी सूचनांचा आदर करेन, नव्हे, आपल्यालाही आम्ही बोलावू. कारण ॲडव्हायझरी कमिटी गठीत करण्याची माझीसुध्दा योजनाआहे. ब-याचशा गोष्टींचे नॉलेज नसते आणि म्हणून क्रिडा क्षेत्रामध्ये आणि शिक्षण क्षेत्रामध्ये ज्यांनी ज्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले असेल, अशा आठ-दहा लोकांची समिती गठीत करुन, त्यांच्याकडून निश्चितच मार्गदर्शन घेऊ. नंतर सर्वच सन्माननीय सदस्यांकडून हेच जाणवलेले आहे की, शालेय पोषण आहार हे एकप्रकारे महाराष्ट्र शासनासमोर चॅलेंज बनलेले आहे. म्हणून न्याय व्यवस्थेने कितीही आदेश दिलेले असले, एक ते दीड रुपयाचे अनुदान आम्हाला द्यावयाचे असले तरी बऱ्याच ठिकाणी मी स्वत: भेट दिलेली आहे आमचे काटेबाई हायस्कूलला भेट दिली असता, त्या ठिकाणची बाई स्वयंपाक करतांना तिला हे माहीत नव्हते की, गॅस सिलेंडर लिकेज झालेले आहे. अक्षरश: ती स्वत: त्यामध्ये होरपळून मरणार होती. त्यावेळेस माझ्या बॉडीगार्डला तेथे मी पाठविले, तेव्हा ती बाई कशीतरी वाचली. अशाप्रकारे अनेक जोखमीचे प्रसंग या शालेय पोषण आहाराच्या सबंधातील मिड डे मिलच्या निमित्ताने होणार आहेत. म्हणून 159 कोटी रुपये देताना आमचा प्लॅन असा होता की, तालुक्या तालुक्यामध्ये एक मोठे किचन निर्माण करावे आणि तेथे जेवण करावे. जेवण चवदारसुध्दा असले पाहिजे. नुसते तांदूळ शिजविले जातात, काही चव नसते. जरी चवदार खिचडी मिळाली तरी त्या खिचडीसोबत पातळ असा पदार्थ असल्याशिवाय शिवाय कोणालाही ती खावत नाही. म्हणून या संदर्भात छोटेसे किचन उभे करायचे कोणातरी एजन्सीला ते काम द्यायचे असा आमचा प्लॅन होता, तो प्लॅन आमच्याकडून पाहिजे तेवढा यशस्वी झाला नाही. अनेक लोकांकडून मागणी आली की,आम्हाला मिळणारे जे काम आहे ते खरेच चांगले काम आहे. त्यांना रोजगार मिळत होता. म्हणून हा प्रयत्न आम्हाला यशस्वी करता आला नाही. हेतू असा आहे की, मिड डे मिलच्या संदर्भात मूलगामी सूचना आहे की, जर न्यायालयाची सूचना असली तरी ज्युडिशियरीकडे आपण गेले पाहिजे. त्यांना समजावून सांगितले पाहिजे. शालेय पोषण आहाराच्या संदर्भात सरकारने न्यायव्यवस्थेला प्रॅक्टीकली इम्पॉसिबल आहे हे समजून सांगण्याची भूमिका असेल तर ती भूमिका बजावायला आम्ही तयार आहोत. परंतु अनेक खेड्यातून मागणी यायला लागली की, मिड डे मिल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके (पुढे चालू....

मिळालेच पाहिजे. शहरी भागाला त्याची गरज नाही. पण बॅकवर्ड एरियामध्ये, ट्रायबल एरियामध्ये ते देणे आवश्यक आहे, याची देखील आम्ही दखल घेऊ. त्यानंतर महत्वाची सूचना सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी केलेली आहे. मी परवा वसंत व्याख्यानमालेमध्ये गेलो होतो, त्यावेळेला लोकांनी सांगितले की, तुम्ही जर मराठीचे चाहते असाल, तर तुम्ही उद्यापासून मराठी कंपल्सरी करणार आहात काय ? मी त्यांना तेव्हाच नम्र विनंती केली की, मराठीचे गोडवे गाताना आपण आपली मुले, आपले नातू खऱ्याअर्थाने मराठी शाळेमध्ये पाठविणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.सावंत साहेबांनी सांगितलेल्या  संस्थेचे नाव साधना विद्यालय आहे. साधना विद्यालय मराठीच्या मुलांची आणि पालकांची कोंडी करत असेल तर भरपूर समाचार घेऊन कारवाई केल्याशिवाय रहाणार नाही. कारण मुलांची संख्या कमी होत आहे. शिक्षकांची संख्या कमी होत आहे. परिणामी भुर्दंड मुलांच्या फीवाढीमध्ये होत आहे, ही देखील गंभीर बाब आहे.  यासाठी मी शिक्षण चालकांशी स्वत: बोलेन. अनुदान कापण्याबाबतची कशी कारवाई करायची, याबाबत मी आपल्याला साक्षीसाठी बोलवेन अशी मी ग्वाही देतो. शालेय पोषण आहार ही अत्यंत जोखमीची बाब झालेली आहे. मी तर असे म्हणेन की, शालेय पोषण आहार कसा द्यायचा आणि कोणत्या पध्दतीने द्यायचा याचीसुध्दा सल्लागार समिती गठीत करणे,त्यांचे विचार ऐकून घेणे आणि नियोजन करणे गरजेचे आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.तरे साहेबांनी शाळांना कुलपे लागतात. अनेक शाळेमध्ये शिक्षक जात नाहीत. अनेक ठिकाणी दोन शिक्षकी शाळा असूनही एक शिक्षक शाळा आहेत. त्याही पेक्षा जवळजवळ 87 क्रिडा संकुलना निधी उपलब्ध नाही. बीडच्या तत्वावर हे सुरु करावे की काय, अशाप्रकारची सूचना केलेली आहे. पण ज्या शाळांना कुलपे लागतात, त्यांची नेमकी कारणे आपण सांगावीत. त्या ठिकाणी शिक्षक नसतील तर आपल्याकडे सेतू शाळा आहे, महात्मा फुले हमी शाळा आहे, राजीव गांधी संधी शाळा आहे, या विविध प्रकारच्या शाळा सुरु केलेल्या आहेत. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठीसुध्दा शाळा असली पाहिजे. मला वाटते, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हेंचा हा मुद्दा आहे.  सगळया प्रकारचे प्रयत्न करुनही म्हणजे 15 विद्यार्थ्यांची संख्या, 30 विद्यार्थ्यांची संख्या मेंटेन केल्यानंतरही मुले शाळेमध्ये येतच नसतील अशी नंदीवाल्यांची शाळा आहे, माकडवाल्यांची शाळा आहे, ऊसतोड कामगारांच्या मुलांची शाळा आहे. मी आता पश्चिम महाराष्ट्रामध्ये मी गेलो, तेव्हा हा प्रश्न  पश्चिम महाराष्ट्रामध्ये दिसून आला.  तीन मुले असतील, चार मुले असतील, पाच मुले असतील तरी सेतू शाळेसारखी संकल्पना महाराष्ट्रामध्ये आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके (पुढे सुरु....

रुजविली. 25 ते 30 कोटी रुपये खर्च करुन राजीव गांधी संधी शाळासुध्दा महाराष्ट्रामध्ये सुरु केलेली आहे. पण त्यासाठी आपल्या सगळयांनाच पुढाकार घेणे गरजेचे आहे. शिक्षणापासून कोणी वंचित राहू नये, म्हणून शेवटी जे काही करता येईल त्याबाबत आपल्या सूचना घेऊन निश्चित करु माननीय मोते सरांनी अनुदान प्राप्त शाळांना कायमस्वरुपी विना अनुदान तत्व हे खऱ्याअर्थाने रद्द करावे, अशाप्रकारची सूचना आहे. एका बाजूला अनुदान तत्वावर चालणारी शाळा आहे, त्या ठिकाणची वाढीव तुकडी ही कायम विना अनुदान तत्वावरील आहे.

यानंतर कु.थोरात......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके...

17 ते 18 टक्के अशा शाळा आहेत. म्हणून डोंगरी भागातील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. तेथे विद्यार्थी संख्या 30 वरुन 15 वर विद्यार्थ्यांवर आणली आहे.ज्या अर्थी विद्यार्थ्यांची संख्या कमी केलेली आहे त्या अर्थी शिक्षकांची संख्या सुध्दा वाढण्याची शक्यता आहे. म्हणून हा विषय कॅबिनेट समोर नेऊन कायम अनुदान प्राप्त शाळांमध्ये कायम विनाअनुदान तुकडयांना सुध्दा अनुदान देता येईल किंवा कसे याचा विचार शासन करीत आहे. कारण असा भेदभाव करणे शक्य नाही.

श्री. सदाशिवराव पोळ : सभापती महोदय, 103 तालुके शैक्षणिकदृष्टया मागासलेले आहेत. त्याच्या संबंधात शासनाने आपली भूमिका मांडावी.

प्रा. वसंत पुरके : म्हणूनच मागच्या वेळेस डोंगरी भागातील मुलांची जी संख्या आहे तीच आहे. ती पंधरा करु अशा प्रकारचे आश्वासन दिलेले आहे पण शासनाला अद्यापही तो प्रोग्राम वर्कआऊट करता आला नाही. तो निश्चत वर्क आऊट करु.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, डोंगरी भागात धनगर आणि मेंढपाळ असतात त्यां मुलांसाठी शासन डोंगरी शाळा नावाचा कन्सेप्ट सुरु करणार आहे काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माझी विनंती अशी आहे की, नियमित शाळांमध्ये ही मुले आलीच पाहिजेत. तेथे ते येत नसतील तर ती वस्ती शाळेत गेली पाहिजेत. तेथेही ते येत नसतील तर सेतू शाळेत तरी गेली पाहिजेत. तेथेही ते येत नसतील तर ते राजीव गांधी संधी शाळेत तरी गेली पाहिजेत. तीन-तीन मुलांसाठी शासन 13-13 हजार रुपये खर्च करण्यासाठी तयार आहे. परंतु सर्व सदस्यांनाच या बाबतीत जागरुकतेने हे काम करणे गरजेचे आहे. कोणाही एकटया माणसाचे निश्चितपणे हे काम नाही. म्हणून माझी सदस्यांना विनंती आहे की, आपणही याकडे लक्ष द्यावे. 55 हजार वर्गखोल्यांचा अनुशेष महाराष्ट्रात कायम आहे, हे सुध्दा मी मान्य करतो. जवळ जवळ 55 ते 56 हजार वर्ग खोल्या बांधवयाच्या आहेत. म्हणून 11 व्या वित्त आयोगातून मिळणारा पैसा तसेच सर्वशिक्षा अभियानातून जवळ जवळ 10 ते 12 हजार खोल्या बांधण्याचा शासनाचा 4 वर्षाचा प्लॅन आहे. त्या वर्गखोल्या हमखास बांधण्यासाठी शासन तत्पर रहील अशी मी या ठिकाणी ग्वाही देतो. त्यानंतर जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शिक्षकांना -----

..2..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके....

सुधारित वेतन हवे अशी या ठिकाणी मागणी केली आहे. शासनाने यासंबंधात एक आढावा घेतला आहे. महाराष्ट्रात एकूण किती शाळा आहेत? ज्या गावाला शाळाच नाही अशा एकूण किती शाळां आहेत ? 3 कि.मी. वर असणा-या एकूण किती शाळा आहेत? अशा किती शाळा आहेत की, ज्या गावांना अद्याप शाळाच नाही. पाणी कोणत्या शाळेत आहे, वीज कोणत्या शाळेत आहे. प्रशासकीय इमारत कुठे आहे? त्या ठिकाणी ॲप्रोच रस्ते आहेत की नाही हा सगळा आढावा मी घेतलेला आहे. हा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्रातील सगळे डायरेक्टर आणि डेप्युटी डायरेक्टर जवळ जवळ 32 ते 34 लोकांना प्रत्येक जिल्हयात संपर्क अधिकारी म्हणून नियुक्त केली आहे. या संदर्भात सर्वच सन्माननीय सदस्यांच्या सूचना आहेत त्या मी ग्राहय मानतो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी टंचाईग्रस्तांच्या बाबतीत सूचना केली होती.

प्रा. वसंत पुरके : श्री. मोते सरांनी अतिशय महत्वाची सूचना केलेली आहे. त्यासाठी शासनाने एक कोटी आणि काही लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. टंचाईग्रस्त भागातील मुलांना शुल्क देण्यासाठी तरतूद केलेली आहे. पण आपल्या मनात शंका आहे की, हे शुल्क उशिरा मिळणार आहे.जवळ जवळ परीक्षेची वेळ आलेली आहे. 100 टक्के त्याच मुलांना पैसे मिळतील . सन्माननीय सदस्यांनी चेकची सूचना केलेली आहे. म्हणून चेक सुध्दा देण्यास शासनाला अडचण राहणार नाही. पण या शुल्कापासून कोणीही मुलगा वंचित राहणार नाही यासाठी आपण सुध्दा शासनाला मदत करावी. शासन याची गांभीर्याने दखल घेत आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे: सभापती महोदय,वस्तीशाळांची दुरावस्था आहे त्यासंबंधीची टक्केवारी मी आपल्याला सांगितली होती.

प्रा. वसंत पुरके : मी त्यासंबधात आपल्याला माहिती देतो. वस्तीशाळा जवळ जवळ आठ ते साडेआठ हजार आहेत. श्री.पाटील साहेबांची देखील या बाबतीत सूचना होती.वस्तीशाळांच्या संदर्भात त्यांची पहिली सूचना आहे की, नोकरीत येऊन त्यांना तीन ते चार वर्षे झालेली आहेत. त्यामुळे त्यांना कायम स्वरुपी नोकरीमध्ये सामावून घेण्यात यावे. त्याचबरोबर त्यांना सरळसरळ नोकरीत सामावून न घेता त्यांच्यासाठी डी.एड.ची व्यवस्था करण्यात यावी. एका नगरपालिकेमध्ये असे झालेले आहे. त्यांना कायमस्वरुपी नोकरीमध्ये घेऊन त्यांना प्रशिक्षित गणल्या जाणे. त्यापेक्षाही

..3..



SMT/ D/ RJW/ 20:35

प्रा. वसंत पुरके....

त्यांना दहा महिन्याचेच वेतन कां मिळावे अशीही त्यांची सूचना आहे.चौथी सूचना अशी आहे की,15 ते 30 पर्यंत आपण पहिली शाळा देतो. 30 नंतर 31 वा मुलगा आला असेल तर त्या ठिकाणी दुसरी शाळा देतो.आपले म्हणणे आहे की, त्या ठिकाणी त्याच शाळेला लागून दुस-या शिक्षकाची नियुक्ती करावी. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार या शाळा चालविण्यात येत असल्यामुळे त्या ठिकाणी दुसरी शाळा देण्यास हरकत नाही. पण केंद्र सरकारच्या मार्गदर्शनानुसार त्यांना दहा महिन्याचे वेतन मिळते त्याबाबत विचार व्हावा ही जी सदस्यांची सूचना आहे त्याबाबत केंद्र सरकारकडे मला निश्चित प्रयत्न करता येईल. कारण कॅब नावाच्या समितीमध्ये मी स्वत: आहे. यासाठी मी स्वत: पुढाकार घेईल. वस्तीशाळांचा प्रश्न सोडविण्यासाठी जशी सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये तळमळ आहे तशी माझ्याही मनामध्ये आहे. ही कायम स्वरुपी व्यवस्था नाही.तात्पुरता शिक्षणाचा प्रश्न सुटावा म्हणून निर्माण झालेली ही व्यवस्था आहे. याच्याही संदर्भात मी सकारात्मक भूमिका घेईल अशी ग्वाही देतो आणि श्रीमती रायकर यानी ज्युनिअर कॉलेजचा मुद्दा मांडला.चार वर्षापूर्वी सुरु झालेले अनेक ज्युनियर कॉलेज आहेत. परंतु जसे आपण 915 शाळांचे मूल्यांकन केलेले आहे.तशाच प्रकारे ज्युनिअर कॉलेजचे सुध्दा आपण मूल्यांकन करुन आणि ते सुध्दा अनुदान तत्वावर येतील. ते सुध्दा याचे क्लेमंट आहेत हे शासनाला नाकारता येणार नाही. त्यानंतर रायकर मॅडमची दुसरी एक सूचना आहे की, आदिवासी एरियात, नक्षलग्रस्त एरियात जे लोक मनापासून काम करतात, डेलिगेशनने काम करतात,समर्पित भावनेने काम करतात त्यांना सुध्दा प्रोत्साहन भत्ता द्यावा म्हणून तो पूर्ण एरिया शासन वर्कआऊट करेल आणि त्यांना सुध्दा प्रोत्साहन भत्ता मिळेल. फक्त नक्षलग्रस्त भागाच्या संदर्भात माझ्या मनात थोडीशी शंका आहे. कारण आदिवासी खाते आणि शिक्षण खाते आम्ही दोघेही बसू आणि त्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेऊ. डॉ. गावित साहेबांनी आजच सांगितलेले आहे की, यासंदर्भातील आदेश काढलेला आहे त्यामुळे त्यांना प्रोत्साहन भत्ता 100 टक्के मिळेल. पण श्रीमती रायकर मॅडम, श्री. रामनाथ मोते आणि सगळयाच शिक्षक प्रतिनिधींना माझी विनंती आहे.........................................................

...यानंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके .......

की, आपल्या न्याय्य हक्कांसाठी भांडण्यास कोणतीच हरकत नाही परंतु कर्तव्याच्या बाबतीत सुध्दा कॉन्शस रहावे अशी माझी विनंती आहे. गुरुजनांबाबत माझी नेहमीच भूमिका आदराची आहे. मी आदिवासी भागात पहिलीपासून नववीपर्यन्त पाहिले असता असे लक्षात आले की, पहिलीपासून नववीपर्यन्त मुले नापास होत नाहीत परंतु दहावीमध्ये नापास होणाऱ्यांची संख्या वाढते, याचा कुठेतरी विचार गुरुजनांनी करावा. मी स्वत: जवळजवळ 900 आदिवासी आश्रमशाळा पाहिल्या. त्यातील मुलांना अक्षरश: नाल्यावरती आंघोळ करण्याची वेळ आलेली असते अशी दुर्देवी परिस्थिती आहे. डॉ. विजयकुमार गावित आणि मी यासंदर्भात एकत्र बसून चर्चा केली व ज्या शाळांमध्ये शौचालयाची व स्नानगृहांची व्यवस्था नाही अशा ठिकाणी किती अनुदान द्यावयाचे, कोणत्या प्रकारच्या सुविधा पुरवावयाच्या याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. तसेच त्या शाळांचे अध्ययन आणि अध्यापनाची भूमिका यशस्वीपणे पार पडते की नाही याचे पर्यवेक्षण शिक्षण विभागामार्फतच करणार आहोत. एवढे बोलून शिक्षण विभागाच्या आठ मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती मी सभागृहाला करतो व माझे भाषण संपवितो.

**तालिका सभापती (श्री. विलास अवचट)** : सन 2005-06 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

-------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कृषी उत्पन्न पणन (विनियमन)(सुधारणा) विधेयक.

**L.A. BILL NO.LXVIII OF 2005.**

**( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (REGULATION) ACT, 1963.)**

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्र.68-महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विनियमन) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक, मांडतो.

**तालिका सभापती (श्री. विलास अवचट)** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्र.68-महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विनियमन) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, या विधेयकाच्या संदर्भात माझा एकच मुद्दा असा आहे की, खाजगी मार्केट्सना शासन मान्यता देणार आहे परंतु ऍपीएमसीला ज्याप्रमाणे ओपन लिलावाने माल विकावयास लावते तशा प्रकारचे कुठलेही बंधन या खाजगी मार्केट्सना लागू केलेले दिसत नाही. जे शेतकरी ऍपीएमसीमध्ये आपला माल आणतात त्यांच्याकडून ऍपीएमसीच्या कायदयाप्रमाणे सर्व बंधनकारक आहे परंतु खाजगी मार्केट्सवर कुठल्याही प्रकारचे बंधन नसल्यामुळे ऍपीएमसीला स्पर्धेमध्ये टिकावयाचे असेल तर त्याबाबत शासन काळजी घेणार की नाही, की केवळ देशाचे अर्थमंत्री पि. चिंदंबरम् यांनी सांगितले म्हणून हे विधेयक शसन या ठिकाणी आणत आहे, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. एवढे बोलून माझे भाषण मी पूर्ण करतो.

-------------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे ( रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, विधानसभा विधेयक क्र. 68 च्या संदर्भात मला एकच मुद्दा मांडावयाचा आहे की, ठाणे जिल्हयातील पालघरपासून, दहिसर चेक नाक्यावरुन येणाऱ्या शेतकऱ्यांना तसेच भिवंडीमधील शेतकऱ्यांना कृषि उत्पन्न बाजार समितीला नवी मुंबई येथे जावे लागते. यामुळे या शेतकऱ्यांना अत्यंत त्रास होतो. यासंदर्भात वारंवार आम्ही विनंती सुध्दा केलेली आहे. या त्रासातून शेतकऱ्यांना शासन मुक्त करणार आहे काय ? याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : या विधेयकावर अगोदरच चर्चा झालेली आहे. तसेच हे विधेयक संयुक्त समितीकडे देखील गेले होते. या विधेयकाच्या संदर्भात संयुक्त समितीच्या 9 बैठकाही झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्याची नोंद घेऊन दखल घेतली जाईल.

डॉ निलम गो-हे : या बिलाचा बराच गाजावाजा झालेला आहे. परंतु खाजगी बाजार तयार करण्याच्या दृष्टीने मधले जे दलाल असतात त्यांना बाजूला सारुन शेतक-यांना फायदा व्हावा यासाठी विधेयक असले पाहिजे. या विधेयकाचा हेतू चांगला आहे याची मला कल्पना आहे परंतु मला असे वाटते की, दलाल शेतक-यांवर दबाव आणून तेच मालक होऊन बसणार नाहीत ना ? यासंदर्भात कोणती दक्षता घेतली गेली याचे स्पष्टीकरण आवश्यक आहे. याचे स्पष्टीकरण झाले नाही तर ठिकठिकाणचे बाजार आणि व्यवहार पाहिले तर शेतक-याला त्याच्या मालाला चांगल्या प्रकारचा भाव मिळविता येत नाही. शेतक-याच्या मालाला भाव मिळाला नाही तर शेतक-याला आपला माल रस्त्यावर फेकून द्यावा लागतो. शेतक-याला माल तयार करण्यासाठी जो खर्च येतो तो खर्च सुध्दा निघत नाही त्यामुळेच शेतकरी आपला माल रस्त्यावर फेकून देतो. जनतेला फायदा होईल अशा प्रकाची विधेयके आणली जात नाहीत तर आम्ही शेतक-यासाठी अशा अशा प्रकारचे चांगले विधेयक आणले म्हणून मिडीयासमोर आपण मुलाखती देता, प्रत्यक्षात सामान्य शेतक-याला त्याचा काही सुध्दा फायदा होत नाही. शेतक-याची जी अपेक्षा असते ती भंग होते त्यामुळेच शेतकरी आत्महत्या करीत असतो. त्यामुळे या विधेयकाचा फायदा दलाल घेणार नाहीत याची दक्षता घ्यावी असे नमूद करावेसे वाटते.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सन्माननीय सभापती महोदया, या विधेयकाचा फायदा दलालांना होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे. मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, या विधेयकाच्या संदर्भात संयुक्त समितीच्या एकूण 9 बैठका झालेल्या आहेत. या बिलाच्या संदर्भात संबंधित घटकांकडून 2200 आक्षेप आले होते. या आक्षेपातून मार्ग काढून त्यावर सखोल चर्चा करण्यात आलेली आहे. तसेच या विधेयकाच्या संदर्भात मार्केट कमिटयांशी, तज्ज्ञांशी चर्चा करण्यात आल्यानंतरच या विधेयकामध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. या विधेयकामुळे

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर.......

बाजार समित्यांचे नुकसान होणार नाही, यामध्ये कोणाचेही नुकसान होणार नाही याची पूर्ण काळजी घेण्यात आलेली आहे. त्यामुळे हे विधेयक सभागृहाने संमत करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 13, ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 68 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 68 संमत झाले आहे.

----------------

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXXVI OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES ACT, 1998.)

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 76 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 76 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदया, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ कायदा आपण 1998 मध्ये आणलेला आहे. त्यावेळी आपण पोस्ट ग्रॅज्युएट आणि अंडर ग्रॅज्युएट हे दोन्ही कोर्सेस यामध्ये समाविष्ट केले होते. मग सेंट्रल कौन्सिल निर्माण झाले. पण त्याची आपल्याला मान्यता नव्हती म्हणून आपण परत सुधारणा आणून पोस्ट ग्रॅज्युएट आणि अंडर ग्रॅज्युएट कोर्सेस आपण महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ कायद्यातून वेगळे केले होते. आता आपल्याला सेंट्रल कौन्सिलची मान्यता प्राप्त झाली आहे. परत आपण पोस्ट ग्रॅज्युएट कोर्सेस महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये समाविष्ट करीत आहोत. त्यासाठी आपण हे बिल आणले आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी सदर विधेयक मंजूर करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री.श्रीकांत जोशी : अध्यक्ष महोदया, मंत्रिमहोदयांनी काही विशेष अधिकार हे विद्यापीठाला आहेत. ते स्पष्ट केले तर बरे होईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आता आपण आपले अधिकार दुसऱ्यांदा घेणार आहोत. आपले जे पहिले अधिकार होते त्यात काही बदल झाला आहे किंवा नाही ? त्या विषयीचे स्पष्टीकरण मिळणे आवश्यक आहे.

..2../-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदया, आता पोस्ट ग्रॅज्युएटच्या परीक्षा आणि डिप्लोमाच्या परीक्षा मुंबई, नागपूर, पुणे विद्यापीठ घेत होते. त्या आता आपण महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे हस्तांतरित करीत आहोत. पुढच्या वर्षीपासून पोस्ट ग्रॅज्युएशन डिप्लोमा आणि डिग्री हे कोर्सेस महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे हस्तांतरित करीत आहोत. त्यामुळे आता सर्व अधिकारी हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाला राहणार आहे.

**तालिका सभापती** : प्रश्नोत्तराची पध्दत सभागृहामध्ये पाडू नये, असे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. ज्यावेळी आपल्याला बोलायला संधी मिळेल त्यावेळी आपले मुद्दे उपस्थित करावेत.

नंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (विधानसभाद्वारे निर्वाचित) : सभापती महोदया, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम 1998 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक सभागृहापुढे आणले आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदया, वि.स.वि.क्र.76 महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ 2005 वर बोलण्यासाठी मी उभा आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी आताच भाष्य केले की, पूर्वी सेंट्रल कौन्सीलची मान्यता नव्हती. आयुर्वेदिक असो, ॲलोपथी कौन्सील असो किंवा कोणतेही कौन्सील असो,पोस्ट ग्रॅज्युएट डीग्री कोर्स मुंबई विद्यापीठाकडे होता किंवा तत्सम विद्यापीठाकडे होता पण आता त्याचे रजिस्ट्रेशन हेल्थ युनिव्हर्सिटीकडे आणलेले आहेत असे या विधेयकावरुन दिसते. ज्यावेळी आपण अशाप्रकारचे मुंबई विद्यापीठाकडून अधिकार काढून तो अधिकार हेल्थ युनिव्हर्सिटीकडे देत आहात. मला याठिकाणी नमूद करावयाचे आहे की, मुंबई विद्यापीठ हे जगाच्या नकाशावर सर्वसामान्य लोकांना माहीत झ ालेले आहे. मुंबई विद्यापीठाला जितकी प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे तितकी प्रतिष्ठा हेल्थ युनिव्हर्सिटीला मिळवून देण्यास आपण असमर्थ ठरलो आहोत असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. ज्यावेळी एखादा पोस्ट ग्रॅज्युएट होऊन उच्च शिक्षणासाठी परदेशात जातो त्यावेळी मुंबई युनिव्हर्सिटी, शिवाजी युनिव्हर्सिटी किंवा तत्सम युनिव्हर्सिटीचे लेबल त्याच्यामागे असते. ते एक वेटेज असते. आज हेल्थ युनिव्हर्सिटी नेट वर आहे. जर आपण ग्लोबल नेटवर गेला तर हेल्थ युनिव्हर्सिटीला फार कमी महत्व प्राप्त झालेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रतिष्ठेत कुठे तरी कमतरता येण्याची शंका मला वाटते. दुसरी गोष्ट अशी की, ज्यावेळी आपण अशाप्रकारचे विशेषाधिकार काढून आरोग्य विज्ञान विद्यापीठाला बळकटी आणण्याचा प्रयत्न करीत असतो त्यावेळी आपण नेमके काय साधतो हे समजत नाही. आपल्याला जर फोरीने कोलॅबोरेशन करावयाचे होते तर आपण त्यांना येथे आमंत्रित करावयास पाहिजे होते आणि तत्संबंधीचा कोर्स चालू करुन मग मुंबई विद्यापीठाकडून अधिकार काढून ते एम.यु.एच.एस.कडे दिले असते तर योग्य झाले असते. आपण हे विधेयक आणण्यासाठी घाई का करीत आहात ? आपण पूर्ण विचारांती एक वर्षानंतर हे विधेयक आणले असते तरी चालले असते.

श्री.सुरेश शेट्टी : संभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, यासंबंधी दिनांक 3 जून 1998 रोजी ऑर्डीनन्स काढण्यात आला होता. त्यावेळी युतीचे सरकार होते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे गेल्या वर्षापर्यंत एम.सी.आय.कडे एम.बी.बी.एस.रजिस्टर नव्हते. मी जर चुकीचे सांगत असेन तर आपण आपल्या उत्तरामध्ये त्याबाबत खुलासा करावा. युतीच्या काळात आम्ही हेल्थ युनिव्हर्सिटीकडे हे अधिकार दिले नाहीत कारण या हेल्थ युनिव्हर्सिटीला प्रतिष्ठा मिळणे गरजेचे होते. आज आपण हे विधेयक मंजूर करण्याची घाई करीत आहात. हे विधेयक मंजूर करण्यासाठी आपल्यावर कोणाचा दबाव आहे काय ? आपण बरेचसे कोर्स कंडक्ट करतो. एम.बी.बी.एस.चे एम.सी.आय मध्ये रजिस्ट्रेशन झाल्याशिवाय त्याला कुठेही प्रॅक्टीस करता येत नाही हे आपल्याला माहीत नाही काय ? म्हणून मी सांगितले की, हेल्थ युनिव्हर्सिटी किंवा तत्सम युनिव्हर्सिटीचे स्थान जगाच्या नकाशावर कुठे आहे ? ज्यावेळी तो विद्यार्थी परदेशात जातो त्यावेळी त्याला अडचण येणार आहे. we can spell that things म्हणून शासनाने साधक बाधक चर्चा करुन हा निर्णय घेतला होता. 10 वर्षानंतर आपण पोस्ट ग्रॅज्युएटचा कोर्स एम.यु.एच.एस.कडे द्यावयाचा आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

परंतु त्यापूर्वी या शासनाने अशाप्रकारचे कोर्सेस पुन्हा आपल्याकडे घेण्याचा प्रयत्न केला आहे. हे बील अतिशय चांगले आहे, परंतु परिपूर्ण अभ्यास न करता ते घाईघाईने आणले गेलेले आहे असे मला वाटते. नेहमी वैद्यकीय शिक्षणाच्या संदर्भातच आपण अशी घाई का करता हे मला समजत नाही. महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण उच्च दर्जाचे मानले जाते. बिहार, उत्तर प्रदेश किंवा साऊथच्या वैद्यकीय शिक्षणापेक्षा आपल्या वैद्यकीय शिक्षणाला जगात वेगळे स्थान आहे. युके, युएसए मध्ये मुंबईतून आलेल्या डॉक्टरला वेगळे स्थान आहे. परंतु आता असे विधेयक आणून आपण त्याचे अवमूल्यन कशासाठी करीत आहात ? मुंबई युनिव्हर्सिटीचा ग्रॅज्युएट असल्यामुळे त्याला सर्वत्र वेगळे स्थान आहे. त्यामुळे ज्याला फायदा व्हावयाचा आहे त्यालाच जर या विधेयकामुळे फायदा होणार नसेल तर या विधेयकाचा काय उपयोग आहे ? त्यामुळे आपण पुन्हा या विधेयकाच्या दृष्टिकोनातून विचार करा. हे विधेयक पास करण्यास आमचा विरोध नाही. परंतु या विधेयकावर साधकबाधक चर्चा न केल्यामुळे आपण विद्यार्थ्यांचे नुकसान करीत आहात असे मला वाटते. आपला विद्यार्थी मेडिकल कोर्स किंवा अन्य कोर्ससाठी परदेशात जाईल तेव्हा त्याचे नुकसान होईल अशी भिती या विधेयकाच्या निमित्ताने मला वाटते. शेवटी सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो व माझे दोन शब्द संपवितो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदया, 2005 चे वि.स.वि.क्रमांक 76-महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सांवत यांनी हे विधेयक घाईघाईने आणलेले आहे असे जे मत व्यक्त केले त्या मताशी मी सहमत आहे. महाराष्ट्रातील मेडिकल सायन्सला अतिशय चांगले नाव असताना त्या नावाला डाग लावण्याचे काम विभागाचे डेस्क ऑफिसर करीत आहेत आणि माननीय मंत्रिमहोदय त्यास साथ देत आहेत असे यावरुन दिसून येते. नाशिक येथे डिग्री विद्यापीठ आहे. परंतु मेडिकल करावयाचे असेल तर विद्यार्थी डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद येथे जातो आणि पेपर मिळेल काय, पर्यवेक्षक कोणे आहे हे पाहतो. डिग्री वेगळया विद्यापीठाने द्यावयाची आणि पोस्ट डिग्री मॅनेजमेंट दुसऱ्या विद्यापीठाकडे असावे असा जो विवाद आहे तो मेडिकल क्षेत्रात कोठेनाकोठे चालू आहे. माननीय मंत्री महोदयांकडून प्रास्ताविक भाषणामध्ये सविस्तर माहिती अपेक्षित होती. पोस्ट ग्रॅज्युएट युनिव्हर्सिटी किती आहे ? मेडिकलमधील किती आहेत ? युनानीमधील किती आहेत ? या संपूर्ण प्रश्नांबाबतची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी प्रास्ताविकामध्ये सांगणे आवश्यक होते. याचे मॅनेजमेंट विद्यापीठाकडे असल्यामुळे कसा गोंधळ होतो हे सुध्दा त्यांनी सांगणे आवश्यक होते. महोदय, विशिष्ट क्षेत्रात तज्ञ असलेली व्यक्ती, आपल्या क्षेत्रात व्यवस्थित व्यवस्थापन करु शकते. दुसऱ्या माणसाला अनुभव नसल्यामुळे त्याचा व्यवस्थापनामध्ये गोंधळ उडू शकतो. उदा.पेपर तपासावयाचे असतील, एक्झामीशन घ्यावयाची असेल तर मेडिकल क्षेत्रातील माणसे हवी असतात. मेडिकलशी संबंधित नसलेल्या लोकांचा ग्रेस किती गुणांना द्यावयाचा, एटीकेटी किती मार्काला लागू होते, ओरलसाठी काय करावयाचे, पास करण्यासाठी कोणते तत्व वापरावयाचे असा गोंधळ पोस्ट ग्रॅज्युएट आणि काही ठिकाणी डिप्लोमामध्ये चालला आहे. हे अधिकार एका क्षेत्राखाली आणले ते चांगले आहे. अशा पध्दतीने एका क्षेत्राखाली अधिकार आणण्याचा आपण प्रयत्न केला. परंतु विधेयकाच्या माध्यमातून केवळ चार ओळी छापून चांगले परीक्षण होईल काय ? माननीय मंत्री महोदय आपल्या प्रास्ताविकामध्ये सांगू शकत होते की, पोस्ट ग्रॅज्युएटचे कोर्स असल्यामुळे महाराष्ट्रातील मॅनेजमेंटमध्ये गोंधळ

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

होतो. नाशिकच्या आरोग्य विद्यापीठाच्या मार्फत अशी रचना करावयाची ठरली आणि आपल्याकडे अधिकार नसल्यामुळे कायद्याने ते अधिकार विद्यापीठाला देण्यासाठी आम्ही हे विधेयक आणले आहे असे माननीय मंत्री महोदय सांगू शकत होते.

नंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी ..

हे सांगत असतांना नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठ जर तसे करण्याच्या क्षमतेमध्ये नसेल तर त्याला सपोर्टिंग सिस्टीम म्हणून काय देणार आहात आणि त्यासंबंधी या कायद्यात काही अधिकार आहेत किंवा नाही? याबद्दल मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावचाचे आहे.नाशिक येथील आरोगय विद्यापीठ परिपूर्ण झालेले नाही. दुर्देवाने 1998 साली युती सरकार असतांना ज्या उद्देशाने हे विद्यापीठ सुरु केले होते ते परिपूर्णतेकडे या शासनाने नेण्या ऐवजी केवळ युती सरकारने हे विद्यापीठ सुरु केले होते म्हणून त्याकडे निग्लेक्ट करण्याची भूमिका या शासनाने घेतलेली आहे.1998 पासून 2006 पर्यन्त नाशिकच्या आरोग्य विद्यापीठाचा प्रवास हा काही चांगला झ ाालेला नाही.त्या ठिकाणी जे इनफ्रास्ट्रक्चर हवे होते ते त्या ठिकाणी नाही तसेच त्या विद्यापीठाला जो दर्जा पाहिजे होता तो दर्जा मिळालेला नाही. सभ्ांपती महोदया, त्यांच्याकडे खरोखर ही मॅनपॉवर विल पॉवर आणि ॲडमिनिस्ट्रेटीव्ह पॉवर आहे काय असा मला माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे.नाशिक आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे एका झटक्यात सगळे डिप्लोमा आणि पोस्ट ग्रॅज्युएटसचे कोर्सेस देणार आहात तेव्हा चन्द्रपूर,गडचिरोली किंवा गडहिंग्लजमध्येजर एखादे डिप्लोमा कोर्स देणारे कॉलेज असेल त्या कॉलेजची तपासणी आणि ॲफिलिएशन कमिटीची व्हीजीट किमान त्या कॉलेजच्या प्रिन्सीपलची आणि कुलगुरुची भेट एवढे तरी या विद्यापीठाक्डून केले जाणार आहे किंवा नाही अशा पध्दतीची शंका मला येत आहे. या संबंधीचे विधेयक ज्या घाई घाईने या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे त्यावरुन मला ही शंका आली आहे.महाराष्ट्रात अशा प्रकारे डिप्लोमा देणारी किती तरी कॉलेजेस आहेत.आता आयुर्वेद आणि फिजिओथेरपीचे डिप्लोमा कॉलेजसुध्दा आपण याठिकाणी आणलेले आहे हे चांगले करण्यात आलेले आहे.तसे करण्यामागचा आपला उद्देश अतिशय चांगला आहे. आपण वाईट केलेले आहे असे मी म्हणत नाही परंतु फिजिओथेरपी , नॅचरोथेरपी आणि हयुमन बॉडी सबंधीचे जेवढे मेडीकल सायन्स आहे ते सगळे एकछत्री कलमा खाली आणण्याचा आपला उद्देश चांगला आहे.परंतु एकटे नाशिक येथील विद्यापीठ गडचिरोली पासून गडहिंग्लजपर्यन्तच्य सगळया मेडिकल डिप्लोमा कॉलेजेसचे ॲकडमिक एक्सलन्स आणि एज्युकेशन एक्सलन्स आणि एज्युकेशनल ॲडमिनिस्ट्रेशन या सर्व गोष्टीची काळजी व्यवस्थितपणे घेईल यासाठी कोणती यंत्रणा आपल्याकडे राहणार आहे पुढव्या काळात आपण काही ासब सेन्टर्स काढणार आहोत काय ? ते काढण्याची गरज आहे असे आपल्याला

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी ..

वाटते काय ? त्याचबरोबर देशात आणि परदेशात जे काही अभ्यासक्रम सुरु आहेत त्यासाठी आपली काही ॲपेक्स बॉडी निर्माण करण्यात येणार आहे काय ? अभ्यासक्रमात जसा एक्सलन्सपणा वाढवावयाचा आहे त्याप्रमाणे ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये तो वाढावा यासाठी काय करण्यात येणार आहे ? यासबंधीचे व्हिजन या विधेयकात मला दिसून येत नाही. मंत्रिमहोदय कदाचित असे सांगतील की कायद्यात तसे करण्याची काही गरज नाही.परतु कायद्यात काही अधिकार देण्यासंबंधी पुन्हा आपल्याला सूचना द्याव्या लागतील. व्ही.सी. ना कदाचित पुढच्या काळात काही विशेष् अधिकार द्यावे लागतील. He may take some support either from the Heath Department or whatever Department he wants, and then he will implement whatever is in the mind of the Government that health caring education institute will be properly functioning hereafterwards. त्यामुळे या सगळया संस्थ्ां नीट काम करतात किंवा नाही ही गोष्ट नाशिकचे आरोग्य विज्ञान विद्यापीठ बघणार आहे.त्यासाठी आपण ज्या काही सुधारणा सुचविलेल्या आहेत त्या अत्यंत तकलादु स्वरुपाच्या आहेत असे मला वाटते.आपल्याला पुढच्याकाळात हे प्रशासन अधिक चांगले कसे होईल सया दृष्टिकोनातू अधिक बदल करावे लागणार आहेत.आरोग्य विज्ञान विद्यापीठातील बॉडी आपल्याला बदलावीलागणार आहे. पी.जी करता एक्सलन्स सेन्टर हे वेगळे ठेवावे लागणार आहे.त्या दृष्टीकोनातून नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठानंतर नागपूरसारख्या ठिकाणी किंवा कोल्हापूर सारख्या ठिकाणी एक सब सेन्टर असणे आवश्यक आहे. नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठातील व्ही.ासी.ची जर भेट होऊ शकली नाही तर उदगीर सारख्याएका आयुर्वेद महाविद्यालयातील प्रिन्सपॉलला ॲफिलिएश मिळाले नाही म्हणून त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यानी तडफडून मरावयाचे काय ?होमिओपॅथीचे एखादे कॉलेज जर खेडेगावात असेल त्या कॉलेजेचे जसे ॲफिलिएशनच्या संदर्भातीलजसे प्रश्न असतातत्या प्रमाणे सिलॅबसचे सुध्दा काही प्रश्न असतात.प्राध्यापकांच्या नेमणुकासंबंधीचे प्रश्न असतात हे सगळे प्रश्न नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठातील व्ही.सी. किंवा त्याचे मॅनेजमेन्ट कॉन्सिलने सोडविले नाही तर सबंधितानी त्याबाबतीत दाद कोणाकडे मागावयाची ? हायकोर्टा शिवाय दुसरीकडे दाद मागण्याचा पर्याय त्याला आज उपलब्ध नाही. त्यामुळे या प्रकरणाची दाद मागण्यासाठी त्याला मुंबईच्या हायकोर्टापुढे जावे लागते आणि त्या ठिकाणी लहान

...3


VTG/ SBT/ MHM/ प्रथम श्री बोर्डे 21:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी ..

लहान बाबीसाठी भांडावे लागत असेल तर ते बरोबर नाही.अशा प्रकारचा जर कायदा करण्यात येत असेल तर मला असे वाटते की हे विधेयक आणण्यासाठी माननीय मत्रिमहोदयांना खूप घाई झालेली आहे.तेव्हा या संदर्भात एखादीबैठक बोलावून मेडिकल सायन्सच्या क्षेत्रातील सर्व लोकांना बोलावून त्याबाबतीत विचार करावयास पाहिजे होता असे मला वाटते.आपल्याला एवढी घाई करण्याची काय आवश्यकता आहे? 2006 मध्ये आपल्याला असे ठरवावयाचे आहे की, सगळया पी.जी.ची व्यवस्था एक छत्राखाली आणावयाचे आहे. ही गोष्ट मला मान्य आहे परंतु त्याकरता सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यात बैठक का बोलाविण्यात आली नाही आणि या बाबतीत सूचना का काढण्यात आल्या नाहीत.या बाबतीत अधिनियम काढण्यात आला आहे हे ठीक आहे परंतु त्या बिल आणण्या अगोदर सूचना काढावयास पाहिजे होत्या.य्त्या का काढल्या नाहीत. सर्व महाविद्यालर्याच्या प्रिन्सीपॉलची एखादी बैठक का बोलाविण्यात आली नाही ? ज्यावेळी हे बिल आणण्याचा प्रश्न निर्माण झाला होता तेव्हा या महाविद्यालयातील प्रिन्सीपॉलचे प्रश्न काय आहेत हे त्यांना विचारण्यात आले होते काय युनानी,होमियोपॅथी, आयुर्वेद या सगळया महाविद्यालयाच्या प्रिन्सीपॉलची एक तरी बैठक आपण घेतली होती काय ?

नंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ SBT/ श्री.गायकवाड नंतर --- 21:10

श्री.श्रीकांत जोशी ..

मी आपल्याला सांगू इच्छितो की, आजच्या परिस्थितीमध्ये मराठवाड्यातील जी तीन आयुर्वेदिक कॉलेजेस आहेत. या तीन मेडिकल कॉलेजेसना ज्यावेळेस मेडिकल कौन्सिलची टीम भेट देण्यास येते तेव्हा तेथे पकडून आणून प्राध्यापक उभे केले जातात आणि त्या आधारे ॲफिलिएशन मिळविले जाते. जेव्हा आता पुढील काळामध्ये या साऱ्या गोष्टी हे विद्यापीठ बघणार आहे तेव्हा त्यांना येणाऱ्या अडचणी कोण दुरूस्त करणार आहे ? इतक्या शेकडो कॉलेजेसना भेट देण्यासाठी या विद्यापीठाला तेवढा वेळ तरी मिळणार आहे का ? यासाठी मंत्री महोदय, तुम्हाला वेळ नाही तर विद्यापीठाला तरी काय वेळ असणार आहे ? लोकांनी तुम्हाला निवडून दिलेले आहे, तुमच्याकडून साऱ्या महाराष्ट्राच्या अपेक्षा आहेत. आपण वैद्यकीय शिक्षण मंत्री म्हणून असताना आपणच जर याकडे लक्ष देत नसाल, त्यासाठी तुमच्याकडे वेळ नसेल तर मग जो आपल्या खात्यातील सचिव आहे, अधिकारी आहे की, जो 58 व्या वर्षी निवृत्त होणार आहे आणि त्याची कमिटमेंट ही तेवढ्याच काळापुरती असते. अशा परिस्थितीत, समजा तुम्ही एक बॉस म्हणून आहात अशा वेळी तुम्ही ज्याप्रमाणे वागणार आहात त्याप्रमाणे आपले सचिव वागणार आहेत. जोपर्यंत तुम्ही अशा बैठका घेणार नाहीत, असे याचे डिटेल वर्कआऊट करणार नाही तर मग सेक्रेटरी तरी कशाला हे सारे वर्कआऊट करतील ? विद्यापीठ कशासाठी प्रोजेक्ट करील ? विद्यापीठ म्हणेल, ठीक आहे. कायदा आला आहे तर आता आम्ही बसू. पुढील सिनेटच्या बैठकीच्या वेळी विचार करू. किती कॉलेजेस आली आहेत त्यांचे प्रश्न समजून घेऊ आणि दोन चार वर्षामध्ये ते प्रश्न सुटले तर सोडवू. नाही तर पोरं मेली काय आणि महाराष्ट्र मागे गेला काय, आम्हाला त्याची पर्वा नाही. अशा पद्धतीचे थिंकींग आपल्याकडून डेवलप होत असेल तर त्याची चिंता मला अधिक आहे. म्हणून माननीय राज्य मंत्री महोदय, मला आपल्याला विचारावयाचे आहे की, या विधेयकाच्या निमित्ताने मेडिकल एज्युकेशनचा सर्वंकष विचार आपण खरोखरी करणार आहात का ? आणि याची किमान काही सबसेंटर्स पुढील काळामध्ये आपण निश्चितपणे काढणार आहात का ? याचे आपण स्पष्टीकरण द्यावे. त्याचबरोबर या विधेयकामध्ये कोठेही आता असलेल्या विद्यापीठाचा काहीही संबंध नाही., असे काहीही यामध्ये लिहिलेले नाही. किंबहुना जे काही लिहिले आहे त्यामुळे गोंधळच निर्माण होतो आहे. मी आपल्याला वाटल्यास यातील केवळ दोनच ओळी वाचून दाखवितो. या विधेयकाच्या मराठी प्रतीतील पृष्ठ 7 वर आपण म्हटले आहे की, "... अशा महाविद्यालयांना किंवा स्वायत्त

.... 5एल 2 ..

श्री.श्रीकांत जोशी ...

संस्थांनाआणि विद्यार्थ्यांना, अशी मान्यता मिळण्यापूर्वी दिलेला असा पुन:प्रवेश आणि पुनर्संलग्नता, या विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेल्या उक्त पदव्युत्तरा पदव्यांना केंद्र सरकारने मान्यतादिली असली किंवा नसली तरीही, त्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 अन्वये, त्यांच्या संबंधित विद्यापीठांकडून अशा पदव्युत्तर पदव्या मिळेपर्यंत, राज्य शासनाकडून किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडून रद्द करण्यात येणार नाही, किंवा काढून घेण्यात येणार नाही किंवा त्यात कोणत्याही प्रकारे बदल केला जाणार नाही. " म्हणजे 1994 ला विद्यापीठाचे जे अधिकार आहेत ते कोठे तरी कायम आहेत अशा प्रकारे प्रतिध्वनित करणाऱ्या चार ओळी मी आपल्याला वाचून दाखविल्या. म्हणून मग त्या विद्यापीठाचा खरोखरी काही संबंध आहे की नाही ? त्या विद्यापीठाच्या ज्या काही डिग्र्या दिल्या आहेत त्यांची नावे तीच राहणार आहेत की त्याला आपण काही ॲडिशन आपण करणार आहात ? जो त्या कॉलेजमध्ये अर्धवट शिकलेला आहे त्याच्या बाबतीत पुढचे आपल्याला काही करावयाचे आहे काय ? असे बारकावे बरेच आहेत की कदाचित उद्या ते टेक्निकॅलिटीमध्ये लॉ पॉईंटमध्ये येऊ शकतात. म्हणून या सगळ्या गोष्टींचा आपण आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा अशी विनंती करतो आणि आपली रजा घेतो. धन्यवाद.

***

..... 5 एल 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ अधिनियम हा कायदा जेव्हा या सभागृहामध्ये आला होता तेव्हा देखील मी त्याला कडाडून विरोध केला होता. त्यावेळेस सरकार कोणाचे होते हा प्रश्न येथे महत्त्वाचा नाही. त्यामुळे आपण याला राजकीय वळण कृपा करून देऊ नका. कारण हा राजकारणाचा नाही तर विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विषय आहे. आज महाराष्ट्रात किंवा देशामध्ये ... आपण येथे आता खास करून महाराष्ट्रासंबंधातच बोलू या, .. जेवढे म्हणून पदवी किंवा पदव्युत्तर कॅटेगरीज आहेत, मग ते आर्टस् असो, सायन्स असो वा कॉमर्स असो, त्यांच्याबाबतीत मात्र एकच विद्यापीठ महाराष्ट्राला नाही. तर महाराष्ट्रात या पदव्या घेण्यासाठी वेगवेगळी विद्यापीठे आहेत. मात्र केवळ मेडिकल पदवी वा पदव्युत्तर ज्ञान घेण्यासाठी मात्र अगदी गडचिरोली ते सावंतवाडी यातील कोणत्याही विद्यार्थ्याला महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठातूनच यावे लागते. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी त्यावेळेस विषय मांडला होता तेव्हा सुद्धा मी बोललो होतो की, शेवटी मुंबई विद्यापीठाचे स्टेटस् विद्यार्थ्याला मिळते. मी जी.एस.मेडिकल कॉलेजचा विद्यार्थी आहे असे तो अभिमानाने सांगतो. आता तुम्ही त्या पुढे निघाला आहात. आरोग्यासंबंधात जेवढ्या म्हणून पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम आहेत ते सगळे महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाकडे आहे. सभापती महोदय, या विद्यापीठाच्या उद्घाटनाच्या समारंभाच्या नंतर दोन दिवसांनी डॉ. रवि बापट यांनी व्ही.सी. पदाचा राजीनामा दिला. तो त्यांनी का दिला हे आजपर्यंत कोणालाही कळले नाही. पण त्यांना हे कळले असावे की, हे व्हाएबल नाही.

( यानंतर श्री. सरफरे ..... 5एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

आणि म्हणून माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी याठिकाणी मुद्दा मांडला. त्यावेळी सुध्दा हाच मुद्दा उपस्थित झाला की, हे सर्व प्रश्न तेव्हा उपस्थित होणार आहेत. एखाद्या विद्यार्थ्याला गडचिरोलीमधील प्रश्न असतील तर त्यासाठी त्याला नाशिकला यावे लागेल. त्या विरुध्द त्याला कोर्टात अपिल करायचे असेल तर आणखी तिसरीकडे त्याला जावे लागेल. आणि म्हणून नाशिक हे जिल्हयाचे ठिकाण आहे हे आम्हाला मान्य आहे. मी सुध्दा नाशिकमध्ये काम करतो. हा तुघलकी कारभार आहे. दिल्लीहून दौलताबादला राजधानी नेली. त्याप्रमाणे मुंबई विद्यापीठ येथून आपण नाशिकला नेले. जेव्हा हा विद्यार्थी पदव्युत्तर डिग्री घेऊन परदेशात जाईल. तेव्हा तो सांगेल की, मी नाशिकच्या महाराष्ट्र युनिव्हर्सिटीचा एम.डी. आहे. तुला कोण विचारतो? त्याठिकाणी तुझे स्टेटस काय? म्हणून माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही हे गंभीरपणे घेतले पाहिजे. त्याला प्रतिष्ठा निर्माण केली पाहिजे. ती प्रतिष्ठा महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाला नसतांना त्या एम.डी. झालेल्या विद्यार्थ्याचे करिअर खराब करता. तो जी.एस. सेंट जॉर्जेस, जे.जे. किंवा सायनला असलेल्या लोकमान्य टिळक महाविद्यालयामध्ये शिकणार आणि डिग्री घ्यायला नाशिकमध्ये जाणार. म्हणून माझा प्रस्ताव आहे की, झालेली चूक सुधारा व होते तसेच ठेवा. हे जर सत्य आहे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी एकच इंजिनिअरींगचे विद्यापीठ कां करीत नाही? म्हणून या संदर्भात बोलतांना इतर विद्यार्थ्यांना गौण लेखण्याचा माझा हेतू नाही. तो शिवाजी विद्यापीठातून शिकला म्हणून गौण आहे असा माझा म्हणण्याचा हेतू नाही. यामुळे सर्व विद्यार्थ्यांवर बाकीच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्हच्या संदर्भात अन्याय होणार आहे तो जास्त घातक आहे. एखादा विद्यार्थी कऱ्हाडला शिकत आहे, त्याची युनिव्हर्सिटी नाशिकला कां? त्याला पुणे जवळ आहे तर मग पुणे विद्यापीठामध्ये त्याला डिग्री घेऊ द्या. पाहिजे तर तुम्ही ॲपेक्स बॉडीचा विचार करा. व ही गव्हर्निंग युनिव्हर्सिटी म्हणून ठेवा. But let the other university remain. Let them have a recognition. Let them have the status and let them enjoy the status also. म्हणून विद्यार्थ्यांना ते स्टेटस एंजॉय करु द्या. त्यांच्या भवितव्याशी खेळू नका. हा घिसाडघाईने आपण विषय आणीत आहात. Why do not you collaborate with the universities of the other countries. तुम्ही कोलॅबरेशन केले असते तर त्याला आणखी स्टेटस आले असते. एम.डी. करणाऱ्या विद्यार्थ्याने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांची डिग्री ताबडतोब घ्या एवढी घाई कशासाठी? ही घाई करण्याचे कारण नाही. म्हणून हे विधेयक आपण मागे घ्यावे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

जसे होते तसे ठेवा. आणि जर गरजच असेल तर त्याची एक गव्हर्निंग बॉडी ठेवा. दिल्लीला मेडिकल कॉन्सिल आहे त्याप्रमाणे राज्याच्या पातळीवर सर्वांचे प्रश्न घेऊन दिल्लीला कुणी तरी नाचणारे हवे असेल तर Let us make an agency as a council for Maharashtra level which will look after all these colleges and universities in Maharashtra. अशाप्रकारची सूचना मी या निमित्ताने करतो. व माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एम. ए. अझिज (नामनियुक्त) : सभापती महोदय, नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठ हे स्थापित करीत असतांना त्यामागील उद्देश एकच होता की, हेल्थ एज्युकेशन हे सेंट्रलाईज केले पाहिजे. महाराष्ट्रात सर्वत्र एम.बी.बी.एस. कोर्स हे हेल्थ युनिव्हर्सिटी नाशिकमधून केले पाहिजेत. पोस्ट ग्रॅज्युएशन कोर्सेस हे एकाच ठिकाणी आले पाहिजेत. याकरिता माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत म्हणाल्याप्रमाणे मुंबई युनिव्हर्सिटी ही एक संस्था आहे. या ठिकाणी एम.डी. परीक्षा पास केल्यानंतर त्याला महत्व आहे. मी आपल्याला सांगतो की, औरंगाबादला झ ालेला एम.डी. असेल किंवा लातूरला झालेला एम.डी. असेल, नांदेडला एम.डी. केले असेल तर त्याचे काय? हे सर्व कोर्सेस सेंट्रलाईज झालेतर...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी मुंबई किंवा तत्सम विद्यापीठातून असे म्हटले आहे...

डॉ. एम. ए. अझिज : ठीक आहे, मला मान्य आहे. परंतु हे सांगत असतांना यामधील डिस्पॅरिटी नाहीशी झाली पाहिजे. म्हणून ही हेल्थ युनिव्हर्सिटी नाशिकला झाली आहे. याचा अर्थ असा नाही की, नाशिकचे सर्टिफिकेट असते. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण म्हणाल्याप्रमाणे ज्या कॉलेजमधून विद्यार्थी एम.डी. करणार असेल त्या कॉलेजचे नाव त्यामध्ये असते. व त्यानंतर विद्यापीठाचे नाव असते. ही चुकीची कल्पना आहे. ते सेंट्रलाईज झाले पाहिजे. म्हणून हे महाराष्ट्र विद्यापीठ कायम करण्यात आले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/MHM पूर्वी श्री.सरफरे . . . . 21:20

डॉ.एम.ए.अझिज . . . .

मेडिकलचे,युनानीचे,आयुर्वेदिकचे पूर्ण कोर्सेस सेंट्रलाईज झाल्यानंतर, आपल्याला जर एम.डी.साठी प्रश्नपत्रिका काढावयाची असेल तर मग नांदेडचा पेपर वेगळा, औरंगाबादचा वेगळा, मुंबईचा वेगळा ही जी डिसपॅरिटी आहे, त्यामुळे डिसक्रिमिनेशन होते. जेव्हा तुम्ही डिग्री घेऊन जाणार, तुम्ही औरंगाबादवरुन पास केले असेल तर त्याला महत्व नाही. हे सेंट्रलाईज झाल्यानंतर पूर्ण महाराष्ट्रामध्ये विद्यार्थ्यांचे यामध्ये कल्याण होईल आणि यात युनिफॉर्मिटी राहीली. त्यामुळे याठिकाणी जे विधेयक आणलेले आहे, त्याला मान्यता दिली पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

-----

. . . .5 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकला आहे आणि ते काढण्याचा उद्देश हा मल्टीडिसीप्लीनरी फॅकल्टी म्हणजे ॲलॉपॅथी, होमिओपॅथी, आयुर्वेदिक, युनानी एका छत्रीखाली आणावयाचे आणि त्याच्यामध्ये इंटरॲक्शन, इंटरडिसीप्लीनरी रिसर्च होईल आणि तो इंडियन मेडीसीनच्यारुपाने विद्यार्थ्यांना आणि पेशंटनां सुध्दा उपयोगाचा ठरेल म्हणून हे सर्व एका छत्रीखाली ठेऊन त्यावेळी आरोग्य विज्ञान विद्यापीठ सुरु केले होते. तेव्हा मी या सभागृहाचा सभासद नव्हतो, पण मला खात्री आहे की, आता जी भाषणे सुरु आहेत, त्याच्या विरुध्द भाषणे त्यावेळी झाली असतील.

(काही सन्माननीय सदस्य बसून बोलतात.)

आपल्याच सरकारच्या काळात हे झालेले आहे. आमचेच सहकारी डॉ.दौलतराव आहेर त्यावेळी माननीय आरोग्य मंत्री होते.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर बोलावे.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, मी बिलावरच बोलत आहे. या बिलामध्ये जे काही केलेले आहे, ते अत्यंत योग्य आहे. कारण पोस्ट ग्रॅज्युएशन विद्यापीठामध्ये नव्हते. तर ते प्रत्येक कन्व्हेन्शनल युनिव्हर्सिटीकडे होते. त्यामुळे एक प्रकारची तफावत निर्माण झाली होती आणि सर्व डॉक्टरांचीही मागणी होती की, आम्हाला एकाच ठिकाणी पोस्ट ग्रॅज्युएशनची सुविधा पाहिजे आणि त्याच्या आधारे पोस्टग्रॅज्युएशन एम.यु.एच.सी.ला जोडले आहे. यामध्ये एकच मुद्दा आहे की, कन्व्हेन्शल युनिव्हर्सिटीज आहेत, त्याचा यामध्ये काही संबंध राहीलेला आहे की नाही ? तर यामध्ये जे विद्यार्थी त्या विद्यापीठामध्ये पोस्ट ग्रॅज्युएट करीत आहेत, ते जोपर्यंत पास होत नाहीत तोपर्यंत ती फॅकल्टी त्या विद्यापीठामध्ये कन्टीन्यू राहणार आहे आणि त्या युनिव्हर्सिटीला ती मुले पास होई पर्यंत परीक्षा घेत रहावे लागणार आहे आणि पुढच्या ज्या ॲडमिशन आहेत, त्याबाबतीत शासनाने आता जे केलेले आहे ते योग्य आहे आणि त्यावर टीका न करता हे मंजूर करणे गरजेचे आहे अशी माझी आपल्या सर्वांना विनंती आहे.

-----

. . . .5एन-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, डॉ.वसंतराव पवारसाहेबांनी जे सांगितले, तर आपल्या आणि दुसऱ्या सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यामध्ये एक मुद्दा महत्वाचा आहे की, यात युनिफॉर्मिटी यावी, युनिटी यावी वगैरे. पण जो धोका आहे, त्याकडे मी लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबद्दलचे श्रेय मी माननीय श्री.श्रीकांत जोशी यांना देणार आहे. पान क्र.7 वरील जो उल्लेख त्यांनी वाचून दाखवला, तो मी देखील आता शांतपणे वाचला, आपणही तो कृपा करुन वाचावा. यामध्ये असे म्हटलेले आहे की, "परंतु या पोटकलमांन्वये महाविद्यालयांना किंवा स्वायत्त संस्थांना, विद्यार्थ्यांना अशी मान्यता मिळण्यापूर्वी दिलेला असा पुन:प्रवेश किंवा पुन:संलग्नता या विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेल्या उक्त पदव्युत्तर पदव्यांना केंद्र सरकारने मान्यता दिली असली किंवा नसली तरीही त्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 अन्वये त्यांच्या संबंधित विद्यापीठांकडून अशा पदव्या, पदव्युत्तर पदव्या मिळेपर्यंत राज्य शासनाकडून किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडून रद्द करण्यात येणार नाही किंवा काढून घेण्यात येणार नाही किंवा त्यात कोणत्याही प्रकारे बदल केला जाणार नाही."

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक (पुढे चालू...

मला आपल्याला आवाहन करायचे आहे की, ही विधानपरिषद असेल किंवा शेजारची विधानसभा असेल, आपण या पलीकडे विधान काही करु शकत नाही. आपण अशी कल्पना करु या की, धुळे शहरातील विद्यार्थी या आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून पदव्युत्तर पदवी मिळविण्यात यशस्वी झाला. परंतु तो बऱ्हाणपूरला देखील दवाखाना टाकू शकणार नाही. कारण केंद्र सरकारने मान्यता दिली काय किंवा न दिली काय ? ही भाषा आपल्याला परवडेल. पण जो संभाव्य डिग्री होल्डर आहे, त्यांच्याही भवितव्याचा विचार केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी जे म्हणाले ते मला महत्वाचे वाटते. कारण एका बाजूला आज मुंबई विद्यापीठाचा विद्यार्थी असेल, नांदेडचा विद्यार्थी असेल किंवा अन्य कोणत्या विभागातील विद्यार्थी असेल, त्याला मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता असेल, केंद्र सरकारची मान्यता असेल तर तो परप्रांतात जाऊ शकतो, परदेशामध्ये जाऊ शकतो. आपण या ठिकाणी जे विधान केले ते विधान कायद्याला धरुनच आहे. आपण फार तर केंद्र शासनाला आवाहन करु शकतो, राज्यातील प्राधिकरणाला आवाहन करु शकतो. पण मध्यप्रदेशातील, कर्नाटकातील प्राधिकरणाला आपण काहीही आवाहन करु शकत नाही...Because they are going to insist on Medical Council of India. एवढ्यासाठीच आपण याचा विचार करावा,अशी सन्माननीय सदस्यांनी विनंती केलेली आहे, त्या विनंतीला मी दुजोरा देतो.

डॉ वसंत पवार : "मान्यता असो किंवा नसो" याबाबत सन्माननीय सदस्यांची शंका आहे. हा फक्त ट्रान्झीट पिरिअड आहे. एम.बी.बी.एस. बी.ए.एम.एस.ला मान्यता नव्हती आता एम.सी.आय.ने दिली. याचा अर्थ लगेच मान्य मिळेल असे नाही. तीन वर्षानंतर मुले जेव्हा परीक्षेला बसतील त्यानंतरच एम.सी.आय.ची मान्यता त्यांना मिळेल. म्हणून त्यामध्ये "असो किंवा नसो" हा टेंपररी ट्रान्झिट पिरिअड घातलेला आहे. जुन्या विद्यापीठामध्ये अगोदरच एम.डी, एम.एस.ला मान्यता आहे. त्या ठिकाणी नवीन विद्यार्थी जातील, त्यांना आता लगेच मान्यता मिळणार नाही, वेळ लागेल म्हणून ती रचना तशी करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यामध्ये घाबरण्याची गरज नाही. यामुळे विद्यार्थ्यांचा कोणताही तोटा होत नाही.

डॉ.अशोक मोडक : तुम्ही-आम्ही घाबरण्याचे कारण नाही. मुळामध्ये ट्रान्झीट पिरिअड किती कालखंडाचा असेल याबाबत आपण अंधारात आहोत. तो भले वर्षाचा असेल. त्या वर्षाचे नुकसान करण्याचा तुम्हा-आम्हाला कोणी अधिकार दिलेला आहे ? हा विषय गंभीर आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, बरेचसे कोर्सेस हे आजही रिकग्नाईज नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. बऱ्याचशा एम.डी.च्या जागा आपण भरतो, परंतु त्या रिकग्नाईज नाहीत. परंतु तीन वर्षासाठी डिग्री प्राप्त करतो हे खरे आहे. पूर्वीची प्रॅक्टीस काहीही असो. आता आपण नवीन सर्व कोर्सेस एका छत्राखाली आणलेले आहेत, त्याला आपण "हेल्थ युनिव्हर्सिटी",असे म्हटलेले आहे. त्या "हेल्थ युनिंव्हर्सिटी"चे स्वरुप विराट असणे आवश्यक आहे. मला मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, आपण यापूर्वी एम.सी.आय.शी संपर्क साधला आहे काय ? या विषयी एम.सी.आय.शी बोलणी केली आहेत काय की आम्ही पोस्ट ग्रॅज्युएशनचे कोर्सेस सुरु करतो आहोत, त्याला अशी अशी मान्यता देतो आहोत. तेव्हा नजिकच्या भविष्य काळामध्ये ज्या विद्यार्थ्यांना त्यांचे रजिस्ट्रेशन एम.सी.आय.च्या अंडर देणार आहात काय ? ज्यायोगे सर्व प्रांतामध्ये, देशामध्ये आणि परदेशामध्ये ही मुले प्रॅक्टीस करु शकतील.

डॉ.एम.ए.अझिज : सभापती महोदया, इंडियन मेडिकल कौन्सिलच्या रिकग्नेशनचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. एम.बी.बीएस.लासुध्दा बऱ्याचशा महाविद्यालयांमध्ये रिकग्नेशन नाही. त्या लोकांना त्या राज्यामध्येच प्रॅक्टीस करावी लागते. त्यामुळे येथे प्रश्न कोठे येतो ? सन्माननीय सदस्य डॉ.मोडक साहेब म्हणाले की, त्या पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांचे काय होणार आहे ? एम.सी.आय.ची मान्यता आहे की नाही ? या संदर्भात प्रश्न येत नाही. यासाठी चार-पाच वर्षाचा कालावधी लागतो. त्यानंतर हे कोर्सेस रिकग्नाईज होतात. पण आज मेडिकल एज्युकेशन सेंट्रलाईज करण्याची गरज आहे. तेव्हाच ही मेडिकल युनिव्हर्सिटी सुरु करता येईल. So, medical education should be decentralized; otherwise we will have to close down the Maharashtra University of Health Sciences.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी) : मला वाटते की, आपण जसे म्हणालात की, या विधेयकाला विराट स्वरुप दिले पाहिजे . तर ते विराट स्वरुप देण्याकरिताच हा सगळा प्रयत्न आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदया, परत एकदा विषय असा आहे की, हा कायद्याचा प्रश्न आहे. इंटेन्शनचा प्रश्न नाही. ही कायद्याची भाषा आहे ती कायद्याच्या पध्दतीनेच ठेवावी लागते. म्हणून मंत्रिमहोदय, केंद्र सरकारकडून मान्यता मिळेल किंवा न मिळेल ही भाषा कायद्यामध्ये चालत नसते. म्हणून ज्यांनी कोणी हा कायदा बनविला आहे त्यांनी तो विचार करुन बनविलेला नाही हे सिध्द होते.सभापती महोदय, मी या ठिकाणी कायद्याचे पुस्तक घेऊन बसलो आहे. आणि सगळया युनिव्हर्सिटीच्या कायद्यात मी बधितले आहे पण त्यामध्ये अशा त-हेचा जर-तरचा कुठेही उल्लेख नाही. श्री. गुरुनाथ कुलकर्णी याबाबतीत अधिकारवाणीने सांगू शकतील.If and but for law canot subcit. लॉ कडक आणि क्लिअर असावा लागतो. आणि म्हणून येथे इंटेन्शनचा प्रश्न नाही. तो चांगला करा याबद्दल आम्ही सगळे बोललो आणि त्याचे समर्थनही केले आहे. पण अशा पध्दतीने केंद्र सरकारची मान्यता असेल किंवा नसेल असे म्हणणे योग्य नाही. कायद्यामध्ये क्लॅरिटी पाहिजे. हा महत्वाचा मुद्दा आहे. त्याचे मंत्रिमहोदयांनी स्पष्टीकरण करावे.

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, मला एकच शंका आहे की, हा कायदा या वर्षी पासून लागू करणार आणि मेडिकल कौन्सिल गव्हर्नमेंट इंडियाच्या काही स्पेसिफिक तारखा असतात. कॉलेजसना पी.जी.चे नवीन कोर्सेस सुरु करावयाचे असतात त्यांनी ऑक्टोबर महिन्यात त्या त्या युनिव्हर्सिटीला अर्ज करावा लागतो. राज्य शासनाला ज्या युनिव्हर्सिटींनी आपले रिकमेंडेशन पाठवले आहे ते 31 डिसेंबरच्या आत, एका महिन्याच्या आत राज्य शासनाने केंद्र शासनाला त्याचे रेकमंडेशन पाठवायला पाहिजे. त्यानंतरच केंद्र शासन त्यासंबंधीची सगळी प्रोसेस करते.मार्च-एप्रिल मध्ये या नवीन परमिशन्स येतात. या ठिकाणी जो कायदा आणलेला आहे. त्यानुसार एम.यु.एच.एस.साठी त्या त्या युनिव्हर्सिटीतून अर्ज मागविण्यात येणार आहेत. ज्या ज्या कॉलेजस्नी त्या त्या युनिव्हर्सिटींनी अर्ज केले आहेत त्या त्या कॉलेजचे अद्यापपर्यंत युनिर्व्हसिटीचे इन्स्पेक्शन झालेले नाही. 31 डिसेंबरच्या आत इन्स्पेक्शन होऊन त्या युनिर्व्हसिटीने त्यांच्या ज्या रेकमंडेशन असतील त्या केंद्र शासनाला 31 डिसेंबरच्या आत पाठवाव्या लागतात. मला ही भिती आहे की, ज्या नवीन सिट्स गव्हर्नमेंट आणि प्रायव्हेट कॉलेजस्मध्ये येणार आहेत त्या विद्यार्थ्यांचे या सगळया प्रोसेसमध्ये एक वर्षे वाया जाणार नाही, यादृष्टीने शासनाने लक्ष द्यावे. .....यानंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Suresh Shetty (Minister of State for Medical Education) : Respected Chair-person, I think I will speak in English because number of hon.Members spoke in English. Everybody knows that the Maharashtra University of Health Sciences was established in 1998. We appreciate what the then Government did. We also appreciate the initiative taken by the then Shiv Sena-BJP Government to unify all the health science courses in the State of Maharashtra and to bring about an uniformity in the State as far as the education of Health Science Sector is concerned, so that there is a proper and systematic training, research and teaching in Modern Medicine and Indian Medicine. We complimented the then Minister for Health and Medical Education who thought it fit to bring such a legislation to establish Maharashtra University of Health Sciences in Nashik. The question raised by the hon. Member Dr. Deepak Sawant and other respected colleagues here that Mumbai University being very prestigious, probably the students would not like to take certificates from the Maharashtra University of Health Sciences situated in Nashik. I am also a student of Mumbai University. I am proud that I am a student of Mumbai University. But, I think as a students I will be more proud to get a certificate from the Maharashtra University of Health Sciences rather than getting certificate from a particular city like Mumbai, Pune, Nagpur etc. I am proud to say that I am Maharashtrian first and then I am Mumbaikar. I think we should all ... whether it is Uddhav or Raj, we are not concerned .... we are talking about Maharashtra here...

Dr. Deepak Sawant : Respected Chair-person, the Hon. Minister should not bring politics here.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Suresh Shetty : Somebody mentioned about Uddhav and that is why I said so.

(Interruption)

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : माननीय मंत्री महोदयांना त्यांचे भाषण पूर्ण करु द्या.

Shri Suresh Shetty : I withdraw that word.

डॉ. दीपक सावंत : माननीय सभापती महोदया, माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये राजकारण आणू नये. मुंबईकर आणि महाराष्ट्रीयन असा भेदभाव करण्याचा आमचा मुळीच उद्देश नव्हता. त्यामुळे त्यांनी केलेले स्टेटमेंट कृपया रेकॉर्डवरुन काढून टाकावे, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : रेकॉर्ड तपासून माननीय मंत्री महोदयांच्या म्हणण्याचा अर्थ काय होतो हे प्रथम पाहिले जाईल, नंतर ते अनावश्यक वाटल्यास रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

Shri Suresh Shetty : Respected Chair-person, the basic crunch of the problem was that when the Maharashtra University of Health Sciences was established, it was in the original Act that all the Under Graduation and Post Graduation Courses related to Health Sciences will be covered under the Maharashtra University of Health Sciences. Subsequently, when the Act came into existence, it was noticed that there was a lapse on the part of the Government. As there were no proper permissions from all the Medical Council of India, Ayurvedic Council Nursing Council etc., it was decided that an amendment should be made to this Act so that Post Graduation and Post Graduation Diploma Courses could be excluded from this till Maharashtra University of Health Sciences and get proper recognition from all the Central Medical Councils. Now, we have obtained all the permissions

...3



Shri Suresh Shetty ....

from all the Central Medical Councils. The Medical Council of India gave the recognition on 3-7-2003. The Dentist Council gave us the recognition on 14-11-2003. The Ayurvedic and Unani Councils gave us recognition on 29-1-2004. The Homeopathy Council gave

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

the recognition on 20-12-2003. The Nursing Council of India gave the recognition on 7-11-2003. All these degrees are recognized by the respective Central Medical Councils. Now, the question is what about the Post Graduation Courses? As originally thought of, we though that it is better to get Post Graduation Degree and Diploma Courses back into the fold of Maharashtra University of Health Sciences. Hence the decision was taken to take out an Ordinance. But, I have to tell you that we have taken this decision after giving due consideration to all the facts which were mentioned by several hon. Members. We also took into consideration as to what will happen to the students who are doing Post Graduation Courses in the Universities in Maharashtra. The students enrolled in any University will continue to study in their respective Universities till they pass their final Post Graduation Examinations. This Act will be applicable to the students who are going to register for Post Graduation Courses or Diploma Courses in the next academic year i.e. 2006-2007 and as per directive which we have got from the All India Council of Medical Sciences, we have to conduct the central entrance examination for all the Post Graduation Courses on or before 29-1-2006. If we have to conduct the central entrance examination on or before 29-1-2006, then we have to start the process of organizing the conduct of central entrance examinations for the Post Graduation Courses at least 2-3 months in advance and that is why we took out the Ordinance

....4



Shri Suresh Shetty ....

in the month of August,2005. Therefore, this Bill has come before this august House. I definitely agree with the sentiments expressed by the hon. Members that Mumbai University is definitely more well-known all over the world. Since we took a decision to form new University named as Maharashtra University of Health Sciences, let us give a chance to this University. The Government of Maharashtra is committed to strengthen Maharashtra University of Health Sciences by giving additional staff, additional money etc. It is an autonomous body. The Government of Maharashtra is committed to give all

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

co-operation and support to this University. We expect the days to come when the Maharashtra University of Health Sciences will be recognized all over the globe and definitely the name of Maharashtra University of Health Sciences shall spread all round the globe. Let us be proud of this . I hope all of you will support this Bill. I request all of you to pass this Bill unanimously.

यानंतर श्री जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत :सभापती महोदया, आपण सांगितले त्याप्रमाणे आता परीक्षा हेल्थ युनिर्व्हसिटी कंडक्ट करणार आहे की आपली डीएमई ( डायरेक्टर ऑफ मेडीकल एज्युकेशन) कंडक्ट करणार आहे ? कारण आमच्या मनात संभ्रम आहे. कारण पूर्वी डीएमई एक्झाम कंडक्ट करीत होती. त्यांच्याकडून परीक्षा घेण्याचे अधिकार काढून घेऊन हेल्थ युनिर्व्हसिटीला देणार आहात काय हा महत्वाचा प्रश्न आहे. दुसरी करोडो रुपये जी फी जमा होते, प्रॉस्पेक्टस सेल करुन किंवा प्रवेश परीक्षा घेऊन जी फी जमा होते ती करोडो रुपये असते त्यामुळे आता ही फी कोण जमा करणार? कोणाच्या खात्यामध्ये ही फी जमा होणार ?

श्री. सुरेश शेट्टी : हे खरे आहे की, डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्युकेशन सध्या परीक्षा कंडक्ट करीत आहे. येणा-या काळात हेल्थ युनिर्व्हसिटीला ॲडीशनल स्ट्रेन्थ देऊन ...If they are in a position to conduct these examinations, then I don,t know why Government should not give Medical University a chance to conduct these examinations till the options are open, and the Government of Maharashtra will not hesitate to hand over conducting of the entrance examinations to the Maharashtra University of Health Sciences or to create a separate authority to conduct all the entrance examinations related to medicine, engineering or any other field of education in Maharashtra.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश:विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4, ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. सुरेश शेट्टी : महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 76 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 76 संमत झाले आहे.

---------------

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई दारूबंदी (सुधारणा) विधेयक.

L.A.BILL NO. LXXXI OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROHIBITION ACT,1949).

श्री.गणेश नाईक (राज्य उत्पादन शुल्क मंत्री) : अध्यक्ष महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 81 - मुंबई दारूबंदी अधिनियम,1949 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती (श्रीमती जोशी)** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.गणेश नाईक : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 81 - मुंबई दारूबंदी अधिनियम,1949 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदया, गेल्या डिसेंबरमध्ये मुंबईतील विक्रोळी मध्यवर्ती भागामध्ये विषारी दारू पिऊन 90 लोक मृत्युमुखी पडले. एकूणच आजचा जो प्रचलित कायदा आहे आणि त्यामध्ये दंडात्मक कारवाई करण्याची केलेली तरतूद ही दुष्टप्रवृत्ती लोकांना पायबंद घालण्यासाठी अपुरी होती. म्हणून भविष्यकाळात विषारी दारू कोणी निर्माण करू नये, वाहतूक करू नये परराज्यातून अवैधरित्या दारूची वाहतूक होऊ नये म्हणून शासन आता कडक कायदा करीत आहे. अशाप्रकारच्या कृतीमुळे शासनाचा महसूल बुडतो हा भाग वेगळा. मुंबई दारूबंदी अधिनियम, 1949 यामध्ये आजपर्यंत सुधारणा करण्यात आली नव्हती. अवैध दारू प्रकरणी इसमाला पोलिसांनी पकडल्यानंतर तो पोलीस ठाण्यामध्ये जाण्याचा अगोदरच त्याचा बाहेर पडण्याचा मार्ग देखील मोकळा झालेला असायचा. त्याचा मालक किंवा तो वकिलाच्या मदतीने जामीन घेऊन बाहेर यायचा. त्यामुळे कायद्याचा धाक कोणालाही नव्हता. आता आम्ही हा गुन्हा अजामिनपात्र केला आहे. त्यामुळे अवैध दारूच्या व्यवसायात गुंतलेल्यांना कायद्याचा धाक वाटत नव्हता. यापुढे अवैध दारू विक्री,निर्मिती संबंधीचे सर्व गुन्हे हे अजामीनपात्र करण्यात आलेल आहेत. जेणेकरून दुष्टप्रवृत्ती लोकांना धाक वाटेल. सन 1949 नंतर दंडात्मक तरतुदीतील रक्कम अद्याप पर्यंत वाढ केलेली नव्हती. जनतेला निश्चितपणे दिलासा वाटेल अशा प्रकारची सुधारणा आहे. या उद्देशानेच हे विधेयक आणले आहे. मी आपल्या मार्फत सन्माननीय सभागृहाला विनंती करतो की, सदर विधेयकाला संमती द्यावी.

प्रश्न प्रस्तुत झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट (विधानसभाद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, मुंबई दारूबंदी विधेयक आणल्यामुळे मी मंत्रिमहोदयांचे स्वागत करतो. याची अंमलबजावणी किती होईल याबद्दल मला शंका आहे. परंतु, मंत्रिमहोदय हे सक्षम असल्यामुळे मला आशेचा किरण दिसत आहे. या कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता शासनाची खरी कसोटी लागणार आहे ती मुंबई शहरामध्ये दिनांक 25 डिसेंबर आणि 31 डिसेंबर या दिवशी. दिनांक 25 व 31 डिसेंबरला गेट-वे ऑफ इंडिया आणि मुंबईच्या चौपाटयांवर काय परिस्थिती असते याची आपणा सर्वांना कल्पना आहे. ही परिस्थिती हाताळण्यासाठी पोलीस खाते किती सहकार्य करते याची देखील आपल्याला कल्पना आहे. म्हणून मंत्रिमहोदयांची खरी कसोटी हे वर्ष संपताना आणि नवीन वर्ष सुरू होताना लागणार आहे. मी आपणास यासाठी शुभेच्छा देतो. 'केंद्रीय गृहमंत्र्याच्या नावे जारी झाला दारू पिण्याचा परवाना' अशी बातमी आहे. म्हणजे अशाप्रकारचे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या खात्यामध्ये आहेत. आपण स्वत:च्या घरापासून सुरूवात करायला हवी असे नेहमी म्हणतो. याप्रमाणे साफसफाईला सुरूवात झाली तर आपल्याला खात्याच्या अधिकारी,कर्मचाऱ्यांपासून सुरूवात करावी लागेल. कारण केंद्रीय मंत्र्याच्या नावाने परवाना देणे म्हणजे किती सावळा गोंधळ आहे हे कळते. चॅरिटी बिगिन्स ॲट होम. म्हणून मी या निमित्ताने काही धोक्याच्या सूचना करणार आहे. महाराष्ट्र-गोवाच्या सीमेवर दोडा मार्ग आहे. येथून वाहनांमधून अवैधरित्या दारूचा पुरवठा होतो. आपण म्हणता त्याप्रमाणे पोलीस वाहनांची तपासणी करतात. त्यांना दक्षिणा दिली जाते, त्यामुळे दारूच्या बाटल्या फुटत नाहीत. त्यामुळे वाहनांमधून अवैधरित्या दारूची येत असते. जेवढा कायदा आपण कडक करतो, त्याच्यापेक्षा जास्त प्रमाणात पळवाटा निघतात. ज्यावेळी मुंबई शहरामध्ये दारूबंदी झाली त्यावेळी शहरांच्या नाक्यानाक्यांमध्ये आणि वाडयावाडयांमध्ये हातभट्टयांचा धंदा फार मोठया प्रमाणावर चालू होता. अजूनही काही ठिकाणी हातभट्टी आहेत. आपल्याला सांगावयाचे झाले तर रात्री 12.00 ते पहाटे 5.00 वाजेपर्यंत टयूबमधून दारू आणून त्याची विक्री केली जाते.

यानंतर श्री.अजित..

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विलास अवचट...

ज्याठिकाणी रेल्वे स्टेशन्स आहेत त्याठिकाणी हे प्रकार जास्त चालतात. चर्चगेट पासून विरार पर्यंत ही अवैध दारु आणली जाते. आपण अशाप्रकारची अवैध होणारी वाहतूक कशाप्रकारे रोखणार हा आपल्यासमोर मोठा प्रश्न आहे. परवाना धारकांना बारा बाटल्या खरेदी करण्याची परवानगी दिलेली आहे. यावर आपण कसे नियंत्रण ठेवणार आहात ? मी याठिक्‍ाणी नमूद करु इच्छितो की, जास्तीत अपधात हे दारु पिण्यामुळे होतात. उदाहरण द्यावयाचे झाले तर नेताजी सुभाषचंद्र बोस- क्वीन्स रोड येथे रात्री दहानंतर त्याठिक्‍ाणी बेफामपणे सुसाटपणे गाड्या चालविल्या जातात. आपण कार्यक्षम मंत्री असल्यामुळे कायदा करुन वचक आणण्याचा प्रयत्न करीत आहात. आपण जेव्हा अवैध व्यवसायाला आळा घालण्याचा प्रयत्न करीत आहात त्यावेळी आपल्याला गृह विभागाचे देखील सहकार्य मिळणे आवश्यक आहे. कारण या दोन विभागांनी एकत्रितपणे काम केल्यास त्याचे परिणाम दिसून येतील. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी हे विधेयक आणल्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदया, हे विधेयक खरोखर चांगले आहे. आज मुंबई नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात अजूनही हातभट्टीची दारु तयार होत आहे. दुर्दैवाने मला येथे सांगावयाचे आहे की, दोन दिवसांपूर्वी गोवंडी येथे झ ोपडपट्टीमध्ये राहणारा एक शिक्षक अशाप्रकारची दारु पिऊन मृत्युमुखी पडला. मी बुलढाणा येथे गेले होते. त्याठिकाणी जिल्हापरिषदेच्या शाळेतील काही शिक्षकांची रात्री पार्टी चालली होती. त्यावेळी त्यातील एका शिक्षकाने अशा प्रकारची दारु प्यायलामुळे त्याला हॉस्पीटलमध्ये ॲडमीट करावे लागले होते. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी सांगितले की, 25 डिसेंबर आणि 31 डिसेंबरला पार्ट्या खूप होतात. पण मी याठिकाणी सांगू इच्छिते की, फक्त 25 डिसेंबर व 31 डिसेंबरला अशा पार्ट्या होतातच, पण काही समारंभ असेल तर तेव्हा सुध्दा पार्टया होत असतात. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी अतिशय चांगले विधेयक आणलेले आहे. पण आपण यावर नियंत्रण कसे आणणार ? आजही दुर्गमभागात किंवा आदिवासी भागातील लोक पाण्याऐवजी त्यांना प्रथम दारु लागते. मी एकदा सातपुडा या आदिवासी भागात गेले होते. तेथे असा प्रकार रोजच चालू असतो. त्याठिकाणी महिला फार मोठ्या प्रमाणावर दारु पितात. आपण या भागांवर नियंत्रण कसे आणणार ? याची अंमलबजावणी चांगल्याप्रकारे झाली पाहिजे. गृहविभागाने तुमच्या विभागाला सहकार्य केले तर चांगल्याप्रकारे अंमलबजावणी होऊ शकले. आपण एक चांगले विधेयक आणल्याबद्दल आपले अभिनंदन करुन माझे दोन शब्द पूर्ण करते.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदया, मला सभागृहाला नम्र विनंती करावयाची आहे की, दारु पिणे नैतिकता आहे की अनैतिकता आहे? कोणत्या वयाच्या माणसाने दारु प्यावी यावर चर्चा न करता विधेयकातील जे मुद्दे आहेत त्यावरच ही चर्चा नियंत्रित राहिली तर बरे होईल नाहीतर त्या चर्चेला रंगीतसंगीत स्वरुप मिळेल. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी हे विधेयक आणल्याबद्दल मी त्यांचे स्वागत करते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.अजित.... 21:55

डॉ.नीलम गोऱ्हे....

एका चर्चेमध्ये झी-वाहिनीवर माननीय मंत्री श्री.गणेश नाईक आणि मी समोरासमोर आले होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत माझा त्यांच्यांशी प्रचंड वाद झाला होता. माननीय मंत्री हे माता-भगिनींच्या दृष्टिकोनातून सांगत होते की, या दारुविक्रीला नियंत्रण आणून ते थांबवू. त्यामुळे या अनुषंगाने आपण जी पावले उचललेली आहेत ती खरोखरच स्वागतार्ह आहेत. परंतु कोणत्याही गोष्टीचे नियंत्रण करावयाचे असेल तर त्यातून भ्रटाचार आणि परवानाराज तयार होऊ शकते ही वस्तुस्थिती आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत म्हणाले की, महिलांचा आणि दारुचा काय संबंध आहे ? मी त्यांना सांगू इच्छिते की, हजारो स्त्रिया दारुच्या प्रश्नामुळे शासनाला तळतळाट देत असतात आणि त्यामुळेच स्त्रियांचा दारुशी संबंध आहे. स्त्रिया आज दारुला आपली सवत मानतात.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. दारु पिणे हा विषय केवळ आदिवासी किंवा गरीब यांच्यापुरताच मर्यादित आहे असे म्हटले गेले आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, हाय सोसायटयांमध्ये जर आपण जाऊन पाहिले तर त्या ठिकाणी पुरुषच दारुचा ग्लास घेऊन चिअर्स करतात असे नव्हेतर स्त्रियासुध्दा चिअर्स करताना दिसतात. आज हा प्रकार मुंबईमध्ये राजरोसपणे सुरु आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे वकील आहेत. मी त्यांना सांगू इच्छिते की, हे विधेयक महिला आणि पुरुष या दोघांनाही लागू आहे. महिलांना वेगळी परवानगी द्या असे कोणीही म्हणणार नाही. मी वकील जरी नसले तरी थोडयाफार प्रमाणात का होईना मला कायद्याचे ज्ञान आहे. या विधेयकात प्रामुख्याने तीन गोष्टींचा समावेश करण्यात आलेला आहे. पहिला मुद्दा हा प्रतिबंधात्मक कारवाईबाबतचा आहे. गेल्या 30-35 वर्षांमध्ये या कायद्यामध्ये काहीच सुधारणा झाली नव्हती. त्यामुळे या विधेयकाच्या माध्यमातून सुधारणा करण्याचा जो प्रयत्न केलेला आहे तो स्वागतार्ह आहे. दारु बनविण्याची प्रक्रिया कशी घडते याचा अभ्यास करुन, हे विधेयक तयार केलेले आहे. मागे मुंबईमध्ये दारुच्यासंदर्भात मोठे कांड घडले होते आणि त्यामध्ये अनेक लोक मृत्युमूखी पडले होते. त्यामुळे मुंबईच्या पोलीस आयुक्तांना पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक बोलवावी लागली होती. त्या बैठकीमध्ये पोलीस अधिकाऱ्यांनी स्पष्ट सांगितले की, दारुच्या नियंत्रणाच्या जबाबदारीतून पोलिसांना मुक्त करा.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

कारण जोपर्यंत मिथेनॉल पदार्थ दारु बनविताना मिसळविला जाईल तोपर्यंत विषारी दारु उपलब्ध होतच राहील. त्यामुळे अनेक लोक मृत्युमूखी पडतात ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे यावर कशाप्रकारे नियंत्रण आणावे हा मोठा प्रश्न होता आणि त्यातून माननीय मंत्रिमहोदयांनी मार्ग काढलेला आहे.

महोदय, हा गुन्हा अजामिनपात्र करण्यात आलेला आहे. दृतगती न्यायालयात याचे खटले चालतील काय ? कारण न्यायालयात फार मोठया प्रमाणावर प्रकरणे अनिर्णित राहतात, त्यामुळे ही प्रकरणे दृतगती न्यायालयात चालली तर या प्रकरणांचा लवकर निर्णय लागू शकेल. त्यामुळे याबाबत सुध्दा विचार करावा लागणार आहे. दिवसा कामावर असलेले कर्मचारी दारु पिऊन कामावर आले आहेत काय याबाबत तपासणी करणे आवश्यक आहे. दारु पिऊन पोलीस डयुटीला आला तर अशा कर्मचाऱ्यावर कारवाई करु असे माननीय आर.आर.पाटीलसाहेबांनी सांगितले होते. परंतु वाहनातून जर दारुची ने-आण, सेवन झाले तर शासन काय करणार आहे ? आजकाल रेल्वेमधून पारदर्शक वस्तूंच्या माध्यमातून, पाण्याच्या माध्यमातून काही प्रवासी दारु पीत-पीत जात असतात. लांब पल्ल्यांच्या गाडयामध्ये हा प्रकार अधिक प्रमाणावर होताना दिसून येतो. त्यामुळे अशा प्रकारातून मार्ग काढण्यासाठी सुवर्णमध्य काढावा लागणार आहे. या कायद्याच्या माध्यमातून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून लोकांकडून पैसे वसूल करुन भ्रष्टाचाराचे कुरण निर्माण होणार नाही हे सुध्दा या विधेयकाच्या अनुषंगाने पहावे लागेल. क्रिमीनल स्वरुपाच्या दोन-तीन केसेसे रेकॉर्ड असलेल्यांच्या संदर्भात याद्वारे कठोर भूमिका घ्यावी. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, दारुचा धंदा केवळ पुरुषच नव्हेतर स्त्रिया सुध्दा चालवितात.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ..

काही भटक्या आणि विमुक्त समाजातील लोकांचा दारु बनविणे हा एक व्यवसाय आहे.परंतु मला असे वाटते की या बाबतीत आपण कोणतेही समर्थन न करता आदिवासी भागातील संदर्भात त्यांच्या संस्कृतीचा जो काही भाग आहे त्या संदर्भात जो काही विचार होईल तो वेगळा विचार आहे. परंतु संपूर्ण् राज्यात दारुबंदीच्या बाबतीत धोरण स्वीकारत असतांना माननीय सदस्य श्री.विलास अवचट असे म्हणाले की, या मध्ये शासनाची फार मोठी कसोटी आहे. पण माझे असे म्हणणे आहे की यामध्ये शासनाची कसोटी काहीही नाही. कारण वाहतुकीचे नियम पाळण्याच्या बाबतीत आपण ज्याप्रमाणे लोकांना प्रवृत्त करीत असतो त्याप्रमाणे दारुबंदीच्या बाबतीत समाज प्रबोधन , लोक प्रबोधन करावयास पाहिजे. ही बाब आपल्याला कितीही विनोदी वाटत असली तरी त्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही असे मला वाटते .या ठिकाणी जे विधेयक मांडण्यात आलेले आहे त्या विधेयकाचे मी मनापासून स्वागत करते आणि या विधेयकाची अंमलबजावणी करण्यासाठी आमच्यातील सन्माननीय सदस्यांचे निश्चितपणे आपल्याला सहकार्य मिळेल एवढे बोलून माझे भाषण संपविते.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 5V2

श्री.अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी जे विधेयक मांडलेले आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.या ठिकाणी मांडण्यात आलेले जे विधेयक आहे त्या मागचा हेतू अत्यंत चांगला आहे.या बिलातील शब्दाला माझा आक्षेप आहे. हे दारुबंदी विधेयक होऊ शकत नाही.मूळात हे विधेयक दारुबंदीसाठी नाही. त्यामुळे या विधेयकाचे नाव बदलण्यात आले पाहिजे.दारुबंदी म्हणजे दारु तयार करण्यास बंदी, दारु पिण्यास बंदी .परंतु तशा प्रकारचे हे विधेयक नाही.दारु कॅरी करा परंतु ते सर्व लायसन्स घेऊन कायद्यानुसार करा असे सांगण्यात आलेले आहे. जे कोणी परवाना न घेता हे कृत्य करतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे हे दारुबंदीचे विधेयक नाही.त्यामुळे माझा पहिला आक्षेप असा आहे की, हे दारुबंदी विधेयक नाही.या विधेयकाचा उद्देश चांगला आहे.आम्ही मुंबईतील कामगार वस्तीमध्ये वाढलो आहोत.सन्माननीय सदस्य श्री.अवचट यांनी जो उल्लेख केला होता तो काळ सुध्दा आम्ही पाहिलेला आहे. आपण हार्बर लाईनने चुनाभटटी येथे गेलो तर आता ज्या ठिकाणी ट्रॅन्झिट कॅम्प आहे तेथे मुंबईतील सर्वात मोठा दारुभट्टयाचा आगारच आहे.त्या भट्टयातून जी विषारी दारु निर्माण केली जाते ती दारु फुग्यांमधून तसेच डब्यामंधून मुंबई शहरात नेली जात असे. मुंबईतील चाळीच्या अंगणामध्ये तसेच गटारांजवळ देखील भट्टया आहेत.आज काळ बदलला आहे.दारुसाठी परवाना काढण्याची पध्दत सुरु झाली.त्याप्रमाणे दारुचे परवाने आले, विदेशी दारुचे परवाने आले, त्याचबरोबर बार सुरु झाले . बार सुरु झाल्यामुळे काही बारमध्ये बारबाला आल्या.आता आपण बारबालांवर बंदी घातली आहे.ही चांगली गोष्ट आहे परंतु हे करीत असतांना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की या दारुबंदीच्या बाबतीत आपण जेव्हा एखादा नियम कडक करु इच्छितो तेव्हा त्याची अंमलबजावणी तेवढयाच कडक पध्दतीने झाली पाहिजे.मघाशी बोलत असतांना मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की, की शासनाचा रेव्हेन्यू बुडाला तरी मला पर्वा नाही. ही आनंदाची आणि स्वागतार्ह गोष्ट आहे परंतु हा रेव्हेन्यू सुध्दा का बुडावा ? परवाना कशा प्रकारे मिळतो हे आपल्याला माहीत आहे.निदान बारमध्ये जाऊन जी मंडळी दारु पितात त्यांच्या बाबतीत श्री.शिशिर शिंदे यांनी एक सूचना केली होती .ती मला आजही आठवते. त्यांनी अशी सूचना केली होती की, बारमध्ये जाऊ जे दारु पितात त्यांना तेथल्या तेथे चार्जेस आकारुन लायसेन्स देण्यात आले पाहिजे. त्यामुळे शासनाला रेव्हेन्यू मिळू शकेल. हा रेव्हेन्यू बुडविता कामा नये .हे लायसेन्स देत असतांना 25 वर्ष वयाची अट

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावत ...

घालण्यात आलेली आहे.तेव्हा 25 वर्ष वयाची व्यक्ती बारमध्ये जाऊन दारु पिणार असेल तर त्याच्याकडून हा चार्ज वसूल करण्यात आला पाहिजे.बारवर लक्झरी टॅक्सेस आहेत, तेथे सेल्स टॅक्स आकारला जातो. हे सर्व टॅक्सेस जर लागणार असेल तर आणखी दारुचे लायसन्स देत असतांना चार्ज द्यावा लागत असेल तर त्याला काही हरकत नाही. मला आलेला एक अनुभव मी आपल्याला सांगतो .राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या परदेशी

दौ-यावर मी गेलो होतो. तेव्हा बेल्जियमच्या एका सिग्नलजवळ रात्री 2 वाजता आमची गाडी उभी राहिली होती.भारतीय संस्कृतीप्रमाणे मी त्याला सागितले की , गाडी पुढे काढ तेव्हा त्या ड्रायव्हरने मला असे सांगितले की," आपल्याला रेड सिग्नल दिसत नाही काय ? रेड सिग्नल असल्यामुळे मला गाडी पुढे काढता येणार नाही ". त्यामुळे मी त्याच्याशी जास्त काही बोललो नाही. मी त्याला असे म्हणालो की तुझे म्हणणे बरोबर आहे. सहाशे किंवा सातशे किलोमीटर्स प्रवास करीत असतांना हा ड्रायव्हर दारु पित नसे किंवा सिगारेटसुध्दा ओढत नसे. मात्र रात्री प्रवास संपल्यानतर व हॉटेलमध्ये आल्यानंतर तो दोन बियरच्या बाटल्या प्यावयाचा. तेव्हा मी त्या ड्रायव्हरला विचारले की," दिवसभर तुम्ही का पित नाही ? " तेव्हा त्याने मला असे सांगितले

की, "आमच्याकडील कायदे फार कडक आहेत. तुम्ही ज्याप्रमाणे पायलटला किंमत देता त्याप्रमाणे इकडे ड्रायव्हरला किंमत दिली जाते. मी बस ड्रायव्हर असून माझ्यावर 50 लोकांच्या जीविताची जबाबदारी आहे असे .

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

मी आणि माझे सरकार देखील समजते. मी ट्रक ड्रायव्हर असेन आणि माझ्यावर प्रवाशांची जबाबदारी नसेल पण रस्त्यावरून जाणाऱ्या, मग तो पादचारी असो वा अन्य गाड्यांतील असो, त्याची जबाबदारी माझ्यावर आहे. मी जबाबदारीने वागताना चुकूनमाकून मद्य सेवन केले आणि ते लक्षात आले व मी पकडला गेलो तर माझा हा जॉब तर जाईलच. पण माझा ड्रायव्हिंगचा परवाना देखील रद्द होईल आणि त्यासंबंधीची माहिती साऱ्या युरोपिअन कंट्रीजना दिली जाईल की, हा माणूस असा असा वागणारा आहे, तेव्हा याला पुन्हा ड्रायव्हरच्या नोकरीवर ठेवू नये." तेव्हा मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण जर आता हा कायदा करणार आहात तर मग याची अमलबजावणी इतक्या कडकपणे झाली तरच त्या कायद्याचा धाक राहणार आहे. म्हणून या विधेयकाचे मी स्वागत करतो. सभापती महोदय, आपल्याकडे आज विशेष करून मुंबई शहरातील दारूच्या भट्ट्या पूर्वीपेक्षा खूपशा कमी झालेल्या आहेत मात्र महाराष्ट्रातील भट्ट्या काही कमी झालेल्या नाहीत, खेड्यातील दारूच्या भट्ट्या कमी झालेल्या नाहीत. आदिवासी पट्ट्यामध्ये आम्हीही जातो. तेथे तर आदिवासींचे सगळेच्या सगळे कुटुंबच झिंगलेले असते. श्री. सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असताना असेच एक प्रकरण मुंबईच्या नाना चौकामध्ये झाले होते. त्याची केस अजूनही चालू आहे. मध्यंतरी तर 'सच्चाई'मध्ये छापून आले होते की, कुष्ठरोगी हा व्यवसाय करतात. दारूचे फुगे वाहून नेण्याचे काम हे कुष्ठरोगी करतात. त्या कुष्ठरोग्यांचे या बाबत म्हणणे असे आहे की, आम्ही हा व्यवसाय सोडून देतो. तुम्ही आमचे पुनर्वसन करा. आमच्या जीविताचे रक्षण करा, आम्हाला दोन वेळच्या घासाची शाश्वती द्या म्हणजे मग आम्ही हे करणार नाही. आता तुम्ही या विधेयकात म्हटले आहे की, '.. दारूचे वहन करणारा ..' परंतु तो माणूस म्हणतो की, तीच माझी उपजीविका आहे. समाजाने मला अव्हेरलेले आहे आणि त्यामुळे त्यावरच माझी उपजीविका होते आहे. तर मग तुम्ही काय करणार आहात ? त्याची काळजी तुम्ही कशी घेणार आहात ? तेव्हा दारूच्या भट्ट्या आज देखील आहेत. मुंबईमध्ये त्या कमी संख्येने असतील, पण मुंबई सोडली तर खेडोपाडी आजही दारू भट्ट्या मोठ्या प्रमाणात आहेत. त्यावर प्रतिबंध करण्यासाठी आपण हा कायदा आणला आहे. पण मग आता 25 डिसेंबर, 31 डिसेंबर या दिवशी आपण काय करणार आहात ? हे दोन्ही दिवस तसे आनंदाचे दिवस आहेत. पण या दिवशीही

.... 5डब्ल्यू 2 ..

श्री. सावंत ....

कोणी किती आणि कोठे दारू प्यावी याचाही आपण विचार केला पाहिजे. 31 डिसेंबरला रस्त्यावर दारू पिऊन कोणी आला, झिंगून कोणी आला तर तुम्ही त्याला प्रतिबंध करणार का ? त्या दिवशी कोणी रस्त्यावर दारू पित बसला असेल, तर त्याच्या बाबतीत तुम्ही काय करणार आहात ? कारण तुमच्या या कायद्यामध्ये दारू कोठे प्यावी याबद्दलची कोणतीही तरतूद नाही, कोठेही त्याबाबत उल्लेख केलेला नाही. मी परवानाधारक आहे, मी चौपाटीवर बसून, फुटपाथवर बसून, गाडीमध्ये बसून दारू पिईन. अर्थात हे सारे अडचणीचे विषय आहेत. तेव्हा आपण आता हे पाऊल उचललेच आहे त्याचे मी स्वागत करतो आणि आपल्याला शुभेच्छा देतो. आपण याबाबतीत ज्या सूचना आम्ही केल्या आहेत त्यांचा जरूर विचार करावा इतके सांगून थांबतो. धन्यवाद.

****

..... 5डब्ल्यू 3 ...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी केवळ एक मिनिटामध्ये माझा एकच मुद्दा आहे तो मांडणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरूनाथ कुलकर्णी हे बसलेले आहेत आणि ते कायद्याचे जाणकार आहेत. या विधेयकातील पृष्ठ 11 वर जी उद्दिष्टे आपण दिली आहेत त्यातील पहिल्या दोन उद्दिष्टांचे मी स्वागत करतो. मात्र 3 रे जे उद्दिष्ट आहे त्याबद्दल माझा प्रतिवाद आहे. या क्रमांक 3 च्या उद्दिष्टामध्ये आपण काय म्हटले आहे ते पहा... " तांत्रिक आणि क्षुल्लक स्वरूपाच्या विवक्षित अपराधांच्या बाबतीत अपराध आपसात मिटविण्याबाबतच्या तरतुदींमध्ये त्या खटल्याला पर्याय ठरू शकतील अशा प्रकारे सुधारणा करणे." म्हणजे पोलीस आणि दारूडे यांच्यामध्ये आपसात हे मिटविण्यासाठी आपण हा ग्रीन सिग्नल देत आहात काय ? हे मला या निमित्ताने समजून घ्यावयाचे आहे. त्याबाबत आपण खुलासा करावा अशी विनंती.

****

( यानंतर श्री. सरफरे .... 5एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, विधेयकाच्या पृष्ठ क्र. 18 वरील 69 व्या मुद्दयामध्ये "मोहाच्या फुलांची बेकायदेशीररित्या आयात करणे, वगैरे याबद्दल शास्ती" असे म्हटले आहे. तसे पाहिले तर मंत्रिमहोदय ठाणे विभागातील आहेत. त्यांना आदिवासी लोकांशी चांगला परिचय आहे. मोहाचे फूल हे आदिवासींचे अन्न आहे. तेव्हा याबाबत आपण कोणती भूमिका घेणार आहात? त्याचप्रमाणे खालच्या परिच्छेदामध्ये "झाडावर असणाऱ्या किंवा झाडावरुन गळू पडून जमिनीवर गोळा न करता राहिलेल्या मोहाच्या फुलांच्या बाबतीत कोणत्याही व्यक्तींस शिक्षा करता कामा नये" या तरतुदीचा नेमका अर्थ काय आहे? आदिवासींचे हे अन्न आपण हिरावून घेणार आहात काय? कां आदिवासींना या कायद्यामध्ये मोकळीक देणार आहात काय? एवढा खुलासा करावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मंत्रिमहोदयांनी अतिशय चांगले विधेयक आणल्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. यापूर्वी शहरामध्ये अशाप्रकारच्या घटना घडल्या आहेत. गावठी, हातभट्टीची दारु प्यायल्यामुळे लोक मृत्युमुखी पडले आहेत. याचे कारण त्या कायद्यामध्ये त्यावेळी शिक्षा कमी होती. एवढेच नव्हेतर राज्य उत्पादक शुल्क खाते व पोलीस खाते यांच्यामध्ये समन्वय नाही. राज्य उत्पादन शुल्क खात्याच्या अधिकाऱ्यांना शहरातील दारुच्या धंद्यांची माहिती नाही. तेथील स्थानिक पोलीस स्टेशनला ती माहिती असते. परंतु स्थानिक पोलीस स्टेशनच्या माध्यमातून हप्ते घेण्याचे प्रकार चालतात. म्हणून माझी विनंती आहे की, राज्य उत्पादन शुल्क खाते व पोलीस खाते यांच्यामध्ये समन्वय असला पाहिजे. ज्या पोलीस खात्याच्या हद्दीमध्ये अशाप्रकारचे धंदे सुरु आहेत त्या पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ निरीक्षकांवर कारवाई झाली पाहिजे. माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी महत्वाचा मुद्दा मांडला. केवळ ठाणे जिल्हयात नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात 30 हजार कुष्ठरोग्यांची वस्ती आहे. या सर्व कुष्ठरोग्यांचे प्रतिनिधी विधीमंडळाच्या बाहेर धरणे धरुन बसले आहेत. त्यांना पालक मंत्री भेटले आहेत. त्यांचे पूर्वीचे हातभट्टीचे धंदे पोलीसांनी बंद पाडले आहेत. माननीय उपमुख्यमंत्री व गृहमंत्री हे वरोरा येथे माननीय श्री. बाबा आमटे यांना भेटायला गेले त्यावेळी त्यांनी आश्वासन दिले आहे की, तुमचे आजचे मानधन अडीचशे रुपये आहे ते हजार रुपये केले जाईल. या विधेयकाच्या माध्यमातून विनंती करतो की, त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने त्यांचे मानधन वाढवून दिले पाहिजे. इतर राज्यांमध्ये मानधन जास्त दिले जाते. आपल्या राज्यामध्ये सुध्दा त्यासाठी तजवीज झाली पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी हे जे विधेयक आणले आहे त्याचे मी मनापासून समर्थन करीत आहे. मी फक्त एकच मुद्दा मांडू इच्छितो. दारु सेवन करणाऱ्यांना प्रतिबंध करण्यासाठी हा कायदा प्रभावी ठरणार आहे. अनेक माता-भगिणींचे उध्वस्त होणारे संसार आहेत ते वाचू शकणार आहेत. त्यापेक्षा सर्वात महत्वाची बाब अशी की, शहरी भागामध्ये ज्या ठिकाणी शाळा कॉलेजेस आहेत त्या परिसरात दारुची दुकाने सुरु आहेत. तुम्हाला त्या दुकानाकडून शुल्क मिळेल. परंतु शाळेच्या इमारतीमधून बाहेर पडल्याबरोबर समोर दारुचे दुकान पहायला मिळते. इतकेच नव्हे तर मी आपल्याला कल्याणचे उदाहरण सांगतो. इमारतीच्या तळमजल्यावर दारुचे दुकान आहे व वरच्या मजल्यावर कॉलेज आहे. अशी वाईट अवस्था आहे. त्यामुळे कोंबडी आधी की अंडे आधी. त्या इमारतीमध्ये कॉलेजला परवानगी आधी मिळाली की, दारुच्या दुकानाला परवानगी आधी मिळाली? दारुच्या दुकानाला आधी परवानगी मिळाली व त्यानंतर कॉलेजला परवानगी मिळाली काय? याच्या खोलात गेलो तर तो वादाचा विषय होईल. म्हणून हे टाळण्यासाठी मंत्रिमहोदयांनी याबाबत सहकार्य करावे अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ RJW/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 22:15

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी या बिलाचे समर्थन करण्यासाठी उभा आहे. माझ्या मनात एकच शंका आलेली आहे, त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये काकवीचा उल्लेख केलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रात गुऱ्हाळे चालतात आणि तेथील बहुतेक शेतकऱ्यांच्या घरामध्ये काकवी ठेवलेली असते. आमच्या कडेही घरामध्ये काकवी ठेवलेली असते. लहान मुलांना एक चमचा काकवी दिली जाते. तेव्हा शेतकऱ्यांनी आपल्या घरामध्ये जर काकवी ठेवली तर त्यांना अटक वगैरे केली जाणार आहे का ? या कायद्यानुसार तो शिक्षेस पात्र ठरणार आहे का ? याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

. . . .5 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक (उत्पादन शुल्क मंत्री) : सभापती महोदय, एकंदरीत सर्वच सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाचे कायद्यात रुपांतर करीत असताना अतिशय मनापासून स्वागत केले आहे. सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी मुंबईतील दारुभट्टयांच्या संबंधात विषय मांडला. तसेच परप्रांतातून येणाऱ्या दारुचा विषय उपस्थित केला. भविष्य काळामध्ये गोवा, मध्य प्रदेश, गुजराथच्या बॉर्डर सील करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे शासन पावले टाकेल. तसेच सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी असा मुद्दा मांडला की, रेल्वेतून जात असताना सायन,चुनाभट्टी दारुच्या भट्टया सुरु असल्याचे दिसतात. मी त्यांना सांगू इच्छितो की, हा भूतकाळ झ ाला. आता वर्तमान काळामध्ये तेथे अशाप्रकारे भट्टया सुरु नाहीत. पण जर असतील आणि जे कोणी अशा गोष्टी करीत असतील तर त्याचा बंदोबस्त करण्याच्या बाबतीत मी तुम्हाला वचन देतो.

सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी आणखी एक मुद्दा मांडला की, माननीय केंद्रीय गृहमंत्री श्री.शिवराज पाटील यांच्या नावाने दारुचे लायसन्स काढलेले आहे. पण या नावाच्या अनेक व्यक्ती असू शकतात. त्याठिकाणी केंद्रीय मंत्री किंवा गृहमंत्री असा काही त्यावर उल्लेख नव्हता, त्यामुळे त्या व्यक्तीला लायसन्स नाकारण्याचा प्रश्न आला नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, आदिवासी भागात जातो, तेव्हा त्यांच्या घरात दारु असल्याचे दिसून येते. पण आदिवासींना 25 कि.मोहाची दारु बनविण्याची परवानगी आहे. त्यामुळे त्यांना याबाबतीत सलवत आहे,दुसऱ्यांना नाही. दारुच्या प्रश्नामध्ये स्त्रियांचा निश्चितपणे सहभाग आहे कारण दारुमुळे संसार उध्वस्त होतात, मुलाबाळांचे हाल होतात, अशा प्रकारे घरात सर्वांवर याचे परिणाम होतात. त्यामुळे या विषयावरील चर्चेमध्ये स्त्रियांचा सहभाग असू नये अशी जर कोणाची इच्छा असेल तर ती योग्य नाही. या विषयाच्या संदर्भात महिला सदस्यांना प्राधान्याने बोलावयास दिले पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी भ्रष्टाचाराबद्दल सांगितले. 100 टक्के भ्रष्टाचार संपलेला आहे असा कोणी दावा करणार नाही. राज्याच्या कानाकोपऱ्यामध्ये, वस्ती, वाडीवर कोणी आपल्यापुरती दारु बनवतही असेल, मी नाकारणार नाही. पण ही बाब निश्चितपणे गंभीर आहे. असे प्रकार लक्षात आणून दिले तर त्याला पायबंद केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी कुष्ठ रोग्यांच्या संदर्भात विषय मांडला. कायदा सर्वांसाठी लागू आहे मग तो कोणीही असो, अपंग,दलित किंवा सवर्ण असो या सर्वांनी हा कायदा लागू आहे. सध्या या लोकांना जी मदत मिळते ती दुप्पट करण्याचा आमचा विचार आहे. त्यांच्या

. . . .5 वाय-3



APR/ D/ RJW/ 22:15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक . . . .

मुलांबाळांना त्यांच्या व्यवसायात मदत करता येणार असेल तर शासन निश्चितपणे करणार आहे. मला ठाणे जिल्हयातील कुष्ठरोग्यांचे शिष्टमंडळ भेटले होते. मी त्यांना सांगितले की, तुमच्यावर हा प्रसंग आला, हा काही तुमचा दोष नाही. कुष्ठरोग व्हावा अशी कोणाचीही इच्छा नसते, ती कोणाच्या हातातील बाब नाही. पण आज समाजामध्ये अशी स्थिती आहे की, त्यांच्या हातातून काही गोष्ट घेण्यास लोक तयार नसतात. कुष्ठरोग्यांशी जवळीक साधा असे भाषणातून सांगितले जात असेल तरी व्यक्तीगत जीवनात लोक कुष्ठरोग्यांपासून दूर राहण्याचाच प्रयत्न करता. कुष्ठ रोग्यांच्या वारसांना चांगल्या प्रकारे जगता यावे यासाठी त्यांना मदत करण्याच्या दृष्टीने शासन त्यांच्या पाठीशी उभे राहणार आहे. सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी या बिलावर बोलत असताना यामध्ये "तडजोड" हा जो शब्द आलेला आहे, त्याचा उल्लेख केला.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ RJW/ पूर्वी सौ.रणदिवे... 22:20

श्री.गणेश नाईक (पुढे चालू...

सर्वच केसेस न्यायालयामध्ये गेलेल्या आहेत. त्यांचा निकाल लागेपर्यन्त बऱ्याचशा गोष्टींचा फडशा पडलेला असतो. या गुन्ह्यामध्ये दंडात्मक शिक्षा द्यावयाची आहे. डॉ.दीपक सावंत यांनी आदिवासींना मोहाची फुले गोळा करण्यास बंदी करणार आहात काय या संबंधातील उल्लेख केला. यासंबंधाने आदिवासींना कोणी त्रास देणार नाही. या संबंधाने कायद्याचा वापर करुन त्यांना कोणी त्रास देत असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कलमामध्ये तरतूद केलेली आहे. अशी सदस्यांकडे काही उदाहरणे असतील तर त्याबाबतची माहिती त्यांनी जरुर द्यावी त्याबाबत त्या अधिकाऱ्यांवर ताबडतोब कारवाई करण्यात येईल. तशी त्यांना शिक्षा करण्याची तरतूद आहे. पोलीस खाते आणि उत्पादन शुल्क विभाग यांचा समन्वय असला पाहिजे. कारण काही गोष्टींना पायबंद घालण्याच्यादृष्टीने एकत्र आणलेले आहे. आज 2100 कोटीचे उत्पन्न मिळते ते साधरणत: 2800 कोटीपर्यन्त जाईल असा विश्वास आहे. दारुतून मिळणारे उत्पन्न मोठयाप्रमाणात आहे. खरे तर ही कौतुकाची बाब नाही. पण उत्पन्नामध्ये वाढ झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.मोते साहेबांनी कॉलेजच्या प्रांगणाच्या शेजारी दारुचे दुकान आहे असे सांगिले. दारुचे दुकान अगोदर असेल आणि कॉलेज नंतर झालेले असेल तर त्या कॉलेजला कशी परवानगी दिली, हा त्या विभागाने विचार केला पाहिजे. परंतु नंतर जर दुकान झालेले असेल तर ते बंद करण्याबाबतची कारवाई करण्यात येईल. आज जे दारु विक्री करणारे स्टॉकिस्ट आहेत त्यांना पायबंद घातलेला नाही. परंतु त्या ठिकाणी दारु पिण्याचे दुकान असेल तर ते बंद करण्याची कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी काकवीच्या संबंधाने प्रश्न उपस्थित केला. शेवटी प्रश्न असा आहे की, गुळ जर आपण उन्हामध्ये ठेवला तर त्याचे अल्कोहोलमध्ये रुपांतर होते. तेव्हा अशाप्रकारची काकवी घरामध्ये ठेवणे हा गुन्हा आहे. अफू एक ग्रॅम ठेवली काय किंवा एक किलो ठेवली काय ? त्याचे परिणाम हे होणारच आहेत. म्हणून या गोष्टीला परवानगी नाही.. सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट साहेबांनी दारुबंदी कायद्याच्या टायटलबाबत सांगितले. दारुबंदी कायदा 1995 चा आहे. त्याला अनुसरुन हे विधेयक आणलेले आहे, ते चुकीचे नाही. आपण 1949 आणि 1963 दारु बंदीला सुरुवात केली. त्यामुळे दारुबंदी कायद्याचे जे टायटल आहे ते बरोबर आहे. 25 डिसेंबर आणि 31 डिसेंबर या दिवशी दारु विक्री बंद केलेली आहे 31 डिसेंबरला पोलीस यंत्रणा आणि राज्य उत्पादन शुल्कचे कर्मचारी हे सत्वर दारु विक्री होणार नाही हे पहाणार आहेत. सार्वजनिक ठिकाणी दारु पिता येणार नाही, रस्त्यावर दारु पिता येणार नाही,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ RJW/

श्री.गणेश नाईक (पुढे सुरु......

अशी मूळ कायद्यामध्येच अमेंटमेट केलेली आहे. म्हणून भविष्य काळामध्ये दारुचे प्रमाण कमी कसे होईल हे पाहिले जाईल. ड्रायव्हींग करताना दारु पिऊन गाडी चालविणे हा गुन्हा ठरविलेला आहे. भविष्यकाळामध्ये दारु पिऊन ड्रायव्हींग कोणी करणार नाही याची दक्षता घेतली जाईल, तेव्हा हे विधेयक सभागृहाने मंजूर करावे, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी ): विधेयक विचारात घेण्यात आले आहे आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 38 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. गणेश नाईक :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 81 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून एकमताने संमत झाला.

**तालिका सभापती** :सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 81 संमत झाले आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**पुढील कामकाजासंबंधी**</u>

**तालिका सभापती** : यानंतरची अल्पकालीन चर्चा उद्या ठेवण्यात आली आहे. त्यामुळे आता पाच अर्धा-तास चर्चा घ्यावयाच्या काय?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, या अर्धा-तास चर्चा उद्या घेण्यात याव्यात.

**तालिका सभापती** :आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चा उद्या घेणे शक्य होणार नाही. पण आपण त्या गुरुवारी घेऊ शकतो.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, गुरुवारी घेण्यात येणा-या अर्धा-तास चर्चा आणि आजच्या आर्धा-तास चर्चा या दोन्ही अर्धा-तास सूचना गुरुवारी घेण्यात येणार असतील तर आमची त्याला हरकत नाही.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या अर्धा-तास सूचना आजच घेण्यात याव्यात.

श्री. मधुकर चव्हाण : ठीक आहे. आजच्या अर्धा-तास सूचना आजच घेण्यात याव्यात.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, गुरुवारी सुध्दा बरेचेसे कामकाज आहे. आणि आज अर्धा-तास चर्चा उपस्थित करणारे सदस्य आणि त्या अर्धा-तास चर्चेला उत्तर देणारे मंत्रिमहोदयही उपस्थित आहेत. तेव्हा माझी विनंती आहे की, आताच या अर्धा-तास सूचना घेण्यात याव्यात.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, एक तर अधिवेशनाचा कालावधी जबरदस्तीने दोन आठवडयाचा केला आहे. आपण तीन आठवडे अधिवेशन घेत नाही. त्यामुळे आम्हाला रात्री 12.00 वाजेपर्यंत या ठिकाणी बसावे लागते.

**तालिका सभापती** :अधिवेशन तीन आठवडे घ्यावयाचे नाही हे अद्याप जाहीर झालेले नसल्यामुळे आपण त्याबद्दल कसे काय सांगत आहात?

श्री. विलास अवचट : सभापती महोदया, अर्धा-तास चर्चेला सुरुवात करण्यात यावी.

**तालिका सभापती** :याबाबतीत संसदीय कार्य मंत्र्यांचे काय म्हणणे आहे?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, मी मघाशी विनंती केली आहे की, आजच्या अर्धा-तास चर्चा आता घेण्यात याव्यात. अर्धा-तास चर्चा उपस्थित करणारे सदस्य आणि त्या अर्धा-तास चर्चेला उत्तर देणारे मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे अर्धा-तास चर्चा आता घेण्यात याव्यात.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अर्धा-तास चर्चा**

**पृ.शी.**: मुंबईत पावसाळयामध्ये रस्ते व रेल्वे चालू रहाव्यात यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबत.

**मु.शी.**: मुंबईत पावसाळयामध्ये रस्ते व रेल्वे चालू रहाव्यात यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्र.6376 ला दिनांक 27 जुलै, 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, नितीन गडकरी, श्रीमती कांता नलावडे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मुंबईत पावसाळयामध्ये रस्ते व रेल्वे चालू रहाव्यात यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबत." या विषयावरील तारांकित प्रश्न क्र. 6376 ला दिनांक 27 जुलै, 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदया, मुंबई शहरात पावसाळयामध्ये समुद्राला येणाऱ्या भरतीमुळे एका विशिष्ट दिवशी रस्ते ठप्प होत असतात. साधारणत: 21 ते 26 जून, 21 ते 30 जुलै, 10 ते 23 ऑगस्ट आणि 17 ते 21 सप्टेंबर या विशिष्ट दिवशी समुद्राला भरती येते त्यामुळे पाण्याची पातळी नेहमीपेक्षा साडेचार मीटर्सने वाढते असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. त्या काळात अतिवृष्टी झाल्यास मुंबई जलमय होते. त्याचप्रमाणे 26 जुलै, 2005 रोजी देखील मुंबई संपूर्ण जलमय झाली होती. त्यावेळी शासनाचा कोणत्याही प्रकारे संबंधितांशी समन्वय नव्हता, कोणतीही आपत्कालीन योजना तयार नव्हती, त्यामुळे प्रचंड वित्त हानी झाली. अशी पूर परिस्थिती दरवर्षी निर्माण झाली तर अशा आपत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने काही ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. आपल्या लक्षात असेलच की, मुंबईत जुलै महिन्यात जो हाहा:कार झाला, या अतिवृष्टीसंदर्भात आपण अडीच तासाची सविस्तर चर्चा ठेवलेलीच असल्यामुळे मी फक्त थोडक्यात उल्लेख करणार आहे. साधारणपणे या अतिवृष्टीमुळे रेल्वे ट्रॅक्सचे 90 कोटीचे नुकसान झाले आहे. तसेच 951 रस्ते या काळात उद्ध्वस्त झालेले आपल्याला पहावयास मिळतील. साधारणपणे या काळात जनतेला अनेक प्रकारच्या अडी-अडचणींना मुंबई शहरात तोंड द्यावे लागले. मुंबईच्या

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

विकासासाठी जो प्लॅन तयार केला, जे डी.सी. रुल्स तयार करण्यात आले त्यामध्ये अशा आपत्कालीन परिस्थितीमुळे वाहतूक नियमित व्हावी, फायर ब्रिगेडचे बंब तसेच अग्निशमनच्या गाडयांना वाहतूक करता यावी, ॲम्बुलन्सची वाहतूक सुरळीतपणे करता येऊ शकेल म्हणून विकास आराखडयात काही प्लॉट्स राखून ठेवण्यात आले होते. पण या मुंबई शहरावर कुठलेही संकट आले की त्यावर मार्ग काढता येईल. मुळात हे एक बेट आहे आणि या बेटाची क्षमता फक्त 50 ते 60 लाख लोक राहू शकतील एवढीच आहे, परंतु सध्याच्या परिस्थितीत या मुंबई बेटावर जवळपास सव्वा कोटी एवढी लोकसंख्या वास्तव्य करीत आहे. ज्या दिवशी 26 जुलै, 2005 रोजी मोठया प्रमाणात पाऊस पडला, नैसर्गिक आपत्ती आली, गेल्या 100 वर्षात सुध्दा अशा प्रकारची आपत्ती आलेली नसेल एवढा पाऊस पडला त्यापुर्वी म्हणजे 19 जुलै रोजी ज्यावेळी हा प्रश्न विचारला होता की, अशा प्रकारच्या आपत्कालीन परिस्थतीमध्ये महापालिकेची बेस्ट सेवा, रेल्वेने कोणता कृती आराखडा तयार केलेला आहे यासंबंधीचे उत्तर असे देण्यात आले होते की, याबाबत आम्ही समन्वय साधत आहोत आणि अशा आपत्कालीन परिस्थितीमध्ये, अशी स्थिती निर्माण झाली तर मुंबईमध्ये जिवीत व वित्तहानी होऊ नये म्हणून शासन काळजी घेईल. शासनाने यासंदर्भात दोन समित्या नेमल्या आहेत. एक चितळे समिती आणि दुसरी समिती एमएमआरडीए तर्फे जे रिटायर्ड बांधकाम सचिव आहेत ते एन.व्ही.मेरानी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी मा. तालिका सभापती श्री. विलास अवचट )**

श्री. मधुकर चव्हाण .....

मुंबई शहरातील जे काही रस्ते आहेत ते समतोल नाहीत. तसेच या रस्त्यामध्ये मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे 26 जुलैला जेव्हा अतिवृष्टी झाली त्यावेळेस लोक पुरुष-पुरुषभर पाण्यात होते, 24-24 तास उपनगरीय गाडयामध्ये होते, खाजगी गाडयांमध्ये आणि ट्रॅकवरुन चालत होते. रस्ता कोठे आहे आणि गटार कोठे आहे हे लोकांना समजत नसल्यामुळे अनेक लोक या पाण्यातून वाहून गेले. त्यामुळे मुंबई शहरामध्ये हजारो माणसे मेली, शेकडो माणसे जखमी झाली, कोटयावधी रुपयांची वित्त हानी झाली. या आपत्तीमध्ये शासनाला कोणत्याही प्रकारची उपाययोजना करता आलेली नाही. विशेषत: विकास आराखडयात डोळयात तेल घालून त्यावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता होती. मुंबई डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये 40 फूट, 60 फूटाचे रस्ते व्हावयास पाहिजेत परंतु तशा प्रकारचे रस्ते तयार झालेले नाहीत. मुंबईतील रस्ते समतोल नसल्यामुळे आणि मोठया प्रमाणात खड्डे असल्यामुळे ज्या ज्या ठिकाणी पाणी साचण्याची शक्यता होती त्या त्या ठिकाणी पाणी साचले होते. बस टर्मिनल, ओपन जागेत पाणी साचले त्यामुळे मुंबई शहरातील नागरिकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. अशा भयावह परिस्थितीमध्ये दोन तीन दिवस शासकीय यंत्रणा काम करु शकली नाही. 26 जुलै, 2005 रोजी ज्या प्रकारची परिस्थिती उद्भवली तशा प्रकारची परिस्थिती पुढील काळात निर्माण झाली तर त्यावेळेस कमीत कमी वित्तहानी आणि प्राणहानी होईल, नागरिकांचे संरक्षण करता येईल यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे? अशा त-हेची उपाययोजना केली नसेल तर ती कधी केली जाणार आहे? एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------------

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या ठिकाणी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी मुंबईतील एका महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. प्री -मान्सूनमध्ये पावसाळयाची पूर्व तयारी कशी करावी आणि मुंबईत पावसाळयाच्या वेळी कशी तयारी केली जाते याबाबतीत मी या ठिकाणी माहिती देणार आहे. त्याच बरोबर असेही लक्षात आलेले आहे की, 21 ते 26 जून 10 ते 13 ऑगस्ट, 21 ते 25 जुलै आणि 17 ते 21 सप्टेंबर या काळात मोठया प्रमाणात समुद्राला भरती येत असते व परिणामी समुद्राच्या पाण्याची पातळी मोठया प्रमाणात वाढत असते. 26 जुलै, 2005 रोजी मुंबईत 1000 मि.मि. पाऊस पडल्यानंतर काय परिस्थिती निर्माण झाली याची आपल्या सर्वांना कल्पना आहेच. परंतु असा प्रकार पुन्हा घडला तर मागच्या परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी शासनाने ज्या काही उपाययोजना केलेल्या आहेत त्या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये 24 विभागात कार्यालये आहेत. . या 24 विभागामध्ये पावसावर नियंत्रण करण्यासाठी कंट्रोल रुम अस्तित्वात आहेत. तसेच एक पर्जन्य जल वाहिनी असून त्यामध्ये 24 तास काम केले जाते. भरतीची बारकाईने विशेष काळजी घेण्याच्या दृष्टीकोनातून सर्व यंत्रणांना सूचना करण्यात येतात. तसेच नियंत्रण कक्षामध्ये बिनतारी उपकरणे, दूरध्वनी उपकरणांची सर्व व्यवस्था करण्यात आलेली आहे. जास्त पाऊस झाल्यानंतर ज्या काही ठिकाणी खोलगट भाग आहे ते आयडेंटीफाय करुन त्या ठिकाणी जर पाणी साचले तर ते पाणी त्वरित बाहेर काढले जावे यासाठी 10 पंप सेट्सची कायमस्वरुपी व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच 10 मोबाईल व्हॅनमध्ये पंपसेट बसवून पाणी काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जातो. मुंबईतील मिलन सबवे हा खोलगट भाग आहे. त्या ठिकाणी मोठया प्रमाणात पाणी साचत असल्यामुळे त्या ठिकाणी लोखंडी पूलाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. जेणेकरुन त्याचा ट्रॅफिकवर ताण पडणार नाही. ही सर्व व्यवस्था प्रीमान्सूनच्या दृष्टीकोनातून करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

त्याच बरोबर 26 जुलै 2005 रोजी मुंबईने अतिवृष्टीमुळे जी परिस्थिती अनुभवली आहे, त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून चितळे समिती व मिठी नदी प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. मिठी नदी ही मुंबईच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. या प्राधिकरणाच्या माध्यमातून हायड्रॉलॉजिक स्टडी व कॅचमेंट एरियाचे व्यवस्थापन करण्यासह अन्य काम या प्राधिकरणाच्या माध्यमातून होत आहे. यासंबंधीचा आय.आय.टी. आणि पुण्याच्या संस्थेचा अहवाल आल्यानंतर शासनातर्फे सर्वोतोपरी कारवाई केली जाणार आहे. जेणेकरून 26 जुलैचा अनुभव पुन्हा मुंबईला येता कामा नये. रेल्वेसेवा विस्कळीत होऊ म्हणून पश्चिम रेल्वेचे 58 आणि मध्य रेल्वेचे 56 कन्व्हर्ट स्वच्छ करण्याची कारवाई केली जात आहे. आपत्कालीन व्यवस्थेमध्ये सगळया गोष्टी करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जेवढे प्रश्न उपस्थित केले होते त्यांना उत्तरे देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

**तालिका सभापती** : अर्धा तास चर्चा संपली.

---------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील अशासकीय माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात न करणेबाबत.

**मु.शी.**: राज्यातील अशासकीय माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात न करणेबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 5860 ला दिनांक 19 जुलै 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रा.शरद पाटील, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, "राज्यातील अशासकीय माध्यमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात न करणेबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 5860 ला दिनांक 19 जुलै 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

"राज्यातील अशासकीय माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपान न करणेबाबत" महाराष्ट्र शासनाने अलीकडे जो नवा आकृतिबंध लागू करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर काम करणाऱ्या हजारो शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळण्याची शक्यता निर्माण झाली. त्याच्याशी हा विषय संबंधित आहे. खरे पाहिले तर मंत्रिमहादयांनी तो आदेश मागे घेतल्याचा निर्णय जाहीर केलेला आहे म्हणून मी आभार मानतो. यापूर्वी शासनाने अशाच प्रकारचा आकृतिबंध लागू करण्याचे स्थगित केले होते. त्याची पुनरावृत्ती होऊ म्हणून अर्धा तास चर्चा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला आहे. सन 1994 मध्ये चिपळूणकर समितीने आकृतिबंधाची शिफारस केली. शासनाने ती मान्य केली. त्यानुसार माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती सुरू झाली. सन 2000 साली शासनाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवर बंदी आणली. नंतरच्या काळामध्ये केवळ अनुशेषांतर्गत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती चालू राहिली आणि आता सन 2003 मध्ये शासनाने आकृतिबंध रद्द करून नवा आकृतिबंध आणला. त्याचा अंमल होण्यापूर्वी शिक्षकेतर कर्मचारी क्षेत्रातून मोठया प्रमाणावर वाद झाल्यामुळे स्थगिती दिली. दोन वर्षाने शासनाने पुन्हा हा आकृतिबंध लागू करण्याचा प्रयत्न केला. शासनाचा निर्णय ज्या दिवशी जाहीर झाला त्या दिवशी विविध संघटनांनी निदर्शने केली. 2 दिवसांपूर्वी प्रचंड असा मोर्चा संबंधित घटकांनी आणला होता. मंत्रिमहोदयांनी या असंतोषाची दखल घेऊन निर्णय घेतला व त्यासंबंधीची घोषणा देखील केली.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील....

मी याठिकाणी मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, हा जो आदेश आहे तो आपण कायम स्वरुपी निकाली काढणार आहात काय ? जो नवा आकृतिबंध लागू करण्याचा प्रयत्न केला होता तो आकृतिबंध भविष्यात लागू करावयाचा असेल तर किमान संबंधित घटकांशी चर्चा करुन व्यवहार्य अशा स्वरुपाचा नवा प्रस्ताव विचारात घेऊन नंतर शासन निर्णय घेणार आहे का ? एवढे बोलून मी माझे दोन शब्द पुरे करतो.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, चिपळूण समिती आणि कोकणी समितीने केलेल्या शिफारशी या दोन्ही समित्यांचा सुवर्णमध्य साधावा म्हणून स्कूल कोडचा आधार घेऊन आपण सर्व पदे मंजूर केली होती. आपण पदे कमी केली नाहीत. पण शिक्षक प्रतिनिधींच्या म्हणण्यानुसार हजारो पदे कमी होत आहेत अशाप्रकारचा रोष प्रगट झाला. म्हणून आम्ही असा निर्णय घेतला की, एस.एस.कोड हा बेस गृहीत धरुन आणि खूप पदे कमी होणार नाहीत हे गृहीत धरुन जी.आर.काढला. लेब्रॉयटरी आणि लायब्ररी हे सुध्दा शिक्षण संस्थेचे मूलभूत घटक आहेत. त्याला सुध्दा आम्ही महत्व देण्याचा प्रयत्न केलेला आहे. काल मी मोर्चाला सामोरे गेलो त्यावेळी त्यांच्या भावना लक्षात घेऊन आम्ही तो जी.आर.तूर्त रद्द केला आहे. ज्यावेळी आपण जी.आर.नव्याने आणू त्यावेळी शिक्षण संस्थाचालक, काही शिक्षण तज्ज्ञ आणि काही जाणकार मंडळी यांच्यासोबत चर्चा करुनच निर्णय घेऊ अशाप्रकारचे निवेदन मी काल सभागृहात केले होते. वारंवार अशाप्रकारचे जी.आर.रद्द करणे आणि पुन: निर्गमित करणे ही शोभनीय बाब नाही. चिपळूणकर समितीने सूचित केलेली सगळीच पदे भरली जावीत अशाप्रकारची आग्रही भूमिका कृपया बाळगू नका. श्री.जयंत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे आताच्या संगणकीकरणाच्या आणि ऑटोमायझेशनच्या युगामध्ये खूप पदे भरली जावीत. सर्वसामान्य लोकांना नोकरी मिळणे हे तर स्वागतार्ह आहे. पण अतिरिक्त पदे असता कामा नये. म्हणून साकल्याने विचार करुन नवीन जी.आर.निर्गमित करु. आपण हे सर्व करीत असताना नियोजन आणि वित्त विभागाकडे गेलो तर प्रचंड कालापव्यय होतो. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण हा आकृतिबंध स्वीकृत करावा. त्यानंतर जी काही राहिलेली पदे असतील त्यासंबंधी नव्याने चर्चा करुन पुन्हा नियोजन आणि वित्तगाकडे जाऊ अशी माझी विनंती आहे. पण आपण ती मान्य केली नाही. त्यामुळे हा जी.आर.तूर्त रद्द केलेला आहे. यावर पुन्हा चर्चा करुन निर्णय घेऊ.

---------------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 1994 मध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात चिपळूणकर समितीचा अहवाल आला. खरे म्हणजे् शिक्षण संचालक श्री.चिपळूणकर यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कामांचा आढावा घेऊन, त्यांची माहिती गोळा करुन अत्यंत काळजीपूर्वक हा अहवाल दिला होता. शाळेमध्ये पदे कशी पध्दतीने निश्चित करावीत याचा पॅटर्न दिला होता. 1994 साली हा पॅटर्न स्वीकारल्यानंतर दरवर्षी टप्प्या टप्प्याने पदे भरण्याचा शासनाने निर्णय घेतला. पण ही सर्व पदे भरण्याच्या आतच शासनाने चिपळूणकर समितीचा अहवाल रद्द केला आणि दिनांक 21 नोव्हेंबर 2003 रोजी नवीन जी.आर.काढला. त्या जी.आर.ला विरोध झाला म्हणून तो जी.आर.रद्द झाला. हे प्रकरण गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. त्यामुळे सन 2000 पासून माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरण्यात आली नाहीत. मागील सर्व जी.आर.अतिक्रमित करुन आता जो 21 नोव्हेंबरला जी.आर.काढला होता तो जी.आर.रद्द झालेला आहे. याचा अर्थ या संदर्भातील सर्व सगळे आदेश रद्द झालेले आहेत. आता कोणता पॅटर्न लागू आहे ? एक तर चिपळूणकर समितीचा किंवा एस.एस.कोडचा पॅटर्न लागू आहे. पण एस.एस.कोड.ची तरतूद अतिक्रमित करुन चिपळूणकर समितीचा अहवाल आणला होता. आजची परिस्थिती अशी आहे की, आज चिपळूणकर समितीचा अहवाल लागू आहे. माझा दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, सन 2000 पासून नेमणुका झ ालेल्या नाहीत. प्रा.शरद पाटील यांनी याठिकाणी उल्लेख केला की, मागासवर्गीयाचा अनुशेष भरण्याच्या आधारे काही पदे भरावीत. काही जिल्ह्यामध्ये आदेश नसताना चुकीच्या पध्दतीने भरती करण्यात आली. परंतु नंतर शासनाने त्याचे क्लॅरिफीकेशन केलेले आहे की आम्ही त्यांना परवानगी दिलेली नाही.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

परंतु काही ठिकाणी नेमणूका झाल्या, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मान्यता मिळाली. परंतु जून-2000 पासून शासनाने शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरतीवर बंदी आणली, परिणामी भरती होऊ शकली नाही. अनुकंपातत्वावर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना, पत्नीला नोकरीमध्ये सामावून घेणे आवश्यक होते. परंतु त्यांना सेवेमध्ये सामावून घेतलेले नाही. त्यामुळे अनुकंपातत्वावरील बॅकलॉग शिल्लक आहे. अनुकंपातत्वावर नोकरी मिळण्यास जे इच्छुक आहेत त्यांचे कुटुंबिय नोकरी न मिळाल्यामुळे उध्वस्त झालेले आहे. 25 नोव्हेंबरचा आदेश आपण जरी रद्द केला असला तरी, किमान अनुकंपातत्वावरील भरतीप्रक्रिया सुरु करण्यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदय आदेश देतील काय ?

**तालिका सभापती** : मला वाटते सन्माननीय सदस्य व प्रा.शरद पाटील या दोघांच्याही प्रश्नांवर आपण एकत्रित उत्तर द्यावे. त्यामुळे आता प्रा.शरद पाटील आपण प्रश्न विचारावा.

प्रा.शरद पाटील : नव्या प्रस्तावामध्ये प्रत्येक शाळेला एक पूर्णवेळ ग्रंथपाल मिळावा अशी तरतूद आहे. शिक्षक किंवा क्लार्क ही पदे जरी कमी करीत असला तरी, शालेय दृष्टिकोनातून विचार करुन, निदान ग्रंथपालाचे पद तरी असावे अशी मी सूचना करीत आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांना मी सांगू इच्छितो की, मी मान्य केले आहे की, या दोन्हीही पध्दतींचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. मला याबाबतची पूर्ण कल्पना क्लिअर नाही. त्यामुळे आपण समोरासमोर बसून याबाबत योग्य तो निर्णय घेऊ. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अनुकंपातत्वावर सामावून घेण्याबाबत मुद्दा मांडला. या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, जी स्थायी स्वरुपातील पदे होती त्याच पदांपैकी जर कोणी दिवंगत झाले असेल किंवा कोणाला अपंगत्व आले असेल तर त्याबाबत सहानुभूतीने विचार करता येईल. त्यासाठी आपल्याला समोरासमोर बसावे लागेल व नंतर निर्णय घ्यावा लागणार आहे. अनुकंप आणि आरक्षण या दोन निरनिराळया बाबी आहेत.

--------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: आदिवासी भागातील मृत्यू.

**मु.शी.**: आदिवासी भागातील मृत्यू या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9429 ला दिनांक 6 डिसेंबर, 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ.अशोक मोडक वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, "आदिवासी भागातील मृत्यू" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9429 ला दिनांक 6 डिसेंबर, 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

महोदय, दिनांक 6 डिसेंबर, 2005 रोजी या सदनामध्ये वरील विषयासंदर्भात प्रश्न उपस्थित झाला होता. ती सर्व माहिती चर्चेच्या नव्हेतर पुस्तकाच्या रुपाने आलेली आहे. त्या चर्चेचा विषय "आदिवासी भागातील बालमृत्यू" हा आहे. विशेषत: प्रश्नाच्या उत्तराचा आपण अभ्यास केला तर, स्वयंसेवी संघटनांच्या सहभागातून कुपोषणाचे आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करता येईल काय ? या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही असे दुर्दैवाने दिसते. त्यामुळेच मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे.

सातपुडयानंतर महाराष्ट्रातील वेगवेगळया ठिकाणी विशेषत: आदिवासी भागामध्ये आजही दुर्दैवाने मोठया प्रमाणावर कुपोषण आणि बालमृत्यू होत आहेत. बंग समितीचा अहवाल आपल्यासमोर आहे. विधानपरिषद आश्वासन समितीच्या माध्यमातून आम्ही आरोग्य सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी केवळ सरकारी यंत्रणेवर विसंबून राहून महाराष्ट्रातील कुपोषण आणि बालमृत्यूचे वाढते प्रमाण रोखता येईल काय ? हा प्रश्न आम्ही उपस्थित केला होता. नसेल तर स्वयंसेवी संघटनेबद्दल तुमचे धोरण सांगा असे विचारले होते. महोदय, या स्वयंसेवी संघटनेचे महत्व अनन्यसाधारण आहे. नाशिक जिल्हयामध्ये त्र्यंबकेश्वर परिसरात आणि आदिवासी पट्टयात वनवासी कल्याण आश्रम आणि आयुर्वेद व्यासपीठ या संस्थांनी मुलांना राजगिऱ्याचे लाडू वाटले. त्यामुळे मुलांचे वजन आणि रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढले.

नंतर श्री.गायकवाड....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक ..

राजगि-याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदय अधिकारवाणीने सांगू शकतील. या राजगि-यामध्ये लोह आणि कॅल्शियम हे घटक असल्यामुळे बलवर्धक असा पैलू त्या राजगि-यामध्ये असतो.राजगिरा हा पचण्यास हलका असून त्याची किंमतही कमी आहे.आदिवासी पट्टयामध्ये आणि गरीब वस्त्यामध्ये राजगि-याचे लाडू जर वाटले तर काय होऊ शकते याचे उदाहरण मला आपल्या समोर प्रस्तुत करावयाचे आहे.वनवासी कल्याण आश्रमशाळेने यासबंधीच्या आर्थिक बोज्याची काळजी घेतली आहे तर आयुर्वेद व्यासपीठाने कार्यकर्ते दिले आहेत आणि नाशिक जिल्हयातील इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर या तालुक्यामध्ये वनवासी पाडयांवर, त्याचप्रमाणे नंदूरबार जिल्हयातील वनवासी पाडयांवर 50 हजार राजगि-यांच्या लाडूंचे वाटप केले होते.या लाडूंचे वाटप करण्यापूर्वी बालकांची वजने नोंदविण्यात आली होती. त्याचबरोबर एक महिन्यानंतर पुन्हा बालकांची वजने नोंदविण्यात आली होती. ही आकडेवारी पाहिल्यानंतर एक महिन्यानंतर प्रत्येक बालकाचे 300 ते 350 ग्रॅम वजन वाढलेले आहे. एका बालकास 11 ग्रॅम वजनाचा लाडू देण्यात आला होता.ज्याप्रमाणें लहान मुलांना हे लाडू देण्यात आले होते. त्याचप्रमाणे गरोदर महिलांनासुध्दा ते देण्यात आले होते.ही माहिती मी आपल्याला यासाठी सांगत आहे की त्या संस्थांनी अशा प्रकारे प्रयोग करुन काही निष्कर्ष काढून या बाबतीत काही विधायक कार्य केलेले असेल तर सरकारच्या वतीने त्यांना चर्चेसाठी पाचारण करण्यात येणार आहे काय ? त्यांच्या सहयोगाची आपण काही मदत घेणार आहात काय ?यानंतर मला दुसरा एक मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे.ठाणे जिल्हयात प्रगती प्रतिष्ठान नावाची एक संस्था आहे या संस्थेने जव्हारमध्ये आपले चांगले बस्थान बसवले आहे. खास करुन ज्या ठिकाणी जमिनीला ओल असते त्या ठिकाणी जन्माला आलेल्या नवजात बालकाला ठेवले जाते.त्यातून ते बालक लवकर मरण पावते तेव्हा या प्रगती प्रतिष्ठान संस्थेने अनेक बालके दत्तक घेतलेली आहेत. विशेषत:नवजात बालकाला पहिली सहा महिने जर आपण चांगली ट्रिटमेन्ट दिली त्याची चांगल्या प्रकारे शुश्रुषा केली तर ते मूल इनफॅन्ट मॉर्टिलीटीपासून स्वत:चा बचाव चांगल्या प्रकारे करु शकते.वनवासी कल्याण आश्रम, आयुर्वेद व्यासपीठ आणि प्रगती प्रतिष्ठान यांनी जे प्रयोग केलेले आहेत ते प्रयोग महत्वाचे असल्यामुळे महाराष्ट्रातील कुपोषणाचे आणि बालमृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी या संस्थांचे सहकार्य शासन घेणार आहे काय असा प्रश्न मी माननीय मत्रिमहोदयांना विचारुन माझे भाषण संपवितो.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ): सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे त्याचे उत्तर देण्याकरता मी या ठिकाणी उभा आहे. सभापती महोदय ही गोष्ट खरी आहे की, महाराष्ट्रात बालमृत्यू झालेले आहेत. परंतु त्यांच्या मृत्यूचे कारण केवळ कुपोषण हे नाही. त्यांच्या मृत्यूचे कारण वेगळे आहे हे सन्माननीय सदस्यांना माहीत आहेच. प्रि मॅच्युअरिटी,हायपरथेमिया या कारणामुळे बालमृत्यू होत असतात 2004-2005 मध्ये आदिवासी भागात 8 हजार बालमृत्यू झालेले आहेत. हे खरे आहे. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे की एक आयुर्वेदिक पथक असून त्यांनी काही काम केलेले आहे त्या संस्थेमधील एडिटर श्री.कुलकर्णी आहेत. त्यांनी नाशिक व नंदूरबार भागात राजगि-याचे लाडू वाटण्याचा प्रयोग केला आहे. परंतु त्यांनी फक्त लाडूचेच वाटप केलेले नाही.त्यांनी राजगि-याच्या लाडू बरोबर मूग, भाताची खिचडी आणि दूध या गोष्टीचेसुध्दा वाटप केले होते. त्यामुळे लहान मुलांचे वजन वाढले होते .परंतु त्यांचे स्वत:चे स्टेटमेन्ट असे आहे की,यामध्ये आणखी सायंटिफिक इन्व्हेस्टीगेशन करण्याची आवश्यकता आहे.याबाबतीत आम्ही त्यांच्या बरोबर चर्चा करण्यास तयार आहात. कोणतीही एन.जी.ओ.चांगल्या प्रकारची उपाययोजना केली असेल,चांगले फिड तयार केले असेल आणि ते त्यांनी आय.सी.डी.एस. समोर ठेवले तर स्वाभाविकपणे त्याचा विचार केला जाईल .ज्या गोष्टी शासनाकडून होत नसतात आणि एन.जी.ओ.कडून केल्या जात असतात. प्रयोग करुन इन्व्हेस्टिगेशन करुन त्यांच्याकडे या संबंधीचे रिझल्टस आहेत आणि ते जर शासनासमोर ठेवले तर आम्ही त्यांना 100 टक्के मदत करु.

डॉ.अशोक मोडक : त्यांना चर्चा करण्यासाठी पाचारण करणार आहात काय ?

श्री.रणजित कांबळे : त्यांना चर्चेसाठी बोलाविण्यात येईल.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, हा जो कागद काल किंवा आज मला मिळाला तो महत्त्वाचा आहे. 2003 च्या पावसाळी अधिवेशनामध्ये अंगणवाड्यांसाठी पुरविण्यात येणारा पोषण आहार हाविषय आहे. त्यामध्ये शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटले आहे ते महत्त्वाचे आहे. त्यात म्हटले आहे की, ".. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पूरक पोषण आहाराचा पुरवठा करण्या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार दिनांक 27 ऑक्टोबर 2005 च्या शासन निर्णयानुसार पूरक पोषण आहाराच्या योजनेत आमूलाग्र बदल करून सदर योजना कंत्राटदारांऐवजी स्थानिक पातळीवर स्वयं सहाय्यत बचत गट आणि महिला मंडळ यांचेमार्फत राबविण्याचा तसेच राज्यातील विविध भागात तयार होणारा शेतीमाल आणि लोकांच्या खाण्याच्या सवयी विचारात घेऊन त्याप्रमाणे आहार देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. मला वाटते की याही निर्णय प्रकाशामध्ये आपण आता जो निर्णय घेतला आहे किंवा जे धोरण पत्करलेले आहे ते अमलबजावणीत्मक आहे. आपण आता आश्वासन दिल्यापमाणे जेव्हा केव्हा नजिकच्या भविष्य काळात पाचारण कराल तेव्हा मलाही बोलाविले तर मलाही यायला आवडेल इतकेच मी सांगू इच्छितो.

श्री. रणजित कांबळे : जरूर आपल्यालाही बोलाविण्यात येईल.

****

..... 6एच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : वस्तीशाळा शिक्षकांच्या मागण्या.

**मु.शी.** : वस्तीशाळा शिक्षकांच्या मागण्यांबाबत या विषयावरील ता.प्र.क्र.6785 ला दिनांक 19 जुलै 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रा.शरद पाटील,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

----

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : महोदय, 'वस्तीशाळा शिक्षकांच्या मागण्यांबाबत' या विषयावरील ता.प्र.क्र. 6785, दिनांक 19 जुलै 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, कामानिमित्त स्थलांतरीत होणाऱ्या कामगारांच्या कुटुंबातील मुलांना शिक्षण मिळावे, अशी मुले शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासनाने वस्तीशाळांची योजना आणलेली आहे. गेली काही वर्षे या वस्तीशाळांमध्ये जे शिक्षक काम करीत आहेत त्यांच्याही काही अडचणी आहेत. या वस्तीशाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांकडे शिक्षक होण्यासाठी आवश्यक असलेली अर्हता नसली तरी शिक्षक म्हणून काम करण्याची मुभा आपण त्यांना दिलेली आहे. त्यासाठी शासन त्यांना दरमहा 1000 रूपये वेतन देत आहे आणि तेही दहा महिन्यांसाठी मिळत असते. सभापती महोदय, वस्तीशाळांमध्ये काम करणारे हे जे शिक्षक आहेत त्यांच्याही काही मागण्या आहेत. त्यापैकी पहिली मागणी त्यांची अशी आहे की, त्यांना आपण जी 500 रूपये वाढ जाहीर केलेली आहे ती अद्यापही मिळालेली नाही, तरी ती त्वरित त्यांना मिळावी. ही वाढ केव्हा आपण देणार आहात ते निश्चितपणे आपण आता सांगावे. त्यांची दुसरी मागणी अशी आहे की, जे शिक्षक गेल्या 3-4 वर्षे त्या शाळांमध्ये काम करीत आहेत त्या शिक्षकांना डी.एड.ची पदविका मिळविण्यासाठी शासनाकडून परवानगी तसेच त्यासाठी प्रवेश मिळावा. त्याचप्रमाणे या वस्तीशाळांमध्ये काम करणाऱ्या अप्रशिक्षित शिक्षकांना जिल्हा परिषदांच्या रेग्युलर शाळांमध्ये सामावून घेण्याचाही निर्णय घ्यावा. त्याशिवाय वस्तीशाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी आणि हे शिक्षक यांना सर्वशिक्षा अभियानामार्फत ज्या ज्या योजनांचा लाभ इतर शाळांतील शिक्षकांना मिळतो तो लाभ मिळावा आणि या वस्तीशाळांमध्ये काम करणारे हे जे शिक्षक आहेत त्यांना 500 रूपये वाढवून दिलेले जे वेतन आहे ते मिळावे आणि इतरही शिक्षकांना मिळणाऱ्या सवलती त्यांनाही मिळाव्यात. अशा त्यांच्या मागण्या

.....6एच 2 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील ....

आहेत. तेव्हा त्यांच्या मागण्या मान्य करण्याच्या दृष्टीने आपण सहानुभूतीचा दृष्टीकोन स्वीकारावा. तसेच जी वाढ मध्यंतरी त्यांना दिलेली आहे ती त्वरित मिळावी आणि पोषण आहारासंबंधात आपण निर्णय घेतला आहे त्यानुसार दीड रूपया दरडोई देण्याचा जो निर्णय घेतला आहे ते आपण यांना केव्हा देणार आहात ? याबाबत आपण खुलासा करावा यासाठी ही अर्धा तास चर्चा मी येथे उपस्थित केली आहे.

****

...... 6एच 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, आपल्याकडील गावाबाहेरच्या छोट्या छोट्या वस्त्या, तांडे यावरील तसेच स्थलांतरित कामगारांच्या वस्त्यांमधील अनेक मुले शिक्षणापासून वंचित रहात होती म्हणून त्यांच्या वस्तीवर शाळा सुरू करण्याचा नवीन उपक्रम आपल्या देशात सुरू झाला. या वस्ती शाळांतील शिक्षकांची जी मुख्य मागणी आहे वेतन वाढीची ती अत्यंत रास्त आहे आणि म्हणूनच त्यासंदर्भात आपण 23 जून 2005 ला शासन निर्णय निर्गमित केला आणि त्यांना 500 रूपये वाढ आपण करून दिली. पण त्यांना त्याचा लाभ अजूनही झालेला नाही ही गोष्टही खरी आहे आणि म्हणूनच आता मार्च पर्यंतची वाट न पाहता मी स्वत: माननीय मुख्यमंत्री तसेच वित्त मंत्री यांना सांगून, कारण आता 6-7 महिने होऊन केले हा जी.आर.काढून पण तरीही त्यांना त्याचा लाभ मिळालेला नाही म्हणूनच मी स्वत: यासाठी कॉंटीजन्सी फंडातून हे देण्यासाठी प्रयत्न करीन इतकेच मी या निमित्ताने आपल्याला सांगू इच्छितो. सभापती महोदय, दुसरे म्हणजे त्यांना प्रशिक्षित करणे, प्रशिक्षणासाठी पाठविणे हेही आपण मान्य केले आहे. तसेच त्यांना इतर शिक्षकांप्रमाणे सेवाशर्ती प्रदान करणे अशीही त्यांची एक मागणी आहे. ही बाब ग्राह्य वाटली तरी अडचणीची आहे. तरीही मी आपल्या सोबत याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करीन आणि त्यांच्या या ज्या मागण्या आहेत त्याबद्दल सकारात्मक भूमिका आम्ही घेऊ. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 6आय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके...

मुख्य मुद्दा म्हणजे दहा महिन्यांचे मानधन 12 महिन्यांचे व्हावे अशी मागणी आहे. हे मानधन केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार मिळते. त्याबाबत शक्य झाल्यास महाराष्ट्र सरकारकडून तशी शिफारस करु आणि केंद्र सरकारकडे कन्विंस करण्यासाठी प्रयत्न करु.

प्रा. शरद पाटील : भविष्य काळात या वस्ती शाळांना नियमित शाळा म्हणून मान्यता देणार काय?

प्रा. वसंत पुरके : खरे म्हणजे नियमित शाळा म्हणून मान्यता देणे दुरापास्त आहे. त्यासाठी मुख्य प्रवाहातून मागे राहिलेल्या मुलांना तात्काळ सामावून घेतले पाहिजे. त्याकरीता सेतू शाळा, महात्मा फुले हमी शाळा, राजीव गांधी संधी शाळा याव्दारे सर्व प्रकारचे प्रयत्न करुन मुख्य प्रवाहामध्ये त्या मुलांना आणण्यासाठी हा प्रयत्न आहे. म्हणून आजच्या घडीला चटकन आश्वासन देणे योग्य होणार नाही.

श्री. रामनाथ मोते : या वस्ती शाळातील शिक्षक अनेक दिवसांपासून मागणी करीत आहेत. त्यांची मागणी मान्य होत नाही म्हणून ते हताश झाले आहेत. 12 तारखेपासून त्यांनी उपोषण सुरु कलेले आहे. आणि सामूहिक आत्महत्या करण्याचा टोकाचा निर्णय त्यांनी जाहीर केला आहे. आपल्या माध्यमातून विनंती करतो की, आपण त्या उपोषणकर्त्या कार्यकर्त्यांना बोलावून त्यांना चर्चेसाठी पाचारण करावे अशी विनंती आहे.

प्रा. वसंत पुरके : किमान 7-8 आठ वेळा अनेक लोकांबरोबर चर्चा केली आहे. चर्चा करण्यामध्ये अडचण नाही. उद्या आपण त्यांच्याबरोबर चर्चा करु. आपण उद्या त्यांच्या 5-6 लोकांना सोबत घेऊन यावे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:जे.जे रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील गैरव्यवहाराची प्रकरणे.

**मु.शी.**:जे.जे रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील गैरव्यवहाराची प्रकरणे यासंबंधी डॉ. दीपक सावंत,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :--

"जे. जे. रुग्णालयातील वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. पुरंदरे यांनी दिलेल्या पदव्युत्तर पदव्या डॉ.बन्सल यांचे स्टेंट प्रकरण, अनेक पदे रिक्त असणे, अनेक एडसग्रस्त रुग्णाची आत्महत्या, नवजात अर्भकांचे अपहरण, अनेक औषधांची गैरमार्गाने केलेली खरेदी, रुग्णांना दिले जाणारे निकृष्ट दर्जाचे जेवण, रुग्णांच्या नातेवाईकांकडून तेथील डॉक्टरांना होणारी मारहाण, एकूणच जे.जे. रुग्णालयात असलेली वैद्यकीय सुधारणांची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही".

सभापती महोदय, जे.जे. रुग्णालयाच्या बाबतीत मी ही चर्चा उपस्थित करीत आहे. जे.जे. रुग्णालयाच्या अनेक विभागात, वेगवेगळेया कामांमध्ये आज अनियमितता झाली आहे. त्यामध्ये वैद्यकीय शिक्षण किंवा हॉस्पिटलमध्ये झालेली अनियमितता असेल. अशा अनेक बाबीकडे मी आपले लक्ष वेधतो. या सभागृहामध्ये चर्चेला गेलेली पुरंदरे केस सर्वांना माहीत आहे. याच वेळी सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा श्री. सुरेश शेट्टी हे मंत्रिमहोदय होते त्यांनी याबाबत उत्तर दिले होते. आजपर्यंत त्याचे पुढे काय झाले हे माहीत नाही? पुरंदरे यांचा राजीनामा हा निलंबनाच्या काळामध्ये राज्य शासनाने स्वीकारला तो नेमका कुणी स्वीकारला याबद्दल अजूनही कोडे आहे. वास्तविक माझ्या माहितीप्रमाणे हा राजीनामा संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी स्वीकारायला पाहिजे. तसे न करता तो मंत्रालयात स्वीकारला गेला ही वस्तुस्थिती आहे. या चर्चेमध्ये बऱ्याच गोष्टी मंत्रिमहोदयांनी मान्य केल्या होत्या. यामध्ये डॉ. रेखा डावर यांनी चौकशी केली ती मान्य केली होती. आणि शेवटी माननीय उपसभापतींनी सभागृहामध्ये आदेश दिले होते की, या विषयासंबंधी मंत्रिमहोदयांनी अधिक चौकशी करावी. त्याचे प्रोसेडिंग माझ्याजवळ आहे. या प्रोसेडिंगमध्ये म्हटल्याप्रमाणे मंत्रिमहोदयांनी अधिक चौकशी केली आहे काय? या अर्धा तास

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

चर्चेच्या माध्यमातून त्या अनुषंगाने मला माहिती पाहिजे.अशाप्रकारे कोणत्या कायद्यात बसणारा राजीनामा स्वीकारला गेला? तो राजीनामा ॲथॉरिटीकडे न देता मंत्रालयात कां स्वीकारला गेला त्याविषयी प्रश्नचिन्ह आहे?. त्यामध्ये सर्वप्रकारची अनियमितता दिसते. दुसरा प्रश्न यामध्ये डॉ. बन्सल यांचे स्टेंट प्रकरण. या संबंधी दिनांक 12 डिसेंबर रोजी प्रश्न आला होता. त्यामध्ये विधानसभेत बरीच चर्चा झाली. डॉ. वैद्य आणि डॉ. बन्सल या दोघांना शासनाने निलंबित केले होते. त्यांनतर माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी लेखी उत्तरात म्हटले की, "डॉ. एम.ओ.. बन्सल आणि डॉ. एस.व्ही. वैद्य या मानसेवी प्राध्यापकांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे व या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे". वास्तविक या स्टेंट प्रकरणामध्ये अतिशय अनियमितता झाली आहे. त्याची मान्यता नसतांना ते हृदय रोग्यांमध्ये वापरले गेले होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

त्यामुळे हा जो त्यांचा ॲक्ट होता, हा माणुसकीला काळीमा लावणारा होता असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. तेव्हा याबाबतीत नेमके काय घडले आहे ? तसेच यात अनेक मुद्दे आहेत. आपली जी रुग्णालये आहेत, त्यामध्ये जे.जे. रुग्णालय हे प्रतिष्ठीत रुग्णालय मानले जाते. अनेक एडस्‌च्या रुग्णांनी आत्महत्या केली आहे. यासंबंधात जे नॉर्म्स्‌ आहेत की, एडस्‌च्या रुग्णांना कुठे ठेवावे ? तो न पाळला गेल्याने या रुग्णांनी आत्महत्या केली आहे. यामध्ये कदाचित त्यांचे कौन्सिलींग व्यवस्थित झाले नसेल, त्यांना पुन्हा समाजामध्ये जाण्याविषयी भय वाटले असेल, इतर काही कारणे असतील. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी प्रकाश टाकवा. याठिकाणी अनेक पदे रिक्त आहेत. आज आपण डॉ.बन्सल यांच्या पदावर जे डॉक्टर नियुक्त केले आहेत, ते कार्डीऑलॉजी डिपार्टमेंटसाठी फुलफ्लेज डॉक्टर नाहीत अशी माझी माहिती आहे. अशा प्रकारे एक डॉक्टर गेल्यानंतर जेव्हा दुसरा डॉक्टर येतो, तेव्हा तो वेल-क्वॉलीफाईड आणि वैद्यकीय महाविद्यालयाला साजेसा असावा असे आमचे म्हणणे आहे. कारण जे.जे.हे प्रतिष्ठीत रुग्णालय आहे. पण येथे अनेक गैरमार्गांनी औषधांची खरेदी होते. पेशंटचे जे रक्त काढले जाते, त्याविषयी देखील काही प्रश्न आहेत. आपल्याला माहिती आहे की, एका पेशंटचे जे रक्त काढले गेले, ते हिमोग्लोबीन तपासण्यासाठी बाहेरच्या लॅबमध्ये पाठविण्यात आले आणि ज्याने हे रक्त काढले तो कोणी टेक्नीशिअन नव्हता, तो बाहेरचा माणूस होता. मग तेथे या बाहेरच्या माणसाने कसा प्रवेश केला ? तसेच त्याने एकाच सुईने अनेक रुग्णांचे रक्त घेतले. तेव्हा एडस्‌ आटोक्यात आणण्याबाबत आपली भावना असेल तर अशा प्रकारची जी कृत्ये होत आहेत त्याबाबतीत काय म्हणावयाचे ? जर एखादा एडस्‌चा पेशंट असेल आणि त्याच्यासाठी वापरलेली सुई दुसऱ्या माणसासाठी वापरली गेली असेल तर ती गोष्टही योग्य नाही. तुम्ही जे.जे.ला किलींग लायसन्स दिलेले आहे का ? डिसीज स्प्रेड करण्याचे लायसन्स दिले आहे का ? हा मनामध्ये प्रश्न येतो. तसेच या रुग्णांना जे जेवण दिले जाते, ते अतिशय निकृष्ट दर्जाचे असते. माननीय मंत्री महोदय, मी स्वत: जे.जे.मध्ये जाऊन पाहिले आहे. जर आपण तेथे वापरली जाणारी चहाची पावडर हातात घेऊन चोळली तर आपल्या हाताला रंग लागतो आणि बाकीचा लाकडाचा भुसा वेगळा दिसतो. याबाबत सदनामध्ये अनेक वेळा चर्चा झाली आहे. तसेच पेशंटला जो फलहार देतो, जे केळ देतो ते किती रुपयांना विकत घेतो तर 1 रु.20 पैसे याप्रमाणे घेतो. मला वाटते की, मुंबईमध्ये फक्त

. . . .6जे-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

पंचतारांकित हॉटेलमध्ये 1 रुपया 20 पैसे याप्रमाणे केळ मिळत असेल. जर आपण जे.जे. रुग्णालयातील गरीब रुग्णांना या किंमतीप्रमाणे केळ देत असलो तर हे परत इनहयुमन आहे. दुसरा महत्वाचा प्रश्न असा आहे की, सातत्याने डॉक्टरमंडळींना होणारी रुग्णांच्या नातेवाईकांकडून मारहाण. होस्टेलमधील परवाचे प्रकरण पहावे. आपल्याकडील सगळी होस्टेल पाहिली मग ते के.ईम.असेल, वाडिया असेल, जे.जे. असेल येथील होस्टेलची काय परिस्थिती आहे ते जाऊन पहावे. तेथे डॉक्टर कोणत्या परिस्थितीत राहतात. आपणच मला काल सांगितले की, तेथे एकच गिझर होता आणि त्यामुळे आपण 10 गिझर तेथे बसविण्याबाबत ऑर्डर दिली. पण इतके दिवस काय स्थिती होती ? तेथे मारामारी झाल्यानंतर जास्त गिझर देण्याची गरज का वाटली ? त्या ठिकाणी पाण्याच्या बादलीवरुन मारामारी होते आणि बिहारी व मराठी असा वाद सुरु होतो. ज्यावेळी पेशंटची तपासणी केली जाते आणि तो मृत झाल्याचे जाहीर केले जाते त्यानंतर त्यांना नातेवाईकांकडून मारहाण होते. पण आज जे.जे.मध्ये डॉक्टरांसाठी सिक्युरिटी नाही. डॉक्टरांनी कसे काम करावे ? कोणत्या मानसिकतेमध्ये काम करावे ? उद्या जर पेशंट मेला तर त्याचे नातेवाईक येऊन आपल्याला मारणार अशा भयाच्या वातावरणामध्ये डॉक्टर काम करु शकत नाहीत. जर डॉक्टर भयमुक्त वातावरणात काम करु शकणार नसेल तर तो पेशंटला ट्रिटमेंट काय देणार? आपण बाकीच्या हॉस्पीटलमधील हॉस्टेलची परिस्थिती काय आहे ते पहावे. तेथे उंदीर,घुशी फिरत आहेत. एकच टयुब आहे आणि ती कधी लागते तर कधी लागत नाही. अनेक वेळा जे. जे. हॉस्पीटलचे टेलिफोन कट होतात. इलेक्ट्रीकचे बील भरले नाही म्हणून पॉवर कट होते अशा अनेक गोष्टी आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, मी जेवढे मुद्दे उपस्थित केले, त्यावर एकच उपाय आहे की, जे.जे.चे ॲडमिनिस्ट्रेशन सुधारले पाहिजे. यासाठी आपल्याला ज्यांना बदलावयाचे असेल त्यांना बदलावे. तेथे चांगला माणूस आणावा. मग तेथील डीन बदला किंवा ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफीसर बदला. तसेच या सर्व कारभाराची चौकशी करण्यासाठी आपण एक समिती नेमावी आणि त्याचा रिपोर्ट या सदनासमोर ठेवावा. आणखी एक मुद्दा आहे की, जे.जे.मध्ये अर्भक पळविण्याचे प्रकारही होतात. नुकतेच जन्माला आलेले छोटे बाळ पळविण्याचे देखील प्रकार एक-दोन वेळा झाले आहेत आणि हे लक्षात आले म्हणून आपण एक-दोनदा असे म्हणत आहोत. कदाचित असे अनेक झाले असेल तर ते कोणाला माहिती आहे ? जे.जे.मध्ये लोकांची गर्दी वाढतच आहे.........

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (पुढें सुरु...

जे.जे.रुग्णालयातील परिचारिकांचा प्रश्न फार मोठा आहे. त्यांच्या प्रॉव्हीडेंट फंडाचे पैसे कोठे गेले माहीत नाही. सन्माननीय राज्यमंत्री श्री.कांबळेसाहेब, आपण हात जोडू नका तर आपण जे.जे.रुग्णालयामधील व्यवस्थापकाला हात जोडा. या सर्व गैरप्रकाराची -मग बाहेर इन्व्हेस्टीगेशन करण्याची पध्दती असू दे, डॉ. बन्सलची केस असू दे. डॉ. पुरंदरेंची केस असू दे, मारहाणीची केस असू दे, लोकांना सिक्युरिटी देण्याचा प्रश्न असू दे. या सर्वांची चौकशी करण्यासाठी एक स्वतंत्र समिती नेमून जे.जे.रुग्णालयातील ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये आमुलाग्र बदल करणार आहात काय ? हा या चर्चेचा हेतू आहे.

**तालिका सभापती ( श्री.विलास अवचट)** : समितीच्या अहवालाचा कालावधी किती असणार आहे,हेही विचारावे.

डॉ.दीपक सावंत : अहवालाचा स्पेसिफिक एक महिने, दोन महिने असा कालावधी मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात सांगावा.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत साहेबांनी जे.जे. रुग्णालयाच्या संबंधाने काही प्रश्न उपस्थित केले. त्यामध्ये डॉ.पुरंदरे यांच्या संबंधीचा एक प्रश्न उपस्थित केला. डॉ.पुरंदरे यांच्या संबंधाने सभागृहामध्ये चर्चा झ ाली त्यावेळी मी आश्वासन दिलेले होते, त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. मी सांगू इच्छितो की, डॉ.पुरंदरे विरुध्द 5-5-2004 ला एफ.आय.आर. दाखल झालेला होता. तशीच त्यांची केस सी.पी.एस. आणि एम.सी.आय. ला इन्फॉर्म केलेली होती. विद्यार्थ्यांच्या थिसेसच्या संबंधात गैरप्रकार केल्याचे सिध्द झाले होते. या संदर्भात कमिटी नेमून चौकशी होईल अशाप्रकारचे आश्वासन दिलेले होते. त्याप्रमाणे आमचे जॉइन डायरेक्टर डॉ.एच.आर.नगराळे त्यांची कमिटी नेमली होती. त्यांचा रिपोर्ट तयार असल्याचे मला कळले. तो रिपोर्ट त्यांच्याकडून आल्यानंतर त्याबाबतची कारवाई करु. त्यानंतर डॉ.बन्सल संबंधी दोन्ही सभागृहामध्ये चर्चा झाली. आरोग्य मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील साहेबांनी आश्वासन दिले होते की, आम्ही रिटायर्ड हायकोर्ट जज्जद्वारा या प्रकरणी चौकशी करु. त्याप्रमाणे डॉ.पी.एन.पाटणकर रिटायर्ड हायकोर्ट जज्ज यांना 18-5-2005 मध्ये नेमले.त्यांची 29-9-2005 ला बैठक झाली. ते डॉ.बन्सलसंबंधी अहवाल सादर करतील, त्यानंतर आपण त्यांच्यावर कारवाई करु . दुसरा प्रश्न डॉ.दीपक सावंत यांनी एड्सग्रस्त पेशंटनी आत्महत्त्या केल्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला. दोन-तीन अशाप्रकारच्या केसेस झल्यानंतर मी स्वत: त्या ठिकाणी भेट दिली. मी एच.आय.व्ही. बाधित एड्स पेशंटशी चर्चाही केली. एक तरआपण एड्स पेशंटसाठी स्वतंत्र वॉर्ड करु शकत नाही. This is against the norms laid down internationally. आपण त्यांना सेग्रिगेशन करु शकत नाही. कारण...It will be stigma on the Aids patients असे आयडेंटीफाय होतात, त्यांना कॉमन वॉर्डमध्ये, जनरल वॉर्डमध्ये दुसऱ्या पेशंट सोबतच ठेवायला लागते. एक तर एड्स पेशंटना एड्स झालेला आहे याची माहिती होते तेव्हा त्यांची मानसिकता बदलते. त्यांना शॉक बसून ते डिप्रेशनमध्ये येतात. खरे म्हणजे त्यांना कौन्सिलिंगची गरज असते They require counseling from the Government hospitals, from the family members and friends. मुंबईमध्ये मध्यमवर्गीय,खालचे गरीब, दारिद्र्यरेषेखालील पेशंट येतात, त्यांना एड्स आहेत, एच.आय.व्ही.आहे हे माहीत होते तेव्हा पेशंटस आणि फॅमिली मेंबर या दोघंनाही कौन्सिलिंगची गरज असते. जे.जे.रुग्णालयामध्ये 50-60 अशाप्रकारच्या रोज केसेस येतो.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.सुरेश शेट्टी (पुढे सुरु...

आपल्याकडे कौन्सिलिंग आहेत त्यामध्ये आपण कमी पडतो हे मान्य करतो. एड्स फिल्डमध्ये जे एन.जी.ओ. काम करतात, त्यांना बोलावून त्यांच्यासोबत बैठक घेतली.

यानंतर कु.थोरात...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी..

त्यांना सांगितले की, स्पिरिच्युअल कौन्सिलिंग प्लस मेडिकल कौन्सिलिंग दोन्हीची तेथे प्रोव्हिजन करण्यात आलेली आहे. बाकीच्या एन.जी.ओं.ना इनव्हाईट करुन हॉस्पिटलमध्ये एड्स पेशंटसोबत काम करण्याची ॲपॉर्च्युनिटी त्यांना प्रोव्हाईड करीत आहोत. या ठिकाणी डॉक्टर्स सेक्युरिटीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यासंदर्भात मध्यंतरी अशी एक घटना घडली होती. मार्डवाले स्ट्राईकवर गेले होते. मी त्यासंदर्भात बैठक घेऊन तो स्ट्राईक कोलॅप्स केला. हे खरे आहे की, जे.जे. रुग्णालयातच नव्हे तर प्रायव्हेट हॉस्पिटल असेल, डिस्पेन्सरी असेल, लहान क्लिनिक असेल, मॅटर्निटीहोम असेल त्याठिकाणी गेल्या एका वर्षात बरीचशी प्रकरणे झालेली आहेत. प्रायव्हेट हॉस्पिटलने 10 हजार रुपयाचे बिल दिले तर त्यावर चर्चा करुन त्यासंबंधात मारपीट करण्यात येते. रुग्णाचा मृत्यू झाला तर तो मृतदेह सोडून जातात आणि ये हमारा कोई पहचान का नही. हमारा बाजूवाला था.इसलिए हम ले के आये थे.हमको मालूम नही ये कौन है. तुम बॉडी दो. हम ले जाएंगे. हमारे पास पैसा नही है. असे सांगतात. संपूर्ण मुंबईतील असे प्रकार शासना समोर आलेले आहेत.त्यासंदर्भात स्पेसिफिकली जे.जे. रुग्णालयात होमगार्डचे असिस्टंन्ट घेऊन होमगार्डची स्पेशल डयुटी राऊंड द क्लॉक लावण्यात आली आहे. ओ.पी.डी.मध्ये ऑपरेशन थिएटरजवळ, गेटजवळ त्यांची डयुटी लावण्यात आली आहे. डॉ. लहानेंना सिक्युरिटीचे इंचार्ज करुन त्यांच्याकडून सिक्युरिटीचा एक नवीन प्लॅन करुन घेतला आहे. त्यानुसार काही गेट बंद केले आहेत तर काही गेटमधून एंट्री रिस्ट्रिक्टेड केलेली आहे आणि जनरल पब्लिकला आतमध्ये येण्याचे टाईम ठरविलेले आहे. गाडीचे पार्किंग वगैरेच्या बाबतीत सुधारणा करण्यात आलेली आहे. हा बदल जे.जे. हॉस्पिटलमध्ये नक्की झालेला आहे. तेथे 62-63 सिक्युरिटी गाड्र्स आहेत. सिक्युरिटी गार्डसच्या 50 पोस्ट सॅक्शंन आहेत. त्या पोस्ट भरण्यात येणार आहे. जे.जे. हॉस्पिटलचा कॅम्पस एरिया खूप मोठा आहे. त्या ठिकाणी सात-आठ गेट्स आहेत त्यामुळे नागरिक त्या ठिकाणी कुठून येतात आणि कुठून जातात याचा कोणाला पत्ता लागत नाही. म्हणून यासंदर्भात एक मिटिंग घेऊन त्या ठिकाणी प्रायव्हेट सिक्युरिटी नेमण्याच्या प्रॉबेबलिटीची ट्राएल घेत आहोत. तो प्रयत्न आम्ही करु. तरी सुध्दा सेक्रेटरी मेडिकल एज्युकेशन यांना या संबंधात अभ्यास करण्यास सांगितले आहे. जे.जे. रुग्णालयाची सेक्युरिटी कशी असली पाहिजे ? या संदर्भात मुंबई पोलिसांनी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ 23:20

श्री. सुरेश शेट्टी...

या आधी एक प्लॅन दिला होता. त्याबाबतीत लोकल डी.सी.पी. सोबत बसून नवीन सिक्युरिटी प्लॅन संपूर्ण जे.जे. कॉम्प्लेक्ससाठी तयार करु. त्यात ॲडिशनल सिक्युरिटी गार्डर्स प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीची गरज पडली तर ती सुध्दा नेमण्याची शासनाची तयारी आहे.या ठिकाणी जेवणासंबंधीचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. लोकल फुड कमिटीचे असोसिएट डिन हे चेअरमन आहेत. डायटिशिएन आहेत. ती एक कमिटी आहे. ते यासंदभ्‍ारत बघतात आणि इन्स्पेक्शनही करतात. तेथे जे आर.एम.ओ. आहेत ते रोज फुड टेस्टिंग करुन नंतर रुग्णांना देतात. (अडथळा) या संदर्भात आता पर्यंत रुग्णांकडून किवा स्टाफकडून काही तक्रार आलेली नाही. पण अशी काही तक्रार असेल तर त्याची चौकशी करण्यात येईल. त्यामध्ये काही अडचण नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या संदर्भात ऑलरेडी एक कमिटी नेमण्यात आलेली आहे. डॉ. यसुदी, टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स यांच्या अध्यक्षतेखाली 6 लोकांची दि. 3.11.2005 ला एक कमिटी नेमली आहे. डॉ. डी.पी.व्यास, मुंबई हॉस्पिटल, डॉ. विजयकुमार, डायरेक्टर,जसलोक हॉस्पिटल, डॉ. प्रमोद लेले,सी.ओ. हिंदुजा हॉस्पिटल, डॉ. क्षीरसागर,डॉ. यवलेकर, डॉ. ओक. अशी ही सहा लोकांची समिती आधीच नेमण्यात आलेली आहे. त्यांना आपण मॅंडेड दिलेले आहे की, जे.जे.हॉस्पिटलच्या ॲडमिनिस्ट्रेशनसंबंधी आणि रुग्णांसाठी ज्या सुविधा उपलब्ध आहेत त्यामध्ये आणखी काही दुरुस्ती करावयाची आहे काय ? यासंदर्भात रेकमेंडेशन करण्यासाठी एक समिती ऑलरेडी नेमली आहे. त्यांना तीन महिन्याच्या आत रिपोर्ट द्यायला सांगू. यासंदर्भात मी मुंबईच्या संबंधित आमदारांना बोलवायला तयार आहे. या हॉस्पिटलसाठी सन्माननीय आमदार श्री. बशीर पटेल यांच्या अध्यक्षतेखाली एक व्हिजिटर्स समिती नेमण्यात येणार आहे. मुंबईच्या सर्व संबंधित आमदारांना तसेच यामध्ये इंट्रेस्टेड असलेल्या आमादारांना बोलावेन आणि या समितीचा अहवाल आल्यानंतर आपण सगळे बसून त्यावर चर्चा करु. आमचा इंट्रेस्ट आहे की, हे जे.जे. हॉस्पिटल आज पर्यंत केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर ...

यानंतर श्री. खर्चे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MHM/ SBT/ पूर्वी कु. थोरात.... 23:25

श्री. सुरेश शेट्टी .......

तसेच सन्माननीय सदस्यांच्या ज्या सूचना व शिफारशी असतील त्या स्वीकारण्यास मी तयार आहे.

डॉ. दीपक सावंत : प्रायव्हेट लॅबमध्ये रक्त तपासणीसाठी पाठविले होते त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी कृपया द्यावे.

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, हे खरे आहे की, प्रायव्हेट लॅब टेक्निशियनला जे.जे. हॉस्पीटल्याच्या वॉर्डात पकडले होते, त्याची संपूर्ण तपासणी केली असता त्यासंदर्भात हॉस्पिटलमधील डॉ. निखिल आकर्डेकर यांना वॉर्निंग इश्यू केले आहे. तसेच डॉ. गिरीष बक्षी आणि डॉ. अभिषेक रंजन यांच्यावर देखील आम्ही कारवाई केली आहे.

डॉ. दीपक सावंत : महोदय, डॉ. पुरंदरे यांच्या चौकशीसाठी सहाय्यक संचालक श्री. नगराळे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली, डॉ. बन्सल यांच्या चौकशीसाठी निवृत्त न्यायाधिशांची समिती नेमली तशी समिती डॉ. पुरंदरे यांच्या चौकशीसाठी नेमणार काय ? त्याचप्रमाणे होमगार्ड्सच्यासंदर्भात आपण सांगितले परंतु ती सिक्युरिटी पुरेशी नाही, कारण जे.जे. हॉस्पिटलच्याच प्रिमायसेसमध्ये पोलीस स्टेशन असतांनाही अशा प्रकारच्या घटना तेथे घडतात. म्हणून ज्या ठिकाणी कॅज्युएल्टी विभाग आहे त्याच ठिकाणी प्रामुख्याने अशा मारहाणीच्या घटना घडतात म्हणून त्याच ठिकाणी एक कायम स्वरुपी पोलीस चौकी तयार करण्याबाबत पोलीस विभागाला विचारणा करणार काय ? तसेच ज्यावेळी राष्ट्रपती आपल्याकडे आले होते त्यावेळी जे.जे. हॉस्पिटलचे एक डॉक्टर बेशुध्द पडले होते, त्याच डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली आहे. वास्तविक त्या डॉक्टरची त्यात चूक नाही, Because of the prolonged standing, he was fainted. तरी देखील त्यांच्यावर कारवाई झाली, ती कारवाई शासन मागे घेणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : डॉ. पुरंदरेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे, त्यांचा गुन्हा सिध्द झालेला आहे. तसेच जी समिती नेमण्यात आली ती डॉ. नगराळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमली आहे. माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न राष्ट्रपतींच्या दौ-याच्या वेळी जे डॉक्टर बेशुध्द पडले होते त्यांच्यावर जी कारवाई करण्यात आली त्यासंबंधात विचारलेला आहे, मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात देखील एक समिती नेमण्यात आलेली आहे. They are going to recommend what action should be taken in this respect. There is no doubt that he has committed a mistake and whatever mistake he has committed, he will be punished for that. 

( .........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : मंत्रालयात त्यांचा राजीनामा स्वीकारण्याचे कारण काय ?

श्री. सुरेश शेट्टी : Ultimately, we are going to take action. He is a honourary doctor. We are not against him. दुसरे म्हणजे सिक्युरिटी गार्डसंबंधी मी अगोदरच सांगितले की, स्थानिक पोलिस स्टेशनच्या डी.सी.पी. बरोबर चर्चा करुन संपूर्ण जे.जे. कॉम्प्लेक्ससाठी नवीन सिक्युरिटी प्लॅन तयार करीत आहोत व त्यानुसार त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. पोलिसांना मदत करण्यासंबंधी देखील विनंती करण्यात येईल. तिसरी गोष्ट म्हणजे डयुटीमध्ये जे प्रकार घडतात ते गंभीर आहे. That was a lapse on the part of the concerned doctor. Taking into consideration the prestige and security concerning the President of India, we should not tolerate any doctor whosoever he may be to play with the prestige and security of the President of the country and the person concerned should be duly punished.

**तालिका सभापती (श्री. विलास अवचट) :** आता अर्धा-तास चर्चा संपली आहे. बुधवार दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजीचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असेल :--

1. सकाळी 10.15 ते दुपारी 12.45 पर्यंत अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल.

2. दुपारी 1.00 वाजता प्रश्नोत्तराचा तास व त्यानंतर अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल.

आता सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन बुधवावार, दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी दुपारी 10.15 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक रात्रौ 11 वाजून 30 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 14 डिसेंबर, 2005 च्या सकाळी 10.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही